
रंगांधळा
रत्नाकर मतकरी


रंगांधळा
रत्नाकर मतकरी

रंगांधळा

रत्नाकर मतकरी



मेहता पब्लिशिंग हाऊस

मतकरींची गूढकथा

'रंगांधळा' हा त्यांच्या एकूण कथालेखनाचा एक cross-section म्हणता येईल. या निमित्ताने मतकरींच्या गूढकथांचा साकल्याने विचार करणे प्रस्तुत ठरेल.

कवितेने नव्हे तर एकांकिकेने आपल्या लेखनाला प्रारंभ करणाऱ्या मतकरींना गूढकथेचा वेध लागला, हे उमजण्याजोगे आहे. रहस्यमयता व नाट्यात्मता हे मतकरींच्या प्रतिभेला खास वेधून घेणारे विशेष आहेत; किंबहुना ते त्यांचे आत्माविष्काराचे स्वाभाविक माध्यम आहे. मतकरींच्या बऱ्याच एकांकिकातून प्रवाही असलेली रहस्यमयता (अर्थात नेहमीच व पूर्णत: घटनांच्या व तपशीलांच्या पातळीवरील नव्हे) आणि गूढकथेची नाट्यात्म, रहस्यगर्भ अभिव्यक्तिप्रकृती ध्यानात घेतल्यास या दोन लेखनप्रकारातील अंत:सूत्र स्पष्ट होईल. मतकरींच्या गूढकथातील दृश्यात्मकता, नेपथ्ययोजना, इत्यादीतून त्यांच्यातील एकांकिकाकार सहज दिसून येतो.

कवितेची जातकुळी सांगणाऱ्या ज्या परीकथालेखकाने मतकरी प्रथम कथेकडे वळले ती परीकथा व गूढकथा या दोहीतही एक आंतरिक संगती आहे. दोहीतही अद्भुत अकल्पिताची बोली आहे. अद्भुताचे, अतिमानुषाचे व रहस्यमयतेचे Lyrical, कल्पनारम्य रूप परीकथेत साकार होते तर त्याचेच भयकारक रूप गूढकथेतून समोर येते. परंतु दोहीतली मानवी जीवनाचे व व्यक्तिमनाचे वास्तव आणि त्यांशी अपरिहार्यपणे जडलेले कारुण्य यांचा संदर्भ सतत जागा असतोच.

वस्तुत: परीकथा, गूढकथा ही नावे सोयीसाठी वापरायची. मूलत: त्या कथाच. कथात्मता ही विविध रूपांनी व विविध शैलीतून प्रकट होऊ शकते. परीकथा वा गूढकथा ही कथेचीच वैशिष्ट्यपूर्ण रूपे. अनुभवदर्शनासाठी कथाकार विविध माध्यमे योजू शकतो. अद्भुत वा गूढ हे केवळ एक मध्यम असते, याचे भान ठेवले पाहिजे. ('खरं सांगायचं म्हणजे' आणि 'माणूस परी आणि कासव' या गंगाधर गाडगीळांच्या आकांक्षी प्रयत्नांचा इथे उल्लेख करता येईल.)

गूढकथेचा विचार करताना एक अगदी प्राथमिक गोष्ट नोंदली पाहिजे ती ही की, भुतांच्या गोष्टी व खुनांच्या गोष्टी म्हणजेच चित्तथरारक, भयोद्दीपक रंजक वाङ्मय या दृष्टीने गूढकथेकडे पाहणे गैर आहे. ('रहस्यकथा' या नावाखाली जे वेळ घालविण्याचे, करमणुकीचे साहित्य मराठीत उपलब्ध आहे त्याचे गूढकथेशी कोणतेच नाते नाही.) रंजक वाङ्मय असा सहसा शिक्का मारून वा कसबी लेखन, कारागिरीसदृष्य रचना म्हणजे गूढकथा असे समीकरण मांडून गूढकथा हा लेखनप्रकार बाजूला सारणे हे वाङ्मयाच्या विविध अंगांनी होणाऱ्या विकासाच्या दृष्टीने अहितकारक आहे. काही सन्मान्य अपवाद वगळता अलीकडच्या कथेत जी एक कुंठितता आढळते, त्या संदर्भात असे वाटते की कथेच्या अभिव्यक्तिक्षमतेच्या विकासाच्या दृष्टीने विविध माध्यमांची व शैलीची योजना स्वागतार्ह ठरेल.

तसे पाहू गेले तर, कोणतीही उत्कृष्ट वास्तवदर्शी कथा ही एक व्यापक अर्थाने गूढकथाच असते. कारण अखेर तीही मानवी मनाच्या व जीवनाच्या गूढतेचीच प्रचीति आपल्याला घडवीत असते. तसेच कोणतीही दर्जेदार गूढकथा ही अद्भुताची, प्रसंगी अतिमानुषाची योजना करीत असली तरी ते अतिमानुष वा अदभूत वास्तवलक्षीच असते.

गूढकथेतील अतिमानुष हे आधी म्हटल्याप्रमाणे वास्तवाभिव्यक्तीचे एक माध्यम असते. माणसाच्या मनातील असंख्य, गूढ प्रेरणांना नियतीच्या अतर्क्य, कूट न्यायांना अतिमानुष,, भयावर आकार लाभू शकतात. वास्तवतेविषयीची आपली संकल्पना प्रगल्भ असली तर अतिमानुषाची बाधा वास्तवाला होऊ नये.

गूढकथा ही अशा प्रकारे व्यावहारिक पातळीवरल्या गूढाकडून तात्त्विक पातळीवरच्या गूढाकडे आपल्याला नेत असते. वाचकाला गूढाचा प्रत्यय घडविणे अज्ञातविषयीचे भय त्याच्या मनात जागविणे, भयाचा व रहस्यमयतेचा ताण त्याला अनुभवायला लावणे, हा गूढकथेच्या संपूर्ण अनुभवातला तो एक टप्पा किंवा एक अवस्था मानावी लागेल. हा प्रत्यय एवढेच गूढकथेचे लक्ष्य नव्हे. या प्रत्ययाद्वारे वाचकाला

जीवनातील व्यक्तिमनातील गूढतेकडे नेण्याची ताकद गूढकथेत असते. असली पाहिजे, मतकरींनी या दिशेने अर्थपूर्ण प्रयत्न केला आहे. हे त्यांच्या कथालेखनातून दिसून येईल.

अतिमानुषाचे माध्यम मतकरीं आपल्या गूढकथातून अनेकवार योजिलेले आहे. या माध्यमाच्या उपयोयनेतील विविध शक्यता ते अजमावून पाहतात. हे अतिमानुष प्रतिकात्म पातळीवरच मूलत: आपल्याला भावते. माणसाच्या अंतर्मनाचे, त्याच्या सुप्त, गूढ, अंतस्थ प्रवृत्तीप्रेरणांचे रूप त्यातून आपल्या प्रत्ययास येते. घटनात्मक ग्रंथ असूनही म्हणूनच या कथा मूलत: मनोदर्शनात्मक वठल्या आहेत.

कारुण्याच्या प्रत्ययाकडे नेणारे भाव त्यांच्या बऱ्याच कथातून आढळते. 'जळमटं'सारख्या कथेत तर भयाचा प्रत्यय अगदी क्षीण किंवा नाममात्र आहे. या कथेतील पांढकपेशा म्हाताऱ्या निरपत्य जोडप्याच्या जीवनातील भकास पोकळी मृत्यूनंतरही मिटत नाही, मरणोत्तर अस्तित्वातही हे न्यून त्यांना पछाडते. ही वस्तुस्थिती विद्ध करणारी आहे. या जोडप्याच्या वात्सल्याच्या भुकेचा जिवंतपणी व मरणोत्तरही जो कोंडमारा होतो त्यातील कारुण्य आपल्याला पछाडून टाकते. त्यांच्या जीवनातील शून्य भकासपणा व विटलेपण ह्यानीच इथं अतिमानुष आकार (वस्तुत: निराकार) धारण केले आहेत. या भुतांचे दु:ख, त्यांची असहाय्यता इतकी मानवी आहे की, ही कथा अखेर माणसांचीच ठरते, भुतांची नव्हे.

भुते ही भयकारक किंवा केवळ भयकारक नव्हेतच. भयावहता हा त्यांच्या व्यक्तिदर्शनाचा फक्त एक घटक झाला. अनेकपदरी, अनेक पैलू असलेली व्यक्तित्वे घेऊन ही भुते आपल्यासमोर ठाकतात. आणि ही व्यक्तित्वसंपन्नता स्वाभाविकच आहे. कारण अखेर ही भुते माणसांचीच आहेत आणि भुते झाल्यानंतरही ती आपले मूलभूत 'माणूसपण' सोडत नाहीत.

काही कथातून अवतरणारे अतिमानुष मात्र असे मानवी नसते. ते अगदी निखळपणे व केवळ अतिमानुषच असते. केवळ अद्भुताच्या पातळीवरच आकारणारे आणि फक्त अज्ञाताशीच नाते जोडून असलेले हे अतिमानुष वाचकाला अन्य कशातही न गुंतवता केवळ भयाचाच प्रत्ययाय घडविते. 'ती दोन मुलं'सारख्या कथेचा या निमित्ताने उल्लेख करता येईल. मानवी प्रश्नात न गुंतवता रक्त गोठवणाऱ्या भयाचाच केवळ प्रत्यय देणाऱ्या मतकरींच्या या प्रकारातल्या काही कथा विलक्षण झपाटणाऱ्या आहेत. त्यांचा अंगुलिनिर्देश फक्त अज्ञाताकडे आहे. अज्ञाताविषयीचे भय हे भयभावनेचे सर्वाधिक पुरातन व प्रखर रूप म्हणावे लागेल. या भयाला स्थलकालसापेक्षतेचे परिमाण नाही. ते सनातन आहे, विशुद्ध आहे आणि म्हणूनच कदाचित सर्वाधिक तीव्र आहे. मात्र अशा कथा मतकरींच्या एकूण लेखनात मोजक्याच आहेत.

मतकरींच्या गूढकथालेखनातून गूढाचा व भयाचा विविध पातळ्यांवर, विविध स्वरूपात व विविध माध्यमातून प्रत्यय घडतो. हे श्रेय त्यांच्या कथेतील ताजेपणाचे गमक ठरते. त्यांची अलीकडची 'रंगांधळा' ही कथा हेच दर्शविते. रंगांशी निगडित असलेल्या परिचित संवेदनांना उफराटे करून त्यांच्या गुदमरून टाकणाऱ्या, माणसाला बंदी करून टाकणाऱ्या सळसळत्या प्रवाहात लेखक आपल्याला खेचून घेतो. स्त्रीपुरुषातील नाजुक गुंतवणुकीला शापित रूप देणारी यातील भयावह गूढता सूक्ष्म, पाय न वाजवता मनात शिरणारी पण जीव कोंडून टाकणारी आहे. रंगांचा येथे अगदी अनपेक्षित तऱ्हेने त्यांनी माध्यम म्हणून उपयोग केला आहे. या निमित्ताने स्मरण होते ते मतकरींनी गूढाच्या प्रत्ययाकरिता निसर्गाची ज्या प्रकारे योजना केली आहे त्याचे. अगदी क्वचितच त्यांनी त्याला अतिमानुष रूप दिले आहे. परंतु बहुधा नाट्यानुभवाचे एक अविभाज्य अंग बनलेल्या नेपथ्यासारखा निसर्ग हा त्याच्या गुढानुभवाचे एक महत्त्वपूर्ण अंग बनून राहिला आहे. मतकरी आपल्याला जाणवलेले अर्थपूर्ण जीवनानुभव व्यक्त करण्यासाठी गूढ कथेतील विविध शक्यता शोधीत आहेत आणि त्यातून त्यांच्या कथातील रचनाबंधांचे, निवेदनशैलीचे, माध्यमांचे वैचित्र्य उद्भवत आहे ही गोष्ट महत्त्वपूर्ण आहे.

मतकरींच्या गूढकथातील वैचित्र्य बहुधा मूलत: अनुभवरूपातील वैचित्र्यातून आलेले आहे. कधी दंतकथेचे माध्यम ('म्हातारीची तरुण मुलगी') तर कधी लोककथेचा ढंग. कधी एखाद्या बौद्धिक कोड्यासारखी जाणीवपूर्वक रंगहीन केलेली रचना ('बाकी राहिला काळोख') तर कधी भावस्पर्शी नाट्यात्मता, कधी निखळ संवादांच्या तुकड्यांचेच रचनाबंध ('हातमोजे') तर कधी साधे, सरळ कथन, हे आणि असे अभिव्यक्तीतील

विविध प्रकार त्या त्या विशिष्ट कथेतील आशयाच्या गरजेतून येतात. म्हणूनच ते अर्थपूर्ण ठरतात. हेच भाषेच्या संबंधातही म्हणता येईल. संयत, सूचक शैली आणि भाषेतील सहज प्रवाहिता व स्वाभाविकता हे विशेष सामान्यत: त्यांच्या सर्वच कथातून दिसून येतात. परंतु आशयानुसार रूप बदलण्याचा जो लवचिकपणा तिच्यात आहे, तो विशेष श्रेयस्कारक ठरला आहे.

वैचित्र्याच्या संदर्भात मतकरींच्या व्यक्तिचित्राचा विचार करता जाणवते की, भिन्नभिन्न स्तरातील, वयाच्या व भिन्न प्रकृतिधर्म असलेल्या त्यांच्या व्यक्तिरेखांचा आवाका बराच विस्तृत आहे. त्यांनी रेखाटलेल्या लहान मुलांच्या व्यक्तिचित्रांचा खास निर्देश करावासा वाटतो. पण त्या सर्वांहून एक अगदी वेगळे टोक म्हणजे पिशाच्चरूप असलेली अश्राप, दीन, भिकारी वेषात प्रकटलेली 'ती दोन मुलं!' या विविध व्यक्तिरेखातील वैशिष्ट्यपूर्णता व वैचित्र्य वेधक आहे. वैचित्र्याला केवळ वैचित्र्य म्हणून मोल असत नाही. परंतु गूढमय चित्रणातील विविध शक्यतांचा वेध घेताना अपरिहार्यपणे जर हे वैचित्र्य निष्पन्न होत असेल तर ते निश्चितच अर्थपूर्ण ठरते.

गूढकथा हा एक असा लेखनप्रकार आहे की, जेथे फसगतीच्या (वाचकाच्या नव्हे, लेखकाच्या) अनेक शक्यता संभवतात. गूढता वा रहस्यमयता ही केवळ घटनांच्या, तपशिलांच्या पातळीवरच स्थिरावू शकते. गूढतत्त्व निव्वळ रंजनाच्या पातळीवरच राबवले जाऊ शकते. वाचकाला चकवा घालणारी, केवळ चतुर रचनाबंध साधणारी well made कथा सिद्ध होऊ शकते. मानवी अंतर्मनातील गूढतेला स्पर्श न करता वरवरच्या स्वभावदर्शनात ती रंगू शकते. परंतु असे लेखन ललितसाहित्यात जमा होत नाही.

अशा चतुर रचनांची फसगतीची वाट चुकवून गूढभयचित्रणातील कलात्मक शक्यतांचा वेध मठकरी यापुढेही समर्थपणे व अनेक परींनी घेत राहतील, अशी उमेद त्यांच्या आजवरच्या कथालेखनाने निर्माण केली आहे.

रत्नाकर मतकरी यांचे कथासंग्रह

खेकडा
निजधाम
फाशी बखळ
कबंध
संभ्रमाच्या लाटा
मध्यरात्रीचे पडघम
रंगांधळा
मृत्युंजयी
स्वप्नातील चांदणे
निर्मनुष्य
फॅन्टॅस्टिक (पुनर्संकलन)
रत्नाकर मतकरींच्या निवडक गूढकथा (पुनर्संकलन)
एक दिवा विझताना...
दहाजणी
संदेह
अवचिन्ह (पुनर्संकलन)
विलक्षण (पुनर्संकलन)
ऐक...टोले पडताहेत!
अंश
अपरात्र (पुनर्संकलन)
झपाटणाऱ्या गोष्टी (पुनर्संकलन)
हसता–हसविता
रंगयात्री
बारा-पस्तीस
बाळ, अंधार पडला! (पुनर्संकलन)
माणसाच्या गोष्टी (पुनर्संकलन)

अनुक्रम

रंगांधळा
वारस
पुलावरचा माणूस
बाकी राहिला काळोख
चिखल
हातमोजे
हेड-स्टडी
ती दोन मुलं
तव्याकाङ्गची हिरवळ
झुंबर
म्हातारीची तरुण मुलगी
इंटरव्ह्यू
वशीकरण
जळमटं
तडा गेलेली काच

रंगांधळा

मी तिला न्याहाळीत होतो.....

ती एकटीच एका कोपऱ्यात बसली होती.

शांत. सस्मित.

हातात एक ग्लास. त्यातले मद्य ती अगदी सावकाश, ओठदेखील ओले होणार नाहीत, इतक्या हलकेच पीत होती.

पार्टी ऐन रंगात आली होती.

बडीबडी धेंडे जमलेली. खाण्याच्या बश्या आणि मद्याचे ग्लासेस भराभर रिकामे होत होते. शुभ्र पोशाखातले सेवक ते तत्परतेने भरत होते.

वातावरणात सिगरेटचा धूर मिसळला होता.

आवाज... कोलाहल... प्रत्येकजण शेजाऱ्याला तावातावाने काहीतरी पटवून देत होता. मनातले विचार बीअरवरच्या फेसासारखे पृष्ठभागी उफाळून येत होते. दुसऱ्याला आग्रहाने सांगितले जात होते. नशेत तारस्वर लागत होता. बोलत सगळेच होते. ऐकत कुणीच नव्हते.

ती एकटी मात्र कान देऊन ऐकत असल्यासारखी एकाग्र बसली होती. जणू काही एकमेकांत गुरफटलेले आवाज वेगवेगळे करण्याचा कसलातरी गमतीदार खेळ ती खेळत होती. त्यात गंमत वाटून स्मित करीत होती. मी वेडावल्यासारखा ते स्मित पाहात होतो. तिच्याकडे नि:संकोचपणे सरळ पाहायला हरकत नव्हती. ते तिला कळण्यासारखे नव्हते.

कारण ती आंधळी होती.

डोळ्यांवर गडद काचांचा फॅशनेबल चष्मा चढवून तिने आपले वैगुण्य लपवले होते.

प्रयोगशाळेत डोळ्यांत अॅसिड जाऊन तिची दृष्टी गेली, असे म्हणत. त्यामुळे डोळ्यांची अवस्था भयंकर असावी. परंतु चष्म्यामुळे ती लक्षात येत नव्हती.

एवढे सोडले तर तिचे एकूण व्यक्तिमत्त्व विलक्षण आकर्षक होते. गौरवर्ण, नाजूक, देखणा चेहरा, काहीशी कृश शरीरयष्टी, व्रतस्थ वाटणारा शुभ्र रेशमी वेश!

तिच्याकडे पाहिले की, मी हरखून जात असे.

अनेक वेळा मी तिला पाहिले होते. सभासमारंभात, संगीताच्या मैफलीत, पार्ट्यांमध्ये... जिथेजिथे प्रतिष्ठित माणसे एकत्र जमत, तिथेतिथे! ती आल्यामुळेच जणू समारंभाला प्रतिष्ठा येई. ती विज्ञानाची प्राध्यापिका होती. निदान दृष्टी जाण्यापूर्वी. विद्यापीठात तिने अलौकिक यश मिळवलेले होते.

मला हे सारे माहीत होते. तसा मी तिच्या प्रेमातच पडलो होतो, म्हणा ना! तिला मात्र माझी फारशी माहिती नव्हती. जुजबी ओळख होती, इतकेच.

आता गडबड फारच वाढली. एक जाडजूड बाई दोन पेग पोटात गेल्यावर जोरजोराने लेक्चर देऊ लागली होती. एक टकल्या, वेटरशी भांडू लागला होता.

गर्दीतून वाट काढीत मी तिच्याजवळ गेलो. तिला अभिवादन केले. ओळख दिली. ती हसली.

मी म्हटले, "इथं खूप गोंगाट होतोय. आपण जरा बाहेर जाऊन बसू या का?– म्हणजे तुमची हरकत नसेल तर–!"

तिला ते पटले.

मी म्हटले, "जरा थांबा," आणि वेटरकडून एक ग्लास भरला. तिने विरोध केला नाही. इतर मुलींसारखी नसती भीडभाड तिला नसावी.

आम्ही दोघे बाहेर जाऊन बसलो.

बाहेर चांदणे पडले होते. हिरवळीवर अधेमधे पांढरेशुभ्र संगमरवरी पुतळे भुतांसारखे उभे होते. गार वारा वाहू लागला होता.

दोन दगडी चौथऱ्यांवर आम्ही बसलो. चौथरे चांगलेच थंड लागत होते.

"इथे किती शांत वाटतं नाही?" मी उद्गारलो.

"हो. तुम्हाला कल्पना नसेल; पण शांतता फार महत्त्वाची आहे!" ती एकदम म्हणाली.

तिच्या त्या विचित्र वाक्याने मी चमकलो. पण तसे न दाखवता म्हणालो, "हो- आजकालच्या दिवसांत शांतता मिळते कुठे?"

"मला मिळालीय. दृष्टी गेल्यापासून." ती हलकेच म्हणाली.

"पण आवाज? त्याचा त्रास तर तुम्हाला अधिकच होत असेल."

"आवाजाचा एवढा त्रास नाही. कारण नाही म्हटलं तरी आवाज आपल्या माहितीचे असतात. कितीही मोठा झाला, तरी अखेर तो ओळखीचाच आवाज असतो. त्याची भीती वाटत नाही. रंगांचं तसं नाही."

"रंगांची भीती?" मी बुचकळ्यात पडलो.

"यू नो, कलर्स कॅन् बी टेरिबल. सिम्पली टेरिबल." ती म्हणाली.

काय समजायचा तिच्या बोलण्याचा अर्थ? तिला मद्याची नशा चढत होती का? पण नशेत माणूस अधिक उत्कट होतो. अजिबात अर्थ नसलेले बोलत नाही. मग-

अचानक आलेल्या अंधत्वाने हिच्या डोक्यावर तर काही परिणाम…

"मी वेड्यासारखं काहीतरी बोलत्येय असं वाटतं ना तुम्हाला?" माझ्या मनातले विचार वाचल्यासारखी ती म्हणाली, "पण मी चांगली नॉर्मल आहे."

"आय अॅम् नॉट् ड्रन्क आयदर." ती पुढे म्हणाली, "पण एरवीपेक्षा थोडी हुषारी वाटत्येय. मनातलं बोलायला संकोच वाटत नाही, अशा वेळी. खरं ना?"

तिला संकोच वाटत नव्हता; पण मला भीती वाटू लागली होती. हे काहीतरी अनपेक्षित होते. काय बोलायचे असेल हिला?

“आय रादर लाइक यू. तुम्ही चांगले वाटता मला. बोललेलं ऐकून घ्याल, बाहेर कुठं बोलणार नाही, अशातले वाटता.” ती म्हणाली, “म्हणून बोलत्येय तुमच्याकडे. इतके दिवस हे सारं मी मनातच ठेवलं. बोलणार कुणाकडे? आणि बोलले, तरी ते पटणार कुणाला? पण तुमची गोष्ट तशी नाही.”

“पण कां? एवढ्याशा ओळखीत माझ्यावर इतका विश्वास-”

“आपली ओळख थोडीशीच असेल–” ती मिस्किलपणे हसून म्हणाली, “–पण एक सांगू तुम्हाला? आय थिंक यू आर रादर इंटरेस्टेड इन् मी. त्याशिवाय का तुम्ही नेहमी माझ्यावर नजर ठेवून असता?”

मी भलताच गडबडून गेलो. थंड हवेतही मला घाम फुटला.

“खरं आहे ना मी बोलते ते? तुमच्या गप्प राहण्यावरूनच सिद्ध होतंय.”

“तु-तुम्हाला कसं कळलं?” मी चाचरत विचारले.

“सोपं आहे. आपल्या दोघांशिवाय इतर लोक नसतात का आजूबाजूला? त्यांच्यापैकी कुणीकुणी सांगतं.”

मी हतबुद्ध झालो. इतके सुसंगत बोलणाऱ्या मुलीच्या डोक्यावर परिणाम झाला असेल हे खरे तरी कसे मानायचे? पण मघाचे ते–रंगांची भीती वगैरे…?

“तुम्ही कधी कुणावर प्रेम केलंय?” तिने अचानक विचारले.

मी काहीच बोललो नाही. नुसताच तिच्याकडे पाहात राहिलो. माझी नजर तिला जाणवली की काय कोण जाणे!

“नसेल तर करू नका! प्रेमात माणूस फसतं.” ती म्हणाली, “इतकी सुंदर वाटणारी- आणि इतकी डेड्ली गोष्ट जगात दुसरी नसेल. नाही; आणखी एक डेड्ली गोष्ट जगात आहे– रंग! पण आता मला त्यांची भीती नाही. मला फक्त सगळीकडे काळोखच दिसतो!”

ती हलकेच व्हिस्कीचे घुटके घेत राहिली.

“माझा प्रेमावर विश्वास आहे. पण प्रेमात वाहून जाण्यावर नाही.” ती म्हणाली, “एखाद्यावर प्रेम केलं, म्हणून आपण त्याच्यासाठी कुठल्या मर्यादेपर्यंत जावं, याला काही सीमा आहे, नाही का? विज्ञान हा माझा विषय असल्यामुळे असेल, पण माझी सगळीच मतं रॅशनल आहेत. हळवेपणानं वाहवून जाणं मला बिलकुल आवडत नाही.

“आणि मला जो माणूस भेटला त्याचा स्वभाव याच्या नेमका उलट! रॅशनॅलिटी ही चीजच त्याच्याजवळ नव्हती. प्रत्येक गोष्टीला केवळ मनाचं प्रमाण! अर्थात त्यानं तसंच असायला हवं होतं. कारण तो होता कलावंत. फार मोठा कलावंत!”

“कोण?” मी विचारले.

“रंगनाथ महिंद्र.” तिने सांगितले.

मी चमकलो. रंगनाथ महिंद्रांची माहिती सर्वांना होती. ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार होते. ‘रंगनाथ’ हे त्यांचे खरे नाव नव्हते. एखाद्या पदवीसारखे ते नाव त्यांना चिकटले होते. रंगांशी विलक्षण ताकदीने खेळणारा चित्रकार म्हणून त्यांचा लौकिक होता. रंगवण्याची त्यांची शैली अगदी स्वतंत्र होती. ‘मॉडर्न’ चित्रकारांमध्ये त्यांना फार मान होता. त्यांची चित्रे जगभरच्या गॅलऱ्यांमधून लागलेली होती. असा हा तरुणवयात विलक्षण कीर्ती संपादन केलेला चित्रकार एकाएकी अपघाताने वारला होता आणि त्याच्या मृत्यूने सारे कलाविश्व

हादरून गेले होते!

“मला कल्पना नव्हती रंगनाथ महिंद्रांशी तुमचा इतका जवळून परिचय होता, याची!”

“परिचय?” ती विचारात हरवून गेल्यासारखी म्हणाली, “रंगनाथांनी मला आयुष्यातले काही फार सुंदर क्षण दिले आणि काही- फार भयानक!”

दाराची बेल वाजली. तिनेच दार उघडले.

पायऱ्यांवर एक तरुण उभा होता. केस पिंजारलेले. हातात एक लहानशी बॅग. काखेत घडीचा लाकडी इझेल.

“या ना- आत या.” ती म्हणाली.

पण तो जागचा हलला नाही. नुसताच भारल्यासारखा तिच्याकडे पाहात राहिला. “ब्यूटिफुल्! एक्स्ट्रीमली ब्यूटिफुल्!” तो तोंडातल्या तोंडात पुटपुटला.

ती लाजून चूर झाली. आजवर कुणी असे उघडपणे म्हणण्याचे धाडस दाखवले नव्हते. या माणसाला साधे मॅनर्सदेखील नाहीत का?

“आत या.” ती पुन्हा म्हणाली.

“आय् अॅम् सॉरी.” तो भानावर आल्यासारखा म्हणाला, आणि दोन पायऱ्या चढून आत आला.

मग तिला काय वाटले असेल हे त्याच्या एकदम लक्षात आले. तो म्हणाला, “सॉरी. आय् ओ यू अॅन् एक्स्प्लनेशन. तुम्ही देखण्या आहात. पण मी बोललो ते तुम्हाला उद्देशून नव्हे. तुमच्या आजूबाजूला पसरलेल्या रंगांना.”

“रंग?” तिने गोंधळून विचारले, “कसले रंग?”

“फार फार सुंदर रंग पसरलेत तुमच्याभोवती.” एवढेच बोलून तो म्हणाला, “बाय द वे, मी रंगनाथ. रंगनाथ महिंद्र.”

तिने त्याला आधीच ओळखले होते. त्याच्या एकंदर अवतारावरून आणि काखेतल्या इझेलवरून. काही लँडस्केप्स करण्यासाठी म्हणून त्याला करवीरला यायचे होते. करवीर छोट्याशा शहरासारखे होते, आणि तरीही त्याच्या आजूबाजूला निसर्गसौंदर्य भरपूर होते. कुणीतरी त्याला तिच्या वडिलांचा पत्ता दिला होता आणि पेइंग गेस्ट म्हणून काही दिवस तो त्यांच्याकडे उतरणार होता. तिच्या वडिलांना या गोष्टीचा आनंद आणि अभिमान वाटला होता. परंतु सांगितलेली तारीख उलटून गेली तरी रंगनाथ आला नव्हता, आणि तिची व तिच्या वडिलांची निराशा झाली होती. त्यानंतर एका आठवड्याने हा गृहस्थ आज उगवत होता. शिवाय त्याविषयी काही स्पष्टीकरणही देत नव्हता.

परंतु एका दिवसातच तिची रंगनाथशी चांगली ओळख झाली; आणि या साऱ्याचे स्पष्टीकरण तिला मिळाले. तारीख, वार असल्या चिल्लर गोष्टी रंगनाथच्या हिशेबात नसत. जेवण, अंघोळ असल्या नित्यक्रमाकडे त्याचे कधीच लक्ष नसे. प्रत्यक्ष चित्र काढताना किंवा चित्राच्या तंद्रीत तो अक्षरश: तहानभूक विसरत असे. मुंबईला त्याचा सेक्रेटरी त्याच्या चित्रांचा सगळा कारभार पाहायचा. परंतु त्याने कानावर घातलेल्या व्यवहाराच्या गोष्टींचीही रंगनाथला कटकट व्हायची. मुंबईच्या कटकटींतून सुटका करून घेण्यासाठी लँडस्केपचे निमित्त करून रंगनाथ करवीरला आला होता, म्हटले तरी चालेल!

तिच्या ध्यानात येऊन चुकले की, रंगनाथ हा चारचौघांसारखा तर नाहीच, पण चारचौघा कलावंतांसारखाही नाही. कलावंतांचा लहरीपणा, एककल्लीपणा - सारेसारे ती ऐकून होती. परंतु हे त्याहीपलीकडचे होते. या कलावंताला जणू जगाचे भानच नव्हते. तो आणि त्याचे रंगांचे विश्व आजूबाजूच्या जगापासून फार दूर होते. स्वतंत्र होते. जे रंग त्याला जाणवत, ते कॅनव्हासवर उतरवणे एवढाच त्याच्या अस्तित्वाला अर्थ होता. यापलीकडे तो या जगातच नव्हता.

तिच्या जगातल्या माणसांपेक्षा तो फार वेगळा होता. नव्हे, असा एखादा माणूस या जगात असेल, अशी तिला कल्पनाही नव्हती. त्यामुळेच तिला त्याच्याविषयी अतिशय कुतूहल वाटू लागले. विज्ञानातली कोडी सोडवण्याच्याच ईर्ष्येने ती त्याच्या स्वभावाचे गूढ शोधण्याच्या प्रयत्नाला लागली.

त्याच्या स्वभावाला एकच दरवाजा होता. त्याची चित्रे.

रंगनाथ महिंद्राच्या चित्रांविषयी तिने खूप ऐकले होते; पण त्याचे एकही चित्र तिने पाहिले नव्हते. म्हणून करवीरला आल्यानंतर तो पहिले चित्र कुठले काढतो याविषयी तिला उत्सुकता लागली होती.

दुसऱ्याच दिवशी चित्र तयार झाले.

कॅनव्हासवर बराचसा पांढरा रंग. अधेमधे सोनेरी वाटतील अशा रंगच्छटा. एक दरवाज्यासारखे काहीतरी उघडलेले- बऱ्याच पायऱ्या वाटतील असे तपकिरी रंगाचे पट्टे ब्रशने नुसते ठेवून दिलेले आणि मध्ये गुलाबी रंग... तिने लांबून पाहिले. मान कलती करून पाहिले. डोळे बारीक करून पाहिले. नक्कीच तिथे काहीतरी आकृती होती.

"हे कसलं चित्र आहे?" तिने विचारले.

"ओळख पाहू." तो म्हणाला.

"मॉडर्न आर्टची चित्रं मला ओळखता येत नाहीत." तिने काहीसे खरे, काहीसे थट्टेने सांगितले.

"तरी पण-तर्क कर बरं."

तिने चित्र बारकाईने न्याहाळण्याचे नाटक केले. मग डोळे मिटले. विचारात गुंगल्यासारखे दाखवले. तो आपल्या नाटकाला फसत आहे, हे तिने चाणाक्षपणे ओळखले होते. एक काहीतरी अगडबंब 'इंटरप्रिटेशन' ठोकून द्यायचे आणि त्याची फजिती करायची, असे ठरवून ती म्हणाली, "एक अप्सरा स्वर्गाचं दार उघडते आहे आणि या पायऱ्यांवरून एका मर्त्य मानवाला-"

"राइट!" तो आनंदाने ओरडला, "बरोबर ओळखलंस तू!"

ती काहीशी गडबडली. आपले नाटक सांगून टाकून त्याची टर उडवायची, असे ठरवून ती बोलू लागणार, एवढ्यात तो पुढे म्हणाला,-

"हा माझा कालचा अनुभव आहे. इथं आलो तेव्हाचा. तू दार उघडलंस त्या क्षणाचा."

धक्का बसून ती गप्प झाली. तिला एकदम पटले की, याने खोटे चित्र काढलेले नाही. हे सारे रंग याला काल जाणवत होते. म्हणूनच तो उत्स्फूर्तपणे 'ब्यूटिफुल–एक्स्ट्रीमली ब्यूटिफुल!' असे उद्गारला होता.

तरीदेखील मॉडर्न आर्टची टिंगल करण्याची एकही संधी तिने नंतरच्या दिवसांत वाया घालवली नाही. मॉडर्न आर्टिस्ट्स काय वाटेल ते काढतात आणि त्याला काहीही नावे देतात, असे ती नेहमी आग्रहाने म्हणायची. तो नुसतेच स्मित करायचा. कधीकधी तिला वाटे, आपले बोलणे तो ऐकतच नाही. त्याच्या

डोळ्यांसमोर दुसरेच काहीतरी दिसत आहे…

लँडस्केपसाठी तो करवीरला आला तरी कशाला, हे तिला समजत नव्हते. त्याच्या एकाही निसर्गचित्रात तिला ओळखीची ठिकाणे दिसत नव्हती. नुसते रंग! ती विचारे तेव्हा तो सांगायचा, "हे देऊळ, ही झाडे, हे पाणी, हे डोंगर…" पण तिला ते नुसते रंगच वाटत. मात्र एक गोष्ट खरी! ते रंग पॅलेटवरच्या नुसत्या रंगांसारखे दिसत नसत. चित्रांत त्यांना एक अपूर्व तेज चढल्यासारखे दिसायचे. असे वाटायचे की ते रंग जिवंत आहेत. त्यांचे एकमेकांशी नाते आहे. एकमेकांची भाषा त्यांना समजते आहे. थोडा अधिक प्रयत्न केला, तर ती आपल्यालाही समजेल…

या विचाराने तिला कसेसेच वाटायचे. त्या चित्रांकडे फार वेळ पाहाण्याची भीती वाटायची. असे वाटायचे की, आपण त्या चित्राचाच एक भाग झालो आहोत. आपण त्यात मिसळून चाललो आहोत. रंगनाथला श्रेष्ठ कलावंत का समजत, हे तिला हळूहळू जाणवू लागले होते. तो कॅनव्हासवर नुसते रंग चोपडीत नव्हता. तो रंगांची एक नवी सृष्टी निर्माण करीत होता.

एकदा संध्याकाळच्या वेळेस ती कुठूनशी घरी परत आली. रंगनाथच्या खोलीत काळोख होता. दिवा लावण्यासाठी ती पुढे होणार, एवढ्यात तिच्या ध्यानात आले की, खोलीत रंगनाथ आहे. ती दारातच थबकली.

खोलीत दोन उंच मेणबत्त्या लावलेल्या होत्या. प्रथम काळोखी वाटणाऱ्या त्या खोलीत मेणबत्त्यांचा मंद उजेड पसरलेला दिसत होता. त्या मंद प्रकाशात रंगनाथ एक चित्र काढीत होता.

काय करावे, हे तिला सुचेना. तो कसले चित्र काढीत आहे, हे पाहण्याची उत्सुकता तर होती. पण त्या अपुऱ्या उजेडात खोलीत जाणे प्रशस्तही वाटत नव्हते. त्याची समाधी मोडण्याचीही शक्यता होतीच.

पण तिला चैन पडेना. हलकेच, पाय न वाजवता ती त्याच्या पाठीमागे जाऊन उभी राहिली…

समोरच्या कॅनव्हासवर काळोख नव्हता. मंद प्रकाशही नव्हता. दोन मेणबत्त्यांच्या उभट रेषा तेवढ्या दिसत होत्या. बाकीचा कॅनव्हास जांभळ्या रंगाच्या चित्रविचित्र छटांनी भरून गेला होता. मधेमधे तो जांभळा रंग झगझगत होता. लखलखत होता.

ती पाय न वाजवताच वळली. दाराशी पोहोचली.

एवढ्यात मागून शब्द आले : "थांब!"

त्या आवाजातल्या आर्जवाने ती थांबली.

"आवडलं तुला चित्र?" त्याने विचारले.

"मला-मला समजलं नाही." ती प्रामाणिकपणे म्हणाली.

"चित्र समजण्यासाठी नसतं. ते आवडतं तरी, नाहीतर नाही आवडत."

त्याचा स्वर आज वेगळा येत होता. थकल्यासारखा, ओढल्यासारखा.

ती त्याच्या जवळ गेली. तो इझेलवर डोके टेकून बसला होता. विलक्षण दमलेला वाटत होता.

क्षणभर तिला त्याची दया आली. ती म्हणाली, "तसं तर मला आवडलंच हे चित्र. तुमची सगळीच चित्रं मला आवडतात. त्याशिवाय का मी आत्ता येऊन पाहात उभी होते? पण माझं मत विचारण्यात खरंच काही अर्थ नाही. कारण मला ती दृष्टीच नाही. तुमच्यासारख्या थोर कलावंताच्या समोर माझ्यासारखीनं चित्राचं नावदेखील घेऊ नये…"

त्याने वर पाहिले. मेणबत्त्यांच्या ज्योती त्याच्या डोळ्यांत चमकल्या. तो आपल्याच तंद्रीत होता. तिचे बोलणे कदाचित त्याने ऐकलेही नसावे. तो म्हणाला, “तू हुषार आहेस. मी काही सांगितलं तर ते तुला समजेल. कुणाकडे तरी बोलावं असं आजवर वाटत आलंय; पण समजणारं माणूसच भेटलं नाही.”

तिच्या छातीत धस्स झाले. हा सांगणार तरी काय, ते तिला कळेना. मेणबत्त्यांच्या त्या मंद प्रकाशात तो अधिकच गूढ वाटत होता. त्याच्या गालांची उंच हाडे, पिंजारलेले, कपाळावर आलेले केस, वाढलेली दाढी आणि चमकणारे डोळे… तिला त्याची भीती वाटू लागली आणि एकाच वेळी त्याची विलक्षण ओढही वाटत राहिली.

चटकन दिवा लावून हे गूढ वातावरण नाहीसे करावे, असे तिच्या मनात येऊन गेले. पण तिला धीर झाला नाही. भारल्यासारखी ती त्याचे बोलणे ऐकत राहिली…

“तुला सांगायचं होतं की मी नॉर्मल नाही. माझे डोळे नॉर्मल नाहीत. इतरांना नसलेली एक चमत्कारिक दृष्टी त्यांत आहे. अलंकारिक अर्थानं नाही. खऱ्याखुऱ्या अर्थानं. मला रंग दिसतात. इतरांना दिसतात तेवढेच नाहीत. फार वेगळे आणि फार मोठ्या प्रमाणावर दिसतात. ते हलत असतात. श्वासोच्छ्वास करीत असतात. जिवंत असतात. माझ्यातून कॅनव्हासवर येण्याची त्यांची धडपड चालू असते… समजतंय तुला मी काय म्हणतोय ते?”

तिने “हूं” म्हटले. यातले थोडेफार तिला आधीच समजू लागले होते. जाणवू लागले होते.

“नेहमीच्या जगात रंगांना जागा असते. पण ते रेषांनी बांधलेले असतात. मला ठाऊक आहे. कारण पूर्वी मला ते तसेच दिसायचे. पण हळूहळू त्यांनी बंड पुकारलं. रेषांचं बंधन तोडून ते बाहेर पडले. मला रेषांनी बांधलेल्या वस्तूंची चित्रं काढता येईनाशी झाली. रेषा पुसट झाल्या आणि रंगांनीच माझा ताबा घेतला. त्यावेळी मी नॉर्मल राहिलो नाही आणि तेव्हाच माझा ‘मॉडर्न आर्टिस्ट’ म्हणून लौकिक वाढू लागला. लोकांना वाटतं की, हे माझ्या कल्पनेतून येतं. पण नाही. हे माझ्या अवतीभवती वावरतं. या क्षणी तुला या खोलीत काळोख दिसत असेल. मला ती निळ्या-जांभळ्या, लखलखत्या रंगांच्या, उसळत्या लाटांनी भरून गेल्यासारखी वाटते. तुला पहिल्यांदा पाहिलं, तेव्हा तुझ्या भोवती, आजूबाजूला, पांढऱ्या, सोनेरी रंगांच्या छटा नुसत्या फेसासारख्या तरंगत होत्या… सुरुवातीला मला या प्रकारची भीती वाटायची. पण आताआता मला रंगांवाचून वेगळं मीपण राहिलेलं नाही. आंधळ्याला काळोख दिसावा, तसा मला स्वत:भोवती रंगांचा पूर आलेला दिसतो. लाल, निळे, जांभळे, पोपटी-रंग! नुसते रंगच मला दिसतात. दिवसेंदिवस रेषा कमीकमी दिसू लागल्या आहेत. एक प्रकारचा आंधळेपणाच म्हण हा! नुसतं चित्रं काढतानाच नव्हे, तर एरवीसुद्धा मला केवळ रंगांखेरीज दुसरं काही जाणवेनासं झालंय. कधी हर्ष होतो, तर कधी भीती वाटते. काय होईल माझं? मी कदाचित रंगांधळा होईन. कदाचित…माझं काही बरंवाईट-”

तिने नकळत त्याच्या तोंडावर हात ठेवला.

“हे सारं मी तुला कां सांगितलं? तर तुला समजेल म्हणून. तू मला आवडतेस म्हणून! शिवाय-शिवाय तुला माझ्याविषयी वाटतं, म्हणून-”

ती त्याचे वाक्य पुरते ऐकून घ्यायला थांबलीच नाही. धावतच आपल्या खोलीत गेली आणि पलंगावर अंग टाकून पडली.

खरेच का ती त्याच्या प्रेमात पडली होती?

या विचारासरशी तिच्या अंगावर शहारे आले. -नाही! असे असेल तर ते आत्ताच मोडून काढले पाहिजे. विज्ञानाच्या काटेकोर हिशेबांशी तिचे आजवर नाते जमले होते. ते तोडून ती असल्या एखाद्या अॅबनॉर्मल गोष्टीत स्वत:ला गुंतवून घेणार नव्हती. हे सारे कितीही सुंदर वाटले, तरी तिचे नव्हते - तिच्यासाठी नव्हते. त्याच्या विकृतीशी तिला कसलाही संबंध ठेवायचा नव्हता…

-असे ठरवले, तरीदेखील चार दिवसांनी तो त्याच्याबरोबर लॅंडस्केप-पेंटिंगला गेलाच. गेले चार दिवस तो त्याच्याशी काहीशी फटकून वागली होती. त्याची थोडीफार भरपाई म्हणून, थोडीफार उत्सुकता म्हणून!

प्रथम बराच वेळ त्याला मनाजोगता स्पॉटच मिळेना. नंतर एक मोकळी जागा दिसली. पलीकडे हिरवीगार दरी, निळे-जांभळे डोंगर आणि खाली झुकलेले आकाश…

तिला चार दिवसांपूर्वीचे त्याचे बोलणे आठवू लागले.

आता कसले रंग दिसत असतील याला?

त्याने अजून चित्र रंगवायला सुरुवात केली नव्हती. तो नुसता इकडेतिकडे फिरत होता.

ती त्याच्या हालचाली न्याहाळीत नुसती बसली होती. नि:शब्द.

तो काय करीत होता, हे तिच्या बरोबर लक्षात येत होते. एखादा प्राणी जसा वास घेत फिरतो, तसा तो त्याला दिसत असलेल्या रंगांमधून वावरत होता.

अचानकपणे तो फलकाशी आला- आणि त्याने निळ्या रंगाचे सपकारे मारायला सुरुवात केली.

"व्हॉट अ ब्यूटी- ओ! व्हॉट अ ब्यूटी!" तो स्वत:शीच बडबडत होता. "सच रिच ब्लू! व्हर्मिलिअन! टरकॉइज–"

थोडे रंगवून झाले, की पुन्हा तो आपल्याच मस्तीत इकडेतिकडे फिरून येई- अंगात आल्यासारखा. या क्षणी तो वेडपटच वाटत होता. तिला किंचित हसू आले-

सूर्य मावळतीला लागला. आभाळात सोनेरी छटा अवतरली.

तो अजूनही वेड्यासारखा घुमत होता.

"हे बघितलंस? सोनं… सोनं! कशा लखलखत्या ज्वाळा येताहेत! पाऊस… निळा, सोनेरी पाऊस!"

दोन्ही हात पसरून तो कशातून तरी वाट काढल्यासारखा फिरत होता.

"गोल्डन ब्लू- धिस इज ब्यूटी! धिस इज लाइफ!"

ती धास्तावून उभी राहिली. न जाणो, तो अडखळून पडला तर!

पण तो परत आला. पॅलेटवर त्याने पिवळ्या, नारिंगी रंगांच्या ट्यूब्ज पिळल्या आणि आवेगात तो ब्रश फिरवू लागला…

आणि एकाएकी तो ब्रश घेऊन चालत निघाला. - आकाशाच्या, क्षितिजाच्या दिशेने. "मी चाललो! रंगांमध्ये चाललो!" असे ओरडत.

ती उठली; पण त्याआधीच तो कड्याच्या टोकावरून दिसेनासा झाला होता.

खालच्या दरीत दुसऱ्या दिवशी त्याचे प्रेत मिळाले; तेव्हा वडिलांबरोबर तीदेखील गेली होती. त्यांच्या विरोधाला न जुमानता. त्याचा देह दगडावर छिन्नविच्छिन्न होऊन पडला होता. रक्ताचा शिडकावा होऊन दगड लाल-काळे पडले होते.

तो एवढ्यातेवढ्याने घाबरणारा मुलगा नव्हता. प्रत्यक्ष अपघाताच्या वेळेस तिला विलक्षण धक्का बसला, आणि तोंडून किंकाळीही फुटली, हे खरे. परंतु ती लटपटत्या पायांनी का होईना, पण एकटी घरी येऊ शकली होती; वडिलांना अपघाताविषयी सांगू शकली होती. रात्री ती त्यांच्याबरोबर पोलिस स्टेशनवरदेखील जाऊन आली होती.

रात्रभर तिला झोप मात्र लागली नाही. अनेक विचार डोक्यात उलटसुलट फिरत राहिले. सगळ्या प्रकाराला धैर्याने तोंड द्यायचे तिने ठरवले होते. रंगनाथच्या विकृतीविषयी मात्र ती कुणाकडेच फारसे काही बोलणार नव्हती. एक तर तो समोर नसताना तिला ते सारे स्वप्नवत् वाटत होते. दुसरे म्हणजे तिला त्या विकृतीशी उच्चारापुरताही संबंध नको होता.

पण आज उजेडात रक्ताने माखलेले ते दगड पाहतापाहता तिला एक चमत्कारिक अनुभव आला.

क्षणभर दगडावरचे ते वाळलेले काळे रक्त पुन्हा लाल झाले. जिथे तो देह पडला होता, त्याच्या चारी बाजूंनी रक्तासारखा लाल रंग जमून आला आणि पाहतापाहता लाल रंगाची एक लाट तिच्या रोखाने चालून येऊ लागली...

एक किंकाळी फोडून ती बेशुद्ध पडली.

काही क्षणांनी शुद्धीवर आली तेव्हा ती गाडीत होती. “तरी मी म्हणत होतो येऊ नकोस म्हणून. काहीजणांना रक्त पाहून चक्कर येते.” तिचे वडील म्हणत होते.

पण तिला केवळ रक्त पाहून चक्कर आली नव्हती. तो भयंकर भास!... पण केवळ भासच तो! कारण आता तिला गाडीच्या रूपरेखा स्पष्ट दिसत होत्या. लाल रंगाचा ठिपकादेखील समोर कुठेही नव्हता.

तिला हायसे वाटले.

मध्यरात्री तिच्या स्वप्नात दोन मेणबत्त्या आल्या. त्यांच्या मागून रंगनाथची आकृती उभी राहिली. तो म्हणाला,-

“ओ नो!” ते स्वप्न झटकून टाकीत ती उठून बसली. तो आवाज ऐकण्याचीही तिला भीती वाटत होती.

पण तो आवाज ऐकू येतच होता... दूरवरून आल्यासारखा. आता ती स्वप्नात नव्हती; पण भारल्यासारखी, बिछान्याला खिळून ऐकत होती...

“तू - तू ऐकतेयस ना?” त्या आवाजात अजिजी होती. “इथं काळोख आहे... दाट काळोख. मी त्यात गुदमरतोय. मला रंग हवे आहेत - रंग! मी तुझ्या नजरेतून पाहीन. मला रंग दिसतील. आपल्यांत एक नातं आहे. त्यासाठी तरी- मला रंग पाहू देत! तुझ्या नजरेतून पाहू देत!...”

“नाही, नाही!” ती किंचाळली, “आपल्यांत कसलंही नातं नाही. तू येऊ नकोस. काळोखातून परत येऊन नकोस.”

शेजारच्या खोलीतून तिचे वडील धावत आले. ती घामाने थबथबली होती. उरलेली रात्र ते तिला आपल्याच खोलीत घेऊन गेले.

पण तिची भीती कमी झाली नाही. त्याचा आवाज तिने स्पष्ट ऐकला होता. तो आपले शब्द खरे केल्याशिवाय राहणार नव्हता. कारण तो जिथे पोहोचला होता त्या काळोखात तो राहू शकत नव्हता. त्याला रंग हवे होते. रंग...

-आणि अचानक तिला जाणवले की आपल्या नजरेत तो आला आहे.

वर्गात शिकवताशिकवता एकाएकी विद्यार्थ्यांच्या आकृत्या पुसट झाल्या. पांढऱ्या करड्या रंगांच्या छटा उसळू लागल्या. पण तिने तोल सावरला. वर्गात वेडावाकडा काही प्रकार होऊ न देता ती वर्ग लवकर सोडून घरी आली. नंतर तसे काही झाले नाही. पण संध्याकाळभर तिचे डोके दुखत राहिले.

दुसऱ्या दिवशी ती कॉलेजला निघाली तेव्हा उन्हात पिवळा सोनेरी रंग झगमगत होता. तिने डोळ्यांवर गॉगल्स चढवले. तरीही तिला हालचाल जाणवत राहिली... काहीतरी उसळत होते. पुढे झेपावत होते.

मध्यरात्री पुन्हा तिला दोन मेणबत्त्या दिसल्या. आवाज ऐकू आला : 'मी आलो आहे...मी आलो आहे!'

ती जागी झाली. एकूण ते स्वप्नच होते, या कल्पनेने सुखावली.

पण क्षणभरच!

खोलीकडे नजर जाताच तिला धक्का बसला. खोलीत अंधार नव्हता. सबंध खोली निळ्याजांभळ्या रंगांत झगझगत होती. लखलखत होती.

आता मात्र ती समजून चुकली, की तो आला आहे, तो जाण्याकरता नव्हे. तो तिच्या डोळ्यांत कायम राहणार होता. जागोजागी तिला रंगच रंग दिसणार होते... रेषा पुसट होत जाणार होत्या. दिवसेंदिवस ती अधिकाधिक रंगांधळी होणार होती.

बाकीचे सारे आयुष्य संपणार होते. वेड्यासारखी ती रंगांची गुलाम होऊन राहणार होती. त्याचे ठीक होते. कारण तो चित्रकारच होता. विज्ञानाच्या प्राध्यापिकेला हे रंगांशी नाते कशाला हवे?...

काय वाटेल ते झाले तरी ती त्याच्यापुढे माघार घेणार नव्हती.

"प्रयोगशाळेत माझ्या टेबलाशी मी एकटीच होते." ती सांगत होती, "विद्यार्थी होते; पण ते दूर. ज्याचं-त्याचं आपल्या प्रयोगात लक्ष होतं. मी सारं धैर्य एकवटून दोन्ही डोळ्यांत अॅसिड ओतून घेतलं. मरणाची आगआग झाली आणि मी बेशुद्ध पडले."

"शुद्धीवर आले तेव्हा मी हॉस्पिटलमध्ये होते. माझ्या डोळ्यांवर पट्ट्या होत्या; पण उशाशी वडील बसले होते. कॉलेजमध्ये मला प्रयोग करताना अपघात झाल्याची बातमी पसरल्याचं त्यांनी सांगितलं. माझी दृष्टी गेल्याची बातमी सांगायला ते घाबरत होते. पण मीच ते त्यांच्याकडून वदवून घेतलं."

मी त्या विलक्षण स्त्रीकडे थक्क होऊन पाहात राहिलो.

"तुम्हाला कल्पना नाही मी किती सुखात आहे याची. मी आंधळी आहे, पण निदान नॉर्मल आहे. डोळ्यांसमोर उसळणाऱ्या त्या भयानक रंगांच्या लाटांमध्ये भीतीनं मरून जायची वेळ यायची. हा काळोख किती शांत आहे! किती सुखाचा आहे! मला ठाऊक आहे- या काळोखात रंगनाथचा आत्मा तडफडत असेल; पण मी माझ्या डोळ्यांची दारं त्याला बंद केली आहेत!"

उत्तररात्र सुरू झाली होती. पार्टी संपत आली होती.

तिला पोहोचवून मी घरी निघालो, तो उद्या तिला परत भेटण्याचा निर्धार करूनच.

आमच्यामध्ये एक नवीनच नाते तयार झाले होते.

घरी पोहोचलो तेव्हा कुणीच जागे नव्हते. मी लॅच-कीने दरवाजा उघडला.

पण खोलीत काळोख नव्हता.

सबंध खोली निळ्याजांभळ्या रंगांनी झगझगत होती. लखलखत होती.

वारस

कधीकधी वाटते की, या आयुष्याला अर्थच नाही.

अर्थ शोधण्याचा आपण एकसारखा प्रयत्न करतो. आपल्या परीने अर्थ लावतो. आडाखे बांधतो. अनुभवावरून काही अनुमाने काढतो. सिद्धांतांच्या चौकटी स्वत:भोवती उभारतो. काय म्हणजे यश, आणि काय म्हणजे अपयश, याचे आपल्या कल्पनेप्रमाणे हिशेब मांडतो. त्या हिशेबांच्या आधाराने यशस्वी होण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी रक्ताचे पाणी करून धडपड करतो. एका मर्यादेत यशस्वी होतो. मग स्वत:ला सांगतो की, 'मी बुवा असा.' इतरांना पटवतो की, 'मी हा असा. माझी आई अशी. माझे वडील असे. हे आमचे खानदान. हे आमचे सत्त्व. हे आमचे तत्त्व. आम्ही म्हणजे असे वागणार. दुसरी दिशा आमची नाही. आम्ही असेच चालणार. प्राण गेला तरी बदलणार नाही.' वगैरे वगैरे खूप. सारे अगदी खुरेखुरे असते. निदान आपल्याला तरी ते तसे खरेखुरे वाटत असते. आपल्यापुरते ते अगदी कालत्रयी बदलणार नसते.

आणि एकदम काहीतरी घडते! वरवर पाहता अगदी क्षुल्लक वाटणारे. सहजपणे घडून जाणारे आणि मग पाहावे, तर ही क्षुल्लक गोष्टच सारे जीवन उद्ध्वस्त करून टाकते. आपल्याला आजवर कळलेला आयुष्याचा अर्थ चुकीचाच होता, असे जाणवून देते. पण तोवर फार उशीर झालेला असतो. कुठे चुकले हे समजायच्या आतच सारे काही पार हाताबाहेर गेलेले असते. इतकी वर्षे एकाच दिशेने चालल्यामुळे दुसरी दिशा जणू समजत नाही. दुसरा अर्थ पटत नाही. नवीन कल्पनांच्या नव्या चौकटी पुन्हा उभारणे सोपे नसते. मग काय करावे ते समजत नाही. आपण नुसते हताश होतो. हतबल होतो. दिङ्मूढ होतो आणि मनाची शांती कायमचीच गमावून बसतो.

आणि हे होते एखाद्या साध्याशाच प्रसंगाने. वाटते की, हा प्रसंग सहज टाळता आला असता. पण एखाद्या छोट्या मुलाने ज्याला चेंडू म्हणून लाथ मारावी, तो एक फुटायची वाट पाहणारा टाइम-बॉंब निघावा आणि त्याने त्या मुलाला जन्माचे अपंग करून टाकावे, तितक्या सहजपणे आपण या प्रसंगात ओढले जातो आणि त्यातून बाहेर पडताना जायबंदी होऊन बसतो.

आता प्रसंग किती साधा पाहा! शंकरबरोबर त्याच्या गावी जाऊन येण्याचा. बस्स, एवढाच!

शंकर माझा अगदी जवळचा मित्र. वयाने माझ्याहून दोन-तीन वर्षांनी लहान. आमची केवळ मैत्रीच होती असे नाही चांगला घरोबा होता. शंकरचे वडील रामदादा माझ्या वडिलांचे अगदी निकटचे स्नेही! दोघांच्याही घरची परिस्थिती उत्तम! पण माझ्या जन्मानंतर लगेच आमच्या घराला दुर्दैवाचा फटका बसला. माझ्या वडिलांनी एकाएकी आत्महत्या केली. कारण नीटसे ठाऊक नाही; परंतु ते चांगले वकील होते; कुठल्यातरी अशिलाने फसवल्याची त्यांनी हाय खाल्ली आणि त्याच धक्क्याने आत्महत्या केली, असे आईने मला एकदा सांगितले होते. ते सांगताना तिची जी काही विलक्षण दयनीय अवस्था झाली होती, ती पाहिल्यावर पुन्हा कधी हा विषय तिच्याकडे काढण्याचे मला धाडस झाले नव्हते.

घरातले मिळवते माणूसच असे एकाएकी गेल्यानंतर आईवर आकाश कोसळले. त्यातून लहान मूल पदरात. घरात शिल्लक नावापुरतीच. दोन वेळच्या अन्नाची पंचाईत पडावी, अशी परिस्थिती! पण या परिस्थितीत शंकरचे वडील आमच्या मदतीला धावले. गेलेल्या मित्राच्या स्नेहाला जागून त्यांनी आमच्या कुटुंबासाठी सारे काही केले. आई चार पैसे मिळवीत असे; पण खरे घर चालायचे ते शंकरच्या घरून जी मदत यायची, तिच्यावरच! माझे शिक्षण पुरे होईपर्यंत शंकरच्या वडिलांनी आम्हांला मदत केली. मी स्वत:च्या पायावर उभा राहिलो, तेव्हाच त्यांनी मदतीचा हात सोडला. आजच्या काळात मित्राच्या कुटुंबियांसाठी एवढे करण्याइतकी माणुसकी कोण दाखवील?

शंकर नोकरीला लागला, ते पाहायला रामदादा हयात नव्हते. आठ-पंधरा दिवसांच्या आजाराचे निमित्त होऊन ते गेले. पण त्यांनी आपल्या घरासाठी आणि मुलासाठी चांगली तरतूद करून ठेवली होती. शंकरला दुसरे भावंड नव्हते, पण घरात इकडच्या-तिकडच्या नातेवाइकांना आणि आश्रितांना तोटा नव्हता.

एका परीने आम्हीही त्यांचे आश्रेतच होतो. त्यांच्या घरात राहात नव्हतो, इतकेच काय ते! पण शंकरने कधी मला आश्रितासारखे वागवले नाही. त्याची-माझी लहानपणी जमलेली मैत्री दिवसेंदिवस अधिकच दाट होत गेली होती.

त्या दिवशी रात्री शंकर अचानक घरी आला आणि म्हणाला, "श्याम, उद्या सकाळी राणवलीला जायचं."

"राणवलीला? मधेच काय काढलंस?" मी विचारले.

राणवली शंकरचे मूळ गाव असल्याचे मी त्याच्या तोंडून ऐकले होते; परंतु लहानपणी वडिलांबरोबर एखाद्या वेळी तो तिकडे गेला असेल नसेल. गेला असल्यास त्याला ते अजिबात आठवत नव्हते. राणवली तसे लहानसे खेडे होते, आणि हमरस्त्यापासून बरेच आत होते. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे या रानवट खेड्यात शंकरच्या पूर्वजांनी एक मोठा वाडा बांधून ठेवला होता. शंकरचे एक वृद्ध काका तिथे राहात असत. एखाद-दुसरा कामसू नोकर ठेवून, ते कसेबसे चालवीत. पिढीजाद उत्पन्नावर भागवीत.

"अरे आमचे ते काका वारले नाहीत का?" शंकर अगदी सहजपणे म्हणाला. नात्यातले माणूस का होईना, पण त्याला कधी पाहिलेलेच नसले, तर त्याच्या मृत्यूचे काय दु:ख होणार?

"सांगितलं होतंस तू मला. पण त्याला पंधरा दिवस होऊन गेले. आता जाऊन तू काय करणार?"

"अरे, आताच तर खरं काम आहे." मला एक लखोटा दाखवीत शंकर म्हणाला, "वकिलांचं पत्र आलंय."

"तुला?" मी आश्चर्याने विचारले.

"मग? अरे, या काकांचे वारसदार एकटे माझे वडील. आता ते नाहीत म्हणजे त्यांच्या पाठीमागं मीच वारस त्या वाड्याला."

"कमाल आहे!" राणवलीच्या एका वाड्याचा शंकर एकाएकी मालक बनला, या प्रकारची मला खूप मौज वाटली. "बघ लेका! मुंबईत जागेची इतकी टंचाई आहे! दोन खोल्या मालकीच्या होताहोता पुरेवाट होऊन जाते! आणि तुला एक अख्खा वाडाच्या वाडा मिळालाय! ओनरशिप बेसिस!"

"हो. पण तो राणवलीला! मुंबईत नव्हे! त्यातली एक खोली जरी मुंबईत मिळती, तरी खूप झालं असतं!"

यावर आम्ही दोघेही हसलो.

"पण तिकडे जाण्याचं काय म्हणत होतास?" हसण्याचा भर ओसरल्यावर मी विचारले.

"अरे बाबा, वकिलांना दर्शन देऊन यायचंय. काकांचं विल आहे त्यांच्याकडे. त्यांना मीच वाड्याचा वारसदार याची एकदा समक्ष पाहून खात्री करायचीय. शिवाय तिथं काम करणारा जो माणूस आहे, त्याचीही काहीतरी व्यवस्था करायलाच हवी. आमचे वकीलसाहेब उद्या राणवलीत असणार आहेत. तेव्हा उद्याच मी तिथं यावं, असा त्यांचा आग्रह आहे. नाहीतर सारं लांबणीवर पडेल. येशील ना तू बरोबर? माझ्या एकट्याच्यानं असलं काम निभायचं नाही. तुझ्यावर माझा सगळा भरवसा."

हे खरेच होते. आजवर प्रत्येक महत्त्वाच्या कामात मी शंकरला हातभार लावीत आलो होतो. तेव्हा या वेळेस नाही म्हणणे मला शक्यच नव्हते. आणि तशी गरजही नव्हती. राणवलीला जाऊन येण्यात माझे असे काय नुकसान होते? शिवाय शंकरला अचानक आकाशातून पडल्यासारखा मिळालेला हा वाडा आहे तरी कसा, हे पाहण्याची मला उत्सुकता होतीच!

"उगाच टंगळमंगळ करू नकोस. मग येणार ना? उद्या सकाळची गाडी आहे." शंकर म्हणाला.

मी जायला तयारच होतो. एकदोन दिवस तेवढेच पिकनिक् !

किती भयंकर गोष्टींचे मुखडे किती साधेसुधे असतात! कुठे जायचे आहे एवढेच आपल्याला ठाऊक असते. पण आपण कुठे पोहोचणार, ते फक्त नियतीलाच ठाऊक! तिने आपल्यासमोर काय वाढून ठेवलेले आहे, हे आपण कसे जाणू शकणार?

"आईला विचारून सांगतो." मी शंकरला म्हटले. का कोण जाणे, माझ्याच्याने एकदम 'होय' म्हणवेना. पण माझे वाक्य पुरे होण्याच्या आत शंकर स्वयंपाकघरात धावला आणि आईला म्हणाला, "आई, मी श्यामला घेऊन जातोय उद्या राणवलीला." त्याने तिला कामाची सविस्तर कल्पना दिली.

आई हसतमुखाने म्हणाली, "अरे, मग जा की घेऊन. मला काय विचारतोस?"

"तुमच्या लेकाला तुमची परवानगी हवी." शंकर माझी थट्टा करीत म्हणाला. माझे आईवरचे प्रेम हा सर्वांच्या थट्टेचा विषय होता. आईला विचारल्याशिवाय मी कुठलीच गोष्ट करीत नसे. कुठेही जात नसे. आईच्या मनाविरुद्ध काहीही करायचे नाही असे मी अगदी पक्के ठरवले होते आणि ते स्वाभाविकच नव्हते का? आईने ज्या खस्ता काढून मला वाढवले, त्यांना तोड नव्हती. माझ्या जन्मानंतर लगेच बाबा गेले. इतक्या तरुण वयात आई वेडेवाकडे वागू शकली असती. पण सारे सुख बाजूला ठेवून तिने माझा संभाळ केला. अशी आई मिळायला भाग्य लागते. तिच्या उतारवयात तिला कष्ट पडू नयेत, याची काळजी, मी नाही तर कुणी घ्यायची?

"पण आई, दोन दिवस तू एकटी कशी राहशील?"

"आहेत रे शेजारीपाजारी! दोन दिवसांत काय होणार आहे? आणि रोज सबंध दिवस तू ऑफिसात जातोस तेव्हा रे –"

आईनेच असे मनापासून सांगितल्यानंतर मग प्रश्नच उरला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी आणि शंकर राणवलीकडे जाणाऱ्या गाडीत बसलो.

प्रवास दिवसभराचा होता. शिणवणारा होता. पण गप्पा मारताना, खातापिताना आणि हसताखिदळताना आम्हांला प्रवासाचा शीण बिलकूल जाणवला नाही. दुपार टळून गेल्याचे लक्षातही आले नाही.

पण गाडीतून उतरलो आणि उन्ह कलू लागलेले दिसले. मनाला किंचित उदासवाणे वाटू लागले. पोहोचण्याचे ठिकाण जवळ येत चालले म्हणून असावे. आधी नवख्या ठिकाणी जाताना थोडे अवघड वाटतेच. त्यातून हे ठिकाण असे, की तिथे आमची वाट पाहणारे मायेचे माणूस कुणीच नव्हते. शंकरच्या नात्याचे होते, तेही आता जिवंत नव्हते.

आम्ही एस.टी.त चढलो तेव्हा आमच्या गप्पा आपोआप थांबल्या होत्या.

तासाभराच्या प्रवासानंतर आम्ही एस.टी.तून उतरलो, तेव्हा चांगलीच संध्याकाळ झाली होती.

आम्ही क्षणभर इकडेतिकडे पाहात राहिलो. एवढ्यात एक मध्यम वयाचे गृहस्थ पुढे झाले आणि म्हणाले, "मुंबईहून आलात का? शंकरराव का?"

आम्हांला हायसे वाटले. या आडगावात कुणीतरी ओळख दिली म्हणायची!

ते गृहस्थ वकील होते. शंकर पत्रात लिहिल्याप्रमाणे नक्की येईलच, अशी आशा बाळगून बिचारे एस.टी. स्टँडवर त्याची वाट पाहात उभे होते. आम्ही खरोखरच आल्याचे पाहून त्यांना आनंद झाला.

वाडा अजून दोड-दोन मैल आत, रानातच म्हटले तरी चालेल, असा होता. पण वकीलसाहेबांची सोबत मिळाल्यामुळे आम्हांला तिथवर कसे पोहोचू, याची काळजी राहिलेली नव्हती.

वकीलसाहेब चांगले वाटले. गृहस्थ तसा आतल्या गाठीचा नव्हता; पण फारसा बोलघेवडाही नव्हता. थोडाफार मख्खच, जेवढ्यास तेवढे बोलणारा होता. मनातले कळणार नाही अशी चेहेऱ्याची एकूण ठेवण होती. मुद्रा करारी, काहीशी रागीटच होती. नजर भेदक होती. त्यांच्यापुढे आम्ही अगदी पोरसवदा होतो. तरीही ते शंकरला आणि त्याचा मित्र म्हणून मला अदबीने वागवत होते. त्यांच्या या वागण्याने आम्हांला थोडेसे संकोचल्यासारखे होत होते, एवढे खरे.

वाट रानातली होती. काही काही ठिकाणी तर छोटीशी पायवाट दगडांमधून जात होती, एवढेच. बाकी आजूबाजूला किर्रर्र शांतता होती. पाहतापाहता गपकन् काळोख पडला, आणि काहीच दिसेनासे झाले. मधेच एखादे झुडूप काजव्यांनी मढवल्यासारखे चकाकू लागे, नाहीतर एखाद्या खोपटातला दिवा लुकलुके, तेवढेच. वकीलसाहेबांनी बॅटरी आणली होती, तिचा उजेड पुढच्या पाऊलवाटेवर पडत होता. पाऊलवाटेने एकामागे एक चालताना एकमेकांशी बोलणे जमत नव्हते; आणि बोलण्यासारखे काही सुचतही नव्हते; पायाखालून एखादा दगडगोटा सुटून घरंगळत होता. त्याचा आवाज किंवा खाली वस्तीतल्या एखाद्या कुत्र्याचे भुंकणे सोडले, तर सारे शांतच होते. त्यामुळे आमच्याच चपलांच्या चरचर आवाजाची आम्हांला मोठी सोबत वाटत होती…

हळूहळू काही लहानलहान घरे लागली आणि कुठेकुठे दिव्याचा उजेड दिसू लागला. आम्ही वस्तीत आलो होतो. पण वकीलसाहेब कुठेही थांबले नाहीत. ते आपले बॅटरी घेऊन पुढे चाललेच होते. होताहोता वस्तीही मागे पडली. पुन्हा झाडी सुरू झाली. आता रातकिडेही मोठमोठ्याने किरकिरू लागले होते.

एकाएकी वकीलसाहेब थांबले. समोर बॅटरीचा उजेड टाकीत ते म्हणाले, “आला वाडा.”

बॅटरीच्या प्रकाशात वाड्याचे धूड चांगलेच प्रचंड वाटत होते. अर्थात तेवढ्या अपुऱ्या उजेडात आकारमानाची काहीच कल्पना येण्यासारखी नव्हती.

दारातूनच वकीलसाहेबांनी आरोळी ठोकली : “शिवरामा रेऽ ! शिवरामाऽ!”

तशी कंदिलाचा उजेड आतून बाहेर सरकताना दिसला, आणि त्यामागोमाग, कंदील घेतलेली शिवरामाची वाकलेली आकृती बाहेर आली.

आम्ही आत गेलो.

शिवरामाने हातपाय धुवायला पाणी दिले, आणि तो जेवणाच्या व्यवस्थेला लागला.

आम्ही माडीवर गेलो. शिवरामा कंदील आणि पाण्याचे तांब्याभांडे घेऊन पाठोपाठ हजर झाला. शिवरामा म्हणजे एखाद्या ठिकाणी मनापासून काम करताकरता उमर घालवणाऱ्या विश्वासू चाकराचा दुर्मिळ नमुना होता. मनातल्या मनात मला शंकरचा किंचित हेवा वाटला. अशा विलक्षण सेवावृत्तीच्या माणसाचा तो अचानक धनी झाला होता.

आम्ही तिघेही पाणी प्यालो, आणि काय बोलावे ते सुचेनासे होऊन, एकमेकांकडे पाहात बसलो.

मी वाड्याविषयी, हवामानाविषयी किंवा असेच काहीतरी फालतू बोलणार होतो. इतक्यात माझी नजर वकीलसाहेबांकडे गेली आणि मी गप्प झालो.

त्यांना काहीतरी बोलायचे असावे. पण ते कसे बोलावे, या विचारात ते पडले होते.

काही क्षण असेच गेले. वकीलसाहेबांची अस्वस्थता शंकरच्याही लक्षात आली. त्यांच्या बोलण्याची वाट पाहात तो नुसताच चुळबुळ करीत बसून राहिला.

मग ते एकदा खाकरले आणि पुन्हा गप्प बसले. वातावरणातील ताण कमी व्हावा म्हणून मी खिशातून सिगरेटचे पाकिट काढले आणि त्यांच्यासमोर धरले. त्यांनी मानेनेच नकार दिला. पण ते बोलू लागले,

"हे बघा शंकरराव, तुम्ही गैरसमज करून घेणार नसलात तर तुम्हाला काही सांगायचंय."

"सांगा." शंकर सिगरेट पेटवीत म्हणाला.

"या वाड्याचा शेवटचा मालक तुमचे काका. म्हणजे वारसाहक्कानं तुम्ही इथले मालक. माझ्या मृत अशिलाची इच्छा, वाडा त्याच्या वारसाला मिळावी ही, आणि ती पुरी करणं, हे माझं कर्तव्य!"

वकीलसाहेब अगदी अस्सल वकिलासारखे बोलत होते.

"तुमच्यावर माझा विश्वास आहे. तुम्ही म्हणता त्या अर्थी तुम्हीच शंकरराव याविषयी मला शंका नाही. शिवाय माझं पत्रही तुम्ही सोबत आणलेलं आहे. तेव्हा संशयाला जागाच नको!" शंकरकडे भेदक नजरेने पाहात वकीलसाहेब म्हणाले, "पण तरीही, तुम्हीच या वाड्याचे खरे मालक आहात, याचा आणखी एक पुरावा मला उद्या सकाळपर्यंत आपोआप मिळेल."

"पुरावा? कसला?" लहान होत चाललेला कंदील मोठा करीत मी लगेच विचारले.

"हा वाडा एरवी फार चांगला आहे. इथं-" आजूबाजूला पाहात, आवाज लहान करीत वकीलसाहेब म्हणाले, "इथं तसलं फारसं काही नाही."

"फारसं काही नाही-म्हणजे थोडंफार आहे?" मी विचारले.

"हो. म्हणजे वाडा जवळजवळ तीनशे वर्षांपूर्वीचा. तेव्हा त्यात अगदीच काही नसेल, असं कसं होईल? पण अगदी क्वचित अवसेपुनवेलाच ते दिसतं. आणि ते देखील दुसऱ्या कुणाला नाही. फक्त वाड्याच्या मालकालाच."

"ठीक आहे. आम्ही काही इथं राहणार नाही. तेव्हा अवसेपुनवेलाही-" शंकर वरवर बेपर्वाई दाखवीत म्हणाला.

"अंहं! वाड्याच्या मालकाला पहिल्या रात्री तर ते हटकून दिसतंच! जणू या वाड्यात जे काही आहे, ते वाड्याच्या खऱ्या मालकाशी आपली तात्काळ ओळख, करून घेतं."

शंकर एकदम ताडकन उठून उभा राहिला.

"शंकर!" मी त्याला खाली बसवले.

"मला राहायचं नाही या वाड्यात!" शंकर पुन्हा उठून उभा राहात म्हणाला, "एक रात्रसुद्धा नाही! मी आत्ता चाललो. गावात एखादी खानावळ असेलच ना?"

"नाही शंकरराव. तुम्हाला एक रात्र इथं काढलीच पाहिजे!" वकीलसाहेबांच्या आवाजात जरब होती. "इथून पळून गेलात, तर या वास्तूचा अपमान होईल. ही वास्तू आज आपल्या मालकाचं स्वागत करणार आहे. आपलं रहस्य तिच्यासमोर उघडं करणार आहे; आणि तुम्ही करंटेपणानं तिला झिडकारून पळून जाणार?"

शंकर खाली बसला. त्याने पुन्हा सिगरेट पेटवली.

“नाही शंकरराव. आतापासून तुम्ही या प्रचंड ऐतिहासिक वास्तूचे मालक झाला आहात. या मालकीला शोभेल असा धीटपणा तुम्ही दाखवायला हवा. घाबरू नका. तुम्हाला काहीही होणार नाही. ही वास्तू आपल्या मालकाचा तिरस्कार करीत नाही. त्याच्यावर प्रेम करते. ती त्याला अपाय करणार नाही. मात्र तुम्ही जे काय दिसेल ते तोंडातून चकार शब्द न काढता बघायचं. सहन करायचं. बस्स! फक्त आजची रात्र! …आज जे घडेल ते उद्या सकाळी मला सांगा. माझी त्यावरून खात्री होईल, की तुम्हीच इथले अस्सल वारसदार आहात. रामदादांचे चिरंजीव आहात.”

त्यांनी वडिलांचे नाव घेताच शंकर थोडा ताळ्यावर आला. शिवाय वकीलसाहेबांच्या स्वरातल्या आर्जवाचाही परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही.

“ठीक आहे. राहीन मी आजची रात्र! मी काही एवढा भित्रा नाही.” शंकरने त्यांना नाखुषीने सांगितले, “शिवाय माझा मित्र आहेच माझ्याबरोबर!”

“हो. ते आहेतच!” वकीलसाहेब म्हणाले, “पण प्रत्यक्षात त्यांचा काही फारसा उपयोग होणार नाही. कारण आज जे घडेल ते या वाड्याच्या मालकाशिवाय-अस्सल वारसदाराशिवाय दुसऱ्या कुणालाच दिसू शकणार नाही. काहीही करा; पण आजची रात्र तेवढी निभावून न्या. उद्या कुठंही जायला तुम्ही स्वतंत्र आहात.”

माझा स्वभाव मूळचाच थोडा अश्रद्ध आहे. या जगात एका आईशिवाय दुसऱ्या कुणालाच मी फारसे मानीत नाही. अगदी परमेश्वरालासुद्धा. मग भुतांचे तर नावच नको. तेव्हा वकीलसाहेबांची टर उडवण्यासाठी मी विचारले, “काय हो, तुम्ही सांगितलंत हे खरं का?”

“तर!” माझ्या स्वरातल्या थट्टेकडे दुर्लक्ष करून वकीलसाहेब म्हणाले, “प्रत्येक पिढीचा हा अनुभव आहे. इतिहास आहे. शंकररावांना विचारा सकाळी! काय छाती आहे त्यांची, हे खोटं म्हणण्याची!”

वकीलसाहेब असेच बोलत राहिले, तर शंकरचा धीर अधिकच खचेल, अशी मला काळजी पडली. पण एवढ्यात शिवरामा वर येऊन जेवण तयार असल्याचे सांगून गेला आणि वकीलसाहेब जायला निघाले. ते वाड्यावर न थांबता, गावात उतरले होते तिथे जाणार होते. आम्हाला ‘बेस्ट ऑफ लक’ म्हणून त्यांनी आमचा निरोप घेतला; आणि ते काळोखात दिसेनासे झाले…

जेवण करून आम्ही वर आलो तर काय? आमची अंथरूणे घालून तयार! मात्र ती दोन वेगवेगळ्या खणांत! आम्ही हताशपणे एकमेकांकडे पाहिले.

थोड्या वेळाने शिवरामाही निघून गेला. तो कधीच वाड्यावर राहात नसे. वाड्यापासून हाकेच्या अंतरावर त्याचे खोपट होते, आणि त्याचा नातवंडांपर्यंत संसार होता. त्याला थांबवून घ्यावे, असे फार वाटत होते; पण आम्ही त्याला जाऊ दिले. मात्र त्याची सोबत गेल्यावर अधिकच एकटेएकटे वाटू लागले.

तो जाताच आम्ही पहिली गोष्ट कुठली केली, तर दोन्ही पलंग एका खणात आणून जोडून ठेवले.

मग मी माझा सामानातून एक ब्रँडीची बाटली काढली. शंकरला म्हटले, “चल– थोडीथोडी घेऊ!”

शंकरने विचारले, “आत्ता- जेवणानंतर?”

“काही हरकत नाही.” मी म्हटले, “थोडी ऊब तर येईल. अंगात तरतरी येईल. भीतीबिती सगळी पार पळून जाईल डोक्यातून!”

शंकरला ते पटले. या क्षणी, भीती वाटू नये म्हणून काहीही करण्याची त्याची तयारी होती. माझ्या

भरवशावर तो इथवर आला होता. त्याचे भलतेसलते काही होऊ न देता त्याला सांभाळून घरी नेण्याची जबाबदारी माझ्यावर होती. शिवाय प्रत्यक्षात काही दिसले नसते, तरी केवळ भीतीने हा मुलगा कामातून गेला असता. वकीलसाहेबांना तरी हे सांगण्याची काय गरज होती? नसते सांगितले तर शंकर सुखाने झोपला नसता का? –पण एका अर्थी त्यांचेही बरोबर! त्यांनी शंकरच्या मनाची तयारी केली होती. त्याला सावध राहण्याची सूचना दिली होती.

ब्रँडी पितापिता शंकरला हळूहळू धीर येऊ लागला. मी इकडच्यातिकडच्या अवांतर गोष्टी बोलून त्याला खुलवू लागलो. "शाम्या," तो चढत्या नशेत मला म्हणाला, "समजा मला काही दिसलंच नाही तर रे?"

"दिसणार नाही, हे हंड्रेड पर्सेंट! भुतंबितं काही नसतंच या जगात!" मी त्याला धीर दिला.

"पण न दिसून चालायचं नाही! काही तरी दिसायलाच पाहिजे!"

"कशाला? भीती वाटते ना तुला?"

"नाही रे! पण काहीच दिसलं नाही तर त्या वकीलसाहेबांना पटायचं नाही, की मी या वाड्याचा अस्सल वारसदार आहे! रामदादांचा मुलगा आहे! –मग?"

ब्रँडीमुळे शंकरचे डोके तल्लख झालेले दिसत होते. कारण हा मुद्दा मलाही इतका वेळ सुचला नव्हता. काही दिसलेच नाही तर काय? वाड्याच्या मालकीबाबत रिस्क घेऊन चालले नसते.

ब्रँडी पिऊन माझी कल्पनाशक्ती आता तरल झाली होती. "आपण काही तरी रचून सांगू त्यांना; मग तर झालं? सकाळचं सकाळी पाहू." मी त्याची समजूत घातली.

थोडी म्हणता म्हणता आम्ही भरपूर ब्रँडी रिचवली. इतकी, की कधी नशा चढली आणि कधी गाढ झोप लागली, हे आम्हांला कळले देखील नाही.

शेजारचा कंदील लहान होत होत केव्हा तरी विझून गेला.

सकाळी जाग आली तेव्हा अंगावर उन्हाचा पट्टा ओढला गेला होता. माझ्यापलीकडे शंकर घोरत पडला होता. खाली शिवरामाची चाहूल लागत होती.

मी शंकरला उठवले. जागा होताच प्रथम त्याला, आपण कुठे आहोत, हेच समजेना. मी सविस्तर समजावल्यानंतर तो हायसे वाटून हसू लागला. म्हणाला, "म्हणजे कालची रात्र तशीच पार पडली? –काही न घडता?"

"मग? मी नव्हतं सांगितलं तुला, की भुतंबितं सगळं झूट आहे म्हणून? तू उगाच घाबरत होतास!"

"पण आता वकीलसाहेब येतील. त्यांना काय सांगायचं? काहीच दिसलं नाही असं म्हटलं तर ते त्यांना पटणार नाही. हे लोक भलतेच श्रद्धाळू असतात. काही दिसलं नाही म्हटलं, तर ते मला ताबडतोब हाकलून देतील या वाड्यातून! त्यांना पटायचंच नाही, की मी खरा वारस आहे!"

शंकरने वकीलसाहेबांना काय सांगायचे हे मी त्याला यथास्थित जुळवून दिले. आता ते खरेखुरे पाहिल्याचे नाटक वठवणे त्याच्यावर होते.

आमचा बेत ठरतो ना ठरतो, तो दारात शिवरामा आला– आम्हांला उठवायला. आम्ही खाली गेलो, हात-पाय-तोंड धुतले आणि चहा घेत आहोत, तो वकीलसाहेब हजर! सकाळी अंथरुणातच सारे काही ठरवून ठेवले होते म्हणून बरे!

शिवरामाने वकीलसाहेबांना चहा दिला. त्यांनी शंकरला विचारले, “काय, कशी गेली रात्र?”

शंकर काहीच बोलला नाही. त्याने इकडे तिकडे भयभीतपणे पाहिल्यासारखे केले आणि वकीलसाहेबांच्या लक्षात न येईल, अशा रीतीने मला डोळा मारला.

मी अत्यंत गंभीरपणे त्यांना म्हटले, “सविस्तर सांगेल तो. आपण वर जाऊ या.”

वकीलसाहेबांच्या हातातली रिकामी कपबशी कितीतरी वेळ हातातच राहिली. आश्चर्याने डोळे विस्फारून त्यांनी मला विचारले, “म्हणजे-तसं काही खरंच घडलं?”

“मी खोदून खोदून विचारलं. पण काही बोलायलाच तयार नाही!” मी गांभीर्य कायम ठेवून सांगितले, “तुम्हाला सांगतो का पाहू.”

आम्ही तिघेही वर गेलो. शंकर बिछान्यावर एका टोकाला कोपऱ्यात बसून राहिला. हुडहुडी भरून आल्यासारखा. मधेच तो आजूबाजूला नजर टाकी. एखाद्या भयानक स्वप्नात असल्याप्रमाणे त्याने चादर अंगभर पांघरून घेतली, तेव्हा मलाही क्षणभर संशय आला की, याला काय होते आहे नि काय नाही! शंकर इतका चांगला नट असेल, याची कल्पना मला कधीच करता आली नसती.

“मग सांगा बरं शंकरराव, काल रात्री काय घडलं?” मी दार लावून घेतल्यानंतर वकीलसाहेब शंकरला आवर्जून म्हणाले, “काही काळजी करू नका. खुशाल बोला! मी ते या कानाचं त्या कानाला कळू देणार नाही. हं! सांगा.”

वकीलसाहेबांनी एवढा धीर दिला तरी शंकर बोलेचना. मी म्हटले, याच्याकडून इतके पाठ करून घेतले, आणि हा आयत्या वेळेस दगा देतो की काय? पण नाही! अखेरीस अडखळत अडखळत एवढेच बोलला, “हातात मूल घेतलेली बाई…मला भीती वाटते…भीती वाटते…”

“काहीतरी त्याला दिसलं हे नक्कीच!” मी पुष्टी दिली, “त्याशिवाय त्याची अशी अवस्था व्हायची नाही!”

“पण काय दिसलं? प्लीज शंकरराव! मला सांगा.” काकुळतीला येऊन वकीलसाहेब बोलले, “माझ्यावर विश्वास ठेवा. तुमच्या काकांचादेखील माझ्यावर फार विश्वास होता.”

“सांगेल तो.” मी शंकरच्या जवळ जाऊन त्याच्या खांद्यावर हात ठेवला. “घाबरू नकोस शंकर! आता आम्ही आहोत ना? काय दिसलं तुला, ते सगळं सगळं सांग.”

क्षणभर शंकर शून्यात बघत राहिला. मग थांबतथांबत सांगू लागला, “रात्री आम्ही गाढ झोपलो…मध्यरात्री कधीतरी मला जाग आली…कशी कोण जाणे, आपोआपच! पाहतो तो कंदील विझलेला, सबंध खोली काळोखात आणि दरवाज्यावर तेवढा अंधुक उजेड! सावकाश…अगदी हळूहळू दरवाजा उघडला जात होता. मी बिछान्यात उठून बसलो. दरवाज्यातून थंडगार वाऱ्याची झुळूक येत होती. मला भीती तर वाटतच होती. पण शेजारीच हा झोपला होता. त्याला उठवायचं काही सुचेना. भारल्यासारखा मी दरवाज्याशी गेलो. एकटाच बाहेर पडलो. बाहेर कुणीच नव्हतं. पण मी थांबलो नाही. कुणीतरी ओढून नेत असल्यासारखा चालतच राहिलो. थंडगार वारे वाहात होते.”

इथे शंकरने पांघरूण अधिकच गच्च लपेटून घेतले.

“जिना उतरून मी खाली आलो. दिवाणखान्यात. तिथल्या प्रचंड घड्याळात बाराचे टोले पडत होते. टोले पडायचे थांबले मात्र-मला मुसमुसून रडण्याचा आवाज येऊ लागला. मी आजूबाजूला वळून पाहिलं. पण कुणीच दिसत नव्हतं. हळूहळू मुसमुसणं, हुंदके वाढतच चालले. आता त्यात एका लहान मुलाचं रडणंही मिसळलं. आवाज कुठून येतो हे कळत नव्हतं. चारी भिंतींमधून जसा तो घुमत होता! मग एका पुरुषाचा

संतापलेला आवाज या रडण्याच्या आवाजावरतो ऐकू यायला लागला. दिसत मात्र काहीच नव्हतं. आवाज एवढा वाढला, की त्यामुळं छत कोसळणार की काय, असं वाटत होतं. मी कानठळ्या बसून कानांत बोटं घातली आणि एकाएकी ते आवाज खाड्दिशी थांबले. मी काहीसा भानावर आलो. दिवाणखान्यातून बाहेर पडलो आणि परत जिन्याकडे जाऊ लागलो. एवढ्यात-"

"काय झालं?" वकीलसाहेबांनी विचारले.

"जिन्यावरून धाड्धाड् धावत एक भरजरी लुगडं नेसलेली बाई खाली उतरली. बाई म्हणजे नुसतंच बाईचं धड! त्यावर मुंडकं नव्हतं! तिनं एक लहान मुलासारखं काहीतरी छातीशी घट्ट धरलं होतं. तिच्या पाठोपाठ एक राजबिंडा पुरुष धावत आला. त्यानं तलवार उगारली होती आणि त्याचा चेहेरा आसुरी द्वेषानं माखलेला होता. इतका क्रूर चेहेरा मी जन्मात पाहिलेला नाही. ती दोघंही धावत माझ्यापर्यंत आली, त्याच क्षणी मला एक स्त्रीच्या आवाजातली कर्कश किंकाळी ऐकू आली आणि दोघंही दिसेनाशी झाली."

वकीलसाहेबांनी घाम पुसला. मी शंकरकडे पाहिले. आता त्याची तंद्री लागली होती :

"मी जिना चढून वर कसा आलो ते माझं मलाच माहीत! भीतीनं तर जिवाचं पाणीपाणी झालं होतं. तरीही कुठलीशी एक विलक्षण शक्ती मला पावलं टाकायला लावीत होती. कसाबसा मी दाराशी येऊन आत पाऊल टाकणार-"

"तर दार बंद?" वकीलसाहेबांनी विचारले.

"नाही. दार उघडंच होतं. पण ते भरजरी लुगडं नेसलेलं बाईचं धड मुलाला हातात घेऊन दारातच उभं होतं. आता तिनं मूल छातीशी धरलेलं नव्हतं. ते तिच्या हातात होतं. एखादं टरबूज फुटावं, तसं त्याचं शरीर छिन्नविछिन्न झालं होतं, आणि त्यातून रक्ताच्या धारा गळत होत्या..."

"ते पाहून बहुधा माझी शुद्ध गेली असावी. कारण पुढचं काहीच मला आठवत नाही. सकाळ झाली तेव्हा मी माझ्या बिछान्यातच होतो. मग तिथं मी आपल्या पावलांनीच आलो की, ज्या शक्तीनं मला बाहेर नेलं, तिनंच परत आणून ठेवलं, हे मला माहीत नाही!"

"शॉकिंग! अॅबसोल्यूटली शॉकिंग! बट् टू!" वकीलसाहेब उद्गारले, "शंकरराव, तुम्हीच इथले खरे वारस आहात, याविषयी मला तीळमात्र शंका नाही. तुमच्या काकांनाही हाच-अगदी हा अस्साच प्रकार पाहायला मिळायचा. तुमच्या पूर्वजांमध्ये एका स्त्रीचा आपल्या नोकराशी संबंध आला आणि त्याच्यापासून तिला मूल झालं. तिच्या नवऱ्याला हे समजताच त्यानं तिचा शिरच्छेद केला, आणि त्या मुलाचाही तात्काळ प्राण घेतला. त्या तिघांचीही पिशाच्च इथं अधूनमधून दिसतात. इतरांना नाही- फक्त वाड्याच्या मालकालाच!"

परत जाताना वकीलसाहेबांनी शंकरला गहिवरून मिठी मारली. त्या वृद्ध गृहस्थाने शंकरला मालक म्हणून जो आदर दाखवला तो पाहताना मलाही उचंबळून आले.

ते गेले तरी शंकर त्याच तंद्रीत होता.

काही वेळाने त्याची ती तंद्री ओसरली ...आणि मग मात्र तो खो-खो हसत सुटला. "असाच प्रकार दिसतो म्हणे! अरे सगळे भुताटकीचे प्रकार सारखेच असतात!" तो हसतहसत म्हणाला, "भलतंच सोपं आहे या म्हाताऱ्या लोकांना भुताटकीच्या गोष्टी सांगून बनवणं! एक ठोकून दिली की काम फत्ते!"

कितीतरी वेळ तो हसतच होता.

माझे हसणे मात्र तेव्हापासून कायमचे हरपले.

त्या दिवसापासून मी आतल्या आत जळत राहतो. कुणाकडे सांगू शकत नाही- शंकरकडे तर नाहीच नाही-की मी त्याला जुळवून दिलेला तो प्रकार-तो खोटा नव्हता! तो त्याने पाहिला नसेल: पण मी पाहिलेला होता. प्रत्यक्ष पाहिला होता!

तो मला दिसला याचा अर्थ एकच होता-

मी रामदादांचा थोरला मुलगा होतो! शंकरचा थोरला भाऊ! काकांचा खरा वारस! वाड्याचा खरा मालक!

इतके दिवस मी आईला पवित्र समजत होतो. पण रामदादांचा आणि तिचा संबंध...रामदादांच्या पूर्वजांप्रमाणे माझ्या वडिलांनी तिचा शिरच्छेद केला नाही. माझा प्राण घेतला नाही. त्यांनी स्वत:च आत्महत्या केली!

कुठल्याही भुताटकीपेक्षा हे सत्य अधिक भयंकर आहे! ...पण ज्या आईविषयी मी परमोच्च आदर ठेवला, तिचे हे वर्तन कळूनही मी त्या धक्क्याने मरून गेलो नाही!

अशा वेळेस माणूस जिवंत राहतो; पण त्याच्या जगण्याचा अर्थच बदललेला असतो!

पुलावरचा माणूस

दादाजीला पहिल्याप्रथम पाहिले, तेव्हाच रणजीतचे त्याच्याविषयी वाईट मत झाले. खरे तर तसे व्हायला काही कारण नव्हते. दादाजी हा रणजीतच्या वडिलांचा एकनिष्ठ चाकर. गेली पंचवीस वर्षे त्याने सुरजीतसिंगांची चाकरी केली होती; आणि त्यांनी प्राण सोडला तेव्हादेखील तोच त्यांच्याबरोबर होता. लोहगढसारख्या आडगावातही त्याने सुरजीतसिंगांना त्यांच्या उतारवयात सोबत करून त्यांना काही कमी पडू दिले नव्हते.

रणजीतला हे ठाऊक नव्हते असे नाही; पण त्याचे डोकेच भडक होते. एखादी गोष्ट त्याच्या मनाने घेतली, की ती तिथे पक्की व्हायची. त्याला मोठेसे कारण लागायचे असे नाही. आता दादाजीचे डोळे घारे आहेत म्हणून तो बेरकी आहे आणि फारसे बोलत नाही म्हणजे त्याला मनातल्या मनात गोष्टी दडवून ठेवायची सवय असणार, हा तर्क काही फारसा सुसंगत नव्हता. परंतु दादाजीला पाहताच रणजीतने असा ग्रह करून घेतला खरा!

दादाजी आता चांगलाच पिकला होता. पण त्याची तब्येत मूळचीच दांडगी असावी. कारण या वयातही तो न थकता एकसारखे काम करीत बसे. किंबहुना न बोलता एकामागून एक कामे उचलीत राहण्याच्या त्याच्या या सवयीचीदेखील रणजीतला चीड येत असे. एकट्यादुकट्या माणसाचे काम तरी एवढे काय असते, असे त्याला वाटे. पण लोहगढमध्ये आटा पिसणे, लाकडे फोडणे, लहानमोठ्या दुरुस्त्या करणे, यासाठी बाहेरची माणसे मिळत नसत. त्यामुळे दादाजीला उद्याची कामे आजच करून ठेवण्याची सवय लागली होती. किंबहुना काम करणे हेच त्याचे व्यसन होऊन बसले होते, म्हटले, तरी चालेल.

रणजीतचा स्वभाव याच्या विरुद्ध टोकाचा! माणसाने एकसारखे मर-मर मरण्यापेक्षा चैन करावी, आराम करावा, आणि जाताजाता जमले तरच काही काम करावे, असे त्याचे मत होते. सुरजीतसिंगांनी लोखंडाच्या व्यापारात इतके कमावून ठेवले होते, की असे चार चैनी रणजीत घरात असते, तरी वैभव त्यांना पुरून उरते. त्यातून रणजीत एकुलता बेटा! मग काय विचारता! मनाला येईल ते करावे, आणि मजेत राहवे ही त्याची प्रवृत्ती, न वाढती तरच नवल!

बापाच्या मागून सारे काही आपलेच होणार, याचे वारे फार लवकर रणजीतच्या डोक्यात शिरले. तसा तो आपण होऊन कुणाला त्रास देत नसे; पण एकंदरीत स्वत:च्याच गुर्मीत राहायचा. चैन, रंगढंग, बाई-बाटली हे सारे शौक आपल्यासारख्या रगेल मर्दाने करायचे नाहीत, तर करायचे कुणी, हे त्याचे मत! तेव्हा कुणी उपदेश करण्याच्या भानगडीत पडला, तर त्याची अब्रू जागेवर राहात नसे. सदैव मारामारीचा पवित्रा! कुणी विरोध केला किंवा लागेलसे बोलला, तर लोळवलाच त्याला जमिनीवर! रणजीतचा तामसी स्वभाव माहीत असलेले कुणी त्याच्या वाटेलाच जात नसे. पण तरीही वेळ आलीच, तर एकटा रणजीत चौघाचौघांना भारी पडे. पिढीजाद कणखरपणाला मांसमद्याचा नैवेद्य मिळाल्यावर कां माजू नये शरीराने?

रणजीतने आयुष्यात अनेक गोष्टी केल्या. रग्गड शिक्षण घेतले. केवळ गंमत म्हणून परदेशच्या एकदोन वाऱ्यादेखील केल्या. नोकऱ्या केल्या, बिझनेस केले, खोट खाल्ली, फायदा होताच पैसा उधळला. वय झाल्यावर सुरजीतसिंग लोहगढला आपल्या वाड्यात जाऊन राहिले आणि रणजीत दिल्लीला नाना ढंग करीत राहिला. नसती कटकट नको, म्हणून शादी केली नाही. पण असंख्य लफडी केली, आणि त्यातूनही सुटका करून घेतली. शत्रू केले, मित्र जोडले. थोडक्यात, शक्य तेवढ्या प्रकारांनी जिणे जगून घेतले.

आता मात्र रणजीतचे उतारवय झाले होते. शरीर अजून, धिप्पाड होते, पण त्याचे देखणेपण मावळत चालले होते. मिश्यांचे आकडे टोकदार होते, पण डोक्यावरचे केस करडे झाले होते. रग कायम होती, परंतु संताप शरीरात मावेनासा झाला होता.

आणि अचानक सुरजीतसिंगांनी लोहगढला देह ठेवल्याची बातमी आली. रणजीत त्या वेळेस धंद्याच्या कामासाठी पाटण्याला गेला होता. दादाजीनेच आपल्या मालकाचे और्ध्वदैहिक केले. रणजीतला ही बातमी

कळताच तो मनापासून हळहळला. पण ते दु:ख बाप गेल्याचे होते, की दादाजीसारख्या परक्या माणसाने त्याला मरताना मांडी दिली याचे होते, ते सांगणे कठीण.

सुरजीतसिंग गेले आणि लोहगढचा वाडा रिकामा पडला. अचानक एके दिवशी रणजीतच्या मनात आले की, चला, आता गावीच जाऊन राहावे. दिल्लीमध्ये आहे काय? ना बायको, ना मुले. शौकच करायचा तर काय, तो कुठेही करता येईल. इतके दिवस शहराच्या गजबजाटात केला; आता खेड्यातल्या शांततेत करू. जिंदगीचा मजा चाखता येत असेल, त्याला शहर काय नि खेडे काय? त्यातून लोहगढला आपली पिढीजाद वास्तू. तिच्यात दिवा तर लागायला हवा?... अशा विचारांनी त्याने धंदा पार्टनरवर सोपवला, कायम उत्पन्नाची व्यवस्था केली आणि सरळ लोहगढचा रस्ता धरला.

लोहगढ गाव जवळजवळ भूतकाळातच जमा होता. गावात थोडीफार वस्ती होती, नाही असे नाही. परंतु निम्म्याहून अधिक गाव आता जमीनदोस्त झाला होता. इतिहासकाळी गाव मोठ्या दिमाखात मिरवला असेल, असे सर्वत्र पसरलेले तुटके वाडे आणि ढासळलेले बुरूज पाहून वाटे. गावातला एक पडका किल्ला, आणि देवळे, मशिदी व गढ्या यांचे भग्न अवशेष, यांच्यामुळे गावाला मसणवटीचीच कळा आली होती.

सुरजीतसिंगांचा वाडादेखील उरलेल्या गावासारखाच उदासवाणा दिसे. निराकार पसरल्यामुळे, तो फतकल मारून बसलेल्या एखाद्या स्थूल थेरडीसारखा विमनस्क वाटायचा. वाड्यासमोर एक गढूळ पाण्याचे तळ होते. तळ्यापलीकडे झाडी होती, तिच्या घनदाट काळोखात कुणी दबा धरून बसल्याचा भास होई. तळे तसे चांगलेच लांबरुंद होते आणि दोन किनाऱ्यांना जोडणारा एक लाकडी किरकिरा पूलदेखील त्यावर होता.

दादाजीला सोबत घेऊन रणजीतने सारा वाडा हिंडून पाहिला.

वाड्याची रचना काहीशी बुचकळ्यात पाडणारी होती. प्रशस्त दिवाणखान्याला लागून मध्येच एखादी कोनाड्याएवढी लहान खोली. भिंतीमधेच एखादे ठेंगणे दार. दार उघडले की आत पायऱ्या. पायऱ्या पोहोचायच्या त्या बंद दरवाजाशी आणि बंद दरवाजा उघडायचा एखाद्या लहानशा व्हरांड्यापाशी.

रणजीतने हसून म्हटले, "वा:! खूनबिन करायला भलतीच छान जागा आहे ही! –काय?"

दादाजीने अशा नजरेने पाहिले, की रणजीतचे हास्य एकदम मिटले. मात्र दादाजी बोलला काहीच नाही.

रणजीतच पुढे म्हणाला, "तुला माहीत आहे की नाही, इथं एखादा खून पडलेला?"

दादाजीने न बोलता नुसती मान हलवली. रणजीतचा सगळा हास्यविनोद फुकट गेला होता. त्याच्या कपाळावर एक लहानशी आठी उमटली. इतकी घुमी माणसे त्याला आवडत नसत.

दिवसभर करण्यासारखे काही नसेच. मग रोजची तीचतीच कामं रणजीत बराच वेळ लावून करी. वरचेवर केस धुऊन उन्हात वाळवीत बसे. आरामखुर्चीत बसून तळ्याकडे पाहात चिक्कार सिगरेटस् ओढी, पेशन्सचा डाव मांडी, कादंबऱ्या वाची, नाहीतर संध्याकाळच्या वेळेस व्हिस्की पीत स्वत:शीच जुन्या आठवणी घोळवीत राही. अशा वेळी त्याला वाटायचे की, निदान हा दादाजी तरी गप्पा मारण्याइतका बोलका हवा होता; पण दादाजी त्याने बोलावल्याशिवाय त्याच्या जवळदेखील फिरकत नसे. त्या एवढ्या मोठ्या वाड्यात, तो कुठल्यातरी दिव्याची काच साफ करीत, नाहीतर कुठल्यातरी कोपऱ्यातील कोळिष्टके काढून टाकीत, बसलेला असे. रणजीतला या गोष्टीचा राग येई. तो मुद्दामच काहीतरी काम काढून त्याला बोलावून घेई. सावकाश चालत दादाजी त्याच्यासमोर उभा राही.

"कुठं होतास तू?" रणजीत चिडून विचारी. "हाका मारून घसा सुकला माझा!"

यावर दादाजी काहीच बोलत नसे. नुसता काम सांगण्याची वाट पाहिल्यासारखा उभा राही.

रणजीतचा राग आणखी वाढे, “उभा काय राहेलास मूकस्तंभासारखा? हा ग्लास कोण विसळून आणणार, तुझा-”

पण म्हातारा नोकर वडिलांच्या बरोबरीचा! म्हणजे त्याला शिव्यादेखील देण्याची सोय नसे. रणजीतचा राग घुसमटल्यासारखा होई. तो विचारी, “बाप्पाजींशीदेखील बोलायचा नाहीस का तू?”

दादाजी एकदा रणजीतकडे आपल्या घाऱ्या डोळ्यांनी रोखून पाही; आणि हळूहळू चालत ग्लास विसळायला जाई. त्या नजरेचा अर्थ रणजीत लावीत असे : “बाप्पाजी तुझ्यापेक्षा फार वेगळे होते. ते कुठे आणि तू कुठं? तुझ्याशी बोलत बसावं असं आहेच काय तुझ्यात?”

रणजीतच्या अंगाचा तीळपापडच होई. तो एकवार मिश्यांवरून हात फिरवी. त्याचा अर्थ : “बघून घेईन. जास्त हुषारी नको.”

स्वत:मध्ये हरवून तळ्याकडे पाहात रणजीत त्या संध्याकाळी बसला होता. हातात ग्लास होताच.

एकदम त्याला पुलावर काहीतरी हालचाल दिसली.

तो लक्षपूर्वक पाहू लागला.

एरवी पूल निर्मनुष्यच असायचा. क्वचितच कुणाची ये-जा असे.

तो एक चांगला उंचपुरा मनुष्य होता. अंगात पायघोळ अंगरखा. संध्याकाळच्या अंधुक उजेडात त्याचा चेहेरा बिलकूल दिसत नव्हता. जसा काही त्याला चेहेरा नव्हता - त्या जागी एक काळे विवरच होते.

घाईघाईने चालत तो वाड्याच्या दिशेने येत होता.

तसे म्हटले तर रणजीत बराच वेळ तळ्याकडे पाहात होता. परंतु झाडीतून काही तो माणूस येताना दिसला नव्हता. पुलाच्या पलीकडच्या टोकाशीही दिसला नव्हता.

आणि पुलाच्या मध्यावरूनच एकाएकी तो दिसू लागला होता.

हे कसे शक्य आहे? रणजीत विचारात पडला. पाहतानाच चूक झाली असेल. दृष्टिभ्रम असेल. विचारात गढल्यामुळे तो आधी दिसला नसेल.

पाहतापाहता त्याची आकृती मोठी होत होती. स्पष्ट होत होती. वाड्याच्याच दिशेने येत होती.

रणजीतने बारकाईने पाहिले. पण छे! चेहरा अजूनही दिसत नव्हता.

रणजीत वळला आणि त्याने दादाजीला हाक मारली.

दादाजी स्वयंपाक करीत होता. चार हाका मारल्यानंतर त्याच्या ध्यानात आले की, मालक बोलावीत आहे! वयपरत्वे त्याचे डोळे आणि कान- दोन्ही अधू झाले होते. फडक्याला हात पुशीत तो रणजीतच्या समोर येऊन उभा राहिला, तेव्हा रणजीत चांगलाच चिडला होता, “बोलावल्याबरोबर एकदा तरी येत जा की!” तो दादाजीला म्हणाला.

दादाजी काहीच बोलला नाही.

“बरं, तो कोण आहे? त्या माणसाला ओळखतोस का तू?” रणजीतने पुलाकडे बोट दाखवून विचारले.

दादाजीने डोळे बारीक करून पुलाकडे पाहात विचारले, “कुठला माणूस साहेब?”

त्याच्या प्रश्नासरशी चमकून रणजीतने पुलाकडे पाहिले.

पुलावर आता कुणीच नव्हते!

“तिथं एक माणूस होता आत्ता. मी चांगला पाहिला. आपल्याच वाड्याच्या दिशेनं येत होता.”

दादाजी काहीच बोलला नाही. त्याचे ते मौन रणजीतला फार लागले.

“तुला काय वाटलं?” तो उसळून म्हणाला, “मला भास होताहेत? मला काय भ्रम झालाय? की एवढीशी व्हिस्की चढलीय मला? मी कसम खाऊन सांगतो, की इथं नक्की एक माणूस येत होता.”

पण दादाजी काहीच बोलला नाही. त्याने हातातला फडका खांद्यावर टाकला आणि तो शांतपणे खोलीच्या पायऱ्या चढू लागला.

“गुपचूप बसून राहतोस तू!” रणजीत अजून बडबडतच होता, “पण मी चांगलं ओळखून आहे तुझ्यासारख्या लोकांना! मनातल्या मनात म्हणत असशील, की, ‘मालक काहीतरी निमित्त काढून एकसारखं बोलावतो.’ मला काय हौस आहे तुला उगाच बोलवायची?” एका घोटात एकदम अर्धा पेग रिचवून ग्लास खाली ठेवीत तो म्हणाला, “पण तो माणूस इथं येत होता, यात शंकाच नाही. मी चांगला पाहिला!”

त्याला तसेच बडबडत ठेवून दादाजी आत निघून गेला. रणजीतच्या मनात आले : आपण दादाजीशी बोलत असताना तो माणूस पूल उतरून चालू लागला असेल, किंवा इथेच कुठेतरी घराच्या बाजूला थांबला असेल. कुठल्याही क्षणी तो वाड्याचा दरवाजा ठोठावील!

रणजीत स्तब्ध राहून चाहूल घेऊ लागला. दिंडीदरवाजा कुणी ठोठावते का, याची वाट पाहू लागला.

पण कुणी आले नाही की गेले नाही. मग मात्र रणजीतला शंका येऊ लागली की आपल्याला भासच झाला असेल. दिल्लीला माणसांची वर्दळ, आणि इथे ही स्मशानशांतता! त्यामुळे आपलेच मन कुणीतरी येण्याची वाट पाहात असते. त्याला दादाजीचा अधिकच राग आला. हा माणूस निदान गप्पा मारायच्या उपयोगाचा असता, तरी आपली ही अशी अवस्था झाली नसती!

दिवसेंदिवस रणजीतला वाडा अधिकच भकास वाटू लागला.

पुन्हा एक संध्याकाळ…काळवंडू लागलेली.

फक्त तळ्यावरून उडणाऱ्या पक्ष्यांचा ‘चिर्र-चिर्र’ आवाज. बाकी सारे नि:शब्द.

रणजीत एक इंग्रजी कादंबरी चाळत होता. त्याचे मद्यपान संपले होते, आणि दादाजी जेवणाची तयारी करीत होता.

अगदी सहजपणे रणजीतची नजर खिडकीबाहेर गेली.

पुलाच्या पायथ्याशी तो माणूस उभा होता.

आजही त्याच्या अंगावर त्या दिवशीचाच तो पायघोळ अंगरखा होता. त्याचा चेहेरा दिसणे शक्य नव्हते. कारण त्याची वाड्याकडे पाठ होती. पुलाच्या रोखाने तो हळूहळू चालला होता.

त्याची चाल आज त्या दिवशीसारखी नव्हती. याचे कारण रणजीतच्या लगेच ध्यानात आले. त्याच्या हातात

एक भलेमोठे गोणते होते, आणि त्या गोणत्यात काहीतरी जड सामान असावे. कारण त्याने ते कसेबसे फरफटत-फरफटत आपल्याबरोबर चालवले होते.

एका जागी खिळून रणजीत ते दृश्य पाहात राहिला. कशासाठी हा माणूस ते गोणते घेऊन पुलाकडे चालला आहे?

आता कातरवेळ झाली होती. काळोख चांगलाच पडला होता. एक विचित्र गोष्ट म्हणजे वातावरणात कसलाही आवाज येत नव्हता. मघा 'चिर्रर्र-चिर्रर्र' करून ओरडणारे तळ्यावरचे पक्षीही आता चूप बसले होते.

एव्हाना तो माणूस आपल्या त्या ओझ्यासकट पुलाच्या मध्यभागी पोहोचला होता.

आणि मग एक आश्चर्य घडले.

त्या माणसाने हातातले ते गोणते सरळ तळ्यात फेकून दिले.

लांबवरून का होईना, पण जड वस्तूंनी भरलेले ते गोणते पाण्यात फेकल्याचा आवाज यायला हवा होता. पण किंचितही आवाज झाला नाही. सारे कसे एखाद्या चित्रासारखे नि:शब्द राहिले…

इतका वेळ भान विसरून रणजीत तो सारा प्रकार पाहात होता. पण आता त्याला खाडकन् जाग आल्यासारखे झाले. धावत जाऊन त्या माणसाला गाठायचे, त्याचा चेहरा जवळून बघायचा आणि शक्य झाल्यास त्याने गोणत्यातून आणून तळ्यात काय फेकले, हे त्याला विचारायचे, असे त्याने ठरवले. झपकन् सँडल्स चढवून तो वाड्याबाहेर पडला. दिंडीदरवाज्याशी पडलेली काठी उचलून बरोबर घ्यायला तो विसरला नाही.

पण बाहेर येऊन धावत तो पुलाच्या पायथ्याशी पोहोचतो, तो काय-

त्याचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वास बसेना.

पुलावर चिटपाखरूदेखील नव्हते.

रणजीतची व्हिस्की खाड्दिशी उडाली.

कुठे गेला तो माणूस?

गेल्या वेळेप्रमाणे या खेपेस त्याला कुठल्याही एका बाजूला उतरून जाणे शक्य नव्हते. कारण तो पुलाच्या मध्यावर उभा होता. त्याने गोणते तळ्यात फेकताच रणजीत लगोलग धावत सुटला होता. म्हणजे मध्ये फारसा वेळही गेला नव्हता. मग तो गेला कुठे?

रणजीतला एक भयंकर शंका आली.

–त्याने गोणत्यापाठोपाठ स्वत:च तर तळ्यात उडी टाकली नसेल?

रणजीत पुलाच्या मध्यापर्यंत गेला. त्याने वाकून पाहिले.

पाणी अतिशय शांत होते. त्यावर एकही तरंग नव्हता. झाडांची काळीभोर प्रतिबिंबे वाऱ्याच्या झुळकीवर अगदी हलकेच हलत होती.

मध्यंतरी थांबलेला पक्ष्यांचा 'चिर्रर्र-चिर्रर्र' आवाज आता पुन्हा सुरू झाला. रातकिडेही त्याला साथ देऊ

लागले.

काठी आपटीत रणजीत परत आला. काठीच्या आवाजाने दचकून एक चिचुंद्री 'ची-ची' करीत इकडून तिकडे पळाली.

दारात पाऊल टाकताच तो ओरडत सुटला, "दादाजीऽ!... दादाजीऽ!"

दादाजी वाळलेल्या कपड्यांच्या घड्या करून ठेवीत होता. तो रणजीतच्या लुंगीची घडी करीतकरीतच बाहेर आला आणि त्याच्यासमोर उभा राहिला.

"कोण आहे तो माणूस? कां येतो इकडे पुन्हापुन्हा?" त्याने ओरडून विचारले.

"कुठला माणूस साहेब?" दादाजीने शांतपणे विचारले.

"तोच! त्या दिवशीचाच! तेव्हा तुला वाटलं होतं, मला भ्रम झालाय; पण नाही. तो आजही चालला होता पुलावरून आणि त्यानं एका गोणत्यात काहीतरी भरून ते तळ्यात फेकलं - हो! मी प्रत्यक्ष पाहिलं. माझ्या डोळ्यांनी! आणि माझ्या डोळ्यांच्या काही तुझ्यासारख्या खाचा झालेल्या नाहीत!"

"मी नाही पाहिलं कुणाला." एवढेच बोलून दादाजी चालू लागला.

"जातोस कुठं? माझं बोलून झालेलं नाही अजून." रणजीत ओरडला.

दादाजी वळला आणि आज्ञाधारकपणे थांबला. त्याच्या या आज्ञाधारकपणाचीही रणजीतला नेहमी चीड यायची.

"तुला काय वाटतं? तो कोण असेल? असा मध्येच नाहीसा झाला म्हणजे- माणूसच असेल की पिशाच्च?" रणजीतने विचारले.

"मला माहीत नाही साहेब." दादाजी म्हणाला.

"तुला माहित्येय? माझा पिशाच्चांवर मुळीच विश्वास नाही!"

दादाजी तिथेच पायरीवर बसला. तो किंचित हसल्याचा भास झाला; पण त्याच्या पांढऱ्या मिश्यांमधून खरे काय ते कळणे अवघड होते.

"मी आजवर इतकं पाहिलंय आयुष्यात! पण भूतबीत काही दिसलं नाही आपल्याला अजून! अरे, असं भूत कुठं असतं काय? येऊ दे आपल्यासमोर. नाही त्याची जागच्या जागी चटणी केली-"

रणजीत बोलायचा थांबला. इतके बोलल्यानंतर तरी दादाजी काहीतरी बोलेल, अशी त्याची अपेक्षा होती. पण त्याने फक्त एक सुस्कारा सोडला. का राहतो हा असा गप्प? काहीच का उत्तर देत नाही? याच्यासमोर आपले शब्द एखाद्या भिंतीवर आपटावेत तसे परत येतात. खरे म्हणजे आपण भूत नसते असे म्हटल्याबरोबर याने आजूबाजूचे दाखले देऊन तावातावाने भांडून, भूत असते हे सिद्ध करायला हवे. याची इतकी वर्षे या ओसाड गावात गेली- याला काय इथे काहीच बघायला मिळाले नसेल? काहीच कानावर आले नसेल? खुद्द याच वाड्यात काय कधी एकदाही भुताटकीचा प्रकार घडला नसेल? मग हा बोलत का नाही? भुतांच्या आख्यायिका नाहीत, असा जुना वाडा असेलच कसा? ज्याला गप्पा माराव्याशा वाटत नाहीत, असा जुना नोकर असेलच कसा?...

पण नाही! हा माझ्यासमोरच गप्प राहतो. याला माझे इथे येणेच पसंत नाही. याची बाप्पाजींवरच भक्ती होती. त्यांचा मुलगा याच्या खिजगणतीत नाही...

रणजीतचा राग आतल्या आत उकळत राहिला. त्याला आंधेकच एकटेएकटे वाटू लागले. हा दोंड दमडीचा थेरडा गडी गप्प राहून आपल्यावर हे एकटेपण जाणूनबुजून लादीत आहे, या कल्पनेने तो भडकला. वास्तविक दादाजीने त्याला भुताखेतांच्या गोष्टी ऐकवल्या असत्या, तर त्याने त्याची टर उडवली असती. खो-खो हसून त्याला, भुतांवर विश्वास ठेवणे कसे मूर्खपणाचे आहे, हे पटवले असते. पण ते सगळे राहूनच गेले. कारण दादाजी काहीच बोलला नाही. त्याने घडी केलेली लुंगी सांभाळून हातावर घेतली, आणि मालकाचे बोलणे थांबताच तो हळूहळू आत निघून गेला.

दारातून त्याने एकवार वळून मालकाकडे पाहिले. मालक तोंडातल्या तोंडात शिव्या पुटपुटत होता.

त्या रात्री रणजीतला नीट झोप लागली नाही. मन विषण्ण झाले होते. कसलीतरी विचित्र हुरहुर लागून राहिली होती. कोणी एक माणूस पुलावर दिसला, त्याने तळ्यात काहीतरी टाकले आणि तो नाहीसा झाला, याचे आपल्याला इतके आश्चर्य का वाटावे, ते समजत नव्हते. त्याच्याशी आपला संबंध काय, ते कळत नव्हते, पण त्याचा विचारही डोक्यातून जात नव्हता.

अखेरीस जन्मभर ज्या गोष्टीची आपण टिंगल केली, तीच खरी मानावी, आणि मोकळे व्हावे झाले, असे त्याला वाटू लागले. एखादा माणूस एकाएकी दिसणे आणि एकाएकीच तो नाहीसा होणे, याचे जर दुसरे काहीच स्पष्टीकरण नसेल, तर ते पिशाच्च असेल, एवढाच निष्कर्ष उरत होता. पूर्वी कधीकाळी घडून गेलेली एखादी गोष्टी आता पुन्हा जशीच्या तशी दिसत असेल, असेच म्हणणे भाग होते.

सकाळी उठताच रणजीत आजूबाजूला एक फेरफटका मारून आला. दादाजी काहीच बोलत नसला, तरी झाल्या प्रकाराचा आपल्या वाड्याशी काहीतरी संबंध असेलच, असे रणजीतच्या मनाने घेतले होते.

जवळपास दुसरे एकही घर हाकेच्या टापूत नव्हते. लांबवर थोडी वस्ती होती ती माथाडी लोकांची. ती सगळी कामगार मंडळी आसपासच्या खेड्यांमध्ये कामाला होती, पण त्यांची घरे इथे होती. अधूनमधून ते घरी यायचे, बायकामुलांना भेटायचे आणि आपल्या कामावर परतायचे.

रणजीत तिथल्या घराघरांमधून फिरला. तिथल्या लोकांना त्याने आपली ओळख करून दिली; सुरजीतसिंगांचा मुलगा म्हणून सगळ्यांनी त्याला आदराने वागवले. गावाबद्दल, तिथल्या पीकपाण्याबद्दल, खुद्द त्याच्या वाड्याविषयीसुद्धा त्याला भरपूर माहिती दिली.

पण भुताटकीचा एकही प्रकार त्यांच्यापैकी कुणी सांगितला नाही.

हातात गोणते घेऊन पुलावरून जाणारा माणूस त्यांनी कुणीच कधी पाहिला नव्हता.

पण हा प्रकार एवढ्यावर थांबायचा नव्हता.

रात्रीची वेळ होती.

एवढी रात्र झाली तरी रणजीतचे पिणे थांबले नव्हते. अलीकडे दिवसेंदिवस त्याच्या पिण्याचे प्रमाण वाढतच चालले होते. विचार करून थकणाऱ्या एकाकी मनाला व्हिस्कीची सोबत हवीहवीशी वाटू लागली होती.

दादाजी मागल्या दारी लाकडे फोडीत बसला होता.

त्याच्या लाकडे फोडण्याचा 'खाट् खाट्' आवाज रणजीतच्या विचारात व्यत्यय आणीत होता.

बाकी सारे शांत. बाहेर मिट्ट काळोख.

कशाला फोडतो आहे हा लाकडे? उद्याच्या जळणासाठी...मघापासून फोडतो आहे. अजून झाली नाहीत का? त्यापेक्षा तो बाहेर येऊन कां बसत नाही? आपण बोलवावे का त्याला? माझ्याशी बोल, असा हुकूम करावा का? 'खट् खट्... खच् खच्' ...आपण आजवर इतक्या नाठाळ माणसांना सरळ आणले. मग हाच एक माणूस कां नाही आपल्या मनासारखे वागत? तो बोलत नाही. पण त्याला काही माहीत असेल का? त्या पुलावरच्या माणसाविषयी सांगितले, तेव्हा त्याला काहीच आश्चर्य वाटलेले दिसले नाही. कां नाही?...

खट् खच्... खच् खट्...

त्याला काही ठाऊक असेल का त्या माणसाविषयी?

खट् खच् ... खच् खट्...

बंद कर म्हणावे हा आवाज! माहीत आहे, तू काम करतोस, ते! माहीत आहे मी नुसता बसून राहतो, ते! माहीत आहे, माझे वडील उद्योगी होते, आणि मी ऐतखाऊ आहे, ते!...

खट् खच्... खच् खट्...

रणजीतला तो आवाज असह्य होऊ लागला. तो खुर्चीतून उठला.

उठता उठता त्याचा किंचित तोल गेला. पण ते त्याचे त्यालाच जाणवले. आज, नाही म्हटले तरी आपण जास्तच प्यायलो, असे त्याने स्वत:शी कबूल केले.

रणजीत मागील दारी गेला आणि दादाजीला काही बोलणार-

-एवढ्यात त्याचे शब्द तोंडातल्या तोंडातच थिजून गेले.

त्याच्या समोरून एकजण जिवाच्या आकांताने पळत गेला.

त्याच चेहरा दिसू शकला नाही; परंतु त्याच्या हालचालींवरून कळत होते की, तो फारच भ्यायला आहे.

दादाजीही आपले लाकडे फोडण्याचे काम थांबवून त्याच्याकडे पाहात राहिला.

एवढ्यात त्याच्यामागून दुसरा एकजण धावत आला. त्याच्या पाठीमागे लागल्यासारखा.

त्याच्या पायघोळ अंगरख्यावरून रणजीतने त्याला ओळखले. हा तोच होता– पुलावरचा माणूस!

आत्ताही त्याचा चेहरा नीटसा दिसू शकला नाही. मात्र त्याच्या हातातील कुऱ्हाड दिव्याच्या प्रकाशात लखलखली.

तो उघडच त्या दुसऱ्या माणसाच्या जिवावर उठला होता. दुसरा त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत होता.

धावताधावता दुसरा माणूस उंबरठ्याला अडखळून खाली पडला. तो परत उठण्याआधीच अंगरखावाल्या माणसाने हातातली कुऱ्हाड त्याच्या डोक्यात घातली.

एकदा...दोनदा...

रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या.

आणि मग ते दोघेही दिसेनासे झाले.

स्तंभित होऊन रणजीत आणि दादाजी हा अमानुष प्रकार पाहात राहिले.

मुख्य म्हणजे या एवढ्या सगळ्या प्रकारात कसलाही आवाज झालेला नव्हता. पावलांचा नाही, की ओरडण्याचा नाही.

भयंकर! त्यांच्यासमोर एक भीषण खून घडला होता!

आणि त्याहूनही भयंकर म्हणजे त्या खुनाचा मागमूसदेखील राहिलेला नव्हता.

हा भास नव्हता किंवा स्वप्नही नव्हते. कारण दोघेही नीट जागे होते. रणजीतच्या डोक्यात व्हिस्कीचे स्फोट होत होते. पण दादाजी पूर्ण शुद्धीवर होता.

"बोल!" रणजीत त्याला दरडावून म्हणाला, "अजून तुला म्हणायचंय की इथे काहीच घडलेलं नाही? तुला काहीच माहीत नाही?"

दादाजी काहीच बोलला नाही. भयाने त्याच्या तोंडून शब्दच फुटत नव्हता.

"साल्या, हा प्रकार याच वाड्यात घडलेला आहे! कुणाचातरी खून झाला आहे. तुला तो माहीत आहे; आणि तू लपवतोयस!"

"नाही! मला काही माहीत नाही!" जोरजोराने मान हलवीत दादाजी कसेबसे बोलला.

"नाही कसं? तुला बोललंच पाहिजे! बाप्पाजींचं काहीही रहस्य असलं, तरी मला ते समजलंच पाहिजे! मी त्यांचा मुलगाच आहे! बोल! कोण आहे तो पायघोळ अंगरख्यातला माणूस?"

दादाजीचे डोळे भीतीने तारवटले होते. मान नुसतीच नकारार्थी हलत होती.

त्या असहाय नकाराने रणजीतचा संताप अधिकच उफाळून आला. नशेमुळे तोल अधिकच सुटत चालला.

"बोल! कोण आहे तो माणूस? कोण आहे?"

दादाजी नुसताच भयचकित नजरेने त्याच्याकडे रोखून पाहात राहिला. त्याला काहीतरी बोलायचे होते. पण तोंडून रणजीतच्या भीतीने शब्द उमटत नव्हता.

"माझ्यापासून लपवतोस, साल्या? माझ्यापासून लपवतोस?"

रणजीतच्या डोक्यात संतापाची एक प्रचंड लाट उसळली. शरीरात संताप मावेनासे झाला. काहीतरी करायला हवे! हात शिवशिवू लागले. हा भिकारडा नोकर! माझ्यापासून लपवतो...माझ्या बापजाद्याचे रहस्य...याचे काहीतरी करायला हवे...याला जन्माचा धडा शिकवायला हवा...याला...याला...

मस्तकात एकच कल्लोळ उडाला. तांबड्या-लाल ज्वाळा पेटून उठल्या...

काही समजायच्या आत रणजीतच्या हातांनी, बाजूला पडलेली लाकडे फोडायची कु-हाड उचलली आणि दादाजीवर उगारली...

जिवाच्या आकांताने दादाजी पळत सुटला...

पण क्रोधाच्या नशेने रणजीत पुरताच आंधळा झाला होता. तो कुऱ्हाड उगारून दादाजीच्या मागे धावू लागला.

पळतापळता दादाजी उंबरठ्याला अडखळून पडला.

तो उठण्याआधीच रणजीतने आपल्या हातातली कुऱ्हाड त्याच्या डोक्यात घातली…

एकदा…दोनदा…

रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या…

दादाजीच्या मस्तकातून उसळणारे रक्त पाहिले आणि रणजीतच्या दोन्ही नशा साफ उतरल्या.

काय केले आपण हे?

खून-बाप्पाजींच्या विश्वासू चाकराचा खून? एका गरीब म्हाताऱ्याचा खून? कशासाठी? काय केले बापड्याने आपले? केवळ आपल्याला पहिल्यापासून त्याचा संताप यायचा म्हणून? की केवळ हे असे व्हायचेच होते म्हणून?

झाले ते झाले. प्रथम या देहाची विल्हेवाट लावायला हवी. तेवढे जमले की झाले. मग आपल्या हातून खून घडला, हे कुणाला कळणारही नाही…

जवळच कोळशांचे भलेमोठे गोणते पडले होते. ते रिकामे करून त्यात त्याने दादाजीचा देह भरला. दोरीने गोणत्याचे तोंड गच्च बांधून टाकले…

गोणते आपल्यामागे ओढीतओढीत तो तळ्याच्या दिशेने निघाला.

पुलाच्या मध्यभागी पोहोचल्यावर त्याने गोणते उचलले आणि तळ्यात फेकून दिले.

गोणते तळ्यात बुडाले, तेव्हा रणजीतला हायसे वाटले आणि एकदम दुसरीही एक भावना एकाएकी जागी झाली…

हे सगळे आपण पूर्वी पाहिले आहे; पण उलट्या क्रमाने. कारण ते पूर्वी घडलेले नव्हते…नंतर घडणार होते…

आपला नाइट गाऊन सावरीत घाईघाईने वाड्याकडे परतणाऱ्या रणजीतला पुलावरचा पायघोळ अंगरख्यातला माणूस कोण, हे आता समजून चुकले होते.

बाकी राहिला काळोख

“जगात अशी कित्येक गूढं असतात, की ती कधीच उलगडता येत नाहीत.” डॉक्टर म्हणाले.

पोलिस-इन्स्पेक्टर यावर नुसते हसले. छद्मीपणाने.

त्यांचे ते हसणे डॉक्टरना वर्मी लागल्यावाचून राहिले नाही. त्यांना जे सांगायचे होते, ते त्यांना स्वत:ला अतिशय पटलेले होते. सतत जाणवलेले होते. पण तरीही समोरच्या माणसाला ते पटवणे, त्यांना कठीण जात होते.

कारण समोरच्या माणसाची त्यावर श्रद्धा नव्हती. विश्वास तर अजिबात नव्हता. एका परीने ते बरोबरच होते. आजवरची त्यांची हयात गुन्ह्यांचा शोध लावण्यात गेली होती. गुन्हा घडला रे घडला, की, त्याची चारी बाजूंनी चौकशी करायची, समग्र माहिती मिळवायची, तपशील जमा करायचा, त्या तपशिलाचे धागेदोरे कुठवर पोहोचतात हे तपासायचे, आणि शेवटी गुन्हेगार शोधून काढायचा, ही त्यांची पद्धत होती. गुन्हेगाराचा शोध लागला की प्रत्येक रहस्य उलगडले जाते, आणि मग त्यात गूढ काही उरतच नाही, हा त्यांचा अनुभव होता. तशा कित्येक केसीस आजवर पोलिसखात्याने ‘न उलगडणाऱ्या गूढां’मधे जमा केलेल्या होत्या. पण याचा अर्थ एवढाच होता होता की, पोलिसखात्याकडून आपल्या कर्तव्यात कुचराई झाली होती, किंवा गुन्हेगार पोलिसांपेक्षा अधिक हुषार ठरलेले होते. पण खऱ्याखुऱ्या अर्थांनी ती गूढे नव्हतीच. ती केवळ गणिते होती. न सुटलेली. न सोडवलेली. पण त्यांना निश्चित उत्तरे होती. न बदलणारी. ठामपणे मांडण्याजोगी. जगातला प्रत्येक व्यवहार हा गणितासारखा असतो, आणि त्याला एक निश्चित उत्तर असतेच, अशी इन्स्पेक्टरांची खात्री होती.

डॉक्टरांचे तसे नव्हते. डॉक्टर मानसशास्त्रज्ञ होते. मनुष्यस्वभावाचे गूढ उकलणे, हा त्यांचा व्यवसायच होता. त्यांच्या मते मानवी व्यवहारातले काही व्यवहार इतके गूढ असतात, की त्यांचे कसलेही स्पष्टीकरण मिळत नाही, त्यांना उत्तर असतच नाही. कितीही बेरीज-वजाबाकी केली, तरी काहीतरी बाकी राहतेच. त्यापुढे बेरीज-वजाबाकी शक्य नसते. पुढे एक काळोखाची भिंत उभी असते. या भिंतीवर कितीही वेळ डोके आपटून घ्या- मस्तक रक्तबंबाळ होईल; पण भिंत हटायची नाही. बाकी राहते ती ही भिंत. बाकी राहातो, तो, हा काळोख!

-आत्ताही तिरक्या ग्लासमध्ये बीअर ओतीत ते हेच म्हणाले, “नाही इन्स्पेक्टर. कधीतरी तुम्हाला जरूर अनुभव येईल. जगात अशी कित्येक गूढं असतात, की ती कधीच उलगडता येत नाहीत.”

“जाऊ द्या हो डॉक्टर!” इन्स्पेक्टर हसत म्हणाले, “तुमच्या वेड्या पेशंट्सनी तुमचा भेजा टाकलाय खाऊन!” इन्स्पेक्टरना माहीत होते की, पेशंट्सचा असा उल्लेख केला की कुठलाही सायको-अॅनालिस्ट वैतागतो.

“माझे पेशंट्स वेडे नसतात-त्यांचं वागणं इतरांपेक्षा वेगळं असतं! तसं कां, यामागं काहीतरी गूढ असतं. बहुधा ते उकलतं. तोच तर आमचा प्रयत्न असतो. पण एखादी केस नाही उकलत. गूढ हे गूढच राहतं!” डॉक्टर शून्यात पाहात म्हणाले. बीअरची मंद नशा आता हळूहळू त्यांना गुरफटू लागली होती.

खोलीत एकच दिवा होता. त्या दोघांच्या आरामशीर गार्डन-चेअर्स आणि टेबल यांच्यावरच केवळ प्रकाशणारा. बाकी खोली मंद अंधारात होती. अंधाराचे ते कडे हळूहळू जवळ येत आहे, असा डॉक्टरांना भास होत होता. अर्थात ही नशा आहे, हेही त्यांना कळतच होते.

“आत्ताचीच एक केस सांगतो. माझ्याकडे आलेली.” डॉक्टर म्हणाले, “ऐकून अवाक् व्हाल. तिचं स्पष्टीकरण म्हणाल, तर ते अजून तरी मला मिळालेलं नाहीये.”

“सांगा.” सिगरेट शिलगावीत, खुर्चीत आधेकच आरामशीर बसत इन्स्पेक्टर म्हणाले.

हकीगत पहिली

दार लोटून तो तरुण आत आला, तेव्हा प्रथमदर्शनी डॉक्टरना त्याच्याविषयी कोणतेही निदान करता आले नाही.

सहसा असे होत नसे. आत येणाऱ्या पेशंटच्या अस्थिर नजरेवरून, अनिश्चित चालीवरून किंवा अन्य एखाद्या लक्षणावरून, त्याच्या आजाराचा साधारण अंदाज डॉक्टरना करता येत असे. आजार कुठल्या थराला पोहोचला आहे, याची अटकळ करता येत असे.

पण या तरुणाचे काहीही बिनसल्यासारखे वाटत नव्हते. असे वाटत होते की, हा पेशंट नसावाच. एखाद्या औषधी कंपनीचा सेल्समन जसा सहजपणे डॉक्टरना येऊन भेटतो, तसा तो आत आला. बरीच आधी अपॉइन्टमेंट घेऊन आणि बॉयने नाव घेऊन आत पाठवल्यानंतर तो आला, म्हणूनच त्याला पेशंट म्हणायचे. बाकी त्याचा रुबाब सेल्समनच्याही वरताण होता. बहुधा तो एखाद्या बड्या कंपनीत एक्झिक्युटिव्ह पोस्टवर असावा, हे त्याच्या अंगावरचा उंची सूटच सांगत होता.

त्याचे वागणे शांत आणि समंजसपणाचे दिसत होते. कुठल्याही भावनेमध्ये वाहून न जाता शांतपणे स्वत:चा निर्णय घेणारी जी माणसे असतात, त्यांच्यापैकी तो वाटत होता. डॉक्टरचे साहाय्य घेण्याचे त्याने स्वत:च ठरवले होते, आणि त्याप्रमाणे तो त्यांना येऊन भेटला होता.

“खरं तर माझी हकीगत इतकी विचित्र आहे-” तो म्हणाला, “की त्या बाबतीत डॉक्टरची काही मदत होईल की नाही, हे ठरवणंच कठीण आहे. कारण मला काहीही झालेलं नाही-माझी हेल्थ अगदी नॉर्मल आहे. परंतु जो अनुभव मला येतोय, त्याला कुठलंही रॅशनल् एक्स्प्लनेशन मला देता येत नाही. तेव्हा विचारांती माझी खात्री झाली की, हे सारे आपल्या मनाचे खेळ आहेत. म्हणून एखाद्या मानसशास्त्रज्ञाकडे जाऊन सारं काही सांगून टाकावं, असं मी ठरवलं.”

त्याने केलेली प्रस्तावना डॉक्टरांनी शांतपणे ऐकून घेतली. स्वत:च्या परिस्थितीची इतकी स्वच्छ कल्पना असलेले पेशंट्स डॉक्टरांकडे क्वचितच येत. त्यामुळे त्यांना त्याच्याविषयी काहीसा आदरच वाटू लागला. ते त्याची हकीगत काळजीपूर्वक ऐकू लागले…

“अलीकडे मला दुपारची फार झोप येते.” त्याच्या हकीगतीची सुरुवात काहीशी हास्यास्पद होती. “कितीही प्रयत्न केला तरी झोप आवरत नाही. काहीही कारण नसताना, रात्री अगदी पूर्ण झोप झालेली असतानाही झोप येते -आणि येते ती अगदी अंगावर चाल करून आल्यासारखी. झोपेची गोळी किंवा अतिरेकी प्रमाणात मद्य घेतल्यावर माणसाचा जसा स्वत:वर ताबाच राहात नाही आणि तो झोपेच्या पूर्ण अधीन होतो, तशीच काहीशी माझी परिस्थिती असते. मग मी माझ्या केबिनचं दार आतून लावून घेतो. दारावरच्या शिपायाला ‘डिस्टर्ब’ न करण्याविषयी सूचना देतो, आणि टेबलवर डोकं ठेवून झोपी जातो. तासाभरानं मला अचानक जाग येते आणि मी उत्साहानं पुन्हा कामाला सुरुवात करतो.”

“ओव्हरवर्क! तुमच्या शरीराला झोपेची गरज आहे. यू शुड् कन्सल्ट अ फिजिशिअन्.” डॉक्टर म्हणाले.

“पुढं ऐका ना! मला ही अशी सवय लागली, तेव्हा पहिल्यापहिल्यांदा झोप अगदी निर्वेध लागायची. एकही स्वप्न पडत नसे. मेल्यासारखा मी झोपायचो. आणि खाडकन् जागा व्हायचो. आपण कुठं आहोत, दिवसाचा कुठला प्रहर चालू आहे, याचंही भान मला नसायचं. काळोखाचा एक पट्टा दिवसावर ओढल्यासारखी ही माझी झोप असायची.

“पण हळूहळू त्या काळोखात काहीतरी हालचाल होऊ लागली. आकृत्या तयार होऊ लागल्या.”

“कसल्या?”

“खरं तर त्यातली एक आकृती माझ्या पूर्ण परिचयाची होती.”

“कुणाची?”

“माझी स्वत:चीच! आरशात पाहात असल्याप्रमाणं मी स्वत:ला झोपेत पाहू लागलो. स्वप्नात, असं मी मुद्दामच म्हणत नाही. कारण ते स्वप्न असतं, याची मला खात्री नाही…आरशात स्वत:ला पाहताना आपल्याला स्वत:च्या व्यवहारांची जाणीव असते, आणि आरशात काय दिसेल, याची काहीएक अपेक्षा असते; पण इथं मी स्वत:ला अगदी त्रयस्थपणं पाहात असतो. पाहणारा आणि हालचाल करणारा, हे दोघे सर्वस्वी वेगळे असल्याची मला जाणीव असते, आणि तरीही तो हुबेहूब मीच असतो.”

“काय करीत असता तुम्ही तुमच्या या-आपण त्याला ‘भास’ असं म्हणू- भासात?”

“मी एका फ्लॅटची बेल वाजवतो.” तरुण म्हणाला, “काही क्षण वाट पाहतो. मग दरवाजा उघडतो.”

“एक सुंदर स्त्री तो उघडते.” डॉक्टर हसून म्हणाले.

“हो. तुम्हाला कसं कळलं?” त्याने आश्चर्याने विचारले.

“विशफुल् थिंकिंग! डे-ड्रीम! अहो, तुमच्यासारख्या रुबाबदार तरुणाच्या स्वप्नात सुंदर स्त्री आल्याशिवाय राहते की काय?” डॉक्टर दिलखुलासपणे हसून म्हणाले.

त्यांना हसताना पाहून तरुणाच्या मनात आले की, डॉक्टरांनी आपल्याला असे म्हटले, तरी ते देखील काही कमी रुबाबदार नाहीत. तसे मध्यमवयाचे असले तरी तब्येत राखून आहेत. असे हसताना तर ते फारच तरुण वाटतात…

“मे बी. तुम्ही म्हणता त्यात तथ्य आहे.” त्याने हसून म्हटले, “बट् लेट् मी टेल् यू, माझं लग्न झालेलं आहे. माझी बायकोही काही कमी सुंदर नाही. अतिशय आधुनिक. शिवाय प्रेमळ. -ओ:! माय् मॅरिड् लाइफ इज् अ पिक्चर ऑफ हॅपिनेस्! आम्हा दोघांचं एकमेकांवर अतिशय प्रेम आहे –आणि तिला सोडून दुसऱ्या एखादीकडे जाण्याची कल्पना मला स्वप्नातदेखील…वेल्! असं म्हणणं आता चुकीचं ठरेल, पण…”

“मुद्दा आला माझ्या लक्षात.” डॉक्टर मान हलवीत म्हणाले, “वेल्, पुढं सांगा.”

पण आता तरुणाची जीभ जरा अडखळली. तो काहीसा शरमिंदा झाल्यासारखा वाटला. रुमालाने कपाळाचा घाम पुशीत तो म्हणाला, “पुढचं देखील-तसं विशफुल् थिंकिंगच आहे.”

“म्हणजे?”

“म्हणजे सुंदर तरुणीकडे गेल्यानंतर एखाद्या तरुणाला करावंसं वाटेल, तेच. सबंध फ्लॅटमध्ये तिच्याशिवाय दुसरं कुणीच नसतं. मी दरवाजातच तिला जवळ घेतो. एकमेकांना बिलगूनच आम्ही तिच्या आलिशान बेडरूममध्ये येतो. प्रशस्त डबलबेडवरच्या मऊमऊ गाद्यांवर अंग टाकतो.”

“-आणि अर्थातच यापुढं जे काय घडू शकेल-ते घडतंच!” डॉक्टर काहीशी गंमत वाटून म्हणाले.

“हो.” तरुणाच्या लाजण्यावरूनच डॉक्टरना समजले की, त्याला येत असलेला अनुभव त्याला स्वत:ला अगदी खराखुरा वाटतोय. “पण मीलनाच्या अत्युच्च क्षणीदेखील मला जाग येत नाही. मी उठतो, कपडे ठीकठाक करतो. कधीतरी टेबलावरच्या ग्लासमधलं पाणी पितो आणि दार उघडून बाहेर पडतो. नंतर मात्र सगळा काळोख! खोल पाण्यात बुडी मारल्यावर अलगद वर यावं, तसा मी त्या काळोखातून जागा होतो.

जागा होऊन पाहतो, तेव्हा मी स्वत:च्या केबिनमध्येच असतो आणि मध्ये तासभर उलटून गेलेला असतो.”

“मग यात काळजी करण्यासारखं काय आहे?” डॉक्टरांना अजूनही गंमतच वाटत होती. “स्वप्नात का होईना, पण एका सुंदर स्त्रीचा सहवास तुम्हाला मिळतो, यात वाईट काय?”

“ते स्वप्न असतं तर मलाही त्यात आनंदच वाटला असता डॉक्टर.” तरुण सावकाश म्हणाला, “पण ते स्वप्न नाही. त्यात काहीतरी सत्य आहे.”

“स्वप्नामध्ये सत्य असतंच. –आपली त्या मागची भावना!”

“केवळ भावना नव्हे डॉक्टर! इथं त्यापलीकडचं आणखी काही आहे. जे घडतं ते सगळं खरंखुरं असल्याची जाणीव मला एकसारखी होत राहते. त्या जाणिवेनं मी अस्वस्थ होतो. इथं येऊन तुम्हाला हे सारं सांगण्याचं कारण ही अस्वस्थता. असं वाटतं की, अस्वस्थता वाढत गेली, तर आपल्याला वेड लागेल.”

“कशामुळं ते सारं खरं वाटतं तुम्हाला?”

“सांगणं कठीण आहे. कारणं बारीक-सारीकच आहेत. तो फ्लॅट- ती बेडरूम कुठंतरी पाहिल्यासारखी वाटते. ती तरुण स्त्रीसुद्धा.”

“त्याचं स्पष्टीकरण साधं आहे. तो फ्लॅट तुमचा स्वत:चाच आहे. ती बेडरूम तुमची स्वत:चीच आहे. फक्त ओळखीच्या गोष्टी स्वप्नात वेगळा आकार घेतात, तसं इथं झालंय.”

“आणि ती स्त्री? ती नक्कीच माझी स्वत:ची बायको नाही. तिचा चेहेरा वेगळा आहे. खरं म्हणजे तो कसा आहे, हे मला सांगता येणार नाही. त्या वेळेसही ते कळत नाही; मात्र त्याचं सौंदर्य जाणवतं, तरीही तो नेमका दिसत नाही, एखाद्या धूसर आवरणातून दिसावा तसा दिसतो…”

“हे स्वप्नच आहे.” डॉक्टर ठामपणे म्हणाले, “सत्याचा त्यात कणही नाही. तुम्हीच सांगा, बंद केबिनमधून तुम्ही उठून जाता, आणि परत येता, हे कुणाला खरं वाटेल?”

“तसं नाही म्हणायचं मला.” तरुण काहीसा चिडून म्हणाला, “जातं माझं मनच. सूक्ष्म रूपानं मनाला असं जाता येतं, आणि नंतर शरीराचा आकारही धारण करता येतो, असं कुठंकुठं वाचलंय मी.”

“काहीतरी वाचता तुम्ही लोक आणि त्यावर विश्वास ठेवता!” डॉक्टर त्याची ‘थिअरी’ धुडकावून म्हणाले. पण त्यांच्या मनात आलं, ही हकीगत एकदा इन्स्पेक्टरना सांगायला हवी. काय स्पष्टीकरण देतात बघू या.

“मीदेखील ते स्वप्न मानलं असतं डॉक्टर.” काहीशा अनिच्छेने तरुण पुढे म्हणाला, “पण एक गोष्ट अत्यंत सत्य असते. मी जागा होतो तेव्हाची माझ्या शरीराची अवस्था. खरोखरीच रतिसुख मिळाल्यानंतरची ती अवस्था असते. हेही असत्य?”

“तुमची केस विचार करण्यासारखी आहे खरी.” डॉक्टर म्हणाले, “सत्य आणि स्वप्न यांची ही चमत्कारिक भेसळ आहे; पण काही दिवस असेच जाऊ द्यात. आपोआप परिस्थिती निवळेल. तुम्हाला हे भास होणं बंद होईल.”

“नाही डॉक्टर! ते शक्य तेवढ्या लवकर थांबले पाहिजेत! नाहीतर माझी धडगत नाही.” तो तरुण आवेगाने बोलत होता. मघाचा त्याचा शांतपणा, संयम आता नाहीसा झाला होता. “नाहीतर मला धोका आहे.”

“धोका? धोका कसला?”

“कोण जाणे कसला! कदाचित जिवाचाही. कसला ते नेमकं कळत नाही. पण जाणवतं.”

“पण कुठून धोका आहे?”

“चाललाय हा सगळा प्रकार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. पहिल्यांदा आमची सलगी बरीच आटोक्यात होती. नंतर क्रमाक्रमानं पुढची पायरी गाठत आम्ही आता शेवटपर्यंत मजल मारली आहे; पण हे असं फार काळ चालणार नाही. मला वाटतं तिच्या नवऱ्याला हे कळलं आहे.”

“काय म्हणालात?”

“हो. तिच्या नवऱ्याला. त्याला संशय आलाय. असं तीच म्हणत होती.”

“पण हे कसं शक्य आहे? तुमच्या स्वप्नात तिच्या नवऱ्याला जागाच नाही. तुम्ही असंच समजा की, ती अविवाहित आहे– एकटीच आहे!”

“मी लाख समजेन! पण प्रत्यक्षात तसं नाहीये. तिचं लग्न झालंय, आणि हा सगळा प्रकार तिच्या नवऱ्याला कळलाय.”

“हे प्रत्यक्ष नाही. हे स्वप्न आहे. तुमच्याच मनानं, तिचा नवरा तयार केलाय!

कसा दिसतो तो? मला सांगा.’ डॉक्टर त्याच्याकडे रोखून पाहात म्हणाले.

तरुणाने क्षणभर नजर वर उचलली, तेव्हा दोघांची नजरानजर झाली. तरुणाच्या अंगावर भीतीने शिरशिरी आली.

“मी-मी त्याला अजून पाहिलेलं नाही.” तो अडखळत म्हणाला.

“देअर यू आर! तो तुम्हाला दिसणारच नाही. कारण तो नाहीच आहे.”

“असला पाहिजे! मला त्याची भीती वाटते. तिलाही वाटते. आणि ही भीती एखाद्या अभद्र सावलीसारखी आम्हा दोघांना गुरफटून टाकत असते. अगदी सुखाच्या क्षणीदेखील. वाटतं, कुठल्याही क्षणी तो येईल. आपल्याला त्या अवस्थेत पाहील आणि मग… मग तो संतापाच्या भरात आपलं काहीही करायला मागंपुढं पाहणार नाही. या साऱ्यातून काहीतरी भयंकर घडणार आहे. भयंकर! वाटतं, ते अटळच आहे. आज ना उद्या तो येणारच!”

“स्पष्टीकरण अगदी सोपं आहे.” डॉक्टर म्हणाले, “तुम्ही अत्यंत सद्वर्तनी आहात. तुमचं आपल्या बायकोवर प्रेम आहे. तिला फसवणं, हे तुम्हाला पाप वाटतं. स्वप्नात घडणाऱ्या परस्त्रीच्या सहवासानं तुम्हाला अपराधी वाटतं. त्या अपराधाची टोचणी तुमच्या मनाला लागलीय. केसानं टांगलेल्या तलवारीसारखी ती रात्रंदिवस डोक्यावर आहे. त्या जाणिवेलाच स्वप्नात तुम्ही एका पुरुषाचा आकार दिलाय. तुमचा घात करायला येणाऱ्या माणसाचा.”

पण हे स्पष्टीकरण देतादेताच डॉक्टरना वाटले की, हे फार पुस्तकी स्पष्टीकरण झाले! या प्रकारामध्ये याहून अधिक गुंतागुंत आहे…

“नाही डॉक्टर. एखाददिवशी माझं काहीतरी बरंवाईट होणार आहे. मग तुम्हाला कळेल की, हे केवळ स्वप्न नाही. पण तेव्हा फार उशीर झालेला असेल.” तरुण कळवळून बोलला, “काहीतरी करा डॉक्टर! मला त्याच्यापासून वाचवा! मला व्यभिचार करायचा नाही! त्याच्या बायकोशी संबंध ठेवायचा नाही! पण माझा इलाज चालत नाही! माझ्या हातून ते घडतं. कोण घडवतं, कळत नाही! पण घडल्याशिवाय राहात नाही. मात्र तो हे लक्षात घेणार नाही! त्याला ते समजणारच नाही! तो सरळ येईल आणि… मला जाणवतं, तो येतोय डॉक्टर… तो येतोय.”

डॉक्टर तरुणाच्या चेहऱ्याकडे पाहात राहिले. त्याच्या चेहऱ्यावर भीतीचा गडद सावली होती. स्वप्नात घाबरून किंचाळणाऱ्या मुलाच्या चेहेऱ्यावर असते, तशी. काही केल्या ते मूल जागे होत नाही; पण विलक्षण भयाने निथळत राहते. त्या क्षणी ते ती भीतीच जगत असते.

इथे केवळ स्वप्न नव्हते. खरीखुरी भीती होती… खरीखुरी.

"मी त्याची कशीबशी समजूत घातली." इन्स्पेक्टरचा ग्लास भरीत डॉक्टर म्हणाले, "पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही."

"म्हणजे काय झालं?"

"आजच मला त्याचा फोन आला होता. विलक्षण भेदरल्यासारखा तो बोलत होता… 'डॉक्टर, आज आम्ही बिछान्यात असताना तो दारात येऊन पोहोचला. त्यानं बेल वाजवली. आम्ही दोघंही दचकलो. त्याच वेळी काळोख झाला, म्हणून मी वाचलो. पण मला माहीत आहे, त्यानंच बेल वाजवली. उद्या तो आत आल्याशिवाय राहणार नाही. तो दाराशी येऊन पोहोचलाय डॉक्टर! काहीतरी करा! तो यात येण्याआधी मला बरं करा. तो आलाय डॉक्टर- तो आलाय.' हुंदके दिल्यासारखा तो बोलत होता. पुढचं बोलणं अस्पष्ट झालं. मी फोन खाली ठेवला…"

"इंटरेस्टिंग! क्राइट इंटरेस्टिंग!" इन्स्पेक्टर म्हणाले, "पण यात गूढ कुठं आहे? तुमचा हा पेशंट वरवर कितीही सोबर वाटला तरी वेडा होण्याच्या मार्गावर झपाट्यानं चाललाय. सत्य आणि कल्पना यांची गल्लत, त्यातून भीती… धिस इज अ क्लिअर केस ऑफ अनसाउन्ड माइन्ड. एवढं ओळखायला सायको-अॅनालिस्टची गरज नाही. क्लिअर केस. देअर इज् नो मिस्टरी अबाऊट इट. यात गूढ काही नाही डॉक्टरसाहेब!" इन्स्पेक्टर खिजवल्यासारखे बोलले.

"अॅग्रीड! मीही त्याला तेच सांगितलं. जनरल इम्प्रूव्हमेन्टसाठी औषधं दिली. काही मेन्टल एक्झरसाइजेस सांगितले. पण मध्येच असं काही घडलं की, मला हा प्रकार गूढ वाटू लागला… वाटायला लागलं की, हे याच्या एकट्याच्या मनाचे खेळ नाहीत… देअर इज समथिंग मोर टु इट्!"

"असं काय घडलं?"

"स्ट्रेंज! समथिंग व्हेरी व्हेरी स्ट्रेंज! फारच विचित्र!"

हकीगत दुसरी

तो तरुण येऊन गेल्याला एखाद-दोन दिवस झाले असतील-नसतील. डॉक्टरांचा फोन घणघणला. रिसेप्शनिस्टने तो घेतला. इंटरकॉमवरून ती म्हणाली-

"डॉक्टर, मिसेस सो अँड सो बोलताहेत."

"मिसेस-? अच्छा म्हणजे परवाच आपल्याकडे आलेल्या त्या तरुणाच्या मिसेस तर नव्हेत?"

"मे बी. पण तसं काहीच त्या म्हणाल्या नाहीत. त्यांचे मिस्टर आपल्याला येऊन भेटल्याचा उल्लेखही त्यांनी केला नाही."

तरीही ती त्याची बायकोच होती, हे तिच्या पत्त्यावरून स्पष्ट झाले. अगदी कळवळून ती बोलत होती. डॉक्टरना अगदी तातडीने भेटण्याची तिला उत्कंठा होती. न भेटल्यास जसे काही आभाळ कोसळणार असल्याचा तिचा आविर्भाव होता.

डॉक्टरनी तिला ताबडतोब भेटायचे ठरवले. तिला आपल्याकडे बोलावलेही नाही; स्वत:च तिच्याकडे जाण्याचे कबूल केले. कारण त्या भागात दुपारी त्यांना दुसऱ्या कामासाठी जायचेच होते. तरीही हे तसे शिरस्त्याला धरून नव्हतेच. पण त्या जोडप्याचे घर पाहावे आणि त्यातले कितीसे तिच्या नवऱ्याच्या वर्णनातील घराशी जुळते, हे पाहण्याची सुप्त इच्छाही त्यामागे असावी.

काहीही असो, पण डॉक्टर त्या दिवशी दुपारी तिच्याकडे गेले.

"आलात डॉक्टर? मी तुमची वाटच पाहात होते." ती भारावून म्हणाली.

डॉक्टरांच्या मनात आले : नवऱ्याच्या या विचित्र आजारामुळे घरात बापडीला फारच त्रास होत असणार!

पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे, तिच्या बोलण्यात त्याच्या आजाराविषयी एक अक्षरही आले नाही. तिची तक्रार वेगळीच होती.

"दररोज दुपारी मला तासभर विलक्षण गाढ झोप लागते डॉक्टर आणि- आणि कसं कसं सांगू तुम्हाला! सांगायचं म्हणजे कसंतरीच वाटतं. पण या फ्लॅटची बेल वाजते... मी दरवाजा उघडते... दारात एक रुबाबदार तरुण उभा असतो... त्याचा चेहेरा मला स्पष्ट समजत नाही... पण तो परका आहे एवढी जाणीव मात्र होते. तो आत येतो आणि आम्ही दोघं...डॉक्टर, परपुरुषाशी वागू नये तशी मी त्याच्याशी वागते! झोपेतून जाग येते तेव्हा तो गेलेला असतो आणि शरीरभर एक सुखाची ग्लानी पसरलेली असते. पण मग जाणवतं की, कुठंतरी चुकलं आहे. आपल्या हातून पाप घडलं आहे. त्या शरमेची टोचणी मनाला लागून राहते!" ती थांबली. आत्ताही हे सांगताना तिचा चेहेरा लाजेने लालीलाल झाला होता. "तुम्ही म्हणाल, हे स्वप्न आहे. पण नाही डॉक्टर! त्यात काहीतरी विलक्षण खरं आहे. ते काय, हे मला कळत नाही. पण मला ते नकोय! मला यातून स्वत:ची सुटका करून घ्यायचीय. नाहीतर काहीतरी भयंकर प्रकार घडेल, अशी मला भीती वाटते!"

"तुमच्या नवऱ्याला हे माहीत आहे?" डॉक्टरांनी अगदी सहजगत्या हा प्रश्न केला.

पण त्याचा परिणाम फार अनपेक्षित झाला. ती एकदम शहारली आणि किंचाळल्यागत म्हणाली, "नाही नाही! हे त्यांना कळून चालायचं नाही! मुळीच नाही! त्यांचीच तर मला भीती वाटते. त्यांना हे कळलं, तर ते आकाशपाताळ एक करतील. संतापाच्या भरात काय वाटेल ते होईल त्यांच्या हातून!" मग शून्यात पाहात तीच पुढे म्हणाली, "पण त्यांना कळलंय! मला तीच काळजी वाटते. आज ना उद्या ते आम्हा दोघांना एकत्र पकडल्याशिवाय राहणार नाहीत. दिवसेंदिवस ते जवळ येताहेत. मला तर वाटतं की, ते दारात उभे आहेत. कधीही ते बेल वाजवतील आणि मला दार उघडावं लागेल...काहीही करा डॉक्टर!" ती अजिजीने म्हणाली, "पण हे भास इथेच थांबवा– त्यांनी घरात येण्याआधी. भीतीनं मला जगणं मुश्किल होऊन बसलंय." ती स्फुंदू लागली. अनावर हुंदके देऊ लागली.

डॉक्टरांनी तिला ट्रॅन्किलायझर दिली. हळूहळू ती शांत झाली.

डॉक्टरांनी सगळीकडे हिंडून घर पाहिले. पण कसलाच अंदाज येत नव्हता. म्हटले तर हा फ्लॅट त्याच्या वर्णनाशी जुळणारा होता; म्हटले तर नव्हता. कारण तो विशेष शृंगारलेला, प्रशस्त असा मुळीच नव्हता. अगदीच सर्वसाधारण होता.

डॉक्टर तिथून बाहेर पडले तेव्हा ती बाई शांत झाली होती. पण डॉक्टरांचे डोके मात्र बधिर झाले होते.

हकीगत सांगून झाली आणि खोलीत शांतता पसरली. माथ्यावरच्या दिव्याला मंद झोके मिळत होते, त्यामुळे प्रकाशाचे वर्तुळ हलकेच थरथरत होते. बीअरच्या रिकाम्या बाटल्या टेबलावर पडल्या होत्या आणि इन्स्पेक्टर नि डॉक्टर दोघांचीही शरीरे सोनेरी नशेने जडावली होती. वाद घालायचा मूड ओसरला होता. इन्स्पेक्टर नवीन मुद्दे काढायचे थांबले होते, पण डॉक्टरांना त्यांना खिजवावेसे वाटत नव्हते.

लवकरच दोघांनी एकमेकांचा निरोप घेतला. बाहेर पावसाची बारीक रिपारेप सुरू होती. इन्स्पेक्टरांनी ओव्हरकोट चढवला आणि ते पावसातून चालू लागले. घरी पोहोचताच बिछान्यावर अंग टाकायचे, आणि मस्त झोपेच्या आधीन व्हायचे, असा बेत त्यांनी ठरवून टाकला.

पण प्रत्यक्षात मात्र त्यांचे अंग बिछान्याला लागताच, झोप त्यांचा डोळा चुकवून निसटली. डोक्यात दोन गणिते घोळू लागली. म्हटले तर त्या दोन्हींचा चेहेरामोहरा सारखा होता; म्हटले तर त्यांच्यात फरक होता. कोठेतरी 'पॅटर्न'सारखा होता; पण तपशील वेगळा होता. मात्र त्या वेगळेपणातही संगती होती. त्यामुळे, ते गूढ सुटण्यासारखे आहे, असे त्यांना वाटत राहिले. नवराबायकोंपैकी दोघांनाही सारखीच मानसिक विकृती असणे, हा योगायोग मानायचा, की त्यात काही संगती आहे? घडते ते सत्य किती, काल्पनिक किती?

इन्स्पेक्टर अंथरुणात उठून बसले. त्यांनी दिवा लावला. ते टेबलाशी गेले. टेबलावरचे एक काचेचे पेपरवेट उचलून त्यांनी हव्या त्या जागी मांडले. "हा प्रियकर." ते स्वत:शी म्हणाले. दुसरे फुलाफुलांचे पेपरवेट मांडून ते म्हणाले, "ही प्रेयसी." तिसरे धातूचे वजन ठेवीत म्हणाले, "हा नवरा. पण हा अजून सीनवर यायचा आहे. ही झाली एक हकीगत. दुसरी-बाई हीच कॉमन." फुलाफुलांचे पेपरवट मांडले गेले. "प्रियकर-" त्यांचा हात काचेच्या पेपरवेटकडे गेला. "पण नाही! हा तर तिचा नवरा आहे-ते आपल्याला नक्की माहीत आहे. मग? मग तिसरा..." धातूचे वजन त्यांच्या हातात तसेच अनिश्चितपणे घोळत राहिले. "हा कोण आहे?... म्हणजे एका भासातला प्रियकर खरोखरीचा नवरा-स्त्री तो ओळखत नाही-पण ती तीच असू शकेल. कारण दुसऱ्या भासात ती प्रेयसीच आहे. घर-कदाचित तेच असू शकेल. पण मग तिसऱ्याचं काय?..."

कितीतरी वेळ इन्स्पेक्टर पेपरवेट्स हातात घोळवीत राहिले. त्यांना उत्तर सापडत नव्हते.

त्याने एकदा केबिनच्या दाराकडे पाहिले. ते बंदच होते. त्याची नजर खोलीभर फिरली. तो आपल्या नेहमीच्या सुरक्षित जगात येऊन पोहोचला होता. आणि मुख्य म्हणजे-मुख्य म्हणजे तो जिवंत होता.

त्याने सुटकेचा एक प्रचंड सुस्कारा सोडला.

"आज जिवंत राहिलो आहोत, याचा अर्थ उद्या राहूच, असा नाही!"- तो मनाशी म्हणाला, "काहीही करून हे थांबायला पाहिजे! डॉक्टरांनी शक्य तेवढ्या लवकर काहीतरी...!"

एकाएकी त्याला आजचा प्रसंग कुणाकडे तरी सांगण्याची तीव्र इच्छा झाली. आपण ते सरळ सांगू शकलो, त्याविषयी सुसंगत विचार करू शकलो, तर निदान आपले डोके फिरायला अवकाश आहे, असे सिद्ध होईल. बोलावे-कुणाकडे तरी बोलून टाकावे.

त्याने डॉक्टरांचा नंबर फिरवला. प्रथम तो एन्गेज्ड लागला. अधीरपणाने त्याने दोन-तीन मिनिटे वाट पाहिली. परत फोन केला. रिसेप्शनिस्टने तो घेतला. "डॉक्टर अजून आलेले नाहीत." ती चुणचुणीतपणे म्हणाली. त्याने आपला नंबर तिच्यापाशी देऊन ठेवला.

तरीही बोलण्याची इच्छा शमली नव्हती. पण ही गोष्ट इतकी नाजूक होती! डॉक्टरांशिवाय दुसऱ्या कुणाकडे ती बोलणार?...

त्याने कागद पुढे ओढला आणि डॉक्टरना पत्र लिहायला सुरुवात केली...

हकीगत तिसरी

तो तिच्या बेडरूममधे उभा होता.

ती समोरच होती. तिच्या हातात सरबताचे दोन प्याले होते. नारिंगी सरबताचे.

संगीताचे धुंद सूर दूरवर पसरले होते.

अधीरपणे त्याने सरबत पिऊन टाकले आणि तिला जवळ ओढले.

तिच्या केसांचा सुगंध हळूहळू त्याच्या मस्तकात भिनू लागला.

ती हलकेच बाजूला झाली. त्याने तिचा हात गच्च धरून तिला जवळ ओढले.

तिच्या ओठातून चीत्कार निसटला. सरबताचा ग्लास हातातून खाली पडला होता.

पण काच फुटल्याचा 'खळ्ळ' असा कर्कश आवाज झालाच नाही. अलगद खालच्या मऊ गालिच्याने तो झेलून घेतला.

इथे कर्कश आवाजांना जागा नव्हती. सारे काही संथ, मंद... लयीत... तरंगलल्यासारखे...

...दुसऱ्याच क्षणी त्याने तिला मिठीत घेतले आणि तिच्यासह बिछान्यावर स्वत:ला लोटून दिले.

प्रवाहात, फेस बाजूला व्हावा, तशी अंगावरची जड वस्त्रे बाजूला झाली.

संगीताचे सूर अधिक जवळ आले. जणू शरीरातच शिरले... -त्या सुरांच्या तालावरच शरीरे हलत राहिली.

सारे एका मखमली धुंदीत गुरफटून गेले. सूर शरीर झाले. शरीरे एकजीव झाली. नुसते एक स्पंदन उरले आणि त्या स्पंदनातून झरत आल्या सुखाच्या लहरी...पसरत जाणाऱ्या...क्षणोक्षणी रुंदावणाऱ्या...वातावरण व्यापणाऱ्या...

-आणि याच क्षणी वातावरणातला एक चरा गेला.

दोघेही दचकून उठून बसली. एकमेकांपासून विलग झाली.

दाराजवळ कोणीतरी आले होते.

त्याने बेल वाजवण्यासाठी बेलवर बोट ठेवले होते.

पण बेल खण्दिशी वाजली नाही. 'चर्रर्र' असा काहीतरी जळल्यासारखा आवाज करीत ती त्या बोटाखाली तडफडत राहिली.

तो आवाज जणू न ऐकताच थेट त्या दोघांच्या मेंदूत शिरला.

दोघे निश्चल उभी. अवाक्. तिची किंकाळी घशातच गोठलेली.

आणि सावकाश दार उघडले गेले.

तो दारात उभा होता.

एखाद्या अजस्र सावलीसारखा. बघता-बघता तो दोघांच्या निकट-अगदी निकट येऊन उभा राहिला. येताना त्याचे बूट गालिच्यावर वाजले नाहीत. म्हणून त्याची चाल अधिकच भयप्रद वाटली.

क्षणात त्याचा हात खिशात गेला.

त्यातून रिव्हॉल्व्हर बाहेर आले.

एकदा...दोनदा...तीनदा ते झाडले गेले.

त्याचा उघडा देह बिछान्यावरून खाली कोसळला. रक्त उसळून गालिच्यावर पसरू लागले.

झोपेत किंचाळावे, तशी तिच्या ओठांनी हालचाल केली. आवाज उमटला नाही. भीतीने भान हरपून ती बाजूलाच कोसळली.

-आणि सारे अंधारात विलीन झाले.

अंधारातून तरंगत तो जागा झाला, तेव्हा त्याला आश्चर्य वाटले ते आपण जिवंत असल्याचे. मग हायसे वाटले.

तो सारा भास होता.

भास? पण हा भास खोटा नसतो. त्यात काहीतरी खरे असते.

इथे काय खरे होते?...

तो गोंधळला...पुन्हा ते सारे मनात फिरू लागले. काहीतरी खरे होते. अतिशय खरे...ओळखीचे.

पण काय? आपला मृत्यू?

मृत्यू तर खरा नव्हताच. कारण तो जिवंत होता. त्याच्या केसालाही धक्का लागलेला नव्हता. मग तो खून? तो कुणाचा झाला? कुणी केला?

वर्दी आली तेव्हा इन्स्पेक्टर पोलीस स्टेशनवर होते. टेबलावरच्या पेपरवेटशी खेळत. एकसारखी त्याची मांडणी बदलीत. त्यांना संगती लागली होती. एकातला नवरा-तो दुसऱ्यातला प्रियकर. याच तर्काने एकातला फसलेला तो दुसऱ्यातला फसवणारा. हेच आणखी पुढे नेले तर?... एकातला बळी, तो दुसऱ्यातला खुनी... डॉक्टरांनी सांगितलेल्या त्या दोन्ही हकीगती एकत्र येतील तर...

केबिनचा दरवाजा लोटून पोलीस आत शिरला, तेव्हा तो आपला खून झाला नाही, या समाधानात होता.

"तुम्हाला खुनाच्या आरोपावरून अॅरेस्ट करण्यात येत आहे." असे पोलिसांनी सांगितले, तेव्हा तो विलक्षण गोंधळून गेला.

अर्थातच त्याला आपल्या बायकोला होणाऱ्या भासांची कल्पना नसल्यामुळे.

त्याला घरी आणण्यात आले. खून त्याच्याच फ्लॅटवर झाला होता. पण इन्स्पेक्टरही त्याच्याचइतके गोंधळून उभे होते.

ही चक्क खुनाची केस होती. खुनी कोण याचा अंदाज करता येत होता; पण खून सिद्ध करायला पुरावाच नव्हता. जो होता, तो उलट गोंधळातच टाकणारा होता. कल्पनेचे आणि सत्याचे एकमेकांना वेढे पडले होते आणि काहीच समजेनासे झाले होते.

खुनी ऑफिसमधे असतानाच त्याचा हातून खून झाला होता. पण तो आपल्या घरी. त्याची बायको सुन्न उभी होती. तिच्या तोंडून एक शब्दही उमटत नव्हता. ज्याचा खून झाला त्याचा, यांच्याशी तसा संबंध काय, तो तिथे कसा, याचा काहीही पत्ता लागण्यासारखा नव्हता.

इन्स्पेक्टरांनी हार मानली. त्यांच्यासमोर आज असे गूढ उभे होते की, त्याला मानवी व्यवहारातले काही काही स्पष्टीकरण नव्हते. स्पष्टीकरण दुसऱ्या कुठल्या विश्वातले असलेच, तर ते त्यांना माहीत नव्हते. ते कदाचित डॉक्टरच सांगू शकले असते.

पण आता तेही शक्य नव्हते. कारण डॉक्टरांचा देह त्यांच्या समोरच पांढऱ्या चादरीखाली छिन्नविच्छिन्न होऊन पडलेला होता…

चिखल

: १ :

भर दुपार. ऊन तापलेले. नजर टाकली तर डोळे चुरचुरतील इतके. धुळीचा रस्ता. तापल्या तव्यासारखा रणरणता.

चटचटत्या धुळीतून केतकीची अनवाणी पावले कशीबशी उचलली जाताहेत.

वारा पडलेला. झाडाचे पानही हलत नाही. कुठूनतरी ऐकू येणारी टोकटोक पक्ष्याची कटकट, नाहीतर कावळ्याची कर्कश काऽरकाऽर. बाकी दुपार निपचित पडलेली.

केतकीला मात्र या कशाचेच भान नाही. तिच्या लेखी दुपार आणि संध्याकाळ आता सारखीच आहे.

मनच जिथे पोळून निघाले आहे, तिथे बाहेरचे ऊन आणखी काय भाजणार? थकवा आला आहे तोदेखील पायपीट केल्यामुळे नव्हे, पण अंगातली सारी शक्तीच कुणीतरी शोषून घेतली आहे. मन झपाटलेले. शरीर सुकून चिपाड झालेले, कांती फिकुटलेली. चेहेरा मूळचा देखणा. पण आता हडकुलेला. केसांच्या जटांना कित्येक दिवसांत पाणी लागलेले नाही. डोळ्यांकडे पाहून भीतीच वाटायची! पूर्वी सदा हसणारे ते डोळे… आता जणू त्यात आग पेटली आहे. ते पुन्हापुन्हा पाण्याने भरून येताहेत. पण त्यातली आग मात्र अधिकच भडकते आहे.

केतकी या जगात असून नसल्यासारखी झाली आहे. शरीर उरले आहे ते केवळ प्राणावरचे आवरण म्हणून, आणि प्राण उरले आहेत ते केवळ एकाच ध्यासामुळे. त्या ध्यासापोटीच केतकी शिल्लक राहिली आहे. उन्हातान्हात वणवण फिरते आहे.

अखेरीस पोलिसचौकी येते, तशी केतकी थांबते.

दोन पायऱ्या चढून ती ओसरीवर जाऊन बसते.

पोलिसचौकी म्हणजे दोन खोल्यांची पडकी जागा. मातीने सारवलेली. रंग उडालेले लाकडी टेबल. त्याच्या शेजारी दोन खुर्च्या. डगडगत्या. एक बाक.

जाडजूड मिश्यांचा बुटका काळगेला पोलिसपाटील टेबलाशी बसलेला. तो केतकीला पाहून न पाहिल्यासारखे करतो.

सध्या तो एका पटकेवाल्याशी बोलण्यात गुंग आहे.

जाधव नावाचा नवा तरुण फौजदार. तो केतकीला जवळच्या बाकावर बसण्याची खूण करतो.

तिची अधिक विचारपूस करण्याचा धीर मात्र त्याला होत नाही. पोलिसपाटलाला तो चांगलाच ओळखून आहे. कामाशिवाय अधिक बोलल्यास आपल्यावर आगाऊपणाचा आरोप येणार, हे जाणून आहे. शिवाय तो नव्याने लागलेला आहे.

अखेरीस पटकेवाल्याचे काम संपते. आपल्या चंचीतून दहादहाच्या चारपाच नोटा काढून तो त्या पोलिसपाटलाच्या बटबटीत मुठीत कोंबतो. जाधन हे न पाहिल्यासारखे करतो. पोलिसपाटील सगळे दात विचकून रुंद हास्य करतो आणि पटकेवाल्याला निरोप देतो. अखेरीस नाइलाजाने केतकीला विचारतो,

“काय ग बाई, तुझं काय काम?”

केतकी पदराने उगाच तोंड पुसल्यासारखे करते. कळवळून म्हणते, “केलंत तर फार उपकार होतील.”

“अग, पण आधी काम तर बोल.”

“हा भद्रकाळीच्या इथला गाळ आहे ना, तो उपसून काढा.”

“गाळ उपसायचा? तो कशाला?”

“बळीरामा आहे त्यात.”

पोलिसपाटील खदखदून हसतो आणि म्हणतो, “कशावरून म्हणतेस तू हे?”

“मला माहित्येय. शप्पथ!”

“घरी जा केतकी तू.”

केतकी रडकुंडीला आलेली. “मला माहित्येय, तुम्ही नाय माझं काम करणार. कोण नाय मला गाळ उपसून देणार! कोण नाय बळीरामाला अग्नी देणार! कोण नाय!...” ती हुंदके देऊ लागते.

जाधवला तिची दया येते. पण तो काही बोलू शकत नाही.

खरे म्हणजे त्याला एकूण प्रकाराची काहीच माहिती नसते. भद्रकाळीचा गाळ! त्याने त्यासंबंधी बरेच ऐकलेले असते. गावातून भद्रकाळी वाहते. या नदीला खोल डोह आहे. डोहापासून थोड्याच अंतरावर नदीचा गाळ साचूनसाचून एक दलदलीची जागा तयार झालेली आहे. वर्षातून बारा महिने तिथे चिखलाची राड झालेली असते. आजूबाजूला उंच रानटी गवत वाढलेले. दोन पुरुष उंचीचा चिखल तयार झालेला. जागा मोठी धोक्याची! चिखलात चुकून जरी पाय रुतला, तरी दलदल माणसाला आत ओढून घेते. त्या बाजूला कोणी फिरकत नाही. गुराखीसुद्धा गुरांना ती बाजू दाखवीत नाही. क्वचित एखादे चुकार ढोर गाळात फसते. वेळेवर लक्षात आल्यास लाट लावून चिखल उपसला जातो. दोऱ्या लावून ढोराला बाहेर काढले जाते. पण काम एकूण त्रासाचेच! सहसा गाळ उपसला जात नाही.

हे सारे जाधवला ठाऊक आहे. पण ही मुलगी कोण, बळीरामा हिचा कोण, तो चिखलात रुतला कसा, आणि कुणीच त्याला बाहेर काढायला तयार कां होत नाही, हे त्याला कळत नाही. तो गप्पच बसतो.

केतकी थोडा वेळ हुज्जत घालीत बसते. पोलिसपाटील मात्र तिचे काही ऐकून घेत नाही. तो तिला एकसारखा घरी जाण्याचा आग्रह करीत राहतो.

एवढ्यात सुकड्या तिथे येऊन पोहोचतो. केतकीच्या मागावरच तो आलेला आहे. आल्याबरोबर तो पोलिसपाटलाला विडी देतो, स्वत:च्या आगपेटीने ती शिलगावून देतो. दुसरी स्वत:च्या ओठात ठेवतो, आणि कमरेवर हात ठेवून केतकीच्या समोर उभा राहतो.

केतकी पदर डोक्यावरून घेते, आणि अक्षरही न बोलता एखाद्या पाळीव जनावरासारखी सुकड्याच्या मागून चालू लागते.

पायऱ्या उतरताना ती वळून पाहते. तिची जाधवशी दृष्टादृष्ट होते.

क्षणार्धच. मग ती दोघेही बाहेरच्या पेटत्या उन्हात दिसेनाशी होतात.

त्यांची पाठ वळताच पोलिसपाटील आपण होऊन जाधवला तिची माहिती देतो. हसतखिदळत, जाधवच्या पाठीवर आणि स्वत:च्या मांड्यांवर चापट्या मारीत.

केतकी रावसाहेब घाटगेंची मुलगी. एकुलती एक. रावसाहेब गावातले चांगले प्रस्थ. पन्नाशी उलटल्यानंतरही ढाण्या वाघासारखा रुबाबदार दिसणारा माणूस. बायको लवकर वारली आणि पाठीमागे एकटी केतकी राहिली. मुलगा नव्हता. पण घरात पैसा गुळासारखा भरलेला. रावसाहेबाची दानत चांगली नव्हती. वाकडा येईल त्याचा काटा काढल्याशिवाय तो राहणार नाही, अशी ख्याती. त्यामुळे सगळा गाव त्याला टरकून! त्याचा पैसा, त्याची माणसे या सगळ्यालाच गाव वचकून आहे. त्याचा शिकारीचा षौकही गावाला चांगलाच ठाऊकेय!

आजकाल घाटगेचे आणि त्याच्या मुलीचे मुळीच पटत नाही हेही सगळ्यांना माहीत. त्यामुळे कुणीच तिचे काही ऐकून घेत नाही. घाटगेचा राग जाणूनबुजून कोण ओढवून घेणार?

“त्यातून खुद्द रावसाहेबालाच एक भयंकर रोग झालाय्.” हलक्या आवाजात पोलिसपाटील सांगतो, “रावसाहेबाच्या लफड्यात न पडलेलंच चांगलं!”

अजूनही जाधवला नीटसे कळलेले नाही की, केतकीला हवे होते काय?

“मॅड् झालीय ती.” पोलिसपाटील म्हणतो, “तिला वाटतं, आपला नवरा त्या गाळात आहे.”

जाधव काहीच बोलत नाही. मात्र त्याला तिची जातानाची नजर आठवते. त्या नजरेत भीती होती. असहायता होती.

-आणि मदतीची याचना होती!

: २ :

संध्याकाळ. सगळ्या दलदलीवर सावल्या पसरलेल्या. उदास, करड्या, लांबलांब सावल्या. सगळे शांत, निश्चल. त्यामुळे दलदल दबा धरून बसल्यासारखी वाटते. मधेच कुठेतरी हालचाल होते, बुडबुडे उठतात. त्यामुळे त्या चिखलातून घाणेरडे, कुरूप, असे काहीतरी एकदम डोके बाहेर काढील, असे वाटते. कुठेतरी पिंगळा कर्कश ओरडत जातो. दचकायला होते.

चिखलाच्या आजूबाजूला रानटी झाडे वाढलेली. चिवट वेली एकमेकींत गुंतलेल्या. पाऊल टाकले, की अडकायला होईल, असे वाटते. झाडांवरून ओघळणाऱ्या चिकट चिकाला मुंग्यांचे सर झोंबताहेत. डासांचे थवे चिखलावर घोंगावताहेत. दूरची झाडे काळोखात नाहीशी होऊ लागलेली. दूर कुणाच्यातरी हातातली पेटती चूड मधेच हलून दिसेनाशी होते.

पण केतकीच्या हरवलेल्या नजरेला जणू यातले काहीच दिसत नाही. तिला कसलीही भीती वाटत नाही. गवतात सरसर झाले, की ती सवयीने अंग चोरते. पण एवढेच. कसल्यातरी विचारात, कुणाच्याशा आठवणीत खोल बुडून गेल्यासारखी ती खाली पसरलेल्या गाळाकडे शून्यपणे पाहात उभी आहे.

एकाएकी तिच्या खांद्यावर एक हात पडतो. ती दचकून वळते. तिच्यासमोर जाधव उभा असतो.

ती पदर सावरून खाली पाहते.

“इथे काय करत्येयस केतकी?”

“काही नाही.” असे म्हणून ती आल्या वाटेने चालू लागते. जाधवही तिच्याबरोबर चालत राहतो.

काही वेळ कुणीच काही बोलत नाही. मग जाधव विचारतो, “बळीरामा कोण?”

चालताचालता केतकी मध्येच थांबते. त्याच्याकडे टक लावून पाहात विचारते, “मला गाळ उपसून

देणार?”

“देईन.” तो म्हणतो, “पण मला आधी सगळी माहिती मिळायला हवी.”

केतकीच्या डोळ्यांत आशा चमकते; पण ती एकदम काही सांगायला तयार होत नाही. तिचा सगळ्यांवरचा विश्वास उडालेला आहे.

तरीही जाधव आग्रह चालू ठेवतो. केतकीची काही नड असल्यास ती दूर करण्याचा प्रयत्न करावा, असे त्याला मनापासून वाटत असते. पण ते जमले नाही, तरी आपल्याकडे बोलल्यामुळे हिच्या मनावरचा भार निदान कमी होईल, असा त्याचा हिशेब आहे. शेवटी तो गाळ नक्की उपसून देण्याचे आश्वासन देतो, तेव्हा ती सारे सांगायला तयार होते.

“बसू या जरा.” जाधव म्हणतो. पण केतकी चालतच राहते. “तो सुकड्या असेल माझ्या पाळतीवर. दिवेलागणीच्या आत घरी परतायला हवं.” दोघे चालतच राहतात. त्यांची चाहूल लागताच खारकुंड्या सरसर झाडावर चढतात. झाडांमधून वारा घुमत असतो. अंधारू लागते.

चालताचालता केतकी बोलत असते. जाधव जिवाचे कान करून ऐकत राहतो…

केतकी रावसाहेब घाटग्यांची एकुलती एक मुलगी. रावसाहेबांच्या मळ्यावर काम करणाऱ्या बळीरामाशी तिची ओळख झाली. बळीरामा मोठा देखणा गडी होता. अंग कमावलेले होते आणि आता तो नावदेखील कमावण्याच्या मार्गावर होता. इतर गड्यांसारखा मळ्यावर राबत तो जन्म वाया घालवणार नव्हता. त्याची महत्त्वाकांक्षा त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. थोडेसे पैसे साठताच त्याने रावसाहेबांचे काम सोडले. आता तो गावात एक पिठाची चक्की उघडण्याच्या धडपडीत होता. त्याला दुसरे कुणीच नव्हते. आई लहानपणी वारली होती. शिवाय ती होती भाविणींपैकी. त्यामुळे नावाला नाट लागण्यापुरताच बळीरामाला तिचा फायदा झाला होता.

बळीरामाशी ओळख होताच केतकी नुसती चुंबकाकडे लोखंड ओढले जावे तशी त्याच्याकडे ओढली गेली. तो बोले मिठ्ठास आणि शीळ तर त्याहूनही गोड वाजवी. त्याची शीळ ऐकत तासन् तास बसून राहवे असे केतकीला वाटे. रानातल्या कुठल्याही पाखराला इतकी सुंदर शीळ घालता आली नसती.

बळीरामालाही केतकी आवडली होती; पण रावसाहेबांसारखा माणूस ती बऱ्या बोलाने आपल्या हाती लागू देणार नाही, हे त्याला ठाऊक होते. आपल्याच मळ्यातल्या गड्याने आपल्या मुलीची आशा धरावी, ही कल्पनादेखील त्यांना सहन झाली नसती.

पण आज ना उद्या ते त्यांना समजणारच होते. रावसाहेबांना तोंड देण्यातले अपूर्व धाडसही बळीरामा कधी ना कधीतरी करून पाहणारच होता. त्याशिवाय त्याचे महत्त्वाकांक्षी रक्त शांत होणार नव्हते.

एकदा केतकी आणि बळीरामा भद्रकाळीच्या काठावर चोरून भेटली होती. नदीकाठच्या ओल्या वाळूत बळीरामाच्या अनवाणी पावलांच्या खुणा उमटत होत्या. तशी केतकीनेही आपल्या पायांतल्या चपला काढून हातात घेतल्या आणि त्याच्या पावलांच्या खुणांवर पावले ठेवीत ती चालू लागली. “अग बाई! केवढा मोठा आहे रे तुझा पाय! माझी दोन पावलं मावतील याच्यात!”

दोघेही हसली. बळीरामाने तिला जवळ ओढून घेतले आणि आपल्या हाताबरोबर तिचे हात जुळवून घेत तो म्हणाला, “आणि हात? ते किती मोठे आहेत?”

“खूप खूप मोठे! माझा बळीरामा सगळाच्या सगळाच मोठा आहे!” त्याच्या हातावरून हळुवार हात फिरवीत केतकी म्हणाली. त्याने ते सोडवून घेतले आणि किंचित धसमुसळेपणानेच तिचा चेहेरा हातात घेतला. त्याबरोबर त्याच्या बोटातली जस्ताची अंगठी तिच्या गालांना लागली. “स्स्!” असे उद्गारून ती

म्हणालो, “लग्नानंतर हो अंगठो काढायचो बरं का! मला लागते तो!”

या आपल्या बोलण्यावर तो खदखदून हसेल, अशी केतकीची अपेक्षा होती. पण लग्नाचा विषय निघताच बळीराम गंभीर झाला. एकाएकी शीळ वाजवू लागला. त्याने अशी शीळ वाजवलेली तिने कधीच ऐकलेली नव्हती. ही शीळ नेहमीसारखी आनंदी नव्हती. अगदी खोल, गंभीर अशी ती शीळ होती आणि उदासवाणी. कुणाचे काहीतरी हरवले असावे, आणि त्या हरपल्याला हाक मारावी, तशी कातर शीळ बळीरामा घालीत होता.

केतकीला ती शीळ असह्य झाली. तिच्या छातीचे ठोके जलद पडू लागले. डोळ्यांत पाणी येणारसे वाटू लागले. तिने बावरल्यागत त्याचा दंड धरला. बळीरामाची शीळ मधेच थांबली. क्षणभर झाडांमधून ती परत घुमल्यासारखी झाली आणि पुन्हा सगळीकडे शांतता पसरली.

“आज येतो मी रावसाहेबांकडे.”

“कशाला?” केतकी भ्यायली होती.

“विचारायला. लग्नाचं विचारायला नको आता?”

“नको नको. बाबांचा राग तुला माहिती नाही.”

“अग, पण कधीतरी विचारायला नको? आणि ते काय मला खाणारेत?”

“विचारलं तर ते कधीच, हो, म्हणायचे नाहीत.”

“नाही, तर म्हणतील? पुढं बघू काय करायचं ते. हातपाय हलवायलाच हवेत. नाहीतर मग रडत बसावं लागेल.”

केतकीला त्याचे म्हणणे पटले. एकदा काय तो सोक्षमोक्ष लावायलाच हवा होता. नुसते घोंगडे भिजत किती दिवस ठेवायचे? पण ती काहीच बोलली नाही. बळीरामाला प्रोत्साहन द्यावे, असेही तिला वाटले नाही. तो आपल्या वडिलांना भेटणार, हे समजल्यापासून तिच्या मनाला एक विचित्र हुरहुर लागून राहिली.

त्या हुरहुरीतच ती घरी आली.

पाहते, तो सुकड्या रावसाहेबांची बंदूक साफ करीत ओसरीवर बसला होता.

: ३ :

केतकीने त्याला विचारले, “काय रे, ही कसली तयारी?”

केतकी आपण होऊन कधी सुकड्याशी बोलत नसे. तिला सुकड्याची एक प्रकारची भीती वाटे. आज इतकी वर्षे तो घरात होता. पण कधी तिच्याशी मायेने बोलला नव्हता. तसा तो अबोलच होता.

सुकड्या नावाप्रमाणेच बारीक होता. त्याचे पंजे आणि पावले मात्र फताडी होती. त्याचे डोळे भेदक होते आणि मान किंचित खाली झुकवून तो नजर वरती रोखायचा. गालाची हाडे वर आली होती. दात अगदी पांढरेशुभ्र, एका ओळीत बसलेले आणि मोठमोठे होते. तो हसला की त्याच्या काळ्याशार वर्णावर ते पांढरे खडूसारखे दात चमत्कारिक दिसत. त्याला कुणीच नव्हते. एखाद्या भुतासारखा तो वाडाभर वावरे. वाटेल तेव्हा वाटेल तिथून बाहेर पडताना दिसे. कशा कोण जाणे, पण सुकड्याला दाढीमिश्या नव्हत्या. त्याचा तो गुळगुळीत चेहेरा अगदी बघवत नसे. रावसाहेबांचा मात्र तो आवडता चाकर होता. दिवसादेखील तो समोर

आला, की केतकी दचकायची. पण आज तिचे मन जागेवर नव्हते. बळीरामा आज रात्री येणार, एवढा एकच विचार तिला पुन्हा पुन्हा सुचत होता. म्हणूनच ती धीर करून तो प्रश्न सुकड्याला विचारू शकली.

सुकड्या क्षणभर गप्पच राहिला. मग म्हणाला, "आज रात्री साह्यब शिकारीला जायचेय्त."

केतकीचा जीव भांड्यात पडला. एकूण आज रात्री तरी बळीरामाची आणि त्यांची गाठ पडायची नाही!

एवढ्यात माडीवरून काकणे फुटल्यासारखा हसण्याचा आवाज ऐकू आला. केतकीच्या कपाळावर आठ्या पडल्या. आजकाल वरचेवर तो आवाज ऐकू यायचा. रावसाहेबांची कीर्ती बाहेर काहीही असली, तरी आजवर वाड्यावर कोणी बाईमाणूस आलेले तिला आठवत नव्हते. पण अलीकडे कधीकधी माडीवरून एका बाईचे बोलणे, हसणे ऐकू यायचे. ती कोण होती, हे विचारण्याचा धीर केतकीला कधी झाला नव्हता.

केतकी चाहूल घेत तिथेच उभी राहिली.

थोड्याच वेळात पायऱ्या वाजल्या. रावसाहेबांची पाहुणी उतरली. डोक्यावरचा पदर अर्धा चेहेरा झाकीत होता. त्यामुळे रूप दिसले नाही, तरी तिची स्थूलशी आकृती केतकीच्या ध्यानात राहिली. वाढत्या काळोखात ती पायऱ्या उतरून गेली.

रात्र फार पडली. झाडाझाडातून किर्रर्र वाजू लागली. जेवणीखाणी आटोपली. दूरवर एका कुत्र्याने गळा काढला. त्याचे ऐकून दुसरे, त्याच्यामागून तिसरे, असे करीत कुत्री विव्हळत राहिली. मग कुणीतरी खेकसले आणि त्यांच्यावर दगड भिरकावला. तशी ती हळूहळू चूपचाप होऊ लागली. खालच्या आवाजात क्यांवक्यांव करीत राहिली.

अंगणात कुणाच्यातरी वहाणा आणि हातातली काठी वाजली. केतकीचा जीव कानात गोळा झाला. पाठीमागच्या दारातून तिने वाकून पाहिले.

बळीरामा अंगणातून आत आला. सुकड्याचे आणि त्याचे काही बोलणे झाले असावे. तो कराकरा पायऱ्या वाजवीत माडीवर गेला. केतकी पदराला हात पुशीत माडीखाली येऊन उभी राहिली. वरच्या संभाषणाकडे कान देऊ लागली.

रावसाहेबांनी शिकारीला जाण्याचा सगळा जामानिमा चढवला होता. पुढ्यात बाटली ठेवून ते पीत बसले होते. त्यांनी ग्लास तोंडाला लावला आणि जिन्याजवळच्या भिंतीवर मोठी सावली पडली. पाठोपाठ चपलांची करकर ऐकू आली. रावसाहेब 'कोण?' म्हणून विचारतात, एवढ्यात बळीरामाचा बलदंड देह माडी चढून येऊन त्यांच्या समोर उभा राहिला.

केतकी माडीखालून ऐकत होती.

बळीरामाने आपल्या येण्याचा हेतू शक्य तेवढ्या सभ्यपणे सांगितला.

पण तो ऐकताच रावसाहेब भयंकर खवळले. त्यांचे मूळचे गोल मोठे डोळे संतापाने विस्फारले. कपाळ एवढे भव्य असूनही आठ्यांमुळे टीचभर दिसू लागले. रक्त चढून चेहेरा लालबुंद झाला. जाडजूड टोकदार मिश्यांना पीळ देऊन ते ओरडले, "ही शामत पोरा तुझी? माझ्या दारचा गडी तू! आणि मालकाच्या पोरीवर नजर?"

आता शांत राहणे बळीरामालाही कठीण जाऊ लागले, पण असे काहीतरी ऐकायला मिळेल, अशी अपेक्षा त्याने ठेवलीच होती. त्यामुळे तो काहीच न बोलता चित्रासारखा बसून राहिला. आजवर कधीच तो या माडीत आला नव्हता. माडीत एक कंदील जळत होता. त्याच्या प्रकाशात रावसाहेबांची सावली हलत होती. भिंतीवर रानडुकरांची आणि काळविटांची मुंडकी लावलेली होती, ती अपुऱ्या उजेडात जिवंत वाटत होती.

रावसाहेबांनी संतापाला वाट करून देण्यासाठी ग्लास रिकामा केला. त्यांची मूळची बेताल जीभ आता अधिकच सैल झाली,-

"चक्की काढणार असलास गावात म्हणून माझी बरोबरी? तुला काय वाटलंय पोरा, केतकी म्हणजे काय चिंचेचा पाला हाये, का वाटेवरच्या पोरानं येताजाता ओरबाडावा? शहरच्या शिकलेल्या पोरांच्या मागण्या हायेत तिला. तुझ्यासारख्या चिखलातल्या किड्याला-"

"रावसाहेब! तोंड सांभाळून बोला!"

केतकी श्वास रोधून ऐकत होती. वर जाऊन मध्ये पडावे की काय ते तिला सुचत नव्हते. एका बाजूला वडिलांची भीती होती; दुसऱ्या बाजूला बळीरामाची काळजी!

बळीराम स्वत:वर ताबा ठेवण्याचा शक्य तेवढा प्रयत्न करीत होता. त्याच्या नाकपुड्या थरथरत होत्या.

माडी एखाद्या गुहेसारखी गूढ वाटत होती. कंदिलाची ज्योत थरथरत होती, आणि त्या दोघा तब्येतदार पुरुषांच्या सावल्या हातघाईला आल्याप्रमाणे भिंतीवर हलत होत्या.

"मला दम देतोस? रावसाहेब घाटग्याला ओळखलं नाहीस अजून! पाच मिनिटांत होत्याचा नव्हता करून टाकीन! चिखलातला किडा नाहीतर काय? भावणीची औलाद! शरम नाही वाटत कुळवंताच्या घरात शिरून पोरगी मागायला? चिखल-चिखल आहेस तू! घाण!"

"रावसाहेब, परिणाम चांगला होणार नाही!"

रावसाहेबांनी ग्लास पुन्हा भरून तोंडाला लावला.

"एकदा सोडून हजारदा म्हणेन! चिखल, चिखल!"

आता बळीरामाचाही तोल सुटला. तो रावसाहेबांच्या अंगावर धावून गेल्यावर रावसाहेब तयारच होते. त्यांनी कोपऱ्यातली बंदूक उचलली. बळीरामा एकदम मागे झाला. बंदूक उचलून रावसाहेबांनी नेम धरला.

संरक्षणासाठी बळीने दोन्ही हात वर उचलले.

क्षणभर रावसाहेबांची नजर त्याच्या उघड्या पंज्यांवर खिळली.

आता ते चाप खेचणार, एवढ्यात केतकीची किंकाळी त्यांच्या कानांवर पडली. केतकी पुढे झाली आणि तिने बळीरामाला पाठीशी घातले.

"बाजूला हो - बाजूला हो! या चिखलाचा डाग घरावर पडण्याच्या आधीच-" रावसाहेबांनी पुन्हा बंदूक उचलली.

केतकी भयाने चित्कारली.

एवढ्यात दारात जीप येऊन थांबली. शिकारीची मंडळी आली होती. त्यांनी खालून हाका मारायला सुरुवात केली.

रावसाहेबांनी बंदूक उचलली, खांद्यावर टाकली आणि खाड्खाड् बूट आपटीत ते जिना उतरून गेले.

जीपमध्ये कोणकोण होते, ते केतकीला नीटसे दिसले नाही, पण मघाचा हसण्याचा आवाज पुन्हा एकदा ऐकू आला.

बळीरामाचे सर्वांग घामाने डबडबले होते.

“याद राख म्हणावं!” तो बरळत होता, “मला चिखल म्हणतो!- चिखल. नाही सूड घेतला, तर नावाचा बळीरामा नाही!”

केतकी पुढे झाली. जीपचा आवाज दूरदूर जात ऐकू येईनासा झाला. बळीरामाला शांत तरी कसे करावे, हेच तिला समजत नव्हते. तिने त्याचा घाम पुसण्यासाठी पदर पुढे केला.

पण दुसऱ्याच क्षणी तिचा हात मागे झाला, -माडीच्या दारात सुकड्या उभा होता.

एक अक्षर न बोलता बळीरामा त्याच्या अंगावरून खाली उतरून गेला.

सुकड्याने मालकाची बाटली आणि ग्लास उचलून ठेवले, कंदील उचलला आणि तो उभाच राहिला.

तशी केतकी उठली आणि चालू लागली. तिच्या मागोमाग सुकड्या जिना उतरून आला.

रात्रभर बाहेर कुत्री विव्हळत होती.

त्या रात्री केतकीच्या डोळ्याला डोळा लागला नाही.

: ४ :

सकाळी सुकड्या सांगत आला : “वरती साहेब बोलावत्यात.”

त्याची चर्या नेहमीसारखीच निर्विकार होती.

पण केतकीच्या छातीत मात्र धस्स झाले.

आजवर तिला नेहमीच रावसाहेबांची भीती वाटत आली होती. तसे म्हटले तर तिच्यावर कधीच कोणी माया केली नव्हती. आई लहानपणीच गेली होती आणि रावसाहेबांनीच तिला लहानाचे मोठे केले होते. तिला सारे काही वेळच्या वेळी मिळेल, काही कमी पडणार नाही, एवढी काळजी ते घेत. मुलीवर यापेक्षा वेगळी काही माया करण्याची गरज आहे, असे त्यांना वाटत नसे.

केतकी धीर एकवटून माडी चढून गेली.

रावसाहेब दाढी करीत बसले होते. धारदार वस्तरा झरझर फिरत होता. त्यांच्या हातातला तो वस्तरा पाहिला की केतकीला नेहमी कसेसेच होई. त्याची धार आपल्यालाच चाटून जात आहेसे वाटे.

रावसाहेब तिच्याकडे न बघता बोलले,

“हे पाहा, तुला लग्नाची घाई झालीये हे ठाऊक आहे मला. पण त्यासाठी बाहेर हे असे उकिरडे फुंकायची गरज नाही, समजलीस? आम्ही अजून जिवंत आहोत. आपल्या तोलाचं स्थळ बघितलंय आम्ही आणि तुझं लग्न त्याच्याशीच होणार आहे– राहील ध्यानात?”

केतकीचा जीव उडून गेला. रावसाहेब कशाविषयी बोलताहेत, हे तिला कळत नव्हते.

“सातारकर म्हणून आहेत. घराणं श्रीमंताचं आहे. झालंच तर मुलगा हुषार आहे. मुंबईला कॉलेजात शिकतोय.”

जिवाचा धडा करून केतकी म्हणाली, “मला-लग्न नाही करायचं.”

“काय म्हणालीस?” रावसाहेब वळले, “पुन्हा बोल.”

“मला सातारकरांशी लग्न नाही-”

“बस्स!” रावसाहेब गरजले. त्यांचा मघाचा धीमा स्वर साफ पालटला. “आम्हाला हे पुन्हा ऐकायला येता काना नये! त्या भावणीच्या पोराबरोबर तू कधीही दिसता उपयोगी नाही. समजलं? काही वेडंवाकडं येऊ दे माझ्या कानावर, मग सांगून ठेवतो, तू माझी मुलगी नाहीस, की मी तुझा बाप नाही! हालहाल होतील तुझे!”

खिडकीतून येणाऱ्या किरणांत त्यांच्या हातातला वस्तरा मधेच चमकन् चमकून जात होता. केतकीला तिकडे पाहवेना. तिने मान वळवली. रावसाहेबांचा गैरसमज झाला. “माझ्याकडे उद्धटपणा? चल चालती हो खाली! आणि लक्षात ठेव! आजपासून बळी तुला मेला!”

पदराने डोळे टिपीत केतकी खाली उतरून आली. रावसाहेबांनी मारून आणलेली शिकार ओसरीवर पडली होती. हातातल्या धारदार सुऱ्याने सुकड्या त्या हरिणावर एकएक घाव शांतपणे घालीत होता. एकेका घावात एकेक अवयव सुटा होत होता. मात्र अजूनही त्या हरिणाचे डोळे मेलेले नव्हते. त्यातले पाणी कायम होते. जणू अजूनही ते हरीण विनवीत होते. सुटकेसाठी आकांत करीत होते.

ते पाहतापाहता केतकीला भोवळ आली. लाकडी खांबाचा आधार घेऊन ती मटकन् खाली बसली.

दिवसभर केतकी निजूनच होती. संध्याकाळच्या वेळी तिला कुणीतरी हाक मारली. बाहेर बोलावले.

केतकी कशीबशी ओसरीवर आली.

एक पोरगा सुरंगीचे वळेसर घेऊन आला होता.

“हीच केतकी. दाखव तिला वळेसर.” असे म्हणून घर दाखवायला आलेली मुलगी निघून गेली.

पोरगा वळेसर दाखवू लागला. पण केतकीला आज कसला उत्साहच नव्हता. ‘मला नकोत वळेसर’ असे म्हणून ती घरात जाऊ लागली. पण तेवढ्यात ‘जरा थांबा बाई’ अशी हाक त्या पोराने मारली. केतकी थांबली. त्याने तिला खुणेने जवळ बोलावले. सदऱ्याच्या खिशातून घड्या पडलेला कागद काढून दिला.

केतकीने तो लुगड्याच्या निऱ्यांत लपवला. ती घाईघाईने आत आली. पलंगावर पडून तिने तो कागद उलगडला.

आतील अक्षर बळीरामाचे होते.

अजून एक प्रहर रात्र शिल्लक होती.

केतकीच्या पलंगाजवळच्या खिडकीवर दोन टिचक्या बसल्या. केतकी जागीच होती. ती चटकन् उठली. पलंगाखाली ठेवलेली पिशवी तिने उचलली आणि आवाज न करता दार उघडले.

दारात बळीरामा उभा होता.

न बोलता दोघे चालू लागली. पावलांचादेखील आवाज होणार नाही, अशा खबरदारीने.

काळोखातून त्यांनी अंबाबाईचे देऊळ गाठले.

भटजी बाहेर उभा होता. पण तो देवळाचा नेहमीचा पुजारी नव्हता. देवळाचा पुजारी पाठीमागेच राहात असे. तो अजून साखरझोपेत गुंग असावा. हा भटजी बळीरामाने शेजारच्या गावाहून आणला होता. हारासुद्धा सगळे साहित्य घेऊनच तो आलेला होता.

केतकीची मन:स्थिती विलक्षण चमत्कारिक झाली होती. अशा तऱ्हेने लग्न गुपचूप उरकण्याची पाळी आपल्यावर येईल, असे तिला स्वप्नातही वाटले नव्हते. ते उघडकीला आले तर काय होईल, याची भीतीही वाटत होती. पण लगेच मनात येई : सकाळच्या एस्टीने तर आपण गाव सोडून जाणार. पुढे निदान काही काळ तरी आपण या गावाचे तोंड पाहणार नाही. आपण परत येईपर्यंत वादळ नक्कीच शमलेले असेल. शिवाय असे लग्न करण्यावाचून दुसरा इलाजच काय होता? लग्न लांबणीवर पडते, आणि पाऊल घसरते, तर गावभर बदनामी झाली असती. जन्मातून उठावे लागले असते. अशा विचारानेच ती या धाडसाला तयार झाली होती. त्यातून आता बळीरामाचा आधार होता. लग्न झाल्याक्षणापासून सतत तो तिच्याबरोबरच राहणार होता. मग आता घाबरण्याचे कारण काय होते?…

भटजींनी चटपटीतपणे सगळे विधी उरकले. नवरा-नवरींनी एकमेकांच्या गळ्यात हार घातले. भटजींनी घंटा वाजवली. दोघांनी मग अंबाबाईला हात जोडले. केतकी मनातल्या मनात म्हणाली, “आई अंबाबाई, तुझ्या लेकीला सांभाळ!” बळीरामाने हात जोडायचे म्हणून जोडले. त्याला हे सारे कधी एकदा आटपेलसे झाले होते.

गाभाऱ्यात अंधार होता आणि एका विझत आलेल्या नंदादीपाच्या प्रकाशात अंबाबाईचे डोळे अधिकच बटबटीत आणि दगडी वाटत होते. त्यांच्यात करुणेचा अंशही दिसत नव्हता.

दूरवर कोंबडे आरवायला लागले. पाखरांचा कलकलाट सुरू झाला. हळूहळू फटफटायला लागले. भटजीला दक्षिणा देऊन वाटेला लावले आणि दोघे एस्टी-स्टँडकडे निघाली. गळ्यातले हार काढून केतकीने आपल्या हातातल्या हरीण-छाप हिंगाच्या पिशवीत टाकले होते.

बस सुटायला अजून अवकाश होता. बळीरामाने सावधगिरी घेऊन जागा राखून ठेवल्या होत्या. त्यामुळे तशी पंचाईत नव्हती. बळीरामा जाऊन शेजारच्या कॅन्टीनमधून दोन कप चहा घेऊन आला. तो काळामिचकूट चहा पिऊन सुद्धा केतकीच्या अंगात थोडी हुषारी आली. तिला विलक्षण थकवा आला होता. रात्रभर डोळ्याला डोळा न लागल्यामुळे डोकेही थोडेसे दुखू लागले होते. छाती अजूनही धडधडत होती. आपले लग्न झाले ते जागेपणी की स्वप्नात, असा घोळ पडला होता. एकदाची गाडीत बसलो आणि या गावापासून दूर गेलो की सुटलो; अशा विचारात ती बाकावर निमूट बसून राहिली.

बसल्याबसल्याच केतकीला डुलकी लागली. बळीरामा तिच्या कानाशी लागून म्हणत होता, “आता आपलं कुणी नाही, की आपण कुणाचे नाही! आपण फक्त एकमेकांचे.”

केतकी लाजून म्हणत होती, “पुरे बाई! दूर व्हा ना! मिश्या टोचतात!”

दूरवर कसलातरी गलका झाला. बळीरामा जागचा उठला आणि काय प्रकार आहे ते पाहायला गेला. एकजण बस-स्टँडच्या आवारातच बायकोला मारहाण करीत होता. बघ्ये जमले होते. फिदीफिदी हसत होते. पण भांडण सोडवायला कुणी पुढे होत नव्हता.

बळीरामाचे रक्त तापले. मागचापुढचा विचार न करता तो पुढे झाला आणि त्याने मार खाणाऱ्या बाईला पाठीशी घातले. तिचा नवरा त्याच्या अंगावर गुरगुरू लागला. पण बळीरामाची धिप्पाड आकृती पाहून अधिक काही करण्याची त्याची छाती होईना. तो नुसताच गुरगुरून गप्प बसला. मग काही लोकांनी ‘जाऊ दे, जाऊ दे’ म्हणत बळीरामाला बाजूला काढले. ‘बायकांकडे हुषारी…’ असे काहीसे बडबडत बळीरामा त्यांच्याबरोबर चालू लागला.

अचानक एक जीप येऊन त्यांच्यासमोर थांबली. तत्क्षणी वेळ न गमावता त्या चौघांनी बळीरामाला आत

ढकलले. तो काही बोलू शकण्याच्या आतच जोप सुरू झालो. रों रों आवाज करीत धुळीचा एक लोट उठवीत बळीरामाला घेऊन चालती झाली.

केतकीचे सुखस्वप्न काही क्षणांत संपले. ती जागी होऊन पाहते, तो बळीरामा जवळ नाही. गेला असेल जवळच कुठेतरी, म्हणून तिने काही वेळ वाट पाहिली. पण हळूहळू बस सुटण्याची वेळ झाली आणि लोक धावपळ करू लागले, तरीही जेव्हा का तो येईना, तेव्हा मात्र तिला काळजी वाटू लागली. दोन्ही पिशव्या उचलून ती पळत सुटली, आणि सगळा स्टँड पालथा घालून आली. तिला बळीरामा कुठेच दिसला नाही. रडवेली होऊन ती पहिल्या जागी परतली.

अखेरीस एस्टीची बस सुटली.

तरीही बळीरामा परतला नाही.

केतकीला हुंदका फुटला.

धुळीत काहीतरी पडलेले तिला दिसले.

त्यांच्या लग्नाचे हार होते ते. तिने ते पिशवीत कोंबले होते. या धावपळीत ते पिशवीतून खाली पडले असावेत. अजूनही ते ताजे होते.

केतकी पळत जाऊन ते उचलणार, इतक्यात बस मागे आली आणि वळण घेऊन चालू लागली.

बसची चाके धुळीत पडलेल्या त्या हारांवरून गेली.

केतकीला ते पाहवेना. तिने मान फिरवून डोळ्यांवर हात घेतले.

पण एवढ्यात जे दिसले, त्यामुळे ती विलक्षण दचकली.

तिच्या समोर सुकड्या उभा होता.

एक शब्दही न बोलता तो खाली वाकला. त्याने दोन्ही पिशव्या उचलल्या आणि तो शांतपणे वाड्याच्या दिशेने चालू लागला.

: ५ :

वाड्यात शांतता होती.

रावसाहेब कुठेतरी बाहेर गेल्याचे समजले.

केतकीशी कोणी एक अक्षरही बोलले नाही. ती मुकाट्याने आपल्या खोलीत गेली आणि पडून राहिली. कुणीतरी जेवणाचे ताट घेऊन आले. पण केतकी जेवली नाही. ती नुसती पडूनच राहिली. तिला अगदी आजाऱ्यासारखे वाटत होते. उठण्याची शक्तीही तिच्या अंगात नव्हती.

मनाला हजार प्रश्न भेडसावीत होते. बळीरामाचे झाले काय, ते समजत नव्हते. सुकड्या आपल्या मागावर असणार, आणि रावसाहेबांनीच काय करायचे ते केले असणार, यात तिला तिळमात्र शंका नव्हती. पण ते काय असेल, याच्या विचाराने मात्र तिच्या जिवाचे पाणीपाणी होई. गावात रावसाहेबांची कीर्ती काय होती, ते तिला माहीत होते. वाटेत येईल ते कापून काढायचे, अशी त्यांची वृत्ती होती. बळीरामाला त्यांनी त्या दिवशी धोक्याची सूचना दिलेली होती. तिलाही त्यांनी बजावून ठेवलेले होते.

हळूहळू दुपार टळून गेली. केतकीला धड झोप येत नव्हती की, धड जाग राहात नव्हती. मध्येच क्षणभर डोळा लागला, की तिला निरनिराळ्या भयंकर गोष्टी डोळ्यांसमोर दिसायच्या. जाग आली की, विचारांच्या इंगळ्या मनाला डसायच्या. तिच्या डोळ्यांसमोर रावसाहेबांचा हलता वस्तरा दिसत राही. मारून आणलेल्या हरणाचे डोळे दिसत आणि बसच्या चाकाखाली चिरडलेले लग्नाचे हार आठवत...

बाहेर थोडीशी गडबड झाली.

कदाचित बळीच आला असेल, अशा आशेने केतकी धडपडत उठून बसली. तिने खिडकीतून पाहिले.

रावसाहेब येत होते.

त्यांच्या अंगावर शिकारीचा पोशाख होता. खांद्याला बंदूक लटकावलेली होती. पण आज त्यांनी कसलीच शिकार बरोबर आणलेली दिसत नव्हती.

मग त्यांनी शिकार केली होती तरी कुणाची?

दणदण पावले टाकीत समोरून येणाऱ्या रावसाहेबांच्या आकृतीकडे केतकीला पाहवेना. ती आत वळली आणि पलंगावर अंग टाकून स्फुंदू लागली.

उशीत डोके खुपसून ती किती वेळ तशीच पडून होती, कुणास ठाऊक! ती भयभीत मनाने वाट पाहात होती : रावसाहेबांची दणदण वाजणारी ती पावले आपल्या खोलीच्या बाहेर वाजतील. दाराशी येऊन थांबतील. बाहेरून ढकलून दार उघडेल. त्यांची भीमकाय मूर्ती दरवाजात उभी राहील. मग ते प्रश्न, ती निंदा, त्या धमक्या... केतकीला जीव नकोसा झाला.

एवढ्यात दरवाजा कर्रर्र वाजला.

केतकी दचकून उठून बसली.

पण दारात रावसाहेब नव्हते.

तो सुकड्या होता. एका हातात जेवणाचे ताट आणि दुसऱ्या हातात कंदील घेऊन तो उभा होता.

त्या दोन्ही वस्तू तिथे ठेवून सुकड्या निघून गेला. केतकी तशीच निजून राहिली. तिची अन्नावर इच्छाच नव्हती. बाहेर चांगलाच काळोख पडला होता. आता बहुधा रावसाहेब येणार नव्हते. तिला काही विचारणार नव्हते. त्यांनी स्वत:च तिला बजावून ठेवले होते : 'बळीरामाशी संबंध ठेवलास तर तू माझी मुलगी नाहीस, की मी तुझा बाप नाही!' ते आपल्या शब्दाला जागणार होते. एखाद्या कैद्यासारखे, पाळीव जनावरासारखे तिला वागवले जाणार होते. तिचे या घरातले स्थान पूर्वीचे राहिलेले नव्हते. म्हणा तेही बरोबरच! आता ती रावसाहेब घाटग्यांची मुलगी नव्हती. ती बळीरामाची बायको होती. पहाटे मिणमिणत्या उजेडात लागलेले ते लग्न खरेच होते.

गळ्यातल्या साध्या दोऱ्याच्या मंगळसूत्रावरून तिने हात फिरवला. एकदम अंगात बळ आल्यासारखे तिला वाटले.

-आणि याच क्षणी तिला एक आवाज ऐकू आला. तिच्या ओळखीचा. फार फार ओळखीचा.

ती तिच्या बळीरामाची शीळ होती.

केतकीच्या अंगात दुप्पट अवसान आले. ती उठली आणि खिडकीत जाऊन उभी राहिली. एकूण आपल्याला वाटले तसे, बळीरामाचे काही बरेवाईट झाले नाही तर! तो आला होता. तिला न्यायला आला

होता. पण हे कसले धाडस! रावसाहेबांच्या वाड्यासमोर उभे राहून शीळ घालायची म्हणजे... समजा कुणी ऐकले तर?...

काळोखात डोळे ताणताणून केतकीने चौफेर नजर टाकली.

पण बाहेर कुणीच नव्हते.

शीळ मात्र ऐकू येतच होती.

केतकी बावरली. 'ही काय थट्टा? भलतीच? जीवघेणी? कुठे लपून शीळ वाजवतोय हा?...'

आणि एकदम तिला वाटले, ही शीळ वेगळी आहे. बळीरामाचीच खरी; पण तरीही त्याची नसल्यासारखी. फार फार लांबून ऐकू येत असल्यासारखी. नेहमीसारखी मजेत घातलेली नव्हे. अगदी उदासवाणी, करुण आणि तरीही फार कर्कश. कुणीतरी टाहो फोडावा तशी. कुणीतरी ऊर फोडून रडत असावे, तशी.

ती शीळ ऐकता-ऐकता केतकीच्या काळजाचे पाणी-पाणी झाले. ती आत वळली.

पण ती शीळ सबंध खोलीत घुमत होती.

खोलीच्या कानाकोपऱ्यातून शेकडो माणसे एका सुरात शीळ घालीत असावीत, तसे वाटत होते.

शीळ ऐकावीशी तर वाटत होती; पण ऐकताना जिवाचा थरकापही होत होता. भास म्हणावा, तर सबंध खोली नुसती त्या शिळेने दुमदुमत होती. हादरत होती. पण तरीही ती दुसऱ्या कुणाला ऐकू येत नसावी. कारण घरात तशी काही हालचाल नव्हती.

थकल्यासारखी होऊन केतकी भिंतीला डोके टेकून उभी राहिली. एवढ्यात कुणाचातरी हात डोक्यावरून फिरल्यासारखे तिला वाटले. तिने दचकून मान वर उचलली. तिला कुणीच दिसले नाही.

फक्त जवळच भिंतीवर एक डाग पडला होता.

ती बघते आहे, एवढ्यात त्याच्या शेजारीच दुसरा एक मोठा डाग पाहतापाहता उमटला.

सगळे धैर्य एकवटून केतकीने कोपऱ्यातला कंदील उचलला आणि त्याच्या प्रकाशात वर पाहिले. तिला जे काही दिसले, त्याने तिचे भान पुरते हरपले.

ते दोन डाग हाताच्या पंज्यांचे होते.

ओल्याओल्या चिखलाने डबडबलेल्या दोन रुंद तळहातांचे डाग!

-आणि त्यातल्या डाव्या हाताच्या मधल्या बोटाच्या पेरांत सुटलेली, जस्ताच्या अंगठीची जागा!

चिखल! कंदिलाच्या पिवळट प्रकाशात त्या पांढऱ्याशुभ्र भिंतीवर ओलाशार लालवट चिखल चकचकत होता.

केतकीची सारी भीती पार ओसरली. तिला अंदेशा मिळाला होता. तिच्या बळीरामाने तिला आपला पत्ता कळवला होती. भद्रकाळीच्या दलदलीतला तो लालवट चिखलच आता त्याचे घर झाला होता, आणि तिथे तो कायमची काळझोप घेत पडला होता. म्हणा त्याला झोप तरी कुठे लागली होती? तो तर बेचैन होऊन सर्वत्र संचार करीत होता. पहिली धाव त्याने घेतली होती ती आपल्या जीवाच्या कलिजाकडे. टाहो फोडून त्याने शीळ घातली होती, आपल्या मायेच्या सखीसोबतिणीच्या डोक्यावरून हात फिरवला होता, आणि तिला

आपली खूण पटवली होती.

एका क्षणात हे सारे केतकीच्या ध्यानात आले. तिला कळले की, तिचा बळीरामा आता या जगात नव्हता. आता तो भद्रकाळीचा झाला होता.

पण हे लक्षात येऊनही केतकी रडली नाही.

तिच्या डोळ्यांचे मुळी पाणीच आटले. ते भीषण सत्य समजताच दु:खाने तिचे भानच हरपले. ती वेडीपिशी झाली.

केतकी मग पूर्वीची लाजवट कुळवंतीण राहिली नाही. ती केवळ एका प्रचंड वेदनेची चूड झाली.

तिने कंदील खाली ठेवला आणि चिखलाच्या त्या ओल्या ठशांवरून हलकेच बोट फिरवले. त्या पंज्यांजवळ डोके ठेवले आणि ती पहाटेच्या प्रकाशातला लग्नसोहळा आठवू लागली. ते हातात गुंतलेले हात…ती जोडीने टाकलेली सात पावले…काही घटकाच केवळ टिकलेली ती सोबत…

"ज्या कुणी हे केलं, त्याला प्रायश्चित्त मिळालंच पाहिजे!" केतकी मनातल्या मनात तळमळून म्हणाली, "सूड घेणार आहे मी सूड! रडत बसले तर बळीला शांती नाही मिळायची!" ती मोठ्याने म्हणाली, "मी रडत नाय बसणार बळी! मी सूड घेईन! त्यावाचून स्वस्थ नाय बसायची रे!"

ती एवढे बोलली आणि त्या चिखलाचे बोट घेऊन तिने कपाळाला लावले. तशी पाहतापाहत ते चिखलाचे ठसे भिंतीवरून नाहीसे झाले आणि किण्ण वाजणारी ती शीळसुद्धा एकदम थांबली.

केतकी खाली बसली. हातातला काचेचा हिरवा चुडा तिने फोडून टाकला. गळ्यातले मंगळसूत्र काढून कोपऱ्यात फेकून दिले. जेवणाचे ताट उचलून ती आजच्या दिवसात पहिल्याने खोलीबाहेर पडली. मेरेवर उभे राहून तिने जेवण कुत्र्याला खायला घातले आणि ताट स्वयंपाकघरात नेऊन ठेवले. पुढल्या दारी येऊन पाहते, तो सुकड्या जोरजोराने जमीन घाशीत आहे.

केतकीने कर्कशपणे विचारले, "काय झालं रे सुकड्या?"

"काय उपेग न्हाई पगा," सुकड्या घाशीतच म्हणाला, "काल सारवलेली जमीन आज घान जाली. बरं, चिकल बी असला दाट, की किती घासा, त्यो निगतच न्हाई. कुनाचं मढं चालत ग्येलं, कुनास ठावं!"

केतकीने पाहिले. अंगणापासून माडीपर्यंत चिखलाच्या पावलांचे मोठमोठे ठसे उमटत गेले होते.

ती पावले केतकीच्या ओळखीची होती. त्यांच्या ठशांत तिने आपली पावले जुळवून पाहिली होती.

"सुकड्या!" केतकी विचित्र घोगऱ्या आवाजात म्हणाली, "सुकड्या, तुला हे डाग जायला हवे असतील, तर जमीन पुसून काही उपयोग नाही." तिने त्याचा हात पकडला. तिच्या डोळ्यांतून ठिणग्या उडत होत्या. "शपथ घे, की मी सूड घेईन. मगच ते जातील. मगच जातील! म्हण-सूड घेईन! सूड घेईन!" ती त्याचा हात सोडीना.

"केतकी!" माडीच्या खिडकीतून रावसाहेबांचा आवाज ऐकू आला, "सोड त्याचा हात!"

केतकीने सुकड्याला सोडून दिले आणि भ्रमिष्टासारखी पळतच ती माडीच्या पायऱ्या चढली. "तुम्हीच मारलंत त्याला! माझ्या बळीला तुम्ही मारलंत! आणि भद्रकाळीच्या दलदलीत लोटून दिलंत. तुम्ही मारलंत त्याला! हा बघा चिखल-हा बघा!" तिने शेवटच्या पायरीचा चिखल बोटाने उचलून त्यांना दाखवला.

"केतकी, वेड्यासारखं काय करतेस? गप्प बैस पाहू." असे म्हणत रावसाहेब जिन्याच्या तोंडाशी आले. त्यांनी कंदील उंच धरला.

माडीवर चढून येणारी ती चिखलाची पावले पाहून त्यांना धक्काच बसला.

"आता तरी कबूल करा!" केतकी धावत जिना चढून गेली. "नाहीतर हा चिखल तुम्हाला सोडणार नाही. तुम्ही त्याला चिखल म्हटलंत. तो तुमचा सूड घेईल!- तो तुमचा सूड घेईल!" बोटे नाचवीत केतकी बोलत होती. तिचे केस सुटले होते आणि बटा कपाळावर आल्या होत्या. तिला पदराचेही भान राहिले नव्हते. ती तशीच माडीच्या पायऱ्या उतरू लागली. "मी सबंध गावाला जाऊन सांगेन, की तुम्ही आपल्या मुलीला विधवा केलंत! तुम्ही आपल्या जावयाचा खून करून त्याला दलदलीत फेकलंत! मी सांगेन!... मी सांगेन!..."

"केतकी! केतकी! थांब." रावसाहेब तिच्या मागोमाग जिना उतरून खाली येऊ लागले. "केतकी, मी-मी बळीला-" पुढे काही बोलणार, इतक्यात रावसाहेब मटकन् खाली बसले.

"साह्येब!...साह्येब!" म्हणत सुकड्या धावला.

रावसाहेब हातपाय झाडीत होते. डाव्या हाताने त्यांनी आपला उजवा तळवा घट्ट धरून ठेवला होता. जणू काही त्याच्यातून विलक्षण कळा येत होत्या. "आग! आग होत्येय! आग होत्येय!" ते ओरडत होते.

हतबुद्ध होऊन केतकी थांबली. मोठ्या प्रयासाने सुकड्याने रावसाहेबांच्या उजव्या हाताची मूठ उघडली.

त्यांच्या तळहातावर एक पावलीएवढा चिखलाचा डाग उमटला होता.

: ६ :

सुकड्याने रावसाहेबांच्या हातावर लोणी चोळले, तूप ओतले, तरीसुद्धा हाताची आग थांबेना. मलमपट्टी केली तरी काही उपयोग होईना. कशीबशी रात्र गेली. रावसाहेबांच्या माडीच्या जिन्यातले ते डाग सकाळी आपोआप दिसेनासे झाले. सुकड्या डॉक्टरांना बोलवायला गेला. केतकी रात्रभर झोपलीच नव्हती. पण तिचा कालचा आवेश कमी झाला होता. मलूल डोळ्यांनी ती एका जागी बसून होती.

डॉक्टर आले. पण त्यांना समाधानकारक निदान करता आले नाही. "एक प्रकारचा त्वचारोग आहे" असे सांगून त्यांनी रावसाहेबांसाठी मलम पाठवून दिले. वेदना तात्पुरत्या थांबण्यासाठी त्यांना एक इंजेक्शनही दिले.

रावसाहेब निपचित पडून होते. बोलण्याचीही शक्ती त्यांच्यात राहिलेली नव्हती. मात्र त्यांना बघायला कुणीही आले नाही. कारण त्यांच्या या आजाराविषयी कुठेही बोलायला डॉक्टरापासून गडीमाणसांपर्यंत सर्वांनाच बंदी होती.

काहीतरी निर्धार करून केतकी उठली.

भर उन्हातून चालत भद्रकाळीच्या बाजूला निघाली.

दलदलीजवळ आली.

बाहेर ऊन तापत असले तरी झाडांची दाट सावली दलदलीवर पसरली होती. त्यामुळे ती दलदल अपराधाची चोरटी छाया पडलेल्या पापी चेहेऱ्यासारखी दिसत होती. आसापास कुणीच नव्हते. एक प्रकारची अस्वस्थ शांतता तिथे घोटाळत होती. बुडबुड्यांचा तडतड आवाज मधूनमधून येत होता. वाटायचे, की शांततेचा हा मोठा बुडबुडा एकाएकी फाट्दिशी फुटून जाईल आणि मग सारे रान त्या दलदलीत गाडल्या गेलेल्या पापांनी गजबजून उठेल...

आणि एकाएकी एक मंद, खालच्या स्वरातली शीळ आसमंतात घुमू लागली. ती शीळ कालच्या

शिळेसारखी कानठळ्या बसवणारी नव्हती. अगदी हलकेच कुणीतरी-या रानात, या चिखलात, या वाऱ्यात राहात असलेले कुणीतरी-गुणगुणत असावे तशी ती शीळ होती. पण तरीही ती ऐकून केतकीच्या अंगावर सरसरून काटा आला…

हळूहळू ती शीळ तिच्या डोक्यात घुमू लागली. रक्तात पसरू लागली. केतकीचे भान गेले. आता तिला त्या शिळेशिवाय दुसरे काही ऐकू येईनासे झाले. बुडबुड्यांच्या लक्ष तोंडांनी पुटपुटणाऱ्या, फेसाने लडबडलेल्या, कृमिकिटकांनी बुजबुजलेल्या त्या लालवट दलदलीशिवाय दुसरे काही दिसेनासे झाले.

तिच्या जिवाचा सखा तिथेच झोपला होता. त्याच्या घरात जायला तिला कसली भीती?

एक पाऊल गाळात रुतले की पुरे. देहाला मग आपोआपच ओढ लागेल. मग कायमची सोबत. कुणालाच तोडता येणार नाही अशी… एक अतूट नाते…

-त्या मंद भिरभिरत्या शिळेच्या तालात केतकीने पाऊल उचलले-

-आणि ती ते गाळात ठेवणार, इतक्यात-

कुणीतरी तिच्या दंडाला धरून तिला मागे ओढले. केतकी दूर हिरवळीवर जाऊन पडली. तिने इकडेतिकडे पाहिले. जवळ कोणीच नव्हते.

फक्त तिच्या दंडावर एक चिखलाची खूण उमटली होती. चिखलाचा हात लागावा तशी.

मात्र रावसाहेबांच्या हातावरच्या खुणेसारखी ही खूण जळजळत नव्हती.

“ही पाहा ती खूण.” केतकी आपला दंड जाधवला दाखवीत म्हणते, “कालपासून थोडी पुसट झालीय्.”

जाधव चक्रावून जातो.

केतकीच्या हकीगतीवर विश्वास ठेवणे कठीण असते. पण तिच्या बोलण्यात संगती असते. त्यामुळे तिला वेडी ठरवणेही कठीण आहे!

शिवाय हा पुरावा - तिच्या दंडावरचा चिखलाचा!

“मी घरी परत गेले.” केतकी सांगत असते, “माझ्या बळीरामानं मला मरणापासून मागं ओढलं. त्याला मी दलदलीत यायला नकोय. बाहेरच राहून मी त्याच्या मरणाचा सूड घ्यायला हवाय त्याला. त्याशिवाय तो शांत होणार नाही. काल रात्रीसुद्धा माझ्या खोलीत चिखलाचे ठसे उमटले. मी सूड घ्यायचं कबूल केलं, तेव्हा ते गेले. पण मी करू तरी काय? मला काही सुचेनासं झालंय.”

“आपण सूड घेऊ शकत नाही केतकी.”

‘आपण?’ जाधवच्या शब्दांतल्या आपुलकीने केतकी चमकते. तिला खूपखूप बरे वाटते. हलकेहलके वाटते. आपल्याला वेड्यात काढणाऱ्या सबंध गावापेक्षा हा एकच माणूस वेगळा आहे, या विचाराने ती काहीशी सुखावते.

“आपण सूड घ्यायची गरज नाही केतकी. ते तुझा बळीरामच आपल्यापेक्षा अधिक चांगलं करू शकेल. आपण फक्त खरोखर काय घडलं, हे शोधून काढायला पाहिजे. अपराध्याला शिक्षा होईलच. पण त्याआधी आपण बळीरामाला-”

“अपराधी कोण आहे, हे मला ठाऊक आहे.”

“रावसाहेब?”

“हो. तसं नसतं तर हातावरच्या चिखलानं ते असे तळमळत पडले नसते. तो चिखलाचा डाग दिवसेंदिवस चरत गेला नसता. तो चिखल इथला आहे. दलदलीतला. माझी खात्री आहे, बाबांनी त्याचा खून करून त्याला दलदलीत... जाधवराव, मी तुमच्या पाया पडते हो! माझ्या बळीला त्या दलदलीतून बाहेर काढा!... अग्नी तरी द्यायला हवा हो त्याच्या प्रेताला!”

केतकी मुक्तपणे रडू लागते.

एव्हाना आभाळ नक्षत्रांनी भरून गेलेले असते.

: ७ :

जगल्या गुरवाला भयंकर आश्चर्य वाटून राहिलेले असते. नवा फौजदार जाधव आपल्याकडे रातोरात येतो काय, आपला रोडका बैल भद्रकाळीच्या दलदलीत घालायला सांगतो काय, तो मेल्यास त्याच्या किमतीहून पन्नास रुपये जास्त द्यायला तयार होतो काय, आणि मुख्य म्हणजे हे सगळे या कानाचे त्या कानाला कळू न देण्याची अट घालतो काय! हे गौडबंगाल जगल्याला मुळीच उलगडत नाही. पण फौजदाराला नाही म्हणणे शक्य नसते. म्हणूनच तो या सगळ्या यातायातीला तयार होतो.

जगल्या स्वत:ची गुरे स्वत:च चारायला नेतो. त्यामुळे नजर चुकवून बैल दलदलीत घालणे त्याला सोपे असते. त्याप्रमाणे करून, तो बैल दलदलीत गेल्याची बोंब ठोकीत पोलिसचौकीवर हजर होतो.

पोलिसपाटलाकडे आज सोनाराच्या घरावर रेड टाकण्याचे काम असते. त्यात लग्गाही साधला जाणार असतो. म्हणून तो जगल्याकडे विशेष लक्ष न देता जाधवाला त्याच्याबरोबर लावून देतो.

दलदल उपसण्याची ‘लाट’ असते नरसू वाण्याकडे. जगल्याला बैलाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल चार शिव्या हासडून तो ती देतो.

‘लाट’ घेऊन जाधव आणि जगल्या दलदलीजवळ पोचतात. तोवर तिकडे अर्धा गाव जमलेला असतो.

सगळे जगल्याला राखणीतल्या चुकारपणासाठी ठेवणीतल्या शिव्या देतात. त्या माऱ्याने हबकून जाऊन जगल्या खरे ते सांगून टाकतो की काय, अशी जाधवाला काळजी वाटते. पण जगल्याचे सगळे लक्ष बैल मरतो का, आणि पन्नास रुपये अधिक मिळतात का, इकडेच लागलेले असते. त्यामुळे तो तोंडातून चकार शब्द काढीत नाही. बैल ठो-ठो हंबरत असतो आणि सुटण्याच्या धडपडीत अधिकाधिक खोल जात असतो.

‘लाटे’चा दांडा पलीकडे टाकला जातो. दोर बांधण्यात येतात. ‘लाट’ खाली सोडण्यात येते. तिला धरून दोन, लंगोटी लावलेले बाप्ये खाली उतरतात. बैलाच्या आजूबाजूचा चिखल उपसून टाकू लागतात. एका ठिकाणचा चिखल उपसताना, पलीकडचा चिखल तिकडे जमा होतो. त्यामुळे थोडे दूरपर्यंत उपसावे लागते.

आणि एकदम चिखल उपसणारे बाप्ये ओरडू लागतात.

त्यांना माणसाचे प्रेत सापडलेले असते.

बघणारी सारी मंडळी शहारतात.

प्रेत वर आणण्यात येते. विलक्षण दुर्गंधी सुटते.

प्रेत चिखलाने लडबडलेले असते. त्याचा बराचसा भाग किड्यांनी खाल्लेला असतो.

तरीही ते बळीरामाचे असल्याचे सगळे ओळखतात. सगळी मंडळी आपापसांत कुजबुजू लागतात. पण मोठ्याने बोलून आपला तर्क सांगण्याची कुणाची छाती होत नाही.

केतकीला निरोप पाठवून जाधव प्रेत घेऊन स्मशानात जातो.

प्रेताला अग्नी देणार, एवढ्यात केतकी तिथे येते.

आजवर बाईमाणूस स्मशानात आल्याचे गावाने कधीच पाहिलेले नसते. सगळे डोळे फाडफाडून तिच्याकडे पाहात राहतात.

पण केतकीला त्याची पर्वा नसते.

बळीरामाचे पाय अजून जळू लागलेले नसतात. केतकी त्यांच्यावर डोके ठेवते. लाकडे पेटू लागतात. वेळीच जाधव केतकीला मागे खेचतो. ती रडत नाही, आक्रोश करीत नाही. तोंडातून चकार शब्द काढीत नाही. स्वत:चा प्राणच जणू त्या चितेवर ठेवल्यासारखी ती निश्चेतन होऊन जाते.

जाधव तिला हाताला धरून तिच्या घरी पोहोचवतो.

एखाद्या कापडी बाहुलीसारखी ती शून्यपणे चालते. तिच्यातून सारे चैतन्य शोषून घेतल्यासारखे झाले आहे. प्रत्येक पाऊल मोठ्या कष्टाने पडते.

कशीबशी ती घराशी येते, आणि ओटीच्या पायऱ्या चढतानाच खाली कोसळते.

जाधव तिला उठवू लागणार, इतक्यात-इतक्यात रावसाहेबांच्या खोलीतून काळीज पिळवटून टाकणारा विलाप ऐकू येतो.

त्यासरशी केतकी उठून बसते.

तिच्या अंगात कुठून बळ येते कुणास ठाऊक, पण ती तशीच धडपडत उभी राहते.

जणू आपल्याला काय करायचे, आहे याची तिला एकदम जाणीव होते.

ती तशीच तडक रावसाहेबांच्या खोलीत जाते.

तिच्या मागून जाधवही जाऊ लागतो.

दाराशी सुकड्या बसलेला असतो. निर्विकार चेहेऱ्याने. जाधवाला पाहून तो उठून उभा राहतो. जाधव त्याच्या नजरेला नजर देतो. तो बाजूला होतो.

आत रावसाहेब माशासारखे तडफडत पडलेले असतात. आतापर्यंत त्यांच्या हाताचा सबंध पंजा चिखलाचाच झाल्यासारखा दिसत आहे. कुजून गेला आहे. त्यातून येणाऱ्या कळा त्यांना अगदी असह्य होत आहेत.

शेजारी डॉक्टर उभे आहेत. रावसाहेबांना मुंबईला नेऊन पंजा मनगटापर्यंत कापून घेतला तरच ते वाचू शकतील, असे त्यांचे म्हणणे. रावसाहेबांची सबंध हातदेखील कापून घेण्याची तयारी आहे. फक्त त्यांना त्या जळत्या वेदनेपासून सुटका हवी आहे.

जाधव आणि केतकी मुकाट्याने बाहेर येतात. केतकी जाधवाला म्हणते, “तुम्हाला काय वाटतं? बळीरामा त्यांना नुसत्या हातावर सोडील?”

जाधव काहीच बोलत नाही. बोलण्यासारखे असतेच काय? सारे काही समजून चुकलेले असते.

रावसाहेबांवर बळीरामाने सूड घेतलेला असतो.

पण जाधवाचा जीव दुसऱ्याच एका पंचाइतीत पडलेला असतो.

रावसाहेबांनी बळीचा खून केला, म्हणजे त्यांच्यावर पोलिसकेस व्हायला पाहिजे. सगळे कायद्याच्या चौकटीत बसायचे, तर रावसाहेब नुसता हात छाटला जाऊन जिवंत राहता कामा नयेत. त्यांना शिक्षा व्हायलाच हवी! याहून जबर शिक्षा!

पण रावसाहेबांचे स्टेटमेंट घ्यायचे कसे? ते तर तळमळत पडलेले! त्यांना नीट बोलता येत नाही की बोललेले ध्यानात येत नाही. ते नुसते आक्रोश करीत विव्हळत पडून आहेत.

तरीही सगळ्या प्रकरणाची साद्यंत माहिती मिळवायला हवी. केतकीने सांगितलेली हकीगत बाहेरून पडताळून पाहायलाच हवी. रावसाहेबांच्या आजूबाजूच्या साऱ्या माणसांना भेटून या गुन्ह्याचे धागेदोरे मिळवायला हवेत.

आणि एकदम एक नाव त्यांना लख्ख सुचते.

-सातारकर!

जिल्ह्याच्या गावी कॉलेजात शिकत असलेला सातारकर!

केतकीचे लग्न त्याच्याशी लावून देण्याचा रावसाहेबांचा विचार होता. रावसाहेबांच्या बेतांची कदाचित त्याला थोडीफार कल्पना असेल.

दिवसभर फिरून जाधव सातारकराची माहिती गोळा करतो. सातारकर तसा काही वयाने लहान नसतो. पण अजून त्याचे कॉलेजच चाललेले असते. आई शेजारच्या गावात राहून घर संभाळते. आता मुलाचे लग्न व्हावे, आणि त्याने मार्गाला लागावे एवढीच तिची इच्छा! पण त्याचे शिक्षणच संपत नाही. रावसाहेबांची आणि सातारकराच्या आईची जुनी गट्टी! केतकीला स्वत:ची सून करून घ्यायचे त्या बाईच्या मनात. रीतसर मागणीसुद्धा घातलेली असते तिने.

जाधवाला आठवते : केतकीने सांगितलेल्या हकीगतीमधील ती बाई... मोठ्याने हसणारी... स्थूल, मध्यम वयाची.

जाधव सकाळीच उठून शेजारच्या गावी जातो.

सातारकरांचा वाडा शोधून काढणे त्याला कठीण जात नाही.

वाडा चांगला चौसोपी. पण जुनाट. जागोजागी पोखरलेला, ढासळलेला. कित्येक वर्षांपूर्वीच त्याची डागडुजी करून घ्यायला हवी होती. पण घरात पुरुषमाणूस नसावे.

वाड्याच्या दर्शनी दरवाजा उघडा असतो. जाधव सरळ आत शिरतो.

पण आतील दरवाजाला कुलूप!

काय करावे, अशा विचारात जाधव क्षणभर तसाच उभा राहातो.

एवढ्यात कुठूनशी एक जख्ख म्हातारी येते. केसांची पिकून चांदी झालेली, नाक भुईला लागलेले, अशी.

“सातारकर इथंच राहतात ना?” जाधव दबकतदबकत विचारतो.

“तो इथं नाही. बाहेरगावी गेलाय.”

“–आणि आई?” जाधव धीर करून विचारतो.

“तीही नाही.” ती जखिणीसारखी दिसणारी बाई वसकन् अंगावर येते. “दिसत नाही, कुलूप आहे ते?”

जाधव विचारात पडतो. तो आणखी काही चौकशी करणार, तोवर म्हातारी तरातरा चालत वाड्यामागच्या झाडांमध्ये नाहीशी झालेली असते.

निराश होऊन तो परत जाण्यासाठी पाऊल उचलतो.

–आणि याच क्षणी एक जीप वाड्याच्या दर्शनी दरवाजासमोर येऊन थांबते.

आतून एक काळगेला कृश माणूस उतरतो. आणि त्याच्या मागून…

जाधवाला आश्चर्याचा धक्काच बसतो.

त्या माणसामागून केतकी खाली उतरते. “केतकी!…” जाधव पुढे होतो.

केतकी धावतच येऊन त्याच्या हाताचा आधार घेते. “मला यांनी इथं आणलं. सातारकरांनी. मला भीती वाटते हो!”

सातारकर गप्पच उभा. जाधवाला पाहून गोंधळलेला.

“तुम्ही भेटला नसता तर माझं काय झालं असतं?” केतकी केविलवाण्या आवाजात बोलते. “यांनी मला फसवून इथं आणलं. म्हणाले, तुला यायलाच हवं. माझ्या आईला तुला भेटायचंय आणि इथं तर - इथं घराला कुलूप आहे!” जाधवाला पाहून तिला बराच धीर आलेला असतो.

“काय हो! खरं आहे ना ही सांगते ते?” जाधव दरडावून विचारतो.

सातारकर काहीच बोलत नाही. तो नुसता त्यांना पाठीमागून येण्याची खूण करतो.

तिघेही वाड्याच्या पाठीमागच्या बाजूला येतात. एका बंद दरवाजापाशी येऊन थांबतात.

“मी खोटं सांगितलं नाही.” सातारकर अगदी थकलेल्या आवाजात बोलतो. “खरोखरच आईला हिला भेटायचंय. अगदी जरुरीचं आहे ते.”

तो दार ढकलतो.

“या. आत या.”

आत विलक्षण काळोख आहे. काळोखाला डोळे सरावताच एक मुटकुळे पलंगावर दिसू लागते.

“…आली सूनबाई?” पलंगावरून आवाज येतो.

“मी नाही कुणाची सूनबाई!” केतकी फणकारते.

“ऐक. मला बोलू दे.” सारी शक्ती एकवटून बोलावे, तशा आवाजात ती स्त्री बोलते, “तुझ्याकडे बोलल्याशिवाय गेले, तर नरकात पडेन.” बोलता बोलता ती एकदम गप्प होते. थोडा वेळ असाच जातो. मग ती कशीबशी बोलते, “पोरी, तुझा तो बळीरामा भद्रकाळीच्या दलदलीत आहे.”

“माहीत आहे ते आम्हांला. माझ्या वडिलांनी-”

“तुझ्या वडिलांचा त्याच्यावर राग होता ग पोरी! ते त्याला नाही-नाही ते बोलले. पण ते तेवढंच ग! त्यांनी त्याला मारलं नाही.”

“बाबांनी - त्याला - मारलं नाही?”

“नाही मुली. तुझ्या बळीरामावर मारेकरी घातले, मी! मला तुला सून करून घ्यायचं होतं. तू एकुलती एक मुलगी. तुमची सारी इस्टेट जावयालाच जायची. आमची परिस्थिती तू बघतेसच. पण बळीरामा आड आला. म्हणून मी... तुझ्या बापाला हे माहीतसुद्धा नाही.”

तिला धाप लागते. एकवटलेली शक्ती संपते. मान मागे टाकून ती कोसळते.

“आई!” असा अस्फुट उद्गार काढून सातारकर चेहेरा हातात लपवतो.

पण तिच्याजवळ जात मात्र नाही.

जाधवला ते विचित्र वाटते. तो पलंगाच्या पायथ्याची बंद खिडकी उघडून टाकतो.

बाहेरून प्रकाशाचा लोट खोलीत शिरतो.

त्या प्रकाशात जे दिसते, त्याने केतकी किंचाळते.

पलंगावर माणूस म्हणण्यासारखे कुणी नसतेच. एक चिखलाचा - भद्रकाळीतल्या लालवट चिखलाचा पायापासून डोक्यापर्यंत कुजलेला, सडलेला, मानवी आकाराचा पुतळा तिथे पडलेला असतो!

-काही क्षणांपूर्वी बोलणारा - आता सारी चेतना संपलेला!

खिळल्यासारखी होऊन केतकी आणि जाधव त्या चिखलाच्या आकृतीकडे पाहात राहतात.

ती खडबडून जागी होतात, ती उघड्या खिडकीतून ऐकू येणाऱ्या शिळेने!

हळूहळू ती शीळ साऱ्या खोलीभर पसरते.

साऱ्या वाड्यात घुमू लागते.

पण आता तिच्यातला विलाप संपलेला असतो. एखाद्या तृप्त आत्म्याने शांतपणे वाजवावी, तशी ती शीळ मंद, सुरेल वाजत राहते...

हातमोजे

टाप् टाप् टाप् टाप्-टाळ्या…

“हं-आता कोण गाणं म्हणणारेय?”

“सेक्रेटरी, हिला सांगा…”

“ए, मी नाही हां-काय तरीच काय?”

“मघापासून तुमचा आयटेम् बाकी राहिला आहे हं!”

“काय थंडी आहे नाही?”

“हॅ:-याला काय थंडी म्हणतात?”

“तुमचं ठीक आहे…मघा तुम्ही मुलांनी आपली थंडीची सोय करून घेतलीय!”

“म्हणजे? म्हणायचंय काय तुम्हाला?”

“मग? केव्ह नंबर सतरामध्येच सगळे मागे का राहिले हे? आम्हांला समजलं नाही असं वाटलं?”

“समजलं तर समजलं. घेतली आम्ही व्हिस्की. तुला हवीय का?”

“शीऽ आम्ही मुली नाही घेत तसलं काही-”

“नाकानं कांदे सोलू नका! आता विचारलं तर पंचविसातल्या चोवीस तयार होतील.”

“निदान अंजला तरी होईल. ती फॉरवर्ड आहे!”

“नाउ, लेडीज अँड जंटलमेन-मेहफिल जम गई है - या केव्हज अशा मिस्टीरियस दिसताहेत-हा चंद्र असा माथ्यावर आलाय-आपल्यासमोर हा बॉनफायर - ही होळी धडाडतेय-”

“बोअर करू नका होऽ”

“-तर अशा या स्वप्नमय वातावरणात आपल्या सगळ्या, पन्नासच्या पन्नास तरुण हृदयांची धडकन पेश करताहेत-”

“नाव घ्या, नाव घ्या-”

“लेडीज अँड जंटलमेन, टुनाईट वुइ प्रेझेंट यू, अवर स्वीट नाइटिंगेल मिस सोनाली दासगुप्ता-”

टाळ्या. नुसत्या नावालाच टाळ्या.

“ओ तीऽर चलाऽनेवालेऽऽ!

आह्आ! क्या बात है!

“तीऽर खाते जाऽयेंगे! आसू बहाते जायेंगे! ओ तीऽर चलाऽनेवालेऽऽ!”

गाणं थंडीत झिरपतं आहे…

समोर आग धडधडते आहे-

दिवाण किती हँडसम दिसतो आहे!

संध्याकाळी तो म्हणाला होता- 'अंजला, आज आपली डेट् आहे!'

पण आता लक्षच आहे कुठं त्याचं आपल्याकडे? तो आपला एकेक कार्यक्रमच उत्साहानं 'पेश' करतो आहे!

वाटलं काय त्याला? अंजला काय अशी तशी मुलगी आहे, की तिच्याकडे दुर्लक्ष करून चालेल?

"ओ तीऽर चलाऽनेवालेऽऽ…"

टाळ्या. सवयीनं वाजवायच्या. इथं कुणाचं लक्ष होतं गाण्याकडे?

आता दुसरा कार्यक्रम-बोअर आहेत सगळे!

इतकी सुंदर रात्र! आणि ती इथं शेकोटीशी बसून सिनेमातली गाणी ऐकण्यात फुकट घालवायची?

"लव्ह दाय नेबर! लव्ह दाय नेबर्स वाइफ टू!"

सगळे मॅड कोरस म्हणताहेत, स्टुपिड!

"अंजला, तू कां गप्प! म्हण ना तू देखील."

"म्हणते ग…इन द इव्हनिंग, अँड अॅट नाइट टू! लव दाय नेबर…"

"आय लव्ह दी-दी-दी-दिवाण!"

असं वाटतं, की हा सगळा मॅड ग्रुप एकदम पुसला जावा. उरावी फक्त ही रात्र-या चारी बाजूंच्या रहस्यमय काळोखी गुंफा! हा चंद्र…थंडीत शहारणारी ही उंच उंच झाडे!

मी आणि तो! दिवाण! देखणा, रुंद मनगटाचा, पुरुषी दिवाण! त्याच्या कुरळ्या बटा कपाळावर येतात, तेव्हा किती सुंदर दिसतात!

"तुझं लक्ष कुठाय अंजला? कुठं पाहतेयस?"

"चिमटे नको ग काढून जैना! माझं लक्ष आहे!"

दिवाण टाळ्या वाजवून ताल धरतो आहे- टाळ्या वाजवताना त्याचे खांदे काय रुबाबात हलतात! आणि गळ्यातलं वाघनख तर त्याला इतकं खुलून दिसतं!

"-लव्ह दाय नेबर्स वाईफ टू!"

टाळ्या…हसणं…गडबड!

"नाऊ, लेडिज अँड जन्टलमेन, द मोस्ट एक्सायटिंग आयटेम् ऑफ द इव्हनिंग!"

“जैना, काय असेल ग हा मोस्ट-”

“अय्या, नागनाथ उठला!”

“फोक्स, आय अॅम गोईंग टु शो यू द स्ट्रेंजेस्ट आयटेम्स इन् द वर्ल्ड.”

“अंजला, काय असेल ग त्याच्या पोतडीत?”

“अय्या, सुसरीचा दात-लार्जेस्ट टूथ ऑफ द क्रॉकडाइल म्हणे! छान आहे नाही?”

“करायचं काय पण याचं?”

“तू तरी मॅडच आहेस जैना. करायचं कशाला काही ज्या-त्या गोष्टीचं?

“किती बकवास करतो, पटपट सांगून नाही टाकता येत याला?”

“-हे आफ्रिकेतल्या एका झाडाचं लाकूड. कुणाकडे माचिस आहे? गुड-हे बघा-मी फ्लेमवर धरलं. हे जळत नाही- हे न जळणारं लाकूड आहे-”

“मला कंटाळा आला बाई. कसल्या चमत्कारिक वस्तू दाखवतोय एकेक!”

“कशा जमवल्या असतील ग यानं त्या?”

“तू अगदी भाबडी आहेस जैना. अग, त्या काही खऱ्या नाहीयेत. उगाच बंडल मारतो तो!”

“असेना का बंडल! पण ऐकायला किती छान वाटतं!”

“सात-आठ तरी झाल्या. आणखी किती वस्तू काढणारेय हा पोतडीतून?”

“लेडीज अँड जन्टलमेन, धिस इज द मोस्ट वन्डरफुल थिंग इन माय बॅग! होल्ड युवर ब्रेथ! हिअर कम्स-”

फुस्! साधे हातमोजे!

“फोक्स, तुम्हाला वाटेल की हे साधे हातमोजे आहेत! जस्ट सिम्पल ग्लव्ह्ज! टेन रुपीज पर पेअर! आपण कॉलेजच्या लॅबमध्ये एक्सपिरिमेंटस् करायला वापरतो तसले! हे त्याच रंगाचे, बिलकूल तसेच आहेत, हे मी मान्य करतो! पण बिलिव्ह मी, दे आर नॉट अॅज दे लुक!- वाटतात साधे, पण आहेत भयंकर धोकेबाज!”

“धोकेबाज म्हणे! ग्लव्ह्जमध्ये काय असणार आहे एवढं डेन्जरस?”

“तुम्हाला माहीत आहे हे कुणाचे मोजे आहेत? दीज आर् द ग्लव्ह्ज ऑफ अ स्ट्रँगलर! हे मोजे हातात घालून उत्तर हिंदुस्थानातल्या एका माणसानं सहाजणांचे गळे दाबले! पहिला खून त्यानं स्वत:च्या स्वार्थासाठी केला. हाताचे ठसे राहू नयेत म्हणून हे ग्लव्ह्ज वापरले, पण नंतरचे खून मात्र या हातमोज्यांनी त्याला करायला लावले-”

सगळे शांत. कान देऊन ऐकताहेत.

“त्यानं हे हातमोजे घरातच ठेवले होते- पहिल्या खुनानंतर खरं तर ते नाहीसे करायला हवे होते- पण त्याला तसं करवेना. कसलं तरी चमत्कारिक आकर्षण वाटत होतं त्याला त्यांच्याविषयी. म्हणून त्यानं ते स्वत:जवळच ठेवले.

“सॉरी मंडळी-मी ते तुम्हाला हातात घालून दाखवू शकत नाही. कारण ते इतके डेडली आहेत, की नुसते हातात घातले तरी त्यांचा प्रभाव सुरू होतो-ते घालणाऱ्या माणसाचे हात शिवशिवू लागतात- गळा दाबण्यासाठी- कुणाचा तरी गळा दाबण्यासाठी-”

“आई ऽ ऽ”

“काय झालं?-काय झालं?”

“इटस् ऑल राइट. आय अॅम सॉरी इफ आय हॅव फ्राइटन्ड समवन!”

“केवढ्यानं किंचाळलीस जैना!”

“मला भीती वाटली ग अंजू.”

“चल. घाबरायचं काय? ये अशी मला बिलगून बस…”

“मला ऐकायचंच नाही तो पुढं काय सांगतोय ते-”

“काही नाही ग, सगळ्या थापा आहेत! तू काय घाबरतेस त्यात?”

“मी तुझ्यासारखी धीट नाही अंजू-”

“दिवाण कुठं आहे?”

“काय झालं सर, गडबड कसली आहे?”

“अरे, जेवणाची व्यवस्था नको पाहायला? दिवाण कुठं आहे? तो सगळं करणार होता.”

“काही काळजी करू नका सर. सगळी व्यवस्था नीट आहे. पहिली बॅच बसली सुद्धा जेवायला-”

“पण दिवाण कुठं आहे?”

“त्याची कसली काळजी करता सर? असेल इथंच कुठंतरी.”

“आय डोन्ट वॉन्ट एनी मिसहॅप. कॉलेजची ट्रीप म्हणजे जबाबदारी असते.”

“काही काळजी करू नका सर. सगळी मोठी मुलं आहेत. आपापली जबाबदारी समजून वागणारी आहेत.”

“जेवायला सुरुवात करायची ना?”

“सुरुवातच? आमचं संपत आलं.”

“श्लोक येतात कुणाला?”

“संस्कृत डिपार्टमेंटला येत असतील.”

“आम्हाला ‘ना सांगू सोनाचांदी’ येतं. म्हणू?”

“आणि चिकन बिर्यानीला संस्कृत श्लोक कशाला?”

“जैना कुठाय?”

“ती नंतरच्या बॅचला बसेल. तुम्ही जेवून घ्या. एकमेकांसाठी थांबू नका.”

“सकाळी लवकर उठायचंय.”

“पण मघाशी त्या फारच अपसेट झाल्या होत्या. नागनाथ ते सांगत होता ना, ग्लव्ह्जबद्दल-तेव्हा.”

“ते मात्र अगदी टेरिबल होतं हां!”

“सर, तुम्हाला काय वाटतं? ते ग्लव्ह्ज घालून मर्डर झाले, म्हणून त्यांच्यात अजून तशी काही शक्ती असेल?”

“-आता नव्हे, दुसऱ्या खुनापासूनच म्हणे त्यांच्यात काहीतरी विचित्र प्रभाव आहे- एकदा गळा दाबल्यानंतर ते पुन्हा पुन्हा त्या माणसाला गळा दाबायला भाग पाडतात-”

“हम्बग! आपला नाही विश्वास!”

“तो नागनाथ फेकतो, आणि आपण आपले ऐकतो. बाकी वेळ मात्र छान गेला हां!”

“आपण नागनाथलाच विचारू, त्याचा विश्वास आहे का?”

“पण नागनाथ आहे कुठं? मघापासून दिसलाच नाही!”

“मिळाले कुठं त्याला हे हातमोजे?”

“दिल्लीतल्या एका जुन्या दुकानात मिळाले म्हणे! दुकानाच्या बुढ्ढ्या मालकानं त्याला ‘घेऊ नको’ म्हणून किती बजावलं म्हणे- पण यानं पाचपट किंमत देऊन ते घेतले!”

“सगळ्या थापा! तो नागनाथ एक नंबरचा-”

“हळू! तो आला!”

“असा काय दिसतोय? घामानं थबथबलाय नुसता. चेहरा किती पांढरा पडलाय?”

“काय झालं नागनाथ?”

“काही नाही-खरंच काही नाही.”

“बस जेवायला.”

“नको-मला भूक नाही.”

“खरंय. आमची पण भूक मेली. या लोकांनी कसलातरी विषय काढला. गळा दाबण्याचा आणि खुनांचा. मग काय जेवण जाणार?”

“नागनाथ-मी तुझा जवळचा मित्र-मला तरी सांग-काय झालं?”

“समथिंग व्हेरी सिरियस हॅज हॅपन्ड. आय हॅव लॉस्ट द स्ट्रॅन्गलस ग्लव्ह्ज.”

“असे कसे गेले?”

“माझ्या पोतडीतच होते. पोतडी खोलीत होती.”

“आणि तू कुठे गेला होतास?”

“मी-मी म्हणजे असा खास कुठे गेलो नव्हतो. अंघोळ वगैरे करायला गेलो होतो तेवढाच. नंतर आत्ता थोड्या वेळापूर्वी पाहतो, तर पोतडीतल्या बाकी सगळ्या वस्तू जागच्या जागी. फक्त ग्लव्ह्ज तेवढे गेलेले.”

“कमाल आहे!”

“दे आर व्हेरी व्हॅल्युएबल! एवढंच नाही, तर मला आणखीही एक काळजी वाटते.”

“कसली?”

“ते हातमोजे कुणाच्या हाती सापडले, तर तो माणूस भयंकर काहीतरी करून बसायचा!”

“टॉर्चेस घ्या पुरेसे! आणि काठ्या!”

“काठ्या कशाला?”

“वाटेत काहीही येईल! घेतलेल्या बऱ्या. पण इतकं लांब जावं लागणार नाही. इथं जवळपासच सापडेल ती.”

“रडू नकोस अंजला.”

“दिवाण-संध्याकाळी आपले गेम्स चालू होते ना, तेव्हा ती माझ्या शेजारीच बसली होती!”

“अग; पण रडायला काय झालं? ती सापडेल इथंच! कुठं जायची नाही.”

“पहिल्यांदा कुणाच्या लक्षात आलं, ती ग्रुपमध्ये नाहीये ते?”

“नागनाथच्या, मला वाटतं.”

“बाई ग, काय थंडी आहे!”

“साला एवढं सगळं होणार, हे आपल्याला माहीत असतं तर आणखी दोन पेग मारले असते-”

“सगळ्या मोकळ्या जागा पाहून झाल्या. जैनाचा पत्ता नाही.”

“पाठीमागच्या बाजूला-”

“तिकडे गेलेली मंडळी हात हलवीत परत आली.”

“ओ बॉदर! आय वॉन्टेड नो मिसहॅप ऑन धिस ट्रीप.”

“शांत व्हा सर! ती येईल परत. कुठं तरी भटकायला गेली असेल.”

“या वेळी? अशा या अरण्यात? आणि एकटीच?”

“मुडी आहे ती.”

“शी: बाई- त्या नागनाथनं सगळा मूड खराब करून टाकला-”

“कां? त्यानं काय केलं?”

“त्यानं त्या ग्लव्ह्जबद्दल सांगितल्यापासून सगळं वातावरणच कसं चरचरीत झालंय.”

“कुठं चाललोय आपण?”

“गुंफांकडे. आता तेवढी एकच जागा शोधायची राहिलीय.”

“पण एवढ्या काळोखात त्या दगडांमध्ये जायचं?- आय मीन, इजन्ट इट डेन्जरस?”

“बघायला तर पाहिजेच! टॉर्चवाले लोक, जरा पुढे या!”

“प्लीज- लेडीज मस्ट रिटर्न टु द हॉल. आमच्याबरोबर मुली नकोत.”

“दिवाण-मला येऊ दे ना.”

“नाही अंजला- रात्रीच्या वेळेस त्या गुंफांमध्ये मुलींनी यायचं काम नाही.”

“मिसेस वैद्य, तुम्ही लेडीजना घेऊन जा. त्यांना लवकर झोपायची रिक्वेस्ट करा.”

“अय्या, नागनाथ नाही कुठं दिसला?”

“तो झोपलाय म्हणे. त्याचे ग्लव्ह्ज गेल्यापासून तो अपसेट आहे!”

“सांभाळून या. फॉलो द टॉर्चलाइट!”

“बाजूच्या भिंतीला धरा. वाट उंचसखल आहे.”

“बापरे! केवढा काळोख! काजळासारखा आहे अगदी!”

“कसला फटफडाट झाला?”

“घाबरू नका. वटवाघळं उडाली, टॉर्चलाईट टाकल्याबरोबर.”

“नुसता भिंतीवर टाकू नका. जमिनीवर देखील टाका लाईट.”

“कसला कुबट वास येतो हो!”

“दोन गुंफा झाल्या... आता तिसरी...”

“मस्त झोपलो असतो. या पोरी नसतं काही तरी करून बसतात... आता सगळ्यांना वैताग!”

“अहो, ते पुढचे लोक कशाला बोलवताहेत ते बघा!”

“काय झालं हो?”

“विचारा ना-काय झालं!”

“सगळे गप्प कां?”

स्तब्धता. कुणालाच बोलणे सुचत नाही.

“हॉरिबल! सिंपली हॉरिबल!”

“आपल्याच्यानं नाही बुवा पाहवत!”

“मान नुसती काळी-निळी पडलीय!”

“डोळे मात्र अजून उघडे! अगदी बाहेर पडताहेतसे वाटण्याजोगे!”

“समबडी हॅज स्ट्रॅन्गल्ड हर! चक्का गळा दाबून ठार मारलंय तिला!”

“टेरिबल! आय हॅव नेव्हर सीन एनीथिंग लाईक धिस!”

“काळोखात माझ्या पायालाच लागली बॉडी! असा दचकलोय!”

“आता कुठल्या तोंडानं सांगायचं सगळ्यांना? काही मुली तर मघापासूनच रडताहेत!”

“एनी वे, वुइ हॅव टु इनफर्म द पुलीस! —इथे सरळ-सरळ गळा दाबून खून झालाय!”

“बहुधा हे समोर दिसतंय, तेच ते घर असावं…”

“किती निर्जन आहे सगळं!”

“आणि ते घरही किती छोटं!”

“पण असंच बरं वाटतं. लॉजिंग-बोर्डिंगपेक्षा वेगळं. म्हणजे कुणाला काही कळायला नको. गडबड नको. गवगवा नको.”

संध्याकाळ झाली.

टिव टिव-टिटव्या ओरडताहेत.

“बीच जवळ आहे ना?”

“रात्री येऊ या हं आपण बीचवर फिरायला.”

“तुला भीती नाही वाटायची?”

“भीती? दिवाण, तू बरोबर असताना मला कसली भीती वाटणार?”

शेवटी एकदा दिवाण एकटा भेटला. माणसांच्या गर्दीतून, कॉलेजच्या कामातून एकटाच भेटत नव्हता.

त्यासाठी घरी काय काय थापा माराव्या लागल्या - काल्पनिक मैत्रिणीचं नाव सांगून तिच्याकडे दोन दिवस

राहायला जाते, म्हणावं लागलं.

“काय तो गेल्या आठवड्यातला घोळ!”

“जैनाचा खून-बाई ग!”

“नागनाथवर संशय आहे.”

“पकडलं त्याला?”

“पकडलं होतं. पण पुराव्याअभावी सोडलं.”

“आलंच घर. किती छोटं! हाऊ क्यूट!”

“कोण पाहिजे आपल्याला?”

टिव टिव टिव!

“जागा मिळेल ना राहायला?”

“दोघं जण?-” संशयी नजर.

“हो– दोघंच.”

“एका रात्रीचे दोनशे रुपये होतील. जेवणाचे एका वेळचे पन्नास.”

“हे घ्या दोनशे अॅडव्हान्स.”

दूरवरून समुद्राचा आवाज येतोय.

मजा येईल! शेवटी मी आणि दिवाण एकत्र!

“एवढंच सामान?”

“हो-”

“चला-”

लाटांचा घों घों आवाज.

खडकांवर आपटून फुटताहेत.

केवढी मोठ्ठी लाट! बापरे, केवढं पाणी उडालं!

टिव टिव टिव-

“मला खूप भीती वाटते या घोंघावत्या पाण्याची. वाटतं मागे उभं राहिलं नाही- तर लाटा पाण्यात खेचून नेतील.”

“किती शांत आहे हा किनारा! माणसाची बिलकूल जाग नाही!”

“एवढ्या रात्रौ इथं कोण येणार? तुझ्या-माझ्यासारखं एखादं वेडं जोडपं!”

“काळोखही बराच आहे! आकाशात चंद्र नाही. दिवाण-तुला थंडी वाजतेय का? कोटाच्या खिशात हात घालून बसलायस, म्हणून विचारते.”

धो-धो-धडाड्-

“जाऊया का खोलीवर?”

“नको-इथं काळोखात-लाटांचं तांडव बघत बसायला बरं वाटतं. हजारो पांढरी पिशाचं किंचाळत खडकांवर तुटून पडताहेतसं वाटतं…”

“ई ऽ ऽ असं भयंकर नको बोलूस बाबा. आणि हात काढ ना खिशातून.”

“बरं-तू म्हणतेस, तर काढतो.”

“काय? हे हातमोजे! नागनाथचे? – तुझ्याकडे कसे? म्हणजे तू जैनाला मारलंस! आणि आता-मला-मला तुझी भीती वाटते दिवाण. यासाठी तू मला इथं आणलंस?”

“कांगावा करू नकोस. मी जैनाचा खून केला नाही, पण कुणी केलाय ते मला माहितेय?”

टिव टिव टिव-

“कुणी केला?”

“तूच केलास अंजला. संशयावरून तुझी पर्स पाहिली मी त्या दिवशी. मला हे मोजे मिळाले तिथं. बोल, कबूल कर-नाहीतर मी तुझा-”

“मला क्षमा कर- एक्स्क्यूज मी दिवाण-मी चुकून घातले त्या दिवशी-विषाची परीक्षा घेण्यासाठी. तुला माहितेय दिवाण, ते हातमोजे साधेसुधे नाहीत. त्यांचा परिणाम होतो माणसावर. माझेही हात शिवशिवायला लागले. त्यावेळी माझ्याबरोबर जैना होती. म्हणून मी तिचा-पण चूक माझी नाही-मी तिला मुद्दाम मारलं नाही-ते विलक्षण मोजे-”

“ते आता माझ्या हातात आहेत अंजला. माझी बोटं शिवशिवताहेत.”

धडाड-धोऽ धोऽ

“पळू नकोस अंजला, दगडांत डोकं फोडून घेशील-”

“दूर हो- तुझे ते हातमोज्यांचे हात दूर ठेव-”

“किंचाळून उपयोग नाहीये अंजला. मैलभरात तरी कुणी माणूस नाहीये.”

“दूर ठेव तुझे ते हात-”

“माझा इलाज नाही. त्या मोज्यांना माझ्या हातून बळी घ्यायचाय. यू नो दे आर स्ट्रँग्लर्स ग्लव्ह्ज. मला तुझा गळा-”

“खोटं आहे. खोटं आहे. वेडेपणा करू नकोस दिवाण-ते साधे मोजे आहेत. अगदी साधे. मला माहीत

आहे. मी ते-”

“देअर यू आर. ते साधेच आहेत अंजला. नागनाथनं थापा मारल्या. मोजे साधेच आहेत- पण म्हणजे त्यांनी तुला जैनाला मारायला लावलं नाही. तू आपणहून–जाणूनबुजून जैनाचा खून-”

चंद्र आता माथ्यावर आलाय.

सगळीजणं जेवणाच्या गडबडीत असतील.

पण माझी खात्री आहे-दिवाण आणि जैना मात्र त्या गुंफेत गेलेयत्.

अशा भलत्या वेळेस-दोघेच!

मघापासून माझं लक्ष आहे. बॉनफायरच्या वेळी खाणाखुणा चालल्या होत्या त्यांच्या!

मला आजवर कल्पना नव्हती! जैना-भोळीभाबडी वाटणारी जैना!

तिला ठाऊक नाही! दिवाण माझा आहे-फक्त माझा!

पण गुंफेत आतमध्ये कशी जाऊ मी? आत कोळाख आहे. टॉर्चचा प्रकाश टाकला तर दोघं सावध होतील. इतक्या कोळाखात दोघं एकटीच-जैना-तू मला फसवलंस-काय समजलीस मला तू? मी अशी गप्प बसेन? जीव घेईन मी तुझा-जीव घेईन-

हो घेईन-दिवाणसाठी मी काहीही करीन-

फोक्स-दीज आर द ग्लव्हज् ऑफ अ स्ट्रॅन्गलर.

ते हातात असले की बोटाचा ठसे उठणार नाहीत-कुणाला समजणार नाही-

पळत खोलीवर गेलं पाहिजे.

हाउ लकी! नागनाथ खोलीत नाही. पोतडी समोरच आहे!

स्स! काय लागलं हाताला? सुसरीचा दात वाटतं? –मिळाले मोजे!

वेळेत आले-दोघं बाहेर पडताहेत.

“एकच जैना-एकच किस-वन फॉर द रोड!”

“तू पुढे जा दिवाण. मी सावकाश येते. एकत्र गेलो, तर संशय येईल.”

“तुला भीती नाही वाटणार?”

“भीती कसली? आज मला इतका आनंद झालाय. शिवाय वाटेवर चांदणं आहे-”

“बाय! सी यू अगेन-”

“ओ तीर चलानेवाले- S S कोण, अंजला? काय दचकले मी!”

“जरा गुंफेत चल. काहीतरी दाखवायचंय.”

“आत काळोख आहे!”

“मी टॉर्च आणलाय.”

“फार आत नको-दाखव आता-”

“हे पाहिलेस? हे हातमोजे-स्ट्रॅन्गलर्स ग्लव्ह्ज.”

“हात दूर ने अंजला-दूर ने-”

“नाही जैना-तुला मेलंच पाहिजे-माझ्यापासून दिवाणला हिरावून नेणारीला-”

“अंज-अं-अं-”

“-तिथंच पडून राहा जैना-तिथंच राहा आता. दिवाण तुला जिवंत करू शकणार नाही!”

“सो यू किल्ड हर-माझ्यासाठी!”

“हो-तुझ्यासाठीच रे! मला तू हवास! तूच हवास!”

“खुनी मुलीवर मला प्रेम करता येत नाही! अंजला, मी जैनाचा आहे. अजूनही. तुला मरावंच लागेल अंजला. माझ्या जैनाला तू मारलंस, म्हणून.”

“ओ नो –नो –नो!”

“मागे जाऊ नकोस अंजला. पाण्यात पडशील-”

“मग तू पुढे येऊ नकोस-दिवाण-प्लीज-मला क्षमा कर. दिवाण-”

“मागे जाऊ नकोस-मागे-”

“आ ऽ ऽ ऽ”

घों ऽ घों ऽ लाटांचा आवाज.

खडकांवर फुटणाऱ्या लाटा.

हजारो पांढरी पिशाचे.

ती तो नाजूक सुंदर देह क्षणात आत ओढून नेतील.

बरं झालं-निदान स्वत:च्या हातांनी गळा घोटावा लागला नाही!

एक खून या हातमोज्यांनी केलाच आहे-

आता दुसरा नको-त्यांना जलसमाधी द्यावी हेच बरं-

पण माझी जैना? ती थोडीच परत येणार?

काळोख भरलेलो आकाशाचो पोकळो...
या खडकावर मी एकटाच विषण्ण उभा-
आणि लाटांची हजारो पिशाचे...

हेड-स्टडी

: १ :

राधेकृष्ण समोरच्या खिडकीतून बाहेर पाहात निश्चल बसून असतो. बाहेर काहीही नसते. म्हणजे विशेष लक्षपूर्वक पाहावे असे. रस्ता-तोही एका बाजूचा. फारशी वर्दळ नसलेला.

झोपेतून उठला, की राधे त्या खिडकीशी येऊन बसतो. नुकतेच उजाडलेले असते. मग उन्हे पडू लागतात. ती अधिकाधिक तापत जातात. दुपार होते. थोड्या वेळाने उन्हे कलतात. हळूहळू संध्याकाळच्या सावल्यांमध्ये मिसळून जातात. सावल्या गडद होतात. अंधारते. रात्र पडते. अंधारउजेडाची ही भरती-ओहोटी पाहतापाहता राधेचे डोळे तारवटतात. थकतात. त्यांत झोप नकळत उतरते. राधे पलंगावर अंग टाकतो. पुन्हा सकाळ झाली, की नजर खिडकीला चिकटवतो. दिवसचे दिवस हाच क्रम. एकच उद्योग. खिडकीबाहेर पाहण्याचा. क्षणभरही खंड न पडता.

खरे तर राधे खिडकीबाहेर तरी कुठे पाहतो? अमुक एका वस्तूवर अशी त्याची नजर ठरलेलीच नसते. तो नुसता शून्यात पाहात असतो. शून्यात; किंवा शून्यातदेखील नाही. खरे तर तो मनात, आतल्या आतच पाहात असतो. खिडकीबाहेर, असे उगाच म्हणायचे. पण खरे म्हणजे ते पाहणे नजरेच्याही आत. बाहेरच्या उन्हात नव्हे, तर खोल-खोल मनातल्या काळोखात.

राधेच्या लेखी आत-बाहेर सारे सारखेच आहे. अंधार-उजेड दोन्ही एकच आहे. कारण त्याला मुळी कसले भानच राहिलेले नाही. जगाचे नाही, स्वत:चेही नाही. तो आपला नुसता सुन्नपणे बसलेला असतो. खिडकीत.

पण नेहमीच नाही.

कधीकधी या सुन्नपणातही खंड पडतो.

राधेच्या मनाच्या तळाशी खोल-खोल साठलेल्या काळोखातून कधीतरी काहीतरी वर येऊ लागते. सावकाश. हळूहळू फेसाळत. बुडबुडत. काळ्याचिप्प चिखलाचेच गोळ्यावर गोळे रचून काहीतरी लडबडीत निराकार तयार व्हावे आणि काळ्याशार गाळातून धडपडत वर येऊ लागावे, गुठळ्यांचेच वीस-पंचवीस बोटांचे पंजे पुढे करून मानगुटीला झोंबू लागावे, तसे ते करते. राधेचा सुन्नपणा मग कडाकड फुटून पडतो.

उन्हात तापलेल्या त्या सुन्नपणाचे तुकडेतुकडे पडतात आणि मानगुटीवर बसलेल्या त्या काळ्याकुट्ट निराकाराच्या भयाने राधे जीव चालल्यासारखा बोंबलू लागतो : “धावा! वाचवा! मला वाचवा!...”

अर्थात हे शब्द असे इतके स्पष्ट कधीच उमटत नाहीत. राधेचे जेव्हा भान गेले, तेव्हाच जणू त्याचे शब्दही हरवले. आता तो आक्रोश करू लागला म्हणजे नुसत्या आरोळ्या ऐकू येतात. शब्द घुसमटल्यासारखे, जीभ तुटल्यासारखे होतात. राधे ओरडतो. बेंबीच्या देठापासून म्हणतात, तसे किंचाळतो. पण हे सारे, एखादे मुके जनावर काठीने बडवल्यानंतर हंबरेल तसे. त्याचा अर्थ कुणाला समजत नाही. कारणही कळत नाही. काहीही नवीन घडलेले नसताना अचानक हा टाहो सुरू होतो. खिडकीबाहेर राधे एकाएकीच किंचाळ्या फोडू लागतो. मग मी, नर्स परेरा, वॉर्डबॉईज्- सारे धावत जातो. आम्हांला समोर काही दिसत नाही. पण राधेला मात्र जणू आम्हीच दिसत नाही. त्याच्या नजरेसमोर दुसरेच काही घडत असते. भयानक! अक्रीत! त्या अमानुष भीतीपायी त्याचा सारा देह गदगदा हलत असतो. डोळे आता कपाळातून बाहेर पडतील की काय, असे वाटण्याइतके तारवटलेले असतात. नळ फुटल्यासारखा घाम अंगभर वाहात असतो. तोंडाला फेस आलेला असतो आणि जीभ एकसारखी दातांखाली सापडत असते. जीवघेण्या भीतीपासून सुटण्यासाठी राधे खोलीभर थयथया नाचत असतो. अंगावरचे कपडे ओढून ते फाडीत असतो. बिछान्यावरच्या चादरी खेचीत असतो. कपड्याचे बोळे तोंडात कोंबीत असतो. नर्स, वॉर्डबॉइज् त्याला पकडून एका जागी बसवण्याचा प्रयत्न करतात. पण तो चौघाचौघांनाही आवरत नाही. एकाएकी आला तसाच तो उन्माद ओसरतो आणि

गालेतगात्र होऊन राधे जाभेनीवर अंग टाकतो. भीतीच्या काळ्या वाटेवरून वाहात येऊन पुन्हा एकदा सुन्नपणाच्या किनाऱ्याला लागतो. पण कधीकधी लाटा एकामागून एक येतच राहतात. त्याला आतआत खेचीत राहतात. किनारा दिसेनासा होतो. मग डॉक्टरांना गुंगीचे इंजेक्शन द्यावे लागते. भयाने आक्रसलेला जीव मग गुंगीच्या स्वाधीन होतो...

पण नुसत्या एवढ्याच कारणासाठी राधेला या खोलीत एकटे ठेवलेले नाही. सुन्न होऊन स्तब्ध बसणाऱ्या माणसाला जनरल वॉर्डमध्ये ठेवले असते, तरी चालले असते. मधेमधे झटके येणाऱ्या माणसाच्या खोलीतही फार नाही तरी दोन-चार लोकांची सोय होऊ शकली असती. पण राधेची गोष्टच वेगळी आहे. त्याच्या खोलीवर पाटी आहे. तिच्यावर लाल रंगात एकच शब्द लिहिलेला आहे. तो शब्द पाहिला की, कुणी तिकडे फिरकायला धजत नाही. नर्स परेरादेखील सोबत वॉचमनला किंवा वॉर्डबॉयला घेतल्याशिवाय त्याच्या खोलीत शिरत नाही.

शब्द आहे : 'प्राणघातक.'

: २ :

मला त्या शब्दाची विलक्षण खंत वाटते. राधेकृष्णाच्या बाबतीत तो वापरला जावा, यासारखे वाईट दुसरे काहीच नाही. राधे माझा अगदी जिवश्चकंठश्च मित्र. मला स्वत:चा संसार नाही; आणि जीव लावायला राधेशिवाय दुसरे कुणीच नाही. तसे पाहिले तर आमच्या वयात बराच फरक -म्हणजे निदान सातआठ वर्षांचा तरी. पण त्यामुळेच मला तो धाकट्या भावासारखा वाटतो. तोदेखील मला थोरल्या भावाविषयीचा आदर आणि प्रेम दाखवीत असे. दुर्दैव असे की तो वेडा असल्याचे - आणि तसला - नको, तो शब्दसुद्धा नको- वेडा असल्याचे सर्टिफिकेट लिहिण्याचे अमंगळ काम मात्र त्याच्यावर एवढे प्रेम करणाऱ्या माणसाकडेच आले. एक विख्यात सायकिअॅट्रिस्ट म्हणून. त्याची केस पहिल्यापासून माहीत असलेला डॉक्टर म्हणून! दैव असे चमत्कारिक विनोद कां करते? राधेला ते तसले सर्टिफिकेट देण्यापेक्षा मी डॉक्टर झालोच नसतो तर बरे, असे आज वाटते. मनावर दगड ठेवून असली कर्तव्ये करावी लागणारा हा पेशाच नतद्रष्ट! शिकत असताना पुष्कळ वाटायचे की, डॉक्टर झालो म्हणजे आप्तेष्टांच्या उपयोगी पडू! पण राधेइतक्या जवळच्या माणसालाच हॉस्पिटलमध्ये पाठवण्याची पाळी डॉक्टर या नात्याने माझ्यावर येईल, या नशिबाची तेव्हा काय कल्पना?

वाईट याचेच वाटते की, राधेला माझा आता काही उपयोग नाही. उपयोग होता तेव्हा मी त्याच्यासाठी खूप केले. पण त्याचा आजार आगीसारखा भडकत गेला, आणि मी अपेशी ठरलो. आज तो माझ्या ट्रीटमेंटखाली आहे; आणि तो सुधारावा, म्हणून मी शक्य ते सारे करीत आहे. पण वेडासारखा आजार! येतो हत्तीच्या पावलांनी; पण मुंगीच्या पावलांनी परत जाताजाताही कधी उलटेल याचा नेम नसतो. आज तर त्याच्यात कणभरही सुधारणा नाही. पण पुढेमागे झालीच, तरी तो साधासुधा वेडा नाही. 'प्राणघातक'- खुनी प्रवृत्तीचा- गुन्हेगार! म्हणजे पूर्ण बरा झाल्यानंतरदेखील त्याला लोक वाळीत टाकणार. मला तरी राधेच्या नशिबात अंधारच दिसतो! समाधान मानायचे ते एवढेच की, आज राधे माझ्या नजरेखाली आहे.

राधेकृष्ण एक चांगला कलावंत होता. उत्तम शिल्पकार! 'जे. जे. स्कूल' मध्ये असताना तो 'हेड-स्टडी'मधे फार नावाजला होता. समोरच्या मॉडेलचा मानेपर्यंतचा भाग पाहून जसेच्या तसे शिल्प करणे, यात त्याचा हातखंडा होता. ते मुंडके पाहणाऱ्याला इतके जिवंत वाटायचे, की जसा काही त्यातला स्नायून् स्नायू शिल्पकाराला सापडला आहे.

पण राधेचे वडील वारले, आणि त्याला शिक्षण अर्धवटच सोडून द्यावे लागले. त्याने मग 'फ्री लॅन्सिंग' सुरू केले, आणि स्वत:चा एक छोटासा स्टुडिओ काढला. शिक्षण पुरे करता, तर आज राधे एक ख्यातनाम शिल्पकार झाला असता. मी त्याला शिक्षणासाठी मदत करायला हवी होती. पण त्या वेळेस जम बसवण्यासाठी जिथे मलाच दुसऱ्याची मदत घ्यावी लागत होती, तिथे मी काय करू शकणार? त्यातून त्याचा स्टुडिओ चांगला चालेल, याचीही मला खात्री वाटत होती.

पण आपल्या देशात सगळ्या सच्च्या कलावंतांना येतो, तोच अनुभव राधेकृष्णालाही आला. त्याच्या शिल्पकलेचे मुळीच चीज होईना. सुंदरसुंदर पुतळे नुसते पडून राहू लागले. त्यातून राधेकृष्णाला पदवी नव्हती. उचलून धरणारा भगतवर्ग नव्हता. फॅशनेबल वर्तुळात वावरून आपण कुणीतरी फार श्रेष्ठ आहोत असे दाखवण्याची व्यवहारी कला अवगत नव्हती. मुळात आधी तो फारच भोळा होता. कोणी काही म्हटले की, त्याला ते खरे वाटायचे. अविश्वास असा कुणावरच नाही. कलेच्या जगातही थोडीफार जाहिरात, थोड्या लटपटी, थोडी मखलाशी करावी लागते, याचा त्याला पत्ताही नव्हता. अर्थातच त्याच्या पुतळ्यांना गिऱ्हाईक मिळेना. त्यातून 'मॉर्डन आर्ट' ची लाट आली. निरर्थक, निराकार आकृत्यांमधून अर्थ शोधून काढून कलावंत स्वत:ची पाठ थोपटून घेऊ लागले. मग राधेकृष्णाच्या 'लाइफ-लाइक' पुतळ्यांना विचारतो कोण?

गरीब, पडखाऊ स्वभावाच्या राधेकृष्णाने हार खाल्ली. त्याने स्टुडिओ बंद केला. नाहीतर काय करणार? पुतळ्यांसाठी साहित्य आणणेदेखील अशक्य झाले होते. तो कुणातरी कारागिराच्या दुकानावर कामाला राहिला. दुकान होते पुतळे करण्याचेच. पण हे पुतळे कलात्मक नव्हते. हे 'डमीज्' होते. शिंप्यांना, तयार कपड्याच्या दुकानांना, साड्यांच्या जाहिरातींना मोठ्या प्रमाणावर 'डमीज्' पुरवण्याचे काम त्या दुकानात चालायचे. राधेची सारी शिल्पकला त्या डमीजवर ओतली जायची. गिऱ्हाईक तारीफ करीत; पण मालक कसेबसे जेमतेम भागण्यापुरता पैसा देई.

एके दिवशी राधेकृष्ण तिथूनही निघाला. पण आता गिऱ्हाइके ओळखीची झाली होती. त्यांच्यापैकीच कुणी भांडवल दिले. राधेकृष्णाने स्वत:चे छोटेसे दुकान काढले— डमीजचेच. कलेला वाव नव्हता, पण निदान पैसा मजबूत मिळू लागला. त्यातून त्याला उरक चांगला. सारे काम एकटाच करायचा.

पण बिचाऱ्याचे नशीबच खोटे! पैसा मिळवण्याचा मार्ग सापडला, बरे दिवस येऊ घातले, आणि त्याच वेळी त्याच्या वेडाचा पाया घातला गेला. एके दिवशी तो गप्पा मारतामारता मध्येच मला म्हणाला, "डॉक्टर, मी कामात थोडा बदल करणार आहे."

"बदल? कसला?" मी विचारले.

"हे डमीज करतो ना, त्याऐवजी नुसती मुंडकी करणार आहे."

"मुंडकी?"

"हो. असं टवकारून बघायला काय झालं? मुंडकी म्हणजे हेड्स्. स्कूलमधे नाही का आम्ही हेड्स्टडी करीत असू? तसली-मानेपर्यंतची."

"अरे पण लोकांना नुसती मुंडकी कशी चालतील?"

"न चालायला काय झालं? अरे चिक्कार डिमान्ड आहे मुंडक्यांना!" राधे हसून म्हणाला, "फॅशन डिझाइनर्स, हेअर स्टायलिस्टस्, मेकप-मेन, सिनेमावाले..."

राधेची ती यादी ऐकताऐकता माझ्या डोळ्यांसमोर एक वेगळेच चित्र तरळू लागले. लोकांनी राधेकृष्णाकडून मुंडकी विकत घेतली आहेत... ती घरोघर भिंतीभिंतीवर लटकावून ठेवलेली आहेत. प्राण्यांची तोंडे जशी वॉल-डेकोरेशन म्हणून लावतात ना, तशी. सुंदर स्त्रियांची मुंडकी, कुरूप पुरुषांची मुंडकी, वृद्ध जरठांची मुंडकी, छोट्या बाळांची गोजिरवाणी मुंडकी...

"नाहीतरी पहिल्यापासून मला 'हेडस्टडी'चा नाद होता." राधे बोलतच होता, "सबंध बॉडी करायची म्हणजे साला वैताग असतो! त्यात नाना लफडी! प्रपोर्शन, पोज, हे आणि ते! शिवाय एवढं करून त्यात वेगळेपणा नाही! वेगळेपणा येणार तो चेहेऱ्यांनीच. मग नुसते चेहेरेच बनवलेले काय वाईट?"

मला हे सगळे पटत नव्हते. त्यात कुठेतरी कसला तरी चमत्कारिकपणा होता. पण तरीही मी ऐकत

राहिलो; कारण मला एक प्रकारचे कुतूहलही वाटत होते. मुंडकी... नुसती मुंडकीच राधे घडवणार-बिनधडाची. नाहीतरी तो म्हणत होता ते बरोबरच होते. तसे पाहिले तर हातापायांत काय विशेष आहे? खरे सौंदर्य मस्तकातच!...

'गंमत आहे नाही?" राधे हसून म्हणाला, "आता आपण दोघेही एकाच लाईनमध्ये येणार."

"म्हणजे?" मला काही कळेना.

"अरे, तू सायकिअॅट्रिस्ट-म्हणजे डोक्याचा डॉक्टर –आणि मी फक्त डोकी तयार करणारा शिल्पकार! म्हणजे दोघांचाही धंदा एकच-हेड-स्टडी! काय? हेड-स्टडी!"

'हेड-स्टडी' असे म्हणून राधे केवढ्याने हसत सुटला! डोक्यात बिघाड झालेल्या एखाद्या माणसासारखा!

: ३ :

आणि खरेच तेव्हापासून राधे नुसता मुंडकीच करू लागला. त्याची अटकळही बरोबर ठरली. नुसत्या मुंडक्यांना गिऱ्हाईक पुष्कळच होते. त्याच्या किमतीही गिऱ्हाइकाच्या गरजेप्रमाणे आणि त्यापेक्षाही त्याच्या खिशाप्रमाणे बदलत्या असत. एखादा गरीब मेकपमन् मिश्या नाहीतर टोप लावून पाहायला एखादे डोके माफक किमतीत घेऊन जाई. तर शिरच्छेदाच्या सीनसाठी प्रमुख नटाचे तंतोतंत मुंडके करण्यासाठी हजारोंनी रुपये मोजायला कोणी सिनेमावाला तयार होई. राधे गिऱ्हाईक पाहून पैसे घेई. कधी कुणाला अडवून धरीत नसे, की अडचणीत टाकीत नसे. शिवाय कामात कसलीच कसूर नाही. प्रत्येक चेहऱ्याच्या स्नायून् स्नायूत त्याची मेहनत दिसून यायची. पापण्यांना खोटे केस लाव, दातांसाठी प्लॅस्टिक वापर, अशा अनेक युक्त्यांनी तो मुंडके इतके जिवंत करायचा की, ते नुकतेच देहापासून अलगद वेगळे केल्यासारखे वाटायचे.

मी कधी वेळ मिळाल्यास त्याच्या दुकानावर जात असे. तिथेच मागच्या बाजूला तो काम करीत बसायचा. माणसाचे मुंडके तयार करताना त्याला इतका विलक्षण आनंद व्हायचा, की त्याचा सगळा चेहेरा उजळून निघायचा. भारल्यासारखा तो काम करीत राही. त्याला काम करताना पाहताना वेळ कसा निघून जाई, कळतही नसे. त्याच्या आजूबाजूला पसरलेल्या मुंडक्यांकडे पाहतापाहता तर चक्रावून गेल्यासारखे होई. इतकी विलक्षण जिवंत मुंडकी एकत्र पडलेली पाहणे नाही म्हटले तरी थोडे भयावहच होते...

माझ्यासारख्या, कधीमधी ते दृश्य पाहणाऱ्या माणसाला गरगरल्यासारखे होई, तिथे राधेसारख्या दिवसरात्र तेच काम करणाऱ्या माणसावर त्याचा परिणाम झाला तर नवल नव्हते. त्याच्या वेडाची दुसरी अवस्था इथेच सुरू झाली. एके दिवशी अत्यंत अस्वस्थ मन:स्थितीत तो माझ्याकडे आला आणि म्हणाला, "डॉक्टर, स्वप्नावरून माणसाची मन:स्थिती कळत असेलच, नाही?"

मी म्हटले, "अर्थात! पण अगदी प्रत्येकच वेळेला नाही काही. पुन्हापुन्हा तीच तीच स्वप्नं पडायला लागली तरच-"

"तर मन:स्थिती कळते ना? मग...मग मला भीती वाटायला लागलीय. अलीकडे एकच स्वप्न मला पुन्हापुन्हा पडतं आणि स्वप्नदेखील साधं नाही रे! भयंकर आहे!"

मी थोडीशी थट्टामस्करी करून राधेला शांत केले. मग हळूहळू त्याने मला आपले स्वप्न सांगितले.

राधे म्हणाला त्याप्रमाणे स्वप्न भयंकरच होते. स्वप्नात राधेकृष्ण एका स्त्रीशी हसतहसत गप्पागोष्टी करीत असायचा. अचानक तो जवळची काठी तिच्या मानेवर मारायचा. त्याबरोबर तिचे मुंडके धडावेगळे व्हायचे. प्रत्येक स्वप्नात स्त्रिया वेगवेगळ्या असत. वातावरण निरनिराळे असे. कुठे पार्टी चालू असायची; तर कधी दोघेच बागेत बसलेली असत. पण राधेने प्रहार करणे आणि मुंडके खाली पडणे मात्र, सगळ्या स्वप्नांमध्ये

हटकून घडायचेच.

मी काळजीत पडलो. पण माझी काळजी वरकरणी दिसू न देता मी तो विषय थट्टेवारी नेला. राधेला म्हटले, "अरे, यात घाबरण्यासारखं काही नाही. रोज आजूबाजूला मुंडकी घेऊन बसतोस. मग ती स्वप्नात येणं स्वाभाविकच आहे. पण असलं काही होणार असेल तर हा धंदा दे सोडून! मग स्वप्नबिप्नं झक्कत पळून जातील!"

माझ्या सांत्वनाने राधे थोडा थारावला; पण त्याचे पुरते समाधान झाले नाही. तो विचार करीतच राहिला. 'माझ्याशी हसत-हसत बोलणारी बाई-म्हणजे माझ्यावर प्रेम करणारी बाई- आणि मी स्वत:च तिचं शिर… असं कसं? असं कसं?' स्वत:च निर्माण केलेल्या प्रश्नांच्या भोवऱ्यात तो गुरफटून गेला.

धंद्याचा जम इतका उत्तम बसला होता, की तो बंद करणे राधेला शक्यच नव्हते. तेवढ्यात त्याचे लग्न ठरले. नाहीतरी त्याच्या आईचे आता वय झाले होते. बिचारीने राधेसाठी खूप कष्ट उपसले होते. आता सून यावी, आणि मुलाचा संसार सुखात चाललेला बघावा, एवढीच माफक इच्छा तिच्या मनात होती.

गिरिजा तशी काळीसावळी होती, पण तरी नाकीडोळी नीटस होती. बोलण्यावागण्यात गोडवा होता. जिव्हाळा होता. ती राधेचा संसार सुखाचा करील, यात शंका नव्हती.

पण अचानक एक भयंकर प्रकार घडला, आणि लग्न लांबणीवर पडले.

त्यादिवशी सकाळी मला घरी निरोप आला की, 'असशील तसा राधेच्या घरी ये.' मी नुकताच उठलो होतो आणि सकाळची कामे आटपीत होतो. निरोप मिळताच मी कपडे बदलले आणि लगोलग राधेच्या घरी हजर झालो.

घराबाहेर पोलिस उभे होते. माणसांची हीऽ गर्दी जमली होती. मला धक्काच बसला. गर्दीतल्या साधारण ओळखीच्या एका माणसाला बाजूला घेऊन मी प्रकार काय आहे, ते विचारले. तो म्हणाला, "राधेकृष्णाच्या आईचा खून झालाय."

"खून?" मी किंचाळलो.

"हो. मुंडकं धडावेगळं केलंय."

"काय म्हणतोस?" मला भोवती सगळे गरगर फिरत आहेसे वाटू लागले.

"कुणीतरी चोरीच्या उद्देशानं घरावर धाड घातली बहुतेक. म्हातारीनं विरोध केला. काढली कापून! पण चोर म्हणावा तर…"

मी सगळे ऐकायला थांबलोच नाही. आत धाव घेतली.

पोलिस-इन्कायरीला तोंड देत राधेकृष्ण उभा होता.

त्याचा त्या वेळचा चेहरा आठवतो आणि आज खात्री पटते, की तीच त्याच्या आजाराची तिसरी अवस्था होती. त्याआधी दोनच दिवस मी राधेला भेटलो होतो. तो राधे आणि हा राधे या जणू दोन साफ वेगळ्या स्वभावाच्या, वेगळ्या वयाच्या व्यक्ती होत्या. एका रात्रीत तो वयस्क वाटू लागला होता. विलक्षण ताण पडल्यासारखा त्याचा चेहरा ओढला होता. त्यावर दु:ख तर होतेच. पण एकूण भाव भान नसलेल्या माणसाचा होता.

त्याला त्या परिस्थितीत पोलीस ऑफिसरशी बोलू देणे धोक्याचे होते. पोलिसांना संशय येईल असे

काहीतरी, तो बोलून जाण्याचा संभव होता. पण उघडपणे त्याला बाजूला काढणेही अशक्य होते. तरीही मी पुढे झालो आणि स्वत:ची ओळख पोलिस ऑफिसरना करून दिली. ते माझ्याशी आदराने बोलू लागले.

त्यांच्या बोलण्यावरून एवढेच कळले की, राधेकृष्ण अजूनपर्यंत तरी वेड्यासारखे काही बोलून गेला नव्हता. उलट त्याच्या म्हणण्याप्रमाणे, हा प्रकार घडला तेव्हा तो घरातच नव्हता. काल रात्री तो मित्राकडे गेला होता. परत येताना त्याची शेवटची गाडी चुकली होती, आणि सारी रात्र त्याला स्टेशनवरच काढावी लागली होती. पहाटेच्या पहिल्या गाडीने तो आला, तेव्हा दार उघडेच होते, आणि - आणि मधल्या खोलीच्या उंबरठ्यात त्याच्या आईचे शिर पडले होते. खोलीत देह पडला होता. ते दृश्य पाहून राधे जो किंचाळत सुटला होता, तो, लोक जमून त्यांनी त्याला गप्प करेपर्यंत.

पोलिसांना हत्यार सापडले नव्हते. फिंगरप्रिंट्सही नव्हते.

मला हायसे वाटले. राधे अजून तरी सुरक्षित होता. त्याची 'अॅलिबी' थोडी कच्ची होती. पण कच्ची असल्यामुळेच निदान ती त्याच्या विरुद्ध जाणारी नव्हती. 'रात्रभर मित्राकडेच होतो' असे तो सांगता, तर ते पडताळून पाहणे पोलिसांना सहज शक्य होते.

पोलिसांचे सगळे उपचार उरकले आणि मगच आम्हांला अग्निसंस्काराची परवानगी मिळाली.

ते दृश्य मी जन्मात विसरणार नाही. दिवसा, रात्री-कधीही ते माझा पाठपुरावा करते...

राधेच्या आईचे ते तुटलेले शिर! अगदी राधेच्या दुकानातल्या मुंडक्यांसारखे. फक्त काही कमी, काही जास्त! कमी अर्थातच जिवंतपणाचा भास, तजेला! आणि अधिक-

तुटून लोंबणारे स्नायू आणि वाळलेल्या रक्ताचा जाड थर!

: ४ :

मी राधेला फार काही बोललोच नाही. फक्त त्याला एवढेच सुचवले की, त्याच्या जुन्या सबंध शरीराच्या 'डमीज्'पैकी काही त्याने आपल्या कामाच्या ठिकाणी आणून ठेवाव्यात. पोलिसांच्या नजरेला केवळ मुंडकीच पडणे चांगले नव्हते. त्यांना काहीतरी संशय आला असता.

त्या दिवसापासून राधे तंद्रित असल्यासारखा वागू लागला. त्याचे बोलणे जवळजवळ बंदच झाले. कधीकधी मात्र मला किंवा गिरिजाला तो म्हणे, "स्वप्नात माझ्याशी हसणारी स्त्री मला दिसायची! म्हणजे माझ्यावर प्रेम करणारी! –माझी आई!" आणि तो लहान मुलासारखा रडू लागायचा. आम्ही त्याचे सांत्वन करायचा निष्फळ प्रयत्न करीत असू. गिरिजा म्हणायची, "असं काय करता वेड्यासारखं? तुमच्यावर प्रेम करणाऱ्या आई गेल्या; पण मी आहे ना?"

'मी आहे ना?' हे तिचे शब्द जणू त्याला चमकवून जागे करीत. तिच्या चेहऱ्यावर नजर रोखून तो म्हणायचा, "हो. तू आहेस ना- तू आहेस."

पण मनातून राधेला कसलीतरी टोचणी लागल्यासारखे दिसत होते. त्याचे व्यवहार पूर्ववत् चालू होते; पण मधूनच त्याचे भान जाई. आपण काय बोलत आहोत, हेच तो विसरून जाई. मग धागा जुळवायला प्रयास पडत. चेहेरा अपराधी होई. कसलीतरी भीती वाटल्यासारखे शहारे अंगभर येत. एकदा तर तो मला स्पष्टच म्हणाला, "डॉक्टर, मला काहीतरी होतंय् रे! कसलीतरी भीती वाटत्येय." पण तेवढेच! 'कसली वाटत्येय्?' हे विचारले तर सांगेना.

राधेच्या आजाराच्या चौथ्या अवस्थेची सुरुवात मला चांगली आठवते. एकदा तो अचानक माझ्या हॉस्पिटलवर आला. मी कामात होतो, म्हणून त्याला वेटिंगरूममध्ये बसायला सांगितले. तर तो चार वेळा

माझ्या रूममध्ये डोकावून गेला. शेवटी त्याने बॉयकडे निरोप पाठवला, “डॉक्टरना सांगा कॉ, माझं अर्जंट काम आहे.” मग मीच त्याला भेटायला बाहेर गेलो. तो लगेच जागेवरून उठून माझ्याजवळ आला. मला म्हणाला, “मला फार भीती वाटत्येय् रे डॉक्टर! मी काय करू?”

मी म्हटले, “हे बघ राधे, उगाच भलत्या-सलत्या भीतीला मनात थारा देऊ नकोस. हे बघ, आपलं डोकं असतं ना डोकं-” ‘डोकं’ शब्दाच्या उच्चाराबरोबर त्याच्या भिवया उंचावल्या. पण तिकडे लक्ष न देता मी म्हटले, “आपलं डोकं फार नाजूक असतं. त्यावर शक्य तितका कमी ताण द्यावा. तेव्हा हे घाबरणं सोडून दे. तेच तुझा घात करील. नाहीतर तुला तसं काहीएक झालेलं नाही. कुणी तुला कसलाही दोष देत नाहीये. आता झालं-गेलं डोक्यातून काढून टाक बरं.”

मी इतके लांबलचक लेक्चर दिले; पण राधेला जसे काही ते ऐकूच येत नव्हते. त्याचे मन जे काही असंबद्ध बोलत होते, त्याचाच अर्थ लावण्यात तो गुंग होता. एकदम त्याने आजूबाजूला पाहिले. कुणी ऐकत नाही ना, याची खात्री करून घेतली, आणि मग तो हलक्या, अगदी कुजबुजल्यासारख्या आवाजात मला म्हणाला, “हे बघ, विचारतो म्हणून रागावू नकोस, पण काल दुकानावर येताना, तू एखादी कुऱ्हाड आणली होतीस का?”

एरवीच्या परिस्थितीत कुणी हा प्रश्न केला असता, तर मी त्याला खुळ्यात काढून मोकळा झालो असतो. पण राधेच्या घरी कुऱ्हाड असल्याच्या बातमीनेच माझ्या अंगातून भयाची शिरशिरी गेली. पुढे येणाऱ्या भीषण प्रसंगाची जाणीव मला तिथेच पहिल्यांदा झाली. पण ते राधेला जाणवू नये, म्हणून मी सारे हसण्यावारी नेले. “हात्तेच्या! एवढं विचारायला तू इथं धावत आलास? आणि म्हणे माझं अर्जंट काम!”

“तुला कल्पना नाही डॉक्टर. तुला थट्टा वाटत्येय्. पण माझ्या लेखी ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. मला माहित्येय. तू-तू नसणारच आणली कुऱ्हाड.” भीतीने जवळजवळ थरथरत राधे बोलत होता, “पण दुसऱ्या कुणाकडे बोलायचीदेखील चोरी आहे. तुला निदान विचारू तरी शकतो. पण तू किंवा दुसऱ्या कुणीच ती कुऱ्हाड - तुम्ही कुणी कशाला आणाल? पण माझं काय होतं, मी… माझ्या लक्षातच राहात नाही रे! काही - मधलंमधलं विसरूनच जातो आणि मग गोंधळ होतो. त्या दिवशी - आई गेली त्या रात्री - मी कधी परत आलो हे मला नीटसं-”

मी राधेच्या तोंडावर हात ठेवला. आजूबाजूला पाहिले. ऐकणारे कुणीच नव्हते. मी त्याला हलकेच पण ठामपणे सांगितले, “हे बघ, त्या रात्रीविषयी कुठंच बोलायचं नाही. तुला काहीही झालेलं नाही. फक्त टेन्शन आलंय् जरासं.”

त्या संध्याकाळी मी गाडी घेऊन राधेकृष्णाच्या दुकानावर गेलो. तो कसली कुऱ्हाड म्हणतो, ते बघायला. मी त्याच्यावर संशय घेतोय, असे वाटू न देता ती त्याच्याकडून काढून घ्यायला हवी होती. शक्य तेवढ्या लवकर.

त्यानेही फारशी खळखळ केली नाही. कुऱ्हाड दाखवायला तो उत्सुक होताच. पटकन् उठला आणि कुऱ्हाड आणायला आत गेला. मी दुकानात इकडेतिकडे पाहात बसलो. राधे मोठा कलावंत होता यात शंकाच नाही. सगळी शिरे जिवंत वाटत होती. सगळी माझ्याकडे टवकारून पाहात होती. जशी काही मला विचारीत होती, “तू कोण आहेस? धडवालं शिर? तुझं धड काढून टाकलं पाहिजे एकदा, म्हणजे समजेल! मग तू आमच्यातलाच! तू आमच्यातलाच!”

नुसत्या कल्पनेनेही मला घाम फुटला आणि - आणि एकाएकी मी असा काही दचकलो!

हातात कुऱ्हाड घेऊन राधे दारात उभा होता.

“राधे!” मी म्हणालो, “राधे!” आणि एकदम एक चांगली कल्पना माझ्या डोक्यात आली. नुसती कुऱ्हाड नेऊन काय फायदा? त्यापेक्षा राधेलाच काही दिवस आपल्याजवळ ठेवले तर? शक्य तेवढ्या हळुवारपणे, मी त्याला, ही कल्पना सांगितली.

“म्हणजे तुलाही वाटतं की मी पेशंट आहे!” राधे खेन्नपणे हसून म्हणाला.

“पेशंट म्हणून नाही रे. नुसत्या विश्रांतीसाठी. कसला विचार म्हणून करायचा नाही! काम तर मुळीच करायचं नाही. नुसता आराम करायचा. गप्पा मारायच्या. रेडिओ ऐकायचा. कबूल?”

आश्चर्य म्हणजे राधे कबूल झाला. एखाद्या लहान, असहाय, आज्ञाधारक मुलासारखा.

मला एकदम त्याची दया आली. मी त्याला ओढून जवळ घेतले. अगदी गच्च छातीशी धरले. आजवर मी त्याच्यावर केलेले सारे प्रेम एकदम उफाळून आले. मी त्याच्या कानात सांगितले, “डरो मत राधे! अरे मी तुझ्या पाठीशी आहे ना! मग कुणी काही करणार नाही तुझं!”

हे बोलताबोलता अचानक माझे लक्ष एका वस्तूकडे गेले. मला आठवले की, मी आलो तेव्हा राधे याच वस्तूशी खेळत बसला होता.

ते त्यानेच बनवलेले गिरिजाचे चिनी मातीचे मस्तक होते.

: ५ :

ठरल्याप्रमाणे राधे हॉस्पिटलमध्ये येऊन राहिला. अजून त्याला स्वप्ने पडत आणि भीतीची लाट अंगावर आल्यासारखे होई. परंतु एकंदरीत तो बराच सावरल्यासारखा वाटला. वाटले की तो जर कायम माझ्याकडेच राहिला, तर पुन्हा कधीच त्याच्या हातून काही वेडेवाकडे घडणार नाही.

पण ते होणे नव्हते. दहापंधरा दिवसांतच राधे घरी परत गेला.

तो गेला त्याच्या दुसऱ्या दिवशी पहाटेसच बातमी आली.

गिरिजा बेपत्ता होती.

रात्रभर तिची वाट पाहून तिचे वडील पहाटे शोधाला बाहेर पडले. प्रथम ते राधेकृष्णाकडेच गेले. त्याला यातले काहीच माहीत नव्हते. कळले, तेव्हा तो नुसता खुळ्यासारखा रडायलाच लागला. मग ते माझ्याकडे आले. आम्ही दोघे मिळून पोलिसस्टेशनवर गेलो.

पोलिसस्टेशनवर आम्ही पोहोचलो न पोहोचलो, तो तिथे एक चमत्कारिक बातमी आम्हांला ऐकायला मिळाली.

एक तरुणी मोटार-अपघातात सापडली होती.

गिरिजेच्या बापाचे पायच गळाले. कसाबसा धीर करून आम्ही अपघाताच्या ठिकाणी गेलो.

पंचनामा चालला होता. मोटारचा ड्रायव्हर तिथेच होता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे तो पूर्ण निर्दोष होता. रात्रीची वेळ असल्यामुळे गाडी पूर्ण वेगात होती. ती तरुणी रस्त्यातच उभी होती. पण तिच्या आविर्भावावरून ती पलीकडे जाणार असे वाटत होते. ड्रायव्हरने हॉर्न वाजवला आणि तिच्या जाण्याच्या अंदाजाने गाडी पुढे नेली. पण अंदाज चुकला. कारण ती तरुणी जागची हललीच नाही. त्यामुळे तिला गाडीचा फार नाही, पण थोडासा धक्का बसला. तेवढ्याशा धक्क्यानेही ती खाली कोसळून पडली. गाडी थांबवून ड्रायव्हर तिच्याजवळ गेला, आणि त्याला आश्चर्याचा धक्का बसला.

त्या मुलीचे शिर आणि धड वेगवेगळे झाले होते.

“कशावरून तो खरं बोलतो?” मी पोलिस ऑफिसरला विचारले. प्रेत ओळखण्यासाठी आम्ही

त्याच्याबरोबर जात होतो.

"ते कळेलच आता तुम्हांला." त्याने आम्हांला पांढऱ्या कपड्यात गुंडाळलेला देह दाखवला. स्वत:च्या हाताने चादर दूर करीत तो म्हणाला, "पाहा ओळखता येते का?"

चादर दूर करताच जे दिसले त्याने आमच्या अंगावर शहारे आले.

कुऱ्हाडीने शिरापासून वेगळे केलेले ते धड गिरिजेचेच होते.

शिरही गिरिजेचेच होते. पण ते चिनी मातीचे होते.

राधेला पाठीशी घालायला मला सवडच मिळाली नाही. गिरिजेच्या वडिलांनीच ते शिर तयार करणाऱ्या कारागिराचे नाव पोलिसांना सांगून टाकले.

लगोलग त्यांनी राधेच्या दुकानावर धाड घातली.

सगळ्या फळ्यांवरची मुंडकी खाली अस्ताव्यस्त पडली होती. टकले लोक, हसणारे राक्षस, प्रेताची कवटी, भिवया नसलेला माणूस, डोळे फिरवणारे बाळ, दात पडलेला म्हातारा, सुळे लावलेला शेठजी, गुळगुळीत डोक्याची सुंदरी, जबडा हलवून दाखवणारा विदूषक- सगळ्यांची मुंडकी नुकत्याच होऊन गेलेल्या एखाद्या संहारात तुटून पडावीत, तशी उलटसुलट, वेडीवाकडी पडली होती. आणि त्या संहाराच्या मधे बसला होता तो त्या साऱ्यांचा कर्ता! त्या मुंडक्यांच्या सृष्टीचा ब्रह्मदेव.

या क्षणी त्याला कसलेच भान नव्हते. तो आपल्याच नादात काहीतरी करीत बसला होता.

मी त्याला हाक मारली, "राधे!"

तो वळला. आणि मग माझ्या ध्यानात आले की तो काय करीत होता!

तो एक मुंडके स्टुलावर ठेवून त्याच्या केसांची वेणी घालीत होता.

मी पोलिस ऑफिसरला थांबण्याची खूण केली. तो जागच्या जागीच उभा राहिला. न बोलता.

राधेने त्या वेणीवर सायलीच्या फुलांचा गजरा माळला.

मी पुन्हा हाक मारली, "राधे, आज कसलं चित्र करतोयस?"

त्याबरोबर राधेने स्टूल वळवले. "गिरिजा. माझी गिरिजा!" स्टूलवरच्या मुंडक्याकडे बोट दाखवून तो म्हणाला. शेजारचा ब्रश उचलून त्याने लाल रंगात बुडवला आणि तिच्या पांढुरक्या कपाळावर कुंकू काढीत तो पुन्हा तेच म्हणाला, "गिरिजा! माझी गिरिजा!"

पोलिस ऑफिसर पुढे झाला आणि त्याने ते मुंडके उचलले.

अजूनही त्यातून रक्त ठिबकत होते.

पोलिसांनी ते ताब्यात घेताच राधे रडू लागला. मोठ्याने, मुक्तपणे आक्रोश करू लागला. हळूहळू त्या आक्रोशाचे रूपांतर भीतीच्या आरोळ्यात झाले. त्यातला शब्दही कळत नव्हता. एखादे विलक्षण भय पाठीमागे लागलेले मुके जनावर कण्हेल, हंबरेल, तशा त्या किंकाळ्या होत्या…

: ६ :

मग काही लपवण्यात अर्थ राहिला नव्हता.

मला सारे काही पोलिसांना सांगून टाकावेच लागले.

मी राधेकृष्णाच्या डोक्यात बिघाड झाल्याचे सर्टिफिकेट दिले. त्यामुळे निदान त्याची शिक्षा चुकली. लवकरच तो हॉस्पिटलमध्ये अॅडमिट् झाला.

या घटनेचे मला विलक्षण दु:ख झाले. किती, ते दुसऱ्यांच्या लक्षात येणार नाही. कारण माझे राधेकृष्णावर किती आणि कसे प्रेम होते ते जग समजू शकणार नाही. लोकांना कळते, ते आई आणि मुलगा यांच्यांतले, नवरा-बायकोमधले, भाऊ-बहिणीचे प्रेम. पण दोन मित्रांमधले प्रेम, दोन पुरुषांमधले प्रेमच त्यांना समजू शकत नाही…

एनी वे, राधेवर मी जिवापाड प्रेम केले; पण राधे एकटा कधी माझ्या वाट्यालाच फारसा आला नाही. प्रथम आई, मग गिरिजा…

तेव्हा, त्या दोघींचे जे झाले. ते करण्यावाचून दुसरा काय उपाय होता?

आणि मुंडकी…मुंडकी तयार करताना राधेला पाहिले की, माझ्या रक्ताला जशी काही उकळी फुटे. मला त्याचा हेवासुद्धा वाटायचा. मुंडकी हातात खेळवता येतात, म्हणून.

पण ती संधी दैवाने मलाही दिली.

ही विकृती आहे?… मला तरी कधीच तसे वाटले नाही. तसे वाटत राहिले तर त्याचा परिणाम राधेवर झाला, तसा होतो. तो हॉस्पिटलमधला पेशंट आहे. मी डॉक्टर आहे. मग माझ्यात विकृती कशी असेल? दुकानाची डुप्लिकेट चावी माझ्याकडे विश्वासाने देऊन ठेवलेली आहे, एवढ्देखील लक्षात न राहणारा भोळा राधे, आणि सारे काही शिताफीने उरकून टाकणारा मी- आमची तुलना तरी कशी होईल?

पण राधे वेडा असला तरी माझे त्याच्यावर प्रेम आहे.

आज तो माझ्या हॉस्पिटलमध्ये आहे. माझा एकट्याचा आहे.

गेल्या चारदोन दिवसांत एक गोष्ट मात्र मला जाणवू लागली आहे.

नर्स परेराची राधेविषयीची आपुलकी वाढू लागली आहे.

प्राणघातक वेड्याचा बळी जाण्याची आता तिची पाळी आहे.

ती दोन मुलं

ती दोन मुले गेटशी येऊन उभी राहिली, तेव्हा चंद्र ढगाआड गेला. पोरे बिचारी थकून गेली होती. त्यांच्या पोटांत भूक करवतीसारखी फिरत होती. त्यांचे वय तसे अगदीच लहान होते. आठ-नऊ वर्षांची मुलगी, आणि सहा-सात वर्षांचा मुलगा. दोघेही अशक्तच. हातापायांच्या काड्या. पण त्या मानाने चेहेरे टकटकीत. गाल लालवट. मग ते शरीरातले रक्त की मुरुम, कोण जाणे. डोळ्यांमध्ये तर असे लखलखीत तेज, की त्यांच्या त्या काटक्यांसारख्या हातापायांशी ते एकदम विसंगत वाटावेत. जणू काटक्या विस्तवात धरून त्यांची टोकेच पेटवली आहेत. केस दोघांचेही भुरकट पिंगट होते; पण त्यात धूळ आणि कचरा इतका गेला होता, की त्यांचा मूळचा रंग ओळखणे कठीण जावे. शरीरे दोघांचीही फिकुटलेली पिवळट होती. पण ओठ मात्र अगदी रक्तासारखे लालचुटुक होते.

पोरे बहुधा भिकाऱ्यांची असावीत. ते लालचुटुक ओठ आणि तेजस्वी डोळे त्यांना कुणापासून आले होते, कुणास ठाऊक; पण अंगावरच्या दरिद्री कपड्यांमुळे त्यांची परिस्थिती स्पष्ट होत होती. कपडे इतके मळले होतो, की त्यांच्या हिरवट राखटपणामध्ये त्यांचा मूळ रंग समजेनासा झाला होता. फाटूनफाटून त्यांची अशी काही लक्तरे झाली होती, की एकदा अंगात चढवल्यानंतर त्यांनी ते कधीच परत उतरवले नसावेत, असे वाटत होते.

पोरे कुठून आली होती कुणास ठाऊक; पण थकव्यापायी त्यांच्या नुसत्या झोकांड्या जात होत्या. त्यात त्यांच्या पोटात जशी काही आगच पेटली होती, आणि त्या आगीची धग शरीरभर पसरली होती. दहा आणि सात वर्षांच्या त्या कोवळ्या कुडींना ती सोसवतच नव्हती. सारे चिमुकले शरीर व्यापून ती आता त्यांच्या डोक्यात चढली होती. आजूबाजूचे भान त्यांना फारसे उरले नव्हते. आपण काय करीत आहोत, हेही कळत नव्हते. दोघे उगाच एकमेकांना धीर दिल्यासारखे करीत होती. पण खरे तर दोघांचाही धीर खचला होता. भुकेनेच त्यांचा ताबा घेतला होता. भुकेनेच त्यांना धरून ठेवले होते. भूकच त्यांना इतका वेळ चालवीत होती आणि अती झाले असते तर भूकच त्यांना ढकलून पाडणार होती. भूकच त्यांना लोळवणार होती.

तशात मघा जोराचा पाऊस आला. अगदी चोपून काढणारा, 'हूं' म्हणायच्या आत डोक्यापासून पायापर्यंत सरळ भिजवून टाकणारा. पोरे आडोशाला जाणार म्हणेपर्यंत चिंब भिजली. त्यांच्या धुळकट झिंज्यांमध्ये चिखल झाला आणि डोळ्यांमधून नाकावरून पाणी खाली टपटपू लागले. चिंध्यांमधून पाणी थेट अंगाला भिडले. तशीच ती दोघे जाऊन एका बंद दुकानाच्या पायऱ्यांवर उभी राहिली. समोरून येणारा पाऊस सपकारे मारीतच राहिला. दोघे कुडकुडू लागली. अंग थरथरू लागले. वाऱ्याचा झोत येऊन गेला, की थंडी हाडकांपर्यंत जायची. पण या थंडीनेदेखील भुकेची आग विझत नव्हती. शरीर जे तापल्यासारखे वाटत होते, ते थंडावतच नव्हते.

पाऊस थांबल्यासारखा वाटला, की ती आडोशातून बाहेर येत. पुन्हा सर येतेशी दिसली, की बंद दुकानाचा आसरा शोधीत. वेळ मध्यरात्रीची होती. रस्ते सगळे निर्मनुष्य झाले होते. सगळीकडची दारे बंद होती. एरवी मध्येच भुंकणारी, विव्हळणारी कुत्रीदेखील पावसाच्या माऱ्याने घाबरून चिडीचूप बसली होती.

पाऊस थोडा थांबला. तसे अधूनमधून थेंबथेंब पडत होते. पण आधीच भिजून चिंब झालेल्या त्या मुलांना त्या टपटपत्या थेंबांचे काय मोठेसे वाटणार? मुलीने अंगावरच्या चिंध्या एकदा पिळून टाकल्या, कपाळावरच्या ओल्या बटा मागे सारल्यासारखे केले आणि भावाचा हात धरून ती चालत राहिली. दोघांचीही अवस्था इतकी केविलवाणी झाली होती; पण कुणीच कुणाकडे तक्रार करीत नव्हते.

दोघांमध्ये एक समजुतीचा धागा होता. जणू मनातल्या मनातच ती एकमेकांना म्हणत होती, 'चालवत नाही...भयंकर भूक लागलीय, तहान लागलीय...' आणि मनातूनच उत्तर देत होती : 'आता थोडंच राहिलं. मिळेल हं काहीतरी खायला– प्यायला.' त्यांना हे बोलून दाखवावे लागत नव्हते. लागले असते तरी बोलण्याचे त्राण त्यांच्यात उरले नव्हते.

आता या भागात वस्ती विरळ होती. घरे अंतराअंतरावर होती. बंगलीवजा घरांचे आकार वेगवेगळे होते. खोक्यांसारख्या, माणसांनी गजबजलेल्या आडव्यातिडव्या पसरलेल्या चाळीपेक्षा हे जग निराळे होते. कुठे एखाद्या बंगल्यात एखाददुसरे माणूस होते, तर कुठे सबंध बंगला नुसता कुलूप लावून बंदच करून ठेवलेला होता. एखाद्या बंगल्याचे छप्पर उतरते होते. त्यामुळे शिप्तर झालेली हॅट घातलेल्या मुंडक्यासारखा तो दिसत होता. एखाद्याचा कपाळावरचा एकच डोळा लुकलुकत होता. एखादा चौकोनी बंगला बिनशिराच्या कबंधासारखा पाय छाटून उभा होता. एकदोन बैठी घरे काळोखाची घोंगडी पांघरून बसली होती. कंपाउंडमधली झाडे वाऱ्यापावसात सळसळून कुजबूज करीत होती.

आता त्या सबंध रस्त्यावर त्या दोन मुलांशिवाय आणखी कुणीच नव्हते. म्युनिसिपालिटीच्या एका फुटक्या मंद दिव्याचा पिवळट प्रकाश पडला होता, त्यामुळे काळोख अधिकच जाणवत होता. मध्यरात्र झाली होती, आणि त्या निर्जन रस्त्यावरून वावरताना भीतीने छातीत धडधडणे स्वाभाविक होते. पण मुलांना पोटातल्या भुकेपायी आणि घशातल्या तहानेपायी भीतीदेखील वाटत नसावी. असे म्हटले तरी ती अधूनमधून शहारत, आणि एकमेकांना अगदी चिकटून चालू लागत. लटपटणारे पाय मध्येच साचलेल्या पाण्यात पडत, नाहीतर चिखलात रप्रप् वाजत. तरीदेखील रस्ता संपत नव्हता.

सगळे आकाश ढगांनी भरून गेले होते. त्यामुळे काळोखात भर पडत होती; पण मध्येच ढगातून चंद्र बाहेर आला. ओला रस्ता चंद्रप्रकाशात चमचमू लागला.

कुठल्या घराशी जावे, याचा निर्णय पोरांना घेता येईना. कुठून हाकलले जाणार नाही, कोण जवळ करील, कोण भूक भागवील? ती दोघे आशंकेने उभी राहिली. मग एकमेकांशी न बोलताच त्यांचा निश्चय ठरला. रस्त्याच्या टोकाशी असलेल्या एका घराकडे त्यांनी मोर्चा वळवला.

घर एरवी बैठे होते, पण त्याला ठेंगणी माडी होती. सर्वत्र काळोख भरला होता. फक्त माडीवर एक दिवा जळत होता. त्यामुळे असेल कदाचित, पण घर कुणासाठी तरी दबा धरून जागत बसल्यासारखे वाटत होते.

मुले बाहेरच्या गेटपाशी येऊन उभी राहिली, तेव्हा चंद्र ढगाआड गेला.

सर्वत्र काळोख पसरला, आणि तो माडीवर जळणारा एकच दिवा अधिकच एकलकोंडा वाटू लागला. मुले डोळे ताणताणून पाहू लागली. पण माडीच्या खिडकीत त्यांना अधिक काहीच दिसेना.

ती क्षणभर त्या लोखंडी गेटलाच गच्च धरून ओठंगून उभी राहिली. गेट बंद होते. पण त्यांच्या वजनाने ते दार मागे गेले. 'कर्रर्र-कर्रर्र' असा आवाज झाला. त्या शांततेत तो आवाज इतका अकस्मात आला, इतका मोठा वाटला, की पोरे दचकून जागच्या जागी उभी राहिली. कुणी तो ऐकला तर नसेल, अशा विचारात.

पण कुणीतरी तो ऐकलाच होता.

माडीच्या खिडकीत एका पुरुषाची आकृती येऊन उभी राहिली.

"कोण आहे?" त्याने विचारले.

मुले चूपचाप उभीच राहिली. त्यांच्या तोंडून शब्द फुटला नाही.

त्याने पुन्हा विचारले, "कोण आहे?"

मुलांनी उत्तर दिले नाही. पण मुलीच्या तोंडून एक कण्हल्यासारखा स्वर बाहेर पडला.

आता चंद्र ढगाबाहेर आला.

त्या प्रकाशात त्याला दिसले : दोन मुले. अगदी लहान. काटकुळी. असहायपणे दाराशी उभी. जणू आत घेण्यासाठी विनवीत असलेली.

तो आत वळला.

टेबलावरच्या व्हिस्कीच्या ग्लासमधला एक घोट त्याने घेतला.

पलीकडच्या कोनाड्यात ठेवलेला टॉर्च त्याने उचलला.

झपाझप उतरून तो खाली आला. टॉर्चचा प्रकाश फेकीत गेटपाशी गेला.

त्याचे धिप्पाड शरीर, काळा कुळकुळीत रंग आणि वळलेल्या मिश्या पाहून मुले थोडी दबल्यासारखी झाली.

“घाबरू नका.” तो हसून म्हणाला.

“आत येऊ?” मुलाने विचारले.

“या.” तो म्हणाला. खव्विशी त्याने गेटची साखळी सोडली. ‘कर्रर्र’ आवाज करीत दारे उघडली.

“आम्हांला भयंकर भूक-” मुलगा बोलू लागला. पण मुलीने त्याचा हात दाबला.

“चला, वर चला. मी तुम्हाला खायला देतो.”

तो पुढे निघाला. मुले त्याच्या मागून दबकत-दबकत चालली.

मुख्य दरवाजातून ती आत गेली. दिवाणखाना काळोखातच होता. पण हंड्या, झुंबरे लावून केलेली त्याची सजावट काळोखातही जाणवत होती.

मुलगा त्याच्या मागून चालत राहिला. पण मुलगी दारातच थबकली. “पायाला चिखल…” ती अस्पष्ट पुटपुटली.

“असू दे. सकाळी गडी साफ करील. तू ये तशीच.” तो माणूस म्हणाला.

मग तीही थांबली नाही. त्याच्या हातात टॉर्च होता. तेव्हा त्याच्या मागोमाग जाणे भागच होते.

माडीवर पोचताच त्याने एका हिरवट रंगाच्या लाकडी दाराकडे बोट दाखवले. “बाथरूम आहे.” तो म्हणाला, “हातपाय स्वच्छ धुऊन या.”

ती दोघे गेली. नळ सोडून हातपाय खसाखसा धुऊ लागली.

घरात तो आणि गडी दोघेच होते. लहान मुले त्या घरात नव्हतीच. तेव्हा त्याने स्वत:चेच दोन शर्टस् काढले. दोन आतल्या पांढऱ्या चड्ड्या काढून ठेवल्या. मुले बाथरूममधून बाहेर येण्याची वाट पाहात तो टेबलाशी जाऊन बसला.

टेबलाच्या बरोबर डोक्यावर दिवा जळत होता. खोलीत एक पलंग होता. टेबलाशी एक मोठी आरामखुर्ची होती. दोन लाकडी खुर्च्या होत्या. सामानाची गर्दी होती. एका दिव्याचा प्रकाश तसा अपुराच होता. सारी खोली सावल्यांनी भरून गेली होती. दिवा हले, तशा सावल्या स्वत:हून हलल्यासारख्या मागेपुढे होत.

मुले बाथरूममधून बाहेर आली. त्याने एक मोठा टॉवेल कपाटातून काढून दिला आणि म्हटले, “अंग पुसा आणि कपडे बदला.”

मुलांनी नि:संकोचपणे तिथल्या तिथेच अंगातल्या चिंध्या काढून टाकल्या. जसे काही कधी एकदा त्या ओल्या चिंध्या फेडून टाकतो, याची त्यांना घाई झाली होती.

त्याने व्हिस्कीचा ग्लास उचलला. शांतपणे तो व्हिस्कीचे घोट घेत राहिला.

त्याने बोटाने दाखवलेले कपडे मुलांनी अधीरपणे उचलले. त्या पांढऱ्याशुभ्र कपड्यांवरून त्यांनी हरखून हात फिरवला. ते आपल्या अंगाला येतील की नाही, याचा विचारही त्यांना शिवला नाही. त्यांनी घाईघाईने ते अंगात चढवले.

तो आरामखुर्चीत बसून व्हिस्कीचे घोट घेताघेता डोळे किलकिले करून त्यांच्याकडे पाहात राहिला. ‘कोण पोरे ही? कुठली? किती भिजली होती! कशी चालली असतील या वाऱ्यापावसातून? कुठून आली ही?’

अनेक विचार त्याच्या डोक्यात येत होते. पण त्याला काहीही विचारावेसे वाटत नव्हते. व्हिस्कीची छान सुस्ती त्याच्या अंगात चढत होती. ती मोडावीशी वाटत नव्हती.

कपडे बदलून ती मुले त्याच्या समोरच्या लाकडी खुर्च्यांवर येऊन बसली. आता ती बरीच चांगली दिसू लागली होती. अंगाला न बसणाऱ्या ढगळ कपड्यांतही मोहक वाटत होती. खूप स्वच्छ वाटत होती.

व्हिस्की पितापिताच तो खाणे खात असावा. कारण टेबलावर भांडी आणि खाद्यपदार्थ इतस्तत: पडले होते. त्याने दोन बश्या काढल्या, प्लॅस्टिकच्या डब्यातून पाव काढले, ते बशीत घालून मुलांच्या समोर ठेवले. एका पातेल्यातले मटण बश्यांमध्ये वाढले.

त्याने सांगायची वाट न पाहताच मुले जेवणावर तुटून पडली. पलीकडच्या मडक्यातल्या पाण्याचे दोन ग्लास भरून त्याने त्या मुलांसमोर ठेवले, आणि स्वत: व्हिस्की पीत बसून राहिला.

मुले अवाक्षरही न बोलता खात होती. मन लावून खात होती. अन्नाकडे एकटक बघत खात होती. त्यांच्या खाण्याचा मचमच आवाज येत होता. बोटांना लागलेले देखील चाटून साफ करीत ती खात होती.

त्यांच्याकडे पाहातपाहात त्याने हलकेच विचारले, “कुठून आलात?”

क्षणभर मुले काहीच बोलली नाहीत. मग मिटक्या मारीत मुलगी म्हणाली, “आम्हांला घर नाही.”

“म्हणजे?”

“आम्ही फूटपाथवर राहतो.”

काही वेळ असाच गेला. कपाटावर ठेवलेल्या घड्याळाची टिक्टिक् ऐकू येत राहिली. त्या जेवणाऱ्या मुलांच्या खाण्याचा मचमच आवाजदेखील स्पष्ट येत होता.

“तुम्हाला आईवडील नाहीत का?” त्याने विचारले.

“नाहीत. आम्हांला कोणीच नाही.” ती दोघे उत्तरली. तोंडात घास असल्यामुळे त्यांचे उत्तर स्पष्ट ऐकू आले नाही.

लहान मुले…व्हिस्कीच्या गुंगीत त्याच्या मनात विचार तरंगत होते. यांना कुणी नाही. माणूस नाही की घर नाही. निराधार…निष्पाप…भिजलेली…भुकेलेली…कशी जगत असतील? …देखणी आहेत…पण उपासानं

काय कळा आलोय! आणि उपास पडतच असणार!... कोण खायला देणार यांना? यांना कुणी नाही! पोटापुरतं तरी कशी मिळवीत असतील? नसतीलच मिळवीत. किती दिवसांची उपाशी आहेत कोण जाणे!...

त्याने आणखी पाव वाढले. दोन डाव मटण वाढले. बाटलीतून व्हिस्की ओतून घेऊन स्वत:चा ग्लास भरला.

मुले त्याच्याकडे बघतबघत खात होती. कोण आहे हा? चांगला दिसतो... दयाळू दिसतो... आपल्याला स्वच्छ कपडे दिले ...खायला दिले ...प्यायला दिले ...फारशा चौकशा न करता ...इथे माडीवर घेऊन आला. चिखलाचे पाय तसेच असताना. अंगातून पाणी टपकत होते ...इतर ठिकाणी हिडीसफिडीस करतात. बखोट धरून घालवून देतात, मारतात... यानं तसं केलं नाही. जसे काही याचे पाहुणेच असल्याप्रमाणं यानं वागवलं...इतरांपेक्षा वेगळा दिसतो. याला मुलांचा लळा दिसतो. पण याच्या घरात मुलं कुठेच दिसत नाहीत. घरात मुलांचं चित्रदेखील नाही... की म्हणूनच यानं आपल्याला आणलं? ...काही का असेना, हा माणूस चांगला आहे...

त्या दोघांचे खाऊन झाले.

"इकडेच झोपा आता. सकाळी जा." तो सुन्नपणे म्हणाला.

त्याने एक जाजम अंथरले. त्यावर एक चादर पसरली. "झोपा." तो म्हणाला.

मुले मुकाट्याने चादरीवर पसरली. एकमेकांना बिलगून झोपली.

तो काही वेळ तसाच बसून राहिला. पावसाची रिप्रिप् आता कमी झाली होती. चंद्र आभाळातून निवांत फिरत होता. खिडकीतून दिसणारा रस्ता प्रकाशात उजळला होता.

अखेरीस तो आरामखुर्चीतून उठला. त्याने एकदा मुलांकडे पाहिले. तो सावकाश चालत माडी उतरून खाली आला.

हॉलच्या एका कोपऱ्यात अर्धी चड्डी नेसलेला, उघड्याबंब देहाचा गडी पसरला होता.

तो गड्याच्या जवळ गेला. त्याला गदगदा हलवीत म्हणाला, "ऊठ लवकर! हत्यारं काढ. मुलं आली आहेत. दोन आहेत."

गडी तयारीला लागताच तो पुन्हा वर येऊन बसला.

मुलांची झोप स्वस्थ नव्हती. ती चुळबुळत होती.

गड्याने नाही म्हटले तरी चौकश्या केल्याच होत्या. मालकाने 'ऊठ' म्हणताच तो उठून बसला होता. त्याला तशी सवयच होती. रात्रीच्या कुठल्याही प्रहरी मालक जागे करायचा आणि म्हणायचा, 'ऊठ. मुलं आली आहेत.'

मालक तरी काय करणार? हा धंदाच असा विचित्र पडला. एवढी लहान मुलं काय वाटेवर पडलेली असतात? मिळतील तशी मिळवावी लागतात. गावोगावहून पळवलेली मुलं. रात्रीबेरात्री गाड्या स्टेशनात येतात. त्यातून हा रस्ता आडबाजूचा. बंगली कोपऱ्यातली. इथे मुले आणून सोडायची म्हणजे तासचे तास जातात. त्यातून असला उद्योग रात्रीबेरात्रीच केलेला बरा...

तरीसुद्धा तो नेहमी सावध असायचा. हो. प्रत्यक्ष काम होणार आपल्या हातून आणि मालक राहील नामानिराळा. आपल्या गळ्याला कधी फास लागेल, याचा नेम नाही. म्हणून या चौकश्या कराव्याच लागतात. कुठनं मुलं आणली? नेहमीच्याच माणसानं आणली की दुसरीकडून आणली? त्या मुलांना आई-बाप कुणी

आहे? कुणी त्यांना ओळखेल का? कुणी त्यांच्यासाठी पोलिसात जाईल का? तपास सुरू होईल का? असे झाले तर भरली आपली...पण बहुतेक मुलांमागे हे झेंगट नसायचेच. झोपडपट्टीतली मुलं! ती हरवली की आईवडिलांनाच सुटल्यासारखे वाटायचे. खेड्यापाड्यातली गरीब कामकऱ्यांची मुले. ती कुठली शहरात येऊन पोलिसतपास करणार? मालकही तसा हुषार होता. फारसा धोका पत्करत नसे. गोरगरिबांची पोरे मिळवी. त्यांना कुणी ओळखणे कठीण! त्यांचे हातपाय तोडण्यावर भागत असे. ज्यांचे चेहेरे ठसठशीत असत, त्यांची मात्र मागेपुढे ओळख पटू नये म्हणून चेहेऱ्यावरच हत्यार चालवावे लागे. कुणाचा डोळा काढला जाई, कुणाचा ओठ फाडला जाई. चेहेरा विद्रूप करण्याचाही फायदा असे. ज्या शेठला ही मुले भीक मागण्यासाठी विकली जात, त्याला विद्रूप मुले आवडत. भीक मागणाऱ्या मुलांचा एक तांडाच्या तांडा त्याने बाळगला होता. त्याचे एक तंत्र होते. तो म्हणे, कधीकधी लोक भिऊनच भीक घालतात. विद्रूप चेहेरे लोकांना भेवडवतात. टळो एकदाची ही कटकट, म्हणून लोक पैसे घालतात. कसेही असो, आपल्याला काय करायचे आहे? मालक सांगेल त्या भागावर हत्यार चालवायचे. गुंगीचे औषध द्यायचे किंवा तो भाग बधिर करायचा आणि फाट्दिशी शस्त्र चालवायचे. एखाद्या सर्जनला लाजवील अशा शिताफीने तो अडाणी गावठी गडी शस्त्र चालवायचा. हळूहळू कापत राहिले की दोघांनाही त्रास! त्यासाठी शस्त्रही धारेचे हवे! कुठे गंज उपयोगाचा नाही. नंतर सेप्टिकबिप्टिकची लफडी नकोत. आजारपण परवडणारे नाही. हे सगळे हिशेब डोक्यात ठेवून हुशारीने काम करणारा तो गडी म्हणजे मालकाजवळची एक अमोल चीज होती. असला माणूस परत मिळाला नसता. त्यासाठी मालक त्याची हवी ती चैन पुरवायचा. त्याला बरोबरीच्या नात्याने वागवायचा.

गड्याला हत्यारांना धार करायला, हत्यारे तापवायला सोडून मालक माडीवर येऊन बसला. गड्याच्या चौकश्यांना उत्तर देणे त्याला कठीण गेले नाही. विशेष काही नव्हतेच सांगण्यासारखे. आजचा मामला वेगळाच होता. यात कुणाचे कमिशनदेखील नव्हते. उपकारच मानायचे, तर पावसाचे मानायला हवेत. पावसाने या मुलांना आसऱ्यासाठी नेमके आपल्या घरात आणून सोडले! त्यातून त्यांच्या घराचा, आईबापांचा ठावठिकाणा नाही. म्हणजे अक्षरश: आपल्या पायांनी चालत आलेली संधी! आता पोरे जरा नाकीडोळी नीटस आहेत हे खरे. पण चेहेऱ्यावर एक प्रकारचा दीनवाणेपणा आहे. कुणीही पाहिल्याबरोबर भीक घालील. शेठला ही मुले नक्कीच आवडतील. असली देखणी म्हणून काय झाले? एकाचा एक डोळा काढावा. दुसऱ्याच्या नाकाचा शेंडा थोडा कापला, तर बरे होईल. त्याचे ते लालचुटुक ओठ...त्यांचे काहीतरी करता येईल! दोघांपैकी डोळा कुणाचा आणि ओठ कुणाचा?... तो विचारात गुंगून गेला. विचार करायला सोपे जावे म्हणून त्याने आणखी व्हिस्की ओतून घेतली.

मालक जागेवरून उठला. त्याने हलक्या आवाजात गड्याला सूचना दिल्या. आपलाच व्हिस्कीचा ग्लास त्याच्या पुढे केला. त्याने तेवढ्या पेयाचा एक घोट केला. मग तो मुलांकडे गेला आणि त्याने त्यांना उठवले.

मुले नीटशी झोपली नव्हतीच. त्याने उठवताच कसलीही तक्रार न करता ती उठून बसली. गड्याची काळीकभिन्न अगडबंब आकृती पाहून ती क्षणभर बावरल्यासारखी झाली. तरीदेखील त्याने खुणावताच ती उभी राहिली. त्याने 'चल' म्हणताच दोघांनी एकमेकांकडे एकदा पाहिले, आणि मग ती त्याच्या मागून चालू लागली.

माडीचा जिना उतरून तिघे खालच्या दिवाणखान्यात आली. काळोखातूनच पुढे गेली. बाजूच्या दारातून आत गेली.

आत काळोख होता. काळोखातच गडी जिना उतरू लागला. त्याच्या मागोमाग कठड्याला धरून चाचपडत-चाचपडत मुले उतरू लागली. म्हणजे हा जिना तळमजल्याच्याही खाली होता. म्हणजे तळघरात? मुलांना काही समजेनासे झाले. ती एकमेकांचा हात धरून, एकमेकांना चिकटून, धडपडत उतरत होती.

शेवटी एकदाचा तो चाचपडता प्रवास संपला. मुलांच्या पायाला थंडगार फरशी लागली. गड्याने पुढे होऊन भिंतीतला स्विच दाबला. मंद पिवळसर बल्ब पेटला.

खोली तशी रिकामीच होती.

फक्त एका कोपऱ्यात एक टेबल होते. त्याला कड्या लावलेल्या होत्या. त्या कड्यांमधून कापडी पट्टे लावलेले होते. जवळच इंजेक्शनच्या सुया एका ट्रेमध्ये होत्या.

आणि त्याच्या शेजारी एका पत्र्याच्या ट्रेमध्ये छोटीछोटी लखलखती धारदार शस्त्रे होती.

तो विचारात आणि नशेत गुंग होता. ही दोन मुले म्हणजे शुद्ध फायदा होता. आजवर असल्याच धंद्यांमधून एक हॉटेल आणि एक दारूचे दुकान त्याने उघडले होते. हॉटेलच्या फॅमिली रूम्स गरजू गिऱ्हाइकांना देऊन, आणि दारूच्या दुकानात आतल्या बाजूला प्यायची सोय करून चिक्कार फायदा त्याने उकळला होता. ही त्याची साइड्-लाइन होती. सुरुवातीला तो नुसती मुले पुरवी आणि मधले कमिशन घेई. पण हात-पाय तोडलेली, भीक मागायला 'रेडी' मुले दिली, तर अधिक पैसा मिळतो, हे त्याच्या नंतर लक्षात आले. तेव्हा त्याने तीही व्यवस्था केली.

तो तंद्रीत असतानाच त्याला एक अस्पष्ट किंकाळी ऐकू आली.

आज गुंगी नीट दिलेली नाही की काय? त्याच्या मनात विचार आला. एनी वे, पाचदहा मिनिटांत तो खाली जाऊन काम कुठवर आले हे पाहणारच होता.

ग्लास संपवून तो खाली गेला. आता खाली सगळे सामासूम होते. पोरे एव्हाना बेशुद्ध होऊन पडली असतील. गडी हत्यारे स्वच्छ करीत असेल.

बिचारी पोरे! कुठून त्यांना आज इकडे येण्याची दुर्बुद्धी झाली आणि…

क्वचितच मनात येणारा दयेचा विचार आज त्याला सुचला. आपल्याला दारू जास्त झाली आहे याची त्याला खात्री पटली.

जिन्याच्या तळाशी तो आला मात्र, —जे दिसले ते पाहून तो जागच्या जागी गारठून गेला.

मुलांचे बेशुद्ध देह कुठेच दिसत नव्हते.

मात्र गड्याचा मृत देह जमिनीवर पसरला होता.

त्याचा गळा कुणीतरी दातांनी चावून फोडला होता; आणि त्यातून रक्त भळाभळा वाहात होते.

मुलांची चाहूल कुठेच नव्हती.

पण ती जवळपासच कुठेतरी दबा धरून बसली असणार, याची त्याला खात्री होती.

एका विलक्षण भयाने त्याला घेरून टाकले.

तो पळतच जिना चढला, आणि हॉलमधल्या फोनशी आला. कसाबसा त्याने पोलिसस्टेशनचा नंबर फिरवला. : "हलो - हलो!… माझा गडी मरून पडलाय… त्याचं नरडं कुणीतरी फोडलंय!"

"हलो…पण तुम्ही कोण बोलताय?"

या प्रश्नाचे उत्तर त्याला देताच आले नाही. त्याआधीच त्याला जे दिसले, त्यामुळे भीतीने त्याच्या हातातला फोन गळून पडला होता.

ती दोन मुले त्याच्या दोन्ही बाजूंना उभी होती; पण आता त्यांच्यात विलक्षण बदल झाला होता. त्यांचे शरीर हिरवट, केसाळ, एखाद्या जनावरासारखे बनले होते. पंज्यांना लांब टोकदार नखे फुटली होती. दोनच गोष्टी

तेवढ्या न बदललेल्या होत्या.- त्यांचे लखलखीत तेजस्वी डोळे… आता ते भक्ष्य पाहून चमकणाऱ्या लांडग्याच्या डोळ्यांसारखे चमकत होते आणि त्यांचे लालचुटुक ओठ… त्यांच्या तोंडाला रक्त लागल्यामुळे ते अधिकच लाल दिसत होते.

त्याने मागे होण्याचा, त्यांना चुकवण्याचा प्रयत्न केला. पण ती दोघे त्याच्या नरडीलाच भिडली…

तो खाली कोसळला, तेव्हा दोघांचेही तीक्ष्ण दात त्याच्या नरड्यात शिरले होते, आणि त्यातून उष्ण रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या…

पोलिस इन्स्पेक्टरांनी नाइलाजाने फोन खाली ठेवला. त्यांच्या प्रश्नाला उत्तर मिळाले नव्हते. तेव्हा, फोन कुठून आला, हे कळायला मार्ग नव्हता. ऐकलेल्या शब्दांवरच मग त्यांचे डोके विचार करू लागले.

‘माझा गडी मरून पडलाय… त्याचं नरडं कुणीतरी फोडलंय…’

त्यांना काहीच धागादोरा लागेना. कुणाशी बोलावे, तर आज चौकीत कुणीच नव्हते. बाहेर एक हवालदार पेंगतपेंगत पहारा करीत होता. आजची हवा इतकी खराब होती, की रात्रपाळीच्या इतर लोकांना त्यांनी घरी जायची परवानगी दिली होती.

‘नरडं कुणीतरी फोडलंय…’

मध्यंतरी थांबलेला पाऊस पुन्हा कोसळू लागला होता. ढगाआड चंद्र दिसेनासा झाला होता. सारे अधिकच अंधारून गेले होते.

इन्स्पेक्टर विचार करीत बसले. पण त्यांना काही सुचेना. थोडा वेळ त्यांनी कामे करण्यात घालवला.

काम करताकरताच एकाएकी त्यांना आठवण झाली. चार दिवसांपूर्वीच एक सर्क्युलर आले होते :

‘अलीकडे या भागात रहस्यमय खून होत आहेत. एखाद्या प्राण्यानं हल्ला करून नरडी फोडावी, तसे खुनाचे स्वरूप दिसते. हा प्राणी कसा असावा, हे अजूनही निश्चित करता येत नाही. निरनिराळी रूपे धारण करून माणसांचे रक्त पिणारी पिशाच्चे ही कृत्ये करतात, असा इथल्या लोकांत समज आहे; पण तो चुकीचा असावा. या संबंधात अधिक माहिती मिळाल्यास ती ताबडतोब वर कळवणे.’

‘हम्बग! पिशाच्च म्हणे!’ इन्स्पेक्टर स्वत:शी उद्गारले, ‘बाकी आजचा हा मर्डर फोनवरती रिपोर्ट करायला हवा!’ -आणि एकदम त्यांच्या अंगातून भीतीची शिरशिरी गेली. आपल्याला असे का व्हावे ते त्यांना कळेना. पोलिसस्टेशनवर रात्री एकटेच काय ते पहिल्यानेच थांबत होते?

विचार करताकरता दचकून त्यांनी वर पाहिले. दारात दोन लहान मुले उभी होती.

त्यांच्या अंगावरच्या चिंध्या भिजून चिंब झाल्या होत्या. मुद्रेवर केविलवाणा, असहाय भाव दिसत होता. फक्त डोळे विलक्षण तेजस्वी होते. ओठ रक्तासारखे लालचुटुक होते.

बिचारी! पावसात भिजलेली, निराधार मुले!… इन्स्पेक्टर मनात कळवळले.

“आत येऊ का?” ती विचारीत होती.

तळ्याकाठचौ हिरवळ

रात्रीचे नऊ वाजून गेले होते.

फोन घणघणला.

“हॅलो, प्रधान हिअर-” मी फोन उचलला.

“विनायकराव, मी संजीवनी बोलते आहे.”

“हॅलो, संजीवनीताई-काय म्हणताय्?”

“हे आलेयत का तिकडे?”

“कोण, नानासाहेब? -नाही हो.”

“अजून घरी आले नाहीत, म्हणून काळजी वाटते. तसे कधी बाहेर राहात नाहीत सांगितल्याशिवाय.”

“ऑफिसातच उशीर झाला असेल.”

“मी तासभर फोन करतेय तिथं. पण एन्गेज्ड लागतोय. कदाचित बिघडला असेल.”

मी आणखी एकदोन अंदाज सांगितले; पण संजीवनीताईंनी तिथंही आधीच चौकशी केलेली होती.

“बरं. ठेवते मी फोन. कुठं गेले असतील कामाला, तिथं उशीर झाला असेल.”

“दहा वाजता मी करतो तुम्हाला फोन.”

“इश्श-एवढी काय काळजी करता? येतील ते-मी आपली सहज चौकशी केली.”

संजीवनीताईंनी फोन खाली ठेवला. वरकरणी त्या काळजी नसल्यासारखं दाखवीत असल्या, तरी मी ओळखलं होतं. खरोखर काळजी वाटल्याशिवाय त्यांनी फोन केला नसता.

दहा वाजता मी परत फोन केला.

नानासाहेबांनीच तो उचलला.

“सॉरी फॉर द ट्रबल विनायक-हिनं तुला उगाच घाबरवून सोडलं. मी पंधरा-वीस मिनिटांपूर्वी आलो. ऑफिसातच होतो. कामात कुणी डिस्टर्ब करू नये म्हणून फोन उचलून ठेवला होता.”

“संजीवनीताई काळजीत पडल्या होत्या.”

“काहीतरीच तिचं. मध्ये मी आजारी होतो, तेव्हापासून ती मला अगदी लहान मुलासारखी जपायला लागलीय.”

हे मात्र खरं होतं. मध्यंतरी नानासाहेब खूप आजारी होते. आजार कसला होता, ते काही निश्चित झालं नाही. पण थोडासा नर्व्हस ब्रेकडाऊनचा अटॅक होता, म्हटलं तरी चालेल. नानासाहेब आता पन्नाशीच्या घरात होते. त्यांची स्वत:ची चार्टर्ड अकाउंटंट्सची फर्म तुफान चालत होती. हाताखाली कितीही माणसं ठेवा; काम

त्यांना पुरून उरत होतं. अशा पार्श्वभूमीत एके दिवशी अतिश्रमानं नानासाहेब आजारी पडले, तर त्यात कुणाला नवल वाटण्यासारखं नव्हतं. ऑफिसमध्ये कुणाला काही तरी सूचना देतादेताच त्यांना चक्कर आली. नंतर इतका वेळ ते बेशुद्ध राहिले की सगळ्यांच्या तोंडचं पाणी पळालं. त्यांना हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आलं. बरे होऊन हिंडूफिरू लागले तरी कधी काही लक्षात येण्यात, लक्षात ठेवण्यात थोडाफार घोटाळा होई. बोलता बोलता मध्येच गप्प होत. इतकी वर्षं सतत राबवल्याबद्दल जसा काही बुद्धीनंही हा सूडच घेतला होता. पण त्यातूनही हळूहळू त्यांचा तोल सावरला. आता डोक्याला आणि शरीराला‌ही अतिश्रम घ्यायचे नाहीत, अशी डॉक्टरांनी सक्त ताकीद दिली. पण पुन्हा पाहवं, तर नानासाहेब ऑफिसात उशिरापर्यंत बसून नको इतके श्रम करायला लागलेले दिसत होते.

“पण नानासाहेब, डॉक्टरांनी तुम्हाला-”

“अरे, डॉक्टरको मारो गोली. माझी फर्म चालवायला काय डॉक्टर येणारेय?”

“असं म्हणून कसं चालेल? काळजी घ्यायलाच हवी.”

“ओ- के, ओके,” हसत हसत नानासाहेबांनी फोन खाली ठेवला.

महिनाभरानं पुन्हा हाच प्रकार झाला. संजीवनीताईंचा घाबराघुबरा फोन आणि नंतर नानासाहेबांची दिलगिरी.

पण चार महिन्यांनी याहीपेक्षा गंभीर गोष्ट घडली.

रात्री साडेआठच्या सुमाराला संजीवनीताई स्वत:च उठून माझ्याकडे आल्या.

त्यांचा चेहरा चिंतातुर होता. पोषाखही नेहमीसारखा टापटीप नव्हता. मुख्य म्हणजे इतक्या उशिराचं घराबाहेर पडणं त्यांच्या शिस्तप्रिय स्वभावाला धरून नव्हतं.

“एकट्याच आलात?”

“हो. हे अजून घरीच आलेले नाहीत.”

“येतील. ऑफिसात उशीर झाला असेल.”

“नाही. मी बघून आले ऑफिसात. ते नाहीयेत तिथं.”

“असं होय?” मी त्यांना कॉफी देत म्हटलं. “मला वाटलं अलीकडे ते पुन्हा अधिक श्रम करायला लागले की काय? -मध्ये दोनचारदा तुमचा फोन आला, तेव्हा त्यांना असंच खूप काम आलं होतं, होय ना?”

“हो-गेल्या चार महिन्यांत पुष्कळदा ते उशिरा आले. त्यात बहुतेक वेळा ऑफिसात उशीर झाल्याचीच सबब त्यांनी सांगितली.”

“सबब?”

“हो. अहो, बऱ्याच वेळा मी जाऊन आले ना त्यांच्या ऑफिसात! –पण ते तिथे नसायचेच!”

“म्हणजे?”

“विचारलं तर काही तरी उडवाउडवी करायचे; पण ते काही तरी लपवत असायचे, एवढं मात्र खरं.”

“तुमचा गैरसमज झाला असेल. नानासाहेब कधी खोटं सांगणार नाहीत.”

मी काही तरी सारवासारवी करून संजीवनीताईंची समजूत घालीत होतो. पण त्यात काही अर्थ नव्हता. नानासाहेबांचा स्वभाव संजीवनीताई ओळखत नव्हत्या का? ते कधीच खोटं बोलत नाहीत, हे त्या जाणून नव्हत्या का? आणि तरीदेखील ज्या अर्थी त्या नानासाहेबांविषयी तक्रार करीत होत्या, त्या अर्थी त्यात नक्कीच काही तरी तथ्य होते.

“तुम्ही त्यांचे जवळचे मित्र म्हणून मी आले. तुम्ही त्यांना आज इतकी वर्षं ओळखता. त्यांचा स्वभाव तुम्हाला कळतो. तुम्हीच त्यांना विचारू शकाल.”

“कशाविषयी?” मी गोंधळून विचारलं.

त्याबरोबर त्यांचा इतका वेळचा संयम सुटला. त्या एकदम रडायला लागल्या. मला अगदी बावचळल्यासारखं झालं. नानासाहेब जितके प्रतिष्ठित होते, तितक्याच संजीवनाताई समंजस आणि भारदस्त होत्या. एवढ्या तेवढ्यावरून त्या रडत सुटतील, आणि तेही परक्या माणसासमोर, हे संभवनीय नव्हतं. पण ते घडलं होतं. त्याअर्थी त्याला कारणही तसंच जबरदस्त असणार होतं.

“तुम्ही पाहताच आहा विनायकराव-” हुंदके देतदेतच त्या सांगू लागल्या, “आमचा संसार इतकी वर्षं कसा दृष्ट लागण्यासारखा चाललाय. कधी भांडणं नाही की वादावादी नाही. कशासाठी वाद होणार? यांनी नेकीनं काम केलं, मला मनासारखं घर सांभाळू दिलं. मुलगादेखील समजूतदार निघाला. अभ्यासात हुषार निघाला. हल्ली आजारी पडले तोपर्यंत तब्येतीचीही कधी तक्रार नाही. कधी कुठल्या बाईकडे यांनी मान वर करून पाहिलं नाही, आणि आता-आता यांना या वयात-भरल्या संसारात ही कसली अवदसा आठवलीये हो?”

मी चमकलो. काय सांगत होत्या संजीवनीताई? नानासाहेबांच्या बाबतीत हे कसं शक्य आहे? तरुण वयातसुद्धा ते कधी मुलींशी बोललेही नाहीत. त्यांच्या त्या विषयातल्या अलिप्तपणाची आम्ही मंडळी कायम थट्टा करीत असू. या बाबतीत त्यांचा सभ्यपणा लाखात सापडणार नाही, असा होता. असा साधा सरळ माणूस बाईच्या फंदात सापडला असेल, अशी कल्पनादेखील करणं कठीण होतं…

“नुसती कल्पना नाही. माझी आता खात्रीच झालीय.” संजीवनीताई म्हणाल्या, “दुसरं काहीही असतं, तर ते माझ्याकडे बोलल्यावाचून राहिले नसते. पण हे असं काही असल्याशिवाय उशिरा घरी परत येणं, ऑफिसमध्ये नसणं, नेहमीची कामं चुकणं, असलं काही व्हायचं नाही. परवा मला त्यांच्या बुशशर्टच्या खिशात हॉटेल बिल मिळालं. एरवी हे चुकून कधी हॉटेलमध्ये जात नाहीत. त्यांच्या वस्तू शोधायच्या, हे मलाच कसंतरी वाटतं, नाही तर आणखी खूप सापडलं असतं मला.”

मला बोलायला काहीच सुचेना. पतिपत्नीमधल्या या अवघड संकटाविषयी परकं माणूस काय बोलणार? त्यातून ती पतिपत्नी या दोघांच्याइतकी सज्जन, सुसंस्कृत आणि एकमेकांवर प्रेम करणारी असली, तर मग बाब अधिकच नाजूक! मी संजीवनीताईंची समजूत घालण्याचा नाद सोडून दिला.

“पण तुम्ही त्यांना काहीतरी सांगून बघा.” संजीवनीताई म्हणाल्या, “विचारा, आजवरचं त्यांचं प्रेम गेलं कुठं? विचारा, आजवर मी त्यांना काही कमी पडू दिलंय का? कदाचित ते मला सांगू शकणार नाहीत असं काही तुमच्याकडे बोलतील. या गोष्टी पुरुष, पुरुषांकडे अधिक चांगले बोलतात.”

माणसा-माणसांमधली नाती किती चमत्कारिक असतात! दोन माणसं एकमेकांना आपलं सर्वस्व समजतात; पण त्यांच्यात परकेपणा आला म्हणजे तिसऱ्यालाच आपला मानतात. त्यांच्या संसारावरची ही आपत्ती टाळण्यासाठी जमेल ते सारं करीन, असं आश्वासन मी संजीवनीताईंना दिलं.

पण नानासाहेबांकडे हा विषय काढायचा कसा; या चिंतेचा डोंगर छातीवर येऊन पडला.

नानासाहेबांचा सज्जनपणा याहीवेळी माझ्या अनुभवाला आला. मी या विषयाचं नुसतं 'नोम्-तोम्' करताच त्यांनी सारं काही मोकळेपणानं कबूल करून टाकलं.

पिण्याची त्यांना फारशी आवड कधीच नव्हती; पण अलीकडे डॉक्टरांनीच त्यांना पेग-दीड पेग घेण्याचा सल्ला दिला होता.

व्हिस्कीच्या ग्लासशी खेळत खेळत नानासाहेब मला म्हणाले, "विनायक, या गोष्टी लपवून ठेवण्यात काहीच अर्थ नसतो. या ना त्या प्रकारानं त्या उघडकीला येतातच. तेव्हा मी तुला सारं सांगून टाकायचं ठरवलंय. तिचं नाव आहे मार्था. वयानं माझ्यापेक्षा निम्म्याहून कमी-म्हणजे पंचविशीच्या आतली आहे. रूपानं मध्यम आहे. पण तरुण असल्यामुळे चांगली दिसते. शिवाय राहते चांगली-फॅशनेबल! अर्थात संजीवनीची सर तिला नाहीच. तिच्या मानानं मार्था खूपच थिल्लर, उथळ आहे-पण वेळ मजेत जातो. आपण तरुण आहोत असं वाटतं!"

मी काय बोलणार? तुमच्या हातून हा वेडेपणा होतोय, असं मी कसं सांगणार? कारण त्यांना ते आधीच माहित होतं. ती कोण मार्था होती तिच्यापेक्षा संजीवनीताई केव्हाही उजव्या होत्या, हे त्यांनी स्वत:च कबूल केलं होतं. पण या गोष्टी बुद्धीच्या नसून मनाच्या असतात, हेच खरं. असल्या प्रेमप्रकरणामधून पुरुष आपलं गेलेलं तारुण्य शोधीत असतो-त्यासाठी कितीही मोठा धोका पत्करत असतो. पण पुरुषाच्या स्वभावातला हा दुबळेपणा मी संजीवनाताईंना कसा पटवून देणार?

त्यांनी माझ्यावर सोपवलेलं रदबदलीचं काम मी पार पाडायचं ठरवलं.

पण त्या बाबतीतही नानासाहेबांनी मला निरुत्तर केलं. त्या बुद्धिमान माणसानं या गोष्टीचा सगळ्या बाजूंनी विचार केला होता. ग्लासातली व्हिस्की संपवीत ते किंचित हसून म्हणाले, "अर्थात संजीवनीवर मी चांगलाच अन्याय करतोय, या भानगडीनं. या विचारानं मनात खूप गलबलून येतं कित्येकदा. पण काय करायचं? माणूस असहाय असतो अशा वेळी!"

तेव्हापासून संजीवनीताईंचा संसार अधिकच खडतर झाला. कारण आता लपवण्यासारखं काहीच राहिलं नव्हतं. नानासाहेब राजरोस उशिरा येऊ लागले होते. हा वेळ ते ऑफिसचं काम करण्यात घालवीत नसत, हे उघड झाल्यामुळं, त्यांना, अतिश्रम करू नका, असंही म्हणता येत नव्हतं. संजीवनीताईंनी मला फोन करणं किंवा भेटणं सोडून दिलं. एका परीनं मी त्यांची निराशा केली होती; पण या बाबतीत मी अधिक काही करू शकलो नसतो, हेही त्या समजूतदार बाईला पटत होतं. त्या नुसत्या खिन्न होऊन दैवाला दोष देत बसल्या.

एकदा रात्री दहा-साडेदहाचा सुमार होता. जेवण आटोपून मी एक पुस्तक घेऊन झोपेची आराधना करीत पडलो होतो.

अचानक बेल वाजली. अशा आडवेळेला कोण आलं, म्हणून आश्चर्य करीत मी दार उघडलं, तर दारात नानासाहेब!

माझं आश्चर्य दुणावलं.

"माफ कर. तुला भलत्यावेळी त्रास दिला;" म्हणत त्यांनी सिगारेट पेटवली.

हा आश्चर्याचा तिसरा धक्का! कारण नानासाहेब अजूनपर्यंत कधीच सिगारेट ओढीत नसत.

काही वेळ नानासाहेब गप्पच बसून राहिले. काय झाले असेल, या काळजीत मी चूर! पण काय बोलावं तेही कळेना.

"गोष्टी फार वेगळ्या थराला गेल्या आहेत." अखेरीस नानासाहेबांनीच सुरुवात केली, "मार्था आता लग्न

करूया म्हणायला लागलो आहे.”

मी चक्करलो. अशा अभद्र गोष्टींचा नुसता उच्चार, हीच पुढच्या सगळ्या मनस्तापाची नांदी असते!

“इतके दिवस आम्ही गंमत केली. त्यातून ती ज्या वातावरणातली मुलगी आहे, ती माहीत असल्यामुळे, ती लग्नाचा आग्रह धरील, असं मला कधीच वाटलं नव्हतं. पण आता ती घायकुतीला आली आहे. एकही दिवस ती याशिवाय दुसरं काही बोलत नाही. त्यामुळे रोज भांडणं, रोज चिडाचीड! कुठून हे सुरू झालं असं होऊन गेलंय.”

मी काहीच बोललो नाही. एका परीनं नानासाहेबांना तिचा कंटाळा येत होता, हे चांगलं चिन्ह होतं. पण तरीही एकूण प्रकार अधिकच गुंतागुंतीचा होत होता, हे नि:संशय!

“मार्था म्हणते-‘डायव्होर्स घ्या. आपण लग्न करू. असं म्हणणं सोपं आहे-” नानासाहेब स्वत:शीच बोलल्यासारखं बोलत होते, “पण संजीवनीचं काय? इतकी वर्षं ती माझ्यासाठी झिजली, आता या उतारवयात तिला सोडून कसं चालेल? या पोरीला अक्कल नाही. चाललं होतं ते काय वाईट होतं? पण नाही - सगळा मेस् करून टाकलाय्.”

असे कितीतरी वेळ ते चडफडल्यासारखं बोलत राहिले. त्यांच्या मनातली खळबळ पुरती बाहेर पडेपर्यंत मी त्यांना बोलू दिलं. मग त्यांनी हलकेच विचारलं-

“काय करशील?”

“मी बोलून बघतो मार्थाशी. परक्या माणसाचं बोलणं कदाचित पटेल तिला.”

“बोलशील तू तिच्याशी?” नानासाहेबांनी अधीरपणे विचारलं आणि मनावरचा भार दूर झाल्यासारखी आणखी एक सिगरेट पेटवली.

“हो-पण नानासाहेब, वेळच पडली आणि तिनं फार हट्ट धरला, तर तिला दूर करायची तयारी आहे ना तुमची?” मी विचारलं.

नानासाहेबांनी माझ्याकडे विचित्रपणे पाहिलं. क्षणभर ते तसेच पाहात राहिले. मग म्हणाले- “दुसरा इलाजच नसेल तर- तेच करायला हवं.”

“मग उद्या येऊ मी तुमच्या ऑफिसात? तिला बोलावून घेता तिथं?”

“ऑफिसात नको. मी तिला ऑफिसात कधीच बोलवत नाही. लोकांत बभ्रा होतो, आणि हाताखालच्या लोकांचा मोरालही खलास होतो. आमची दुसरी एक जागा आहे. तिथं भेटू आपण तिला.”

दुसऱ्या दिवशी सात वाजता आम्ही ठरलेल्या जागी भेटलो. शांत तळे... काठावर हिरवळ-लांबपर्यंत पसरलेली. अधूनमधून तळ्यावरून उडत जाणारे पक्षी. अंतराअंतरावर बसलेली चार दोन प्रणयी जोडपी सोडली तर फारशी माणसंदेखील नव्हती. फक्त हिरवळीच्या तोंडाशीच, आपलं खोकं घेऊन बसलेला एक विडी-सिगारेटवाला. माझ्या मनात आलं, आपण माणसाला किती कमी ओळखत असतो! काही दिवसांपूर्वी मला कुणी सांगतं की, इथल्या या जोडप्यांतल्या तरुणांसारखेच नानासाहेब इथं एका पोरीला घेऊन बसतात, तर मी त्याला मूर्खात काढलं असतं!

मार्था अजून आली नव्हती.

आम्ही दोघं थोडावेळ तिच्याच विषयावर बोललो. नंतर बोलणं संजीवनीताईंवर आलं. एक मात्र नक्की.

इतकं होऊनसुद्धा नानासाहेबांना संजीवनीताईंविषयी काहीतरी वाटत होतंच. आजच्या माझ्या बोलण्यानं मार्था त्यांच्या आयुष्यातून कायमची जाती, तर किती बरं झालं असतं!

साडेसात वाजत आले तरीही मार्था आलीच नाही.

तळ्यात संध्याकाळच्या दाट सावल्या पडल्या. हिरवळ काळपटली. दूर कुठे तरी म्युनिसिपालटीचा दिवा लागला, त्याचा निसरडा अंधुक प्रकाश आमच्यापर्यंत पसरला. हिरवळीवर बसलेल्या जोड्या अंधाऱ्यात दिसेनाशा झाल्या. अंधाराचा फायदा घेऊ लागल्या. तळ्यावरून उडत जाण्याऱ्या एखाद्या चुकार पाखराच्या चित्काराशिवाय बाकी कसलाही आवाज उरला नाही.

आठ वाजून गेले, तरी मार्था आलीच नाही.

आता ती येणार नाही, अशी खात्री होऊन आम्ही उठलो. माझी अत्यंत निराशा झाली होती. या प्रकरणात आपल्या हातून काहीच होऊ शकत नाही, या दैवयोगानं मी खिन्न झालो होतो.

हिरवळीच्या तोंडाशी आल्यावर नानासाहेब क्षणभर विडीसिगरेटच्या खोक्याशी थांबले. सिगरेट विकणारा पोरसवदा तरुण नेहमी पाहिल्यामुळे नानासाहेबांना चांगलाच ओळखत असावा. तो आपणहून त्यांना पाहून हसला. नानासाहेबांनी काही न बोलता पैसे पुढे केले. ते घेऊन त्याने अर्धे कॅपस्टनचे पाकिट त्यांच्या हातात ठेवले. बहुधा नेहमीच्या रिवाजामुळे त्याला काही विचारायची गरज भासली नसावी.

आपल्या कारनं मला घराशी सोडून नानासाहेब निघून गेले. मात्र वेगळे होण्यापूर्वी, आम्ही मध्ये एक दिवस सोडून तिसऱ्या दिवशी मार्थाला भेटण्याचं ठरवलं.

पण तो तिसरा दिवस इतका चमत्कारिक उगवला!

दुपारीच मला ऑफिसमध्ये नानासाहेबांचा फोन! विलक्षण भेदरलेला, विचित्र स्वर! घाईघाईनं त्यांनी मला एका पोलिसस्टेशनचा पत्ता दिला, आणि असशील तसा निघून ये, मी तिकडेच जातोय, असा तातडीचा निरोप सांगितला. मी काही विचारायच्या आत त्यांनी फोन खाली ठेवला देखील!

पोलिसस्टेशन? आता कसली नवी भानगड उद्भवली असेल, या विचारानं मी गोंधळून गडबडून गेलो.

पोलिसस्टेशनवर मी नानासाहेबांच्या आधीच पोहोचलो.

नानासाहेब गाडीतून उतरले, ते जवळजवळ धावतच पोलिसस्टेशनात जाऊ लागले. त्यांच्या चेहऱ्यावर नुसती प्रेतकळा आली होती.

“काय झालं नानासाहेब?” मी विचारीत राहिलो, “आत जाऊ नका- आधी मला सांगा –काय झालं?-”

नानासाहेबांना जणू माझे शब्दच ऐकू येत नव्हते. झपाटल्यासारखं त्यांनी मला बाजूला ढकललं. एका झेपेत ते चीफ पोलिस इन्स्पेक्टरच्या टेबलाशी गेले, आणि कसेबसे म्हणाले-

“प्लीज अॅरेस्ट मी. आय हॅव मर्डर्ड माय गर्ल प्रेंड.”

दुसऱ्या क्षणी ते खाली कोसळले.

पोलिसस्टेशनवर एकच गडबड उडाली.

मी नानासाहेबांची ओळख पटवून देताच चीफनं स्वत: जातीनं लक्ष घालून भराभर साऱ्या गोष्टी केल्या. लगेच डॉक्टरांना बोलावण्यात आलं. संजीवनीताईंना फोन करताच त्या एकदम खचूनच गेल्या. कसंबसं धैर्य

गोळा करून त्या पोलिसस्टेशनवर आल्या.

नानासाहेब लवकर शुद्धीवर येण्याचं चिन्ह नव्हतं. त्यांना ताबडतोब हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आलं. मागच्या वेळी ज्या डॉक्टरनं त्यांना ट्रीटमेंट दिली होती, तोच याही वेळेस त्यांच्या दिमतीला देण्यात आला.

पोलिस इन्स्पेक्टर हॉस्पिटलवर सारखे फेऱ्या घालीत होते. नानासाहेब पूर्ण शुद्धीवर आल्यानंतर त्यांना त्यांचा जबाब घ्यायचा होता.

दोन दिवसांनंतर नानासाहेबांनी जबाब दिला.

आम्ही मार्थाची वाट पाहिली, त्याच्या दुसऱ्याच दिवशी तळ्याकाठी नानासाहेब मार्थाला भेटले. आदल्या दिवशी न येण्यावरून, आणि तिच्या लग्नाच्या कायम आग्रहावरून चिडाचीड झाली. नानासाहेबांचा तोल सुटला, आणि त्यांनी तिचा गळा दाबला. तिचा श्वास थांबल्याच खात्री होताच त्यांनी तिला तळ्यात ढकलून दिलं. कोणी पाहिलं नाही, याची खात्री करून ते घरी परत आले. पण दुसऱ्या दिवशी मनावरचा ताण वाढत गेला, आणि त्यांनी पोलिसांच्या स्वाधीन व्हायचं ठरवलं.

जबाबानंतर पोलिसांच्या प्रश्नांना उत्तरं देतादेताच नानासाहेब पुन्हा बेशुद्ध पडले, ते, बऱ्याच तासांनी शुद्धीवर आले.

संजीवनीताईंच्या डोळ्यांतलं पाणी खळत नव्हतं.

पोलिसांचा तपास चालूच होता. रोज एकदा तरी स्वत: चीफ हॉस्पिटलमध्ये फेरी मारून जायचे. ते आले रे आले की संजीवनीताई खोलीबाहेर जात. पोलिस त्यांना डोळ्यांसमोरही नको होते. त्यात पोलिसफोर्सचे एक डॉक्टर येऊन नानासाहेबांशी सतत एकांतात बोलत. बहुधा त्यांचा आजार हे ढोंग नाही ना, हे जाणून घेण्यासाठी.

“विनायकराव, एकदा वाटतं हे बरे व्हावेत.” संजीवनीताई मला एकदा डोळ्यांत पाणी आणून म्हणाल्या- “आणि एकदा वाटतं की बरे होऊन जन्मठेपेवर जाण्यापेक्षा इथंच असे हॉस्पिटलमधे पडून राहावेत.”

एवढा बुद्धिमान, प्रतिष्ठित माणूस –पण त्याच्याहून निम्म्या वयाच्या मुलीनं त्याची आणि त्याच्या संसाराची वाताहत केली होती; आणि बदल्यात स्वत:चा प्राण गमावला होता!

संजीवनीताईंच्या मनात काहीही असलं तरी डॉक्टरांनी त्यांना दहाच दिवसांत घरी जायची परवानगी दिली.

ज्या काळवेळेला संजीवनीताई घाबरत होत्या, ती अखेरीस आली.

ज्या दिवशी सकाळी नानासाहेबांना घरी आणलं, त्याच संध्याकाळी पोलिस इन्स्पेक्टर घरी आले.

आणि त्यांच्याबरोबर एक पोरसवदा तरुण. त्याला पाहताच वाटलं की आपण याला कुठं तरी पाहिलंय. पण कुठं ते आठवेना. मग आठवलं-हा तो हिरवळीजवळचा विडी-सिगरेटवाला!

हा? -पोलिसांबरोबर?

म्हणजे बहुधा यानं नानासाहेबांना मार्थाला तळ्यात ढकलताना पाहिलं असणार! प्रत्यक्षदर्शी - आय विट्नेस!

शेवटी याच्या साक्षीवर सारं काही अवलंबून?

मी ओठ चावला. आधीच जर हे लक्षात येतं, तर त्याची भेट घेता आली असती. त्यानं नक्की काय पाहिलं, हे विचारता आलं असतं. कदाचित थोड्याफार मोबदल्यामध्ये त्याची साक्ष बदलता आली असती.

"नानासाहेब, तुम्ही या तरुणाला ओळखता?" इन्स्पेक्टरांनी विचारलं.

संजीवनीताईंनी पदराचा बोळा तोंडात धरून हुंदका दाबला.

"होय." नानासाहेब म्हणाले, "मी आणि मार्था रोज ज्या तळ्याकाठी भेटत असू, तिथं हा जवळच विडीसिगरेट विकत असे..."

"रंगलाल, तू ओळखतोस या साहेबांना?"

"होय साहेब. हे दररोज माझ्याकडून अर्धा पाकिट कॅपस्टन घ्यायचे. दररोज पाहून पाहून ओळखीचे झाले होते-"

"रंगलाल-" माझ्याकडे बोट दाखवून इन्स्पेक्टर म्हणाले- "हे आणि ते असे दोघेही एकदा आलेले तुला आठवतात?"

"होय साहेब. आपण एकदा पाहिलं की चेहरा विसरत नाही."

"त्याच्या दुसऱ्या दिवशी साहेब एका मुलीला घेऊन आले-परत जाताना ती मुलगी त्यांच्याबरोबर होती?"

"माफ करा साहेब. परत जाताना ती मुलगी त्यांच्याबरोबर नव्हतीच-पण साहेब, येतानाही ते एकटेच आले होते..."

"म्हणजे?" मी ओरडलो.

"हे साहेब नेहमी एकटेच यायचे साहेब- आणि एकटेच परत जायचे. हिरवळीवर बसून स्वत:शीच बोलायचे..."

"खोटं आहे हे इन्स्पेक्टर- हा खोटं बोलतो-तुम्ही याला पढवून आणलाय- माझ्याबरोबर मार्था असायची- नेहमी असायची! आय किल्ड हर! आय-" नानासाहेब बेभान होऊन ओरडत सुटले.

"तो खरं बोलतोय नानासाहेब." इन्स्पेक्टर त्यांना शांत करीत म्हणाले, "तुम्ही मार्थाचा खून केला नाहीत. कारण मार्था अस्तित्वातच नव्हती. असती, तर तळ्यात तिचं प्रेत मिळालं असतं. तिला ओळखणारं कुणीतरी पुढे आलं असतं. तुमच्याबरोबर तिला पाहिल्याचं कुणी सांगितलं असतं. पण गेले दहा दिवस जंग जंग पछाडूनही आम्हाला मार्थासंबंधी पुरावा मिळाला तो हा एवढाच! या मुलानं तुम्हाला नेहमीच एकटं पाहिलंय! आमच्या सायकिअॅट्रिस्टनं गेला आठवडाभर स्टडी करून तुमची केस समजावून घेतलीय. गेल्या आजारात तुमच्या डोक्यात थोडी गडबड उडाली. इतकी वर्षं थकलेल्या शरीरानं न् मेंदूनं बंड पुकारलं. सरळ मार्ग जाणूनबुजून नाकारला, आणि कल्पनेनंच एक आडमार्ग तयार केला. गेल्या आजारात तुमची शुश्रूषा करणाऱ्या नर्सचं नाव होतं मार्था. ते तुम्ही तुमच्या कल्पनेतल्या मुलीला चिकटवलं. रोज ऑफिस सुटल्यानंतर तुम्ही या काल्पनिक मार्थाच्या सहवासात स्वत:चं हरवलेलं तारुण्य शोधू लागलात; पण आपण बायकोला फसवतोय, या टोचणीनं तुमचं मार्थाशी पटेनासं झालं. ती बायकोला सोडायला सांगते, अशी तुम्ही कल्पना केलीत. ते असह्य झालं, तेव्हा तुम्ही मनाशी ठरवलंत की मार्थाला दूर करायचं. तसं कुणी तरी तुम्हाला बोललंदेखील. परिणामी तुम्ही आपण तिचा खून केल्याची समजूत करून घेतली!-तुम्ही खोटेपणा केला नाहीत. तुमच्या मनानं तुम्हाला चकवलं!"

"नाही इन्स्पेक्टर-मी असं कसं करीन? मी वेडा थोडाच आहे?" असहायपणे रडत नानासाहेब म्हणाले-"मी

हिला सांगेतलं होतं माथाबद्दल. तो होतो. मी या विनायकलादेखील सांगेतलं होतं. होतो ना रे, माथा खरंच होती ना रे?" त्यांचा चेहरा आता भेसूर, वेडसर वाटत होता. सारं भान हरपलं होतं. चक्काचूर झालेल्या आवडत्या खेळण्याकडे पाहणाऱ्या लहान मुलासारखी त्यांची नजर भयचकित होती.

"पडा बरं आता जरा." संजीवनीताई स्निग्धपणे त्यांना म्हणाल्या, "तुम्हाला विश्रांतीची जरूर आहे..." त्यांची मुद्रा गोंधळलेली होती. आपला पती आपल्याला परत मिळाला, की आपल्यातून गेला हेच त्यांना कळत नव्हतं...

आठवडाभर सारं शांत होतं. नानासाहेब काही न बोलता नुसते आढ्याकडे नजर लावून पडून असत. मी त्यांना दिवसातून एकदा भेटून येत असे.

पण त्या दिवशी दुपारीच मला नानासाहेबांचा फोन आला.

"हॅलो, विनायक, माझ्यावर एक नवीनच संकट आलंय रे-" थरथरत्या आवाजात ते म्हणत होते, "तो रंगलाल-तो आठवतो ना तुला, तो विडीसिगरेट विकणारा मुलगा-त्याचा मला फोन आला होता-"

"अस्सं? काय म्हणून?"

"तो मला ब्लॅकमेल करायला पाहातोय. म्हणतो, उद्या संध्याकाळपर्यंत मला पाच हजार रुपये मिळाले नाहीत, तर मी तुमच्याबरोबर मार्थाला पाहिल्याचं पोलिसांना सांगेन!"

झुंबर

खांडववन वीस मैलांवर राहिले, तेव्हा बसमध्ये आम्ही दोघेच उतारू शिल्लक होतो.- मी आणि वैजू. बाकी जे काय मूठभर प्रवासी सुरुवातीला होते, ते कधीच उतरून गेले होते.

बाहेर संध्याकाळ झाली होती.

बस झाडीतल्या अरुंद वाटेने शक्य तेवढ्या वेगात चालली होती. दोन्ही बाजूंच्या झुडपांची पाने आणि काटक्या, बसच्या खिडक्यांवर फडाफडा आपटत होती.

कुणीही कुणाशी बोलत नव्हते.

एरवी आम्हा दोघांची बोलण्यात स्पर्धा चाले. दोघेही आपलेच घोडे पुढे दामटीत असू. पण या क्षणी मी गप्प होतो. वैजूची चिवचिवदेखील थांबली होती.

खरे तर आज बोलण्यासारखे पुष्कळच होते.

आज आमच्या मधुचंद्राचा पहिला दिवस होता.

दोन दिवसांपूर्वी आमचे लग्न झाले होते. घरच्या मंडळींनी जुळवून नव्हे; चांगला प्रेमविवाह झालेला होता आमचा! तेव्हा एकमेकांना बुजण्याचा प्रश्नच नव्हता. बोलायला विषय भरपूर होते. लग्नाआधीच्या आयुष्यातल्या आठवणी, लग्नसमारंभातील गमती. त्यातून लग्नानंतरचे दोन दिवस पाहुण्यांच्या वर्दळीत गेलेले. एकांत असा थोडाफार आताच मिळालेला! तेव्हा बोलायला उधाण यायला हवे होते. मधुचंद्र कसा साजरा करायचा, हे लाजतलाजत बोलता आले असते. पुढल्या आयुष्याची चित्रे रेखाटता आली असती.

निदान आज रात्रीच्या सुखाच्या कल्पनेने दोघांनी एकमेकांकडे पाहून गालातल्या गालात हसायला तरी हवे होते.

पण तसे होत नव्हते एवढे खरे.

दोघांच्याही मनावर एक विचित्र दडपण आले होते.

खांडववनासारख्या आडबाजूच्या ठिकाणी मधुचंद्राला जाण्याची कल्पना मला काव्यमय वाटली होती. गावात हॉटेल एकच! तिथेच उतारूंचा इतका तुटवडा, की मध्यरात्री दार ठोठावले, तरी उतरायला जागा मिळत असे. अर्थात नंतर कसली अडचण यायला नको, म्हणून मी आधीच पत्र टाकून जागा मिळण्याची निश्चिती केली होती.

आता खांडववन कधी येईल, असे होऊन गेले होते.

काय गंमत आहे पाहा! आम्हा दोघांच्या आयुष्यातला हा पहिलाच एकत्र प्रवास! त्याची आठवण आम्ही जन्मभर मनात जतन करणार होतो. पण प्रत्यक्षात मात्र तो कधी एकदा संपेल, असे झाले होते.

मी वैजूकडे पाहिले. वारे असह्य होऊन तिने पदर डोक्यावर ओढून घेतला होता. तिचा सुंदर चेहेरा किंचित त्रासलेला, थकलेला दिसत होता. बाहेरच्या सावल्या अधिकच गडद झाल्या होत्या. सारे वातावरण भिजल्यासारखे थंड आणि जडशीळ होऊन गेले होते. पावसाच्या झडीत हरवून गेलेल्या पाखरांच्या जोडीसारखी आम्ही दोघे निमूट बसून राहिलो होतो- जंगलातून वाट काढणाऱ्या बसचा घों घों आवाज ऐकत. कधी एकदा हा प्रवास संपेल आणि खांडववन येईल, याची वाट पाहात.

-आणि एकदाचे खांडववन आले.

स्टॉपवर मुळीच वर्दळ नव्हती. एखाददोन फळविक्यांशिवाय आणि चारदोन आशाळभूत हमालांशिवाय बाकी तळ रिकामाच होता.

आम्ही बसमधून उतरून भांबावल्यासारखी इकडेतिकडे पाहात राहिलो. बस वळली आणि रें रें आवाज करीत मुर्दाडपणे निघून गेली. तिच्या दिव्यांच्या प्रकाशाने झुडपांची एक रांगच्या रांग उजळून निघाली, आणि दुसऱ्याच क्षणी सावल्यांत मिसळून गेली. बसचा आवाज दूरवर गेला आणि सारे चिडीचिप्प झाले.

समोर काळाकभिन्न पहाड उभा होता. खालच्या दरीतून धुके हळूहळू वर यायला सुरुवात झाली.

एक केविलवाणा पोरगेला हमाल आवाज न करता आमच्या समोर येऊन कमरेत वाकून उभा राहिला.

सूटकेसेस त्याच्याकडे देऊन आम्ही चालू लागलो.

-एकूण आम्ही खांडववनात येऊन पोहोचलो तर होतो; पण अजूनही मनावरचा ताण कमी झाला नव्हता. खांडववनाचे पहिले दर्शन वाटले होते तेवढे रमणीय नव्हते. आधी झपाट्याने अंधारू लागल्यामुळे काही दिसणेच कठीण होते. काळ्याकुट्ट पहाडांनी गावाला गिळून टाकल्यासारखे दिसत होते. झाडे घोंगड्या पांघरून बसल्यासारखी वाटत होती. सगळीकडे निजानीज होऊ लागली होती.

वैजू अस्वस्थपणे माझ्याजवळ सरकली. तिला थंडी तर वाजतच होती; पण या परक्या गावात ती घाबरल्यासारखी झाली होती, हे अधिकच खरे. मी धीर दिल्याप्रमाणे तिच्या कमरेभोवती हात टाकला. तिला थोडेसे बरे वाटले.

माझी वैजू! वैजूला बरे वाटावे म्हणून मी काहीही केले असते.

पण मला कोण धीर देणार होते?

मी स्वत:च मनाला समजावू लागलो. गाव असेल परका. पण त्यात घाबरण्याजोगे काय होते? हॉटेलमधली खोली आगाऊ रिझर्व्ह केलेली होती. पाचदहा मिनिटांतच आम्ही हॉटेलवर पोहोचलो असतो. गरम पाण्याने हातपाय, तोंड स्वच्छ धुतले असते, चार घास पोटात ढकलले असते, आणि मऊमऊ बिछान्यावर अंग झोकून दिले असते!

-बिछाना!

भीतीच्या विचारांना मग जागाच राहणार नव्हती. मी वैजूचा होतो आणि वैजू माझी होती. रात्र आमची दोघांची होती.

मधुचंद्राची पहिली रात्र!

अपेक्षित सुखाच्या कल्पनेने माझ्या अंगावर रोमांच सरसरून उभे राहिले.

हमालाने सामान हॉटेलच्या दाराशी ठेवले. मी एक नोट त्याच्या हातात ठेवली. तो सलाम करून निघून गेला.

हॉटेलचे मालक-कम्-मॅनेजर घाईघाईने बाहेर आले.

पाहिल्याबरोबर कुणाचेही मत चांगले व्हावे, असा गृहस्थ होता तो. जाडजूड आणि हसतमुख. किंचित बुटका. त्याला डोळे किलकिले करून बोलण्याची सवय होती.

मी नाव सांगेतले. मालक मोठ्या अदबीने आम्हांला आत घेऊन गेले. त्यांच्या ऑफिसमध्ये. हॉटेलचा नोकर प्यायला पाणी घेऊन आला. आम्हांला थोडे विसावल्यासारखे झाले. वृत्ती उल्हसित झाल्या.

मग मला बाजूला घेऊन मालक म्हणाले, "तुमचं पत्र मिळालं. पण हे पाहा, तुम्ही मला माफ केलं पाहिजे. आज रात्री तुम्हाला खोली मिळू शकणार नाही."

एकदम आकाश कोसळल्यासारखे झाले.

काय बोलावे ते सुचेना. मी जेमतेम विचारले, "कां?"

डोळे किलकिले करून मालक म्हणाले, "इथं जवळच एक धरण बांधलं जाणार आहे. त्यासाठी सरकारी इंजिनिअर्सची पार्टीच्या पार्टी इथं आली आहे. त्यांनाच जागा पुरत नव्हती. पण खोल्यांमधून अक्षरश: कोंबून त्यांची कशीबशी व्यवस्था केलीय मी. एकही खोली रिकामी नाही."

मला खरे म्हणजे संताप यायला हवा होता. पण समोर आलेल्या संकटाने मी इतका हतबुद्ध झालो होतो की, मला रागावणे देखील शक्य नव्हते. बिचारी वैजू! थकलेला जीव कसाबसा गोळा करून ताटकळत बसली होती. तिला जाऊन काय सांगायचे?- खोली मिळत नाही, असे?

पण वैजूच उठून आमच्यापाशी आली. आमचे काहीतरी याच प्रकारचे बोलणे चालले असावे, असा संशय तिला आला होता. तिने येऊन विचारले, "काय झालं?"

"हे म्हणतात की जागा खाली नाही."

"पण आपण आधी पत्र लिहिलं होतं..."

मला सांगितलेले सारे मालकांनी तिला पुन्हा एकवार समजावून दिले मी नाही. अत्यंत शांतपणे. दिलगिरीच्या स्वरात.

कुठल्या मुहूर्तावर आम्ही मधुचंद्राला निघालो होतो, कुणास ठाऊक!

मालकावर संतापण्यात काही अर्थ नव्हता. नेहेमी रिकामे असलेले ते हॉटेल आज आमच्याच दुर्दैवाने गच्च भरून गेले होते. आम्ही पत्र लिहिले होते खरे; पण त्याचे उत्तर आलेले नव्हते. आम्हांला खोली द्यायला ते मुळीच बांधलेले नव्हते. ते आम्हांला अगदी कोरडेपणाने सरळ घालवून देऊ शकले असते. याउलट ते निदान दिलगिरी व्यक्त करीत होते, हे काय कमी होते?

पण नुसत्या दिलगिरीने प्रश्न सुटत नव्हता.

"उद्या सकाळी त्यांच्यापैकी तिघेजण जाणार आहेत. उद्या मी तुम्हांला एक रूम देऊ शकेन." मालक म्हणाले.

"थँक्यू." मी स्वर शक्य तेवढा शांत ठेवण्याचा प्रयत्न करीत म्हणालो, "पण आज रात्री आम्ही कुठं जायचं?"

"तेही खरंच." ते ओशाळवाणे हसले, "तुमच्या मधुचंद्राची पहिली रात्र ना आज? पत्रात लिहिलं होतं तुम्ही!"

त्यांचा हेतू आम्हांला खिजवण्याचा नव्हता. पण तरी मी त्रासल्यासारखा झालो. जसे काही आम्ही तरुण आहोत हा आमचा अपराध आहे! जसे काही आम्ही मधुचंद्र साजरा करीत आहोत हा खुळेपणा आहे!

“पण आम्हो जायचं कुठं आता एवढ्या रात्रौ? दुसरं एखादं हॉटेल आहे का इथं?”

“नाही.” ते मान हलवीत म्हणाले, “पण मी बघतो काही व्यवस्था होण्यासारखी आहे का ते. घाबरू नका. तुमच्याबरोबर बाईमाणूस आहे. मी तुम्हांला उघड्यावर पडू देणार नाही. तुम्ही आधी जेवून तर घ्या. तोवर मी पाहतो, काही सुचतं का ते.”

आम्हांला त्यांचा एकदम आधार वाटू लागला. कुठला कोण मनुष्य. दहा मिनिटांपूर्वी आम्ही त्याला पाहिलेलेही नव्हते; पण तो आता घरच्या एखाद्या वडीलधाऱ्या माणसासारखा आमची काळजी करीत होता.

आम्ही हातपाय धुतले. तोवर नोकर ताटे घेऊन आला. मला सणसणीत भूक लागली होती. मी जेवणावर चांगला आडवा हात मारला. मात्र वैजूच्या मनावर चांगलाच ताण पडलेला दिसत होता. ती नुसते अन्न चिवडीत बसली होती.

आमचे जेवून होताहोताच मालक आमच्या जवळ आले. त्यांना काहीतरी कल्पना सुचली होती. पण ते स्वत:च थोडे साशंक असावेत. कारण त्यांच्या गुबगुबीत चेहेऱ्यावरचे ते स्मित मावळले होते. तो थोडा गंभीर वाटत होता.

“तुमचं जेवण तर झालेलंच आहे. उद्या सकाळी तुम्ही इथं राहायला येऊ शकता.” मालक म्हणाले, “रात्रीपुरताच प्रश्न आहे. त्यासाठी मला एक कल्पना सुचली आहे. इथून जवळच एक घर आहे. ते रिकामंच असतं.” आमची साशंकता ओळखून ते पुढे म्हणाले, “तसं परक्याचं घर नाही ते. माझा भाऊच त्याची देखभाल करतो. त्या घराशेजारीच राहतो तो.”

वैजू काहीच बोलली नाही. पण तिला या विचारात काही वावगे वाटलेले दिसले नाही.

“चालेल का आजच्या रात्रीपुरती ही व्यवस्था?” मालक आर्जवीपणे विचारीत होते.

‘नाही’ म्हणण्यासारखी आमची परिस्थितीच नव्हती. दुसरा काही पर्यायच नव्हता. शिवाय या सोयीत नाव ठेवायला जागा नव्हती.

मग मालकांचा चेहेरा असा गंभीर का?

“माझा भाऊ एकटाच असतो; आणि तोदेखील त्या घरात राहात नाही. शेजारीच दोन खोल्यांचा एक मांगर बांधलेला आहे, तिथं राहतो. मला तुमच्याबरोबर येता येणार नाही. अजून इथलं सगळं आटपायला दोन तास तरी लागतील; पण मी गडी देतो तुमच्याबरोबर. चिठ्ठी देतो लिहून.”

इतका माणुसकीने वागणारा हॉटेलमालक कुठे भेटेल, असे त्या क्षणापर्यंत तरी मला वाटले नव्हते.

मी त्यांचे आभार मानले. ते नसते, तर आमचे आज काय झाले असते कुणास ठाऊक! त्यांनी सुचवलेल्या ठिकाणी जायला आम्ही उत्साहाने तयार झालो. इतका वेळ मनावर पडलेले दडपण एकदम निघून गेले आणि कसे मोकळेमोकळे वाटू लागले!

पण आमच्या उत्साहाला मालक मात्र प्रतिसाद देत नव्हते. परिस्थिती आता बरोबर उलटी होती. आम्हांला उत्साह वाटत होता; पण त्यांच्या मनावर मात्र कसलातरी ताण पडलेला दिसत होता.

असे कां?

काही क्षणांतच मला याचा उलगडा झाला.

मला बाजूला घेऊन ते म्हणाले, “आय अॅम् व्हेरी सॉरी! मला तुमची याहून अधिक चांगली व्यवस्था

करता आलो नाही.”

“यात काय वाईट आहे, ते मला समजत नाही.” मी म्हणालो.

मालक क्षणभर गप्प राहिले. सांगावे की नाही, अशा विचारात. मग त्यांनी वैजूकडे एक कटाक्ष टाकला, आणि ते हलक्या आवाजात म्हणाले, “वेल्, आय् मस्ट वॉर्न यू.”

“कशाबद्दल?” मी चमकून विचारले.

“ते घर चांगलं नाही.”

“नसू द्या हो. काही गैरसोयी असल्या तर आम्ही चालवून घेऊ. एका रात्रीचा तर प्रश्न!”

“तसं नाही. चांगलं नाही म्हणजे तिथं...तिथं काहीतरी...”

मी हसलो. नेहेमीचीच हकीगत! भुताटकी!... रिकामं घर म्हणजे तिथं भुताटकीचा वावर असलाच पाहिजे, असा नेहेमीचा विश्वास!

“हसू नका. या घरात दोन मृत्यू झाले आहेत...”

“पण काय होतं तिथं? भूत दिसतं?”

“काय होतं कुणालाच माहीत नाही. प्रत्यक्षात कुणी काही पाहिलेलं नाही. पण तरीही लोक त्या घरात राहायला तयार होत नाहीत, एवढं खरं. म्हणून तर अजून रिकामं राहिलंय ते.”

मला गंमत वाटली. अफवा! निव्वळ अफवा! कुणी काही पाहिलेले नाही आणि तरीही म्हणे घर झपाटलेले! प्रत्येक गावात अशी एखाद-दोन घरे असतातच. त्यांच्याविषयी नाहीनाही त्या अफवा रूढ असतात. प्रत्यक्षात मात्र त्या अफवांना काहीच आधार नसतो. प्रत्यक्ष भूत काही कुणी बघितलेले नसते. पण चार रिकामटेकडे काहीतरी रचून सांगतात, आणि भित्रे लोक त्यावर विश्वास ठेवतात.

माझा तरी भुताटकीवर मुळीच विश्वास नव्हता. त्यातून आजची रात्र अशीतशी नव्हती. आज भीतीला जागाच नव्हती. घाबरायला सवड नव्हती. ज्या परमोच्च सुखात आज आम्ही बुडून जाणार होतो, तिथे भुताटकीचा विचारही शिरू शकत नव्हता.

“तुम्ही काही काळजी करू नका मालक! उद्या सकाळी इथला चहा प्यायला आम्ही दोघंही हजर होतो की नाही, बघा!” मी हसतहसत म्हणालो. मालकांनी नुसतेच खांदे उडवले.

वैजूला मात्र मी यातले काहीच सांगितले नाही.

गड्याने कंदील उचलला.

आम्ही तिघे बाहेर पडलो.

वाटेने कुणीच कुणाशी बोलत नव्हते. पालापाचोळ्यातून चालताना पायाखाली मोडणाऱ्या काटक्यांचा कडकड आवाज होत होता, तेवढाच. पण त्या शांततेत तोदेखील किती मोठा वाटत होता! सगळीकडे अगदी शांत शांत झाले होते. गाव केव्हाच गुडुप झोपी गेला होता.

चालताना गड्याच्या हातातला कंदील हेलकावे खात होता. त्यामुळे आजूबाजूच्या झुडपांवर चित्रविचित्र आकारांच्या सावल्या हिंदकळत होत्या. कंदिलाचा प्रकाश पायांपासून खाली पडत होता. त्यामुळे नुसते

गुडघ्यासारखे सहा पाय त्या काळोखातून चालत असल्याचा चमत्कारिक भास होत होता.

मालकांचे शब्द माझ्या डोक्यात पुन्हा पुन्हा घोळत होते : 'आय मस्ट वॉर्न यू...रिकामं घर...या घरात दोन मृत्यू...' काय दिसणार होते आम्हांला त्या घरात? बहुधा आम्ही स्वत:च्याच सावल्यांना घाबरणार होतो. एखादा किरकिरणारा दरवाजा, उंदराघुशींचे आवाज, नाहीतर स्वत:च्याच पावलांचा पडसाद, असले काहीतरी ऐकून 'कुणीतरी आहे' म्हणत पळत सुटणार होतो. नाहीतर कथा-कादंबऱ्यांत किंवा चित्रपटात असते तसे कुणीतरी पांढरी चादर गुंडाळून अवचित आमच्यासमोर येऊन उभे राहणार होते; पण असल्या फुसक्या गोष्टींच्या भयाला मनात थारा देऊन मी आजची अनमोल रात्र वाया जाऊ देणार नव्हतो. भूत समोर दिसले असते तरी मी त्याचे बखोट धरून त्याला हाकलून दिले असते. हात जोडून म्हटले असते, 'माफ कर. पुन्हा केव्हातरी. आज आम्हांला बिलकूल सवड नाही.'

या गमतीच्या विचारांनी मला अधिकच धीर आला. उत्साह वाटण्यासारखे पुष्कळ होते. अडचणीत सापडल्यानंतरही आयत्या वेळी का होईना, पण नशिबाने एक जागा मिळाली होती. कशी का असेना, पण आजची रात्र साजरी करण्यापुरती ती पुरेशी होती. आता रात्र फुलवणे माझे काम होते.

या रात्रीची मी किती दिवसांपासून वाट पाहिली होती.

अगदी माझी आणि वैजूची पहिली भेट झाल्यापासून!

-पहिल्या भेटीतच आम्ही दोघे एकमेकांच्या प्रेमात पडलो होतो. ते प्रेम दिवसेंदिवस वाढतच गेले होते. एकमेकांच्या मनाला आम्ही फुलासारखे जपत आलो होतो. एकमेकांच्या शरीराला एवढेसेही कष्ट होऊ नयेत, यासाठी जिवाचे रान करीत होतो...

"थंडी वाजत्येय?" मी वैजूला म्हटले, "माझा कोट देऊ?"

तिने नकारार्थी मान हलवली आणि नाजूक स्मित केले. त्याचा अर्थ मला अनुभवाने ठाऊक झाला होता 'मी तुझा कोट घातला तर तुला नाही का थंडी लागणार?'

तिच्या स्मिताला उत्तर म्हणून मी चालताचालताच तिच्या कमरेभोवती हात टाकून तिला जवळ ओढले; पण बरोबरच्या गड्याकडे एक दृष्टिक्षेप टाकून ती लटक्या रागाने बाजूला सरली.

किती नाजूक होती माझी वैजू! परमेश्वरा, हिच्या या नाजूक देहाला कधी कसले कष्ट पडू देऊ नकोस.

वैजूच्या शरीराला स्पर्श करताना मला नेहेमी धास्ती वाटायची, की आपण या फुलाच्या पाकळ्यांना दुखावत तर नाही? मऊसूत, अगदी सायीसारखे नितळ नि नाजूक शरीर होते तिचे!

छे छे! आमचे प्रेम कधीच कमी होणे शक्य नव्हते. आम्ही दोघे एकमेकांना इतके चांगले समजू शकत होतो! इतर जोडप्यांप्रमाणे आम्हांला एकमेकांचा कधीच कंटाळा आला नसता. आमची कधीच भांडणे होणार नव्हती. कारण एकमेकांच्या सुखाचाच विचार आम्ही प्रथम करीत आलो होतो. त्यासाठी काय वाटेल ते करणार होतो. आजवर कुणी केले नसेल असे उत्कट प्रेम वैजू माझ्यावर करीत होती; आणि मी तर केवळ तिच्या प्रेमाखातरच उरलेले आयुष्य वेचायचे ठरवले होते!

सारे आयुष्य!... अजून सारे आयुष्य जायचे होते.

आजची रात्र त्या आयुष्यातली पहिली रात्र होती.

आज रात्री दोघांचेही जिणे नव्याने सुरू होणार होते.

प्रेमाचा पहिला रात्र! जीवनाचा पहिला रात्र!

-गडी थांबला आणि मी विचारातून भानावर आलो. वाट संपली होती.

ते घर आमच्यसमोर उभे होते.

पंख मिटून एखादी घार बसावी, तसे ते घर त्या काळोखात दिसत होते.

पण त्या घारीची नजर समोर होती. भक्ष्याकडे एकटक पाहावे तशी. घरात एक दिवा लुकलुकत होता, त्यामुळे कदाचित असा भास होत असावा. पण माझ्या अपेक्षेप्रमाणे घर रिकामे नव्हते. झोपलेले नव्हते. ते जागत बसले होते. एक डोळा उघडा ठेवून जागत बसले होते.

आमच्यासाठी.

शेजारीच एक मांगर होता.

गड्याने आम्हाला जेमतेम ती जागा दाखवली, कंदील माझ्या हातात दिला, आणि लगेच बरोबर आणलेली चूड पेटवली.

काही न बोलता तो ती पेटती चूड घेऊन वळला. आम्ही दोघेही त्या चुडीच्या लसलसत्या ज्वाळांकडे पाहात राहिलो.

थोडे अंतर गेल्यावर चुडीचा प्रकाश थांबलेला दिसला. -आमचे काय झाले, हे पाहण्यासाठी बहुधा. क्षणभरातच तो प्रकाश चालू लागला. लवकरच त्याचा काजव्याएवढा बारीक ठिपका झाला, आणि मग तोही दिसेनासा झाला.

त्या काळोखात आम्हांला केवळ कंदिलाच्या सोबतीने सोडून तो एकाएकी निघून गेल्यामुळे असेल, किंवा या परक्या घराच्या आवारात आल्यामुळे असेल, कशाने कोण जाणे, पण मध्ये थोडा वेळ उडालेले दडपण मनावर पुन्हा आले. जीव काहीसा घाबरल्यासारखा झाला.

मी कंदील उचलला. आम्ही दोघेही मांगराच्या दरवाजापाशी गेलो. दार ठोठावले. उत्तर नाही.

पुन्हा दारावर थाप मारली.

दार एकदम भक्कन् उघडले.

आत काळोख होता. कुणी दिसत नव्हते.

आणि दोघेही विलक्षण दचकलो!

आमच्या पाठीमागेच एक माणूस उभा होता.

तो फार खंगलेला दिसत होता. त्याची दाढी वाढलेली होती. डोळे विचित्र रीतीने चमकत होते.

बहुधा हाच हॉटेलमालकाचा भाऊ असावा.

“आम्ही आज रात्री या घरात रहाणार आहोत.” शांतता असह्य झाल्यामुळेच की काय, पण मी बोलून गेलो.

आणि एकाएकी एक विचित्र प्रकार घडला.

तो मनुष्य जागच्या जागी खाली बसला, आणि त्याने आमचे दोघांचे पाय धरले.

मी त्याला उठवले. आम्ही दोघांनाही अतिशय अवघडल्यासारखे झाले होते. तो माणूस पन्नाशीचा तरी दिसत होता. त्याने आमच्यासारख्या तरुणांच्या पाया पडावे, याचे कारण तरी काय?

पण या संदर्भात काही बोलणे मोठे अडचणीचे होते. म्हणून मी काही न बोलता मालकांची चिठ्ठीच पुढे केली.

त्याने ती वाचली. तो घराच्या दिशेने चालू लागला.

आम्ही त्याच्या मागून चालत होतो.

त्याच्या मघाच्या वागणुकीचा बराच धक्का वैजूला बसला असावा. तिचे पाय अजून लटलटत आहेतसे वाटत होते.

घराचे दार उघडेच होते.

चार पायऱ्या चढून जाताच आम्हांला एक दिवाणखाना लागला.

घर तसे अलीकडेच बांधलेले असावे. बांधकाम चांगल्या अवस्थेत होते. पण बांधण्याची पद्धत मात्र काहीशी जुनाट होती. कदाचित या भागातली घरे अशीच असतील.

घरात माणसांचा वावर नसावा. पण तरीही दिवाणखाना विलक्षण टापटिपीने ठेवलेला दिसत होता. कदाचित मालकांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचा भाऊ तितक्या दक्षतेने घराची देखभाल करीत असावा!

दिवाणखान्याच्या एका कोपऱ्यातून एक जिना माडीवर गेलेला होता. माडीवरच्या एका खोलीत दिवा लावलेला होता. मघा दिसलेला उजेड कुठून येत होता हे आता लक्षात आले.

दिवाणखाना ओलांडून त्याने आम्हांला माडीवर नेले.

दिवा लावलेल्या त्या खोलीत.

ती आमची झोपायची खोली होती.

त्याने खोलीचे दार लोटले, आणि हात पुढे करून आम्हांला आत जायला सुचवले.

मी खोलीत पाऊल टाकले, आणि मला आश्चर्याचा धक्का बसला.

खोलीत एक प्रशस्त पलंग होता, आणि पांढरीशुभ्र बिछायत घालून तो जणू आमच्यासाठीच सुसज्ज केलेला होता.

मालकांचा भाऊ फार वेळ आमच्याबरोबर थांबलाच नाही. त्याने आमची फारशी चौकशीदेखील केली नाही. आम्हांला खोली दाखवून तो लगेच परत फिरला. त्याचे वागणे मला फारच चमत्कारिक वाटत होते. पण एका दृष्टीने ते आमच्या सोयीचेच होते. म्हणून मी त्याची फारशी दखल घेतली नाही. दुसरा एखादा इकडच्या-तिकडच्या गोष्टी काढून बडबडत बसला असता, तर ते मला मुळीच परवडले नसते.

एका गोष्टीचे मात्र मला राहूनराहून नवल वाटत होते. -त्या खोलीत आमची व्यवस्था फार म्हणजे फारच चोख केलेली होती. अगदी पिण्याच्या पाण्यापर्यंत सारे काही जागच्या जागी होते.

पण आता नवल करीत बसायला सवड नव्हती. ज्या कुणी हे सारे केले, त्याला धन्यवाद देऊन मी कपडे उतरू लागलो.

एकदम माझे लक्ष वैजूकडे गेले. ती एखाद्या पुतळ्यासारखी तिथल्या नक्षीकाम केलेल्या चिमुकल्या खुर्चीवर बसली होती.

“काय ग, झोपायला नाही का यायचं?” मी शक्य तितक्या मृदूपणे विचारले.

ती काहीच बोलली नाही.

“वैजू !… ए वैजू!” मी किंचित घाबरून हाक मारली.

तिने काहीच उत्तर दिले नाही.

मी तिच्याजवळ गेलो आणि तिची हनुवटी धरून चेहेरा वर केला.

तिने माझ्याकडे पाहिले. अगदी दीनवाणे पाहिले. तिच्या नजरेत भीती साकळली होती. एखाद्या निसरड्या कड्यावर उभे राहिलेले लहान मूल जसे पुढेमागे कुठेही पाऊल टाकायला घाबरेल, तशी भीतीने गोठून तिची हालचालच थांबली होती.

मी तिला मिठीत घेतले. तिने असहायपणे माझ्या छातीत मान खुपसली. मी हलकेहलके तिच्या पाठीवर थोपटीत राहिलो. ‘चल, वेडी की काय तू?’ असे काहीबाही धीर देणारे तोंडाने बडबडत राहिलो.

ती काही बोलली नाही. पण कुठल्याही क्षणी तिच्या तोंडून हुंदका फुटला असता.

तशाच अवस्थेत आम्ही कितीतरी वेळ राहिलो आणि एक गोष्ट माझ्या लक्षात येऊन चुकली.

त्या बिछान्यावर झोपायची वैजूला भीती वाटत होती.

मी पुरुष होतो. कुठल्याही बिछान्यावर का होईना, पण आराम करावा एवढीच माझी इच्छा होती. पण ती स्त्री होती. दुसऱ्याच कुणीतरी घालून ठेवलेल्या शय्येवर पटकन् अंग टाकणे, तिला कठीण जात होते.

मी तिच्या कलाने घेण्याचे ठरवले. कुठल्याही कारणासाठी आज रात्री तिला दुखवण्याची माझी तयारी नव्हती.

मी खिडकीपाशी जाऊन उभा राहिलो.

बाहेर सारे शांत होते.

आणि एकदम चंद्रोदय झाला. झाडांचे शेंडे चकाकू लागले. राखाडी जमिनीवर सावल्या हलू लागल्या. पहाडाची कडा राखेने सारवल्यासारखी झाली. झुडुपे दबा धरून बसलेल्या माणसांसारखी दिसू लागली.

माझ्याने ते दृश्य बघवेना. मी खिडकी लोटून घेतली आणि आत वळलो.

वैजू पलंगावर बसली होती.

मी दिवा मालवून टाकला आणि तिच्या शेजारी जाऊन बसलो.

तिने चटकन् माझ्या खांद्यावर डोके ठेवले.

काही क्षण मी तसेच जाऊ दिले. मग हलकेच तिचे डोके उशीवर ठेवले. त्याच उशीवर डोके ठेवून मी तिच्या अगदी निकट झोपलो.

ती काही बोलत नव्हती. पण मला समजत होते. तिच्या मनावरचे दडपण हळूहळू कमी होत होते.

मी तिच्या केसांवरून हात फिरवीत राहिलो. गालांवर हलकेच थोपटीत राहिलो. मग हलक्या-अगदी हलक्या हातांनी मी तिच्या अंगावरचे कपडे दूर केले.

ती आपण होऊन माझ्या कुशीत शिरली. थकलेल्या, भ्यालेल्या आणि नंतर विसावलेल्या पाखरासारखी. किती नाजुक जीव हा! आजपासून जन्मभर मलाच त्या जिवाला जपायचे होते!

मी माझी मिठी बळकट केली. आम्हा दोघांची शरीर पूर्ण उघडी होती. कुठल्याही बंधनापासून मुक्त! केवळ शरीरांचीच जाणीव शिल्लक होती. त्याआड धडधडणारी मनेसुद्धा एकच होऊन गेली होती आणि आता शरीरेदेखील! कोमल, मृदू आणि तापलेले असे एकच शरीर जणू स्पंदन करीत होते. माझे ओठ वैजूच्या ओठांच्या पाकळ्यांवरून पुन्हापुन्हा घासले जात होते...हातांना मऊ, नाजूक पण धगधगता स्पर्श होत होता...आमची ही मिठीच या क्षणी खरी होती. हा क्षण कायम राहणार होता. आम्ही वेगळी कधी नव्हतोच. कधी होणारच नव्हतो. शरीर एकच होते; मन एकच होते. एकच एक लसलसती केशरी-पिवळी दाहक ज्योत पेटली होती. ती ज्योत तेवढी खरी होती. बाकी या जगात दुसरे काहीच अस्तित्वात नव्हते...

एकाएकी खिडकी उघडली.

थंड वाऱ्याचा एकच बर्फासारखा झोत आत आला.

आमची अंगे शहारली.

वैजूच्या ओठांतून एक अस्फुट चित्कार गेला.

मला एक अस्फुट धडधड ऐकू येऊ लागली.

ती कुठून येत होती कुणास ठाऊक; पण अगदी अस्पष्ट, अंधुक, फार फार लांबून आल्यासारखी. पण कदाचित...कदाचित...माझ्यातूनच-माझ्या रक्तातून आल्यासारखी.

हळूहळू ती धडधड वाढत होती. तिचा नाद, तिचा वेगही वाढत होता. कुणीतरी माझ्या रक्तात पडघम वाजवीत होते.

माझे रक्त उसळत होते.

माझी बोटे वैजूच्या खांद्याशी होती.

हळूहळू ती वर सरकू लागली.

मी उठून बसलो.

दोन्ही हात मी वैजूच्या गळ्यावर दोन्ही बाजूंनी दाबू लागलो. हातांची पकड क्षणोक्षणी गच्च होऊ लागली.

मेली पाहिजे!...ती मेलीच पाहिजे!...

एवढीशी नाजूक ही मान! ही आवळली जायला काय उशीर!...

तो आवळलो जाईल, एका बाजूला कलंडेल, तेव्हाच मला समाधान वाटेल. मी मग पोटभर हसेन. तृप्त होऊन!

किती दिवसांपासून मी ही संधी शोधतो आहे! किती दिवस हा द्वेष माझ्या छातीत जळतो आहे निखाऱ्यासारखा!

एवढीशी ही मुलगी! एखाद्या फुलासारखा हा देह! पण तो नुसता काट्यासारखा ठसठसतोय माझ्या काळजात!

ती मेलीच पाहिजे! नाहीतर माझं जिणं बरबाद होऊन जाईल...

मी हात अधिकाधिक गच्च आवळले.

आणि कशी कोण जाणे, पण वैजू उठून बसली. सारा जोर एकवटून तिने मला बाजूला ढकलले आणि ती उघड्या दारातून पळत सुटली.

मी तिच्या मागे गेलो नाही. मी तसाच बिछान्यावर पडलो, आणि दातओठ खात चादर ओरबाडू लागलो.

ती कुठे गेली असेल?

कुठे का जाईना सटवी! माझ्या हातून तर ती सुटली! आता दुसरी संधी पुन्हा कधी मिळेल कोण जाणे!

पण मिळालीच तर आत्ताच्यासारखा अजागळपणा करून चालायला नाही. जिवंत ठेवून चालायचं नाही हलकट सालीला!...

प्रमाणाबाहेर घेतलेले मद्य भिनभिनत डोक्यात चढावे, तसे हे विचार माझ्या डोक्यात घण घालीत राहिले. ओरबाडूनओरबाडून चादरीच्या चिंध्या करायच्या तेवढ्या मी बाकी ठेवल्या!

आणि एकदम एका चाहुलीने मी वळलो.

-वैजूचा खंजीर उगारलेला हात हवेतल्या हवेत राहिला.

काय भयानक दिसत होती ती! तिच्या अंगावर एक चिंधुकही नव्हते. सगळे केस सुटून खाली आले होते. डोळ्यांत सूड माखला होता.

खिडकीतून आत आलेल्या चांदण्यात उजळलेला तिचा तो अवतार पाहूनच कुणी भीतीने जागच्या जागी गार झाला असता.

क्षणभरातच मी हे सारे पाहून घेतले. दुसऱ्याच क्षणी मी तिच्या अंगावर झेप घेतली आणि तिचा हात पकडला.

मी जसजसा तो हात पिळवटीत राहिलो, तसतशी ती वेदनेने विव्हळत राहिली. अखेरीस तिने तो खंजीर हातातून टाकला आणि धापा टाकीत ती भिंतीशी उभी राहिली.

मी तो खंजीर उचलला आणि खिडकीबाहेर लांब भिरकावून दिला.

खोलीबाहेर आलो, आणि कठड्याशी श्वास घेण्यापुरता उभा राहिलो.

आणि इतका वेळ लक्षात न आलेली एक गोष्ट प्रथमच माझ्या लक्षात आली.

दिवाणखान्याच्या मध्यभागी एक मोठे झुंबर प्रकाशत होते.

मला पक्के आठवत होते. आम्ही दिवाणखान्यात पाऊल टाकले, तेव्हा ते झुंबर तिथे नव्हते.

हिरवट-निळसर असा, पण लखलखत उजेड होता त्या झुंबराचा. झुंबर मोठे भपकेबाज होते. सबंध दिवाणखानाभर त्यातल्या काचांची लक्षावधी प्रतिबिंबे नाचत होती.

मी उभा होतो त्या भिंतीलाच झुंबराची दोरी बांधलेली होती.

मला एक कल्पना सुटली. मी त्या दोरीची पक्की गाठ सोडवली आणि हलकेच ती दोरी हलवून पाहिली. दोरी हलवताच झुंबर हलत होते.

मी ती दोरी तात्पुरती खिळ्याला बांधून ठेवली. मग मी खोलीत परत गेलो. वैजूच्या समोर उभा राहिलो. ती पलंगावर बसली होती. मी तिला खसकन् उठवले आणि म्हटले, "नीघ इथून आधी! हो चालती!"

तिने एकवार माझ्याकडे पाहिले. विलक्षण द्वेषाच्या आणि सूडघेण्या नजरेने. मग ती खोलीबाहेर पडली आणि माडी उतरू लागली.

मी खिळ्याची दोरी सोडली. हातात धरून ठेवली.

वैजू पायऱ्या उतरली आणि दिवाणखाना ओलांडू लागली.

मी हातातली दोरी सोडून दिली.

क्षणभर झुंबर हिंदकळले आणि मग अफाट वेगाने खाली आले.

त्याच्या प्रचंड आवाजात वैजूची किंकाळी ऐकूदेखील आली नाही.

खाली काचांचा खच पडला होता.

आणि त्यात वैजूचा देह पसरला होता.

मेली!...अखेरीस मेली!

माझ्या अंत:करणात हर्षाच्या उकळ्या फुटू लागल्या.

त्या विनाशाकडे मला एकदा जवळून नजर टाकायची होती.

मी खाली उतरून आलो.

त्या काचांमधून एकएक पाऊल मोठ्या दक्षतेने टाकीत मी वैजूजवळ गेलो.

खाली बसलो.

आणि एकदम माझ्या डोळ्यांसमोर अंधारून आल्यासारखे झाले. मला भोवळ आली. भान हरपून मी तिथेच कोसळलो. वैजूच्या शेजारीच.

मला जाग आली तेव्हा सारा दिवाणखाना सकाळच्या उजेडाने भरून गेला होता.

क्षणभर मला आपण कुठे आहोत, काय झाले, काहीच समजेना. डोके मनस्वी दुखत होते.

मग एकएक करता सारेच आठवले. आमची झोपायची खोली...मी वैजूचा प्राण घेण्याचा केलेला प्रयत्न... तिने उगारलेला खंजीर...

काय भयंकर स्वप्न!

पण ते स्वप्न म्हणावे तर मी इथे कसा? या दिवाणखान्यात नुसत्या रिकाम्या जमिनीवर?

आणि वैजू?

झुंबर...मी ते खाली सोडले...वैजूच्या डोक्यात पडेल अशा रीतीने...आणि मग ती...

म्हणजे? खरेच मी माझ्या वैजूचा प्राण घेतला?

"वैजू!" मी ओरडतच उठून बसलो.

वैजू शेजारीच पडली होती.

मी तिच्याजवळ गेलो. तिचे खांदे धरून तिला गदगदा हलवीत हाका मारीत राहिलो, "वैजू!...वैजू!"

तिने सावकाश डोळे उघडले. क्षणभर काय चालले आहे हे तिलाही उमजेना. दुसऱ्याच क्षणी ती भानावर आली आणि मला मिठी मारून स्फुंदू लागली.

काल रात्री काही क्षण मी तिचा भयंकर द्वेष केला होता. तीदेखील त्या भयानक अनुभवातून गेली होती. एकमेकांवर इतके उत्कट प्रेम करीत असताना असल्या जळत्या द्वेषाचा अनुभव असह्य होता; मन भाजणारा होता.

"कसं करवलं हे माझ्यानं?" आम्ही दोघेही हाच प्रश्न पुन्हापुन्हा स्वत:ला विचारीत होतो. गाढ मिठीत, स्फुंदत. "कां हे भयंकर स्वप्न पडलं आपल्याला?"

पण स्वप्न म्हणावे, तर ते दोघांनाही एकाच वेळी कसे पडले? शिवाय दोघांचेही तपशील कसे जुळले? आम्ही दोघेही झोपण्याच्या खोलीऐवजी इथे दिवाणखान्यात कशी?

–पण ते खरे होते म्हणावे, तर वैजू जिवंत कशी?

आणि दिवाणखान्यात काचेचा एकही तुकडा शिल्लक नव्हता. फुटलेल्या झुंबराची नावनिशाणीही नव्हती.

आम्ही वर गेलो. अंगात कपडे चढवले. सामान घेतले. मांगराशी जाऊन बाहेरूनच 'येतो!' म्हणून सांगितले, आणि तडक ते घर सोडले.

हॉटेलवर पोहोचताच मालक आमच्या स्वागतासाठी हसतहसत पुढे झाले.

चहा घेताना ते मला म्हणाले, "कालची रात्र चांगली गेली ना?"

मी म्हणालो, "मालक, तुम्ही मला काल त्या घराविषयी तसं कां सांगितलंत?"

मालक ओशाळवाणे हसले. "खरं सांगू? त्या घरात तसं काही आहे की नाही, मला माहीत नाही. पण तुम्ही शक्यतो तिथं जाऊ नये अशी माझी इच्छा होती."

“कां पण? कां?”

“माझा भाऊ. तो वेडसर आहे. तसा त्याचा उपद्रव नसतो. पण तरी खात्री नाही देता येत.”

काही क्षण थांबून ते पुढे म्हणाले,-

“तसा तो पहिल्यापासून वेडसर नव्हता. गेल्या काही वर्षांतच त्याची अशी अवस्था झाली. त्या घरात राहणाऱ्या जोड्प्याकडे तो मॅनेजर म्हणून काम करीत होता. ते लोक श्रीमंत होते. पुरुष जुन्या सरदार घराण्यातला होता. माझ्या भावाची त्या दोघांवर विलक्षण भक्ती. ती दोघं गेली, आणि याची ही अवस्था झाली. मेंदूला धक्काच बसला त्याच्या.”

“कशानं गेली तो दोघं?”

“पहिल्यानं दोघांचं फार प्रेम होतं. पण नंतर अजिबात पटेनासं झालं. एकमेकांना पाण्यात पाहायची दोघं. कित्येकदा एकमेकांचा खून करण्याचा प्रयत्न केला त्यांनी. अखेरीस त्यानं दिवाणखान्यातलं झुंबर तिच्या डोक्यात पाडून तिला ठार मारलं. भयंकर! फार भयंकर!”

भयंकर! ऐकायला हे इतके भयंकर वाटत होते; आम्ही ते प्रत्यक्ष जगलो होतो!

“त्यानंतर त्याचं काय झालं कुणालाच ठाऊक नाही. तो परागंदा झाला. कुणी म्हणतात, त्यानं आत्महत्या केली. आमच्या भावाला मात्र हे समजूच शकत नाही. तो रोज सारं घर पूर्वीसारखं लावून ठेवून वाट पाहतो त्यांच्या येण्याची. पण आता ती कसली परत येतात? ती दोघं या जगातच नाहीत…”

ती दोघे या जगात नाहीत! पण त्यांचा आसुरी द्वेष-तो मात्र भरून राहिला आहे त्या घरात. त्यांच्या नश्वर देहांना पुरून उरलेला तो द्वेष…सारे वातावरण विषारी झाले आहे त्या द्वेषाने. त्या घरात येणाऱ्याच्या शरीरात तो द्वेष भिनेल…पुन्हापुन्हा तो विद्रूप आकार धारण करील…

“ती दोघं तशी मेली, म्हणून लोक घाबरतात. त्यांना वाटतं, अजूनही त्यांची पिशाच्चं त्या तिथं वावरत असतील… तुम्हाला तसं काही दिसलं नाही ना?”

मी वैजूकडे पाहिले. तिने माझ्याकडे पाहिले.

शरीरात भिनलेल्या त्या भयानक विषाची आठवण आता फक्त आमच्याबरोबर राहणार होती.

मी सावकाश म्हणालो, “नाही. तसं काहीच आम्हांला दिसलं नाही.”

म्हातारीची तरुण मुलगी

आता पाच मिनिटांपूर्वी देवळात जातो, तर सगळीकडे लख्ख प्रकाश– पल्याडच्या डोंगरांचा रंग तांबूस काळपट! अन् हे ऽ उन्हाचे चट्टे च्या चट्टे!

अन् एवढ्यातल्या एवढ्यात, म्हणजे दर्शन करून घंटी बडवून बाहेर येतो तोवर अंधारायला लागलेलं. म्हणजे गंमतच आहे!

आपण पायऱ्यांवर बसतो. उगाच. काय कामधंदा नाही. आता घरीच जायचं. मग घाई कशाची? म्हणून बसतो, इकडे तिकडे बघत. असं बघावं. कधी काय गंमत नजरेला पडते बघावं. काहीच नाही तर त्या तिथल्या पोखरणीची शेवाळलेली हिरवी भिंत दिसते. ती बघावी, अधिकाधिक काळीकुट्ट होत जाताना.

असा मी बसलेला. तर समोरून कोणतरी येतोय. एक पासोडी पांघरलेला बुवा.

कितीतरी वेळ तो आपला येतोच आहे. पायानं चालवत नसल्यागत; आणि नसणारच चालवत त्याच्यानं. केवढं वय झालंय! नव्वदच्या घरातला असेल. सगळं अंग थरथरतंय. मान लटलट कापतेय.

तो येतोय तसतसं अधिकच अंधारून येतंय. म्हणून मला नीट दिसत नाही तो बुवा. फक्त ते हळूहळू चालणं नि लटलट कापणं तेवढं-

आला जवळ. बापरे! इतकं म्हातारं माणूस आपण तर कधी पाहिलं नाही बाबा. शरीराची नुसती चाळण झालेली, चामडीच्या झोळ्या. हातपाय कांड्यांसारखे. त्यांवर शिरांची जाळी, पांढऱ्या दाढीचं जंगल चेहऱ्यावर. केस निम्मे गळून गेलेले. उरलेल्यांच्या जटा झालेल्या. डोळे पिचपिच बघताहेत. काय दिसतं त्यांतून, कोण जाणे!

काठी टेकत टेकत म्हातारा कष्टानं एकेक पाऊल टाकतो. मध्येच काठी घसरते. तो धुळीत पडतो. आपल्याला दया येते. आपण जाऊन उठवतो त्याला. तो तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटत उठतो. जास्त चालवत नाही त्याच्यानं. तो तिथंच पायरीवर टेकतो.

आता चांगलंच अंधारून आलेलं. माझ्याजवळ कंदील असतोच. कारण आपण काय, गप्पा मारीत बसलो की बसलो. कधी घरी परतू, याचा नेम नाही. कंदील पेटवून आपण बसून राहातो. पोखरण आता पूर्णच काळोखी झालेली. भक्तमंडळीदेखील दर्शन करून घरी परत गेलेली. देवळात नगारा वाजत असलेला-'धर घम् धर घम्' करून.

म्हातारा तसाच पायरीवर बसून राहिलेला. अंगाचं मुटकुळं करून. मी म्हणतो, हा मेलाबिला की काय? हाक मारतो-"म्हातारबाबा-"

तो हूं की चूं नाही करीत. फक्त पासोडी अधिकच गच्च पांघरून घेतो. त्याअर्थी जिवंत असावा.

"म्हातारबाबा-"

"काय खायला दे बेटा. देव तुझं-"

माझ्याकडे काय असणार खायला? पण प्रसादाचे डाळे-मुरमुरे असतात, ते मी काढून देतो. दया येते. बिचारा कुठून पोटापुरतं मिळवणार या असल्या अवस्थेत? हातातलं सरळ तोंडात गेलं तर पुरवलं. कुठला हा? कुणी पोरंबाळं नाहीत याला? घर सोडून आला? कसं सोडलं याला याच्या माणसांनी? मी त्याला आणखी दहा पैशांची दया दाखवतो.

“कुठं जाणार तू? गावात?” म्हातारा थरथरत विचारतो.

कुठे जाणार? मघापासून विचार चाललाय. आज घरी जाऊच नये. गावाकडे जावं. नव्या आळीत नवा माल आलाय म्हणून ऐकलं. कधीपासून जावं जावं म्हणतोय, रात्री झोपायला, तिथल्याच माडीवर.

आपण खुल्लमखुल्ला सांगून टाकतो म्हाताऱ्याला. लाजायबिजायचं काम नाही. तो कोण आपला? आणि आपल्यासारख्या तरण्याबांड जवानानं नाही करायचे शौक तर करायचे कुणी? बरं, भिडेपोटी सांगून टाकावं याला, की घरीच जाणार आहे म्हणून, तर हे झेंगट सोबत घरीसुद्धा येईल.

“माडीवर जाणार?” म्हातारा विचारतो.

“हो. कां हो?” मी विचारतो.

काही वेळ म्हातारा गप्पच. मी पण लक्ष देत नाही. कंदील उचलून चालू लागतो, इतक्यात-

“गोष्ट ऐकायचीय?” म्हातारा विचारतो.

कंदिलाचा प्रकाश त्याच्या तोंडावर पसरलेला. त्यात तो जीर्ण चेहरा अगदी दगडांत खोदल्यासारखा दिसतो.

गोष्ट म्हटल्यावर मी पण खाली बसतो. भटजीच्या पोराला पाठवून म्हाताऱ्यासाठी डाळे-मुरमुरे मागवतो. म्हातारा थबकत-थबकत, थांबत-थांबत गोष्ट सांगू लागतो…

ते तिघे असेच संध्याकाळच्या वेळेस त्या गावात पोहोचले.

तिघांनी पहिल्यांदा काय केलं असेल, तर एक खानावळ गाठली.

तिघांपैकी जाड्या होता त्याचं नाव महेश्वर. जाड्या म्हणजे अगदी फार सुटलेला होता, अशातला भाग नाही. तसे तिघेही अंगापिंडानं मजबूत आणि अगदी ऐन जवानीतले होते. पण हा थोडा अंगानं सैल होता, एवढंच. अंगानं होता, तसाच जिभेनंही. एकसारखी त्याची बडबड चालू असायची. बोलताना गंमत करायचा, त्यामुळं कुणाला कंटाळा येत नसे. पण त्याच्या जिभेला खळ नव्हता हे खरंच.

दुसरा होता, तो होता थोडा लंबू. त्याचं नाव वेणुमाधव. त्याच्यात सांगण्यासारखं विशेष काहीच नव्हतं. दुसऱ्या दोघांसारखाच तोही तब्येतीनं चांगला होता, रूपानं देखणा होता, उंचीमुळं जरा अधिकच डोळ्यांत भरणारा होता.

तिसरा होता, तो मात्र जरा वेगळा होता. स्वभावानं शांत होता. बोले कमी, आणि विचारपूर्वक. त्याचं नाव होतं विद्याधर. जाड्या महेश्वराच्या बोलण्यात त्यालाही मौज वाटत असे, नाही असं नाही. पण तो इतर दोघांसारखा गडगडा हसत नसे. उगाच एखादी रेषा चेहऱ्यावरची इकडची तिकडे व्हायची, एवढंच. इतर वेळेस त्याचा चेहरा गंभीरच असे.

तसे तिघांचेही स्वभाव साधारण एकसारखेच होते. कारण तिघांचीही परिस्थिती साधारण सारखीच होती. तिघांचंही वय तरुण होतं. काय एखाददोन वर्षांचा फरक असेल तेवढाच. तिघेही दिसण्यात गुलजार. तिघांच्याही हातांत भरपूर पैसा खेळत होता. तिघेही भलतेच हौशी होते. तिघांचीही व्यसनं सारखीच होती. मुख्य म्हणजे तिघांनाही बायकांच्यात भलताच इंटरेस्ट होता.

मन मानेल तेव्हा ते आपला कामधंदा बाजूला ठेवून मन मानेल त्या गावी फेरफटका मारून यायचे. वाटेत भरपूर खायचं-प्यायचं आणि मुख्य म्हणजे त्या त्या गावात जो काय तरणा माल मिळेल, त्याच्याशी इष्कबाजी

करायचो, आपल्या रात्रीचं चटकदार वर्णन एकमेकांना ऐकवून मिटक्या मारायच्या.

तेव्हा, खानावळीत आल्याबरोबर तिघांनीही गावची चौकशी करायला सुरुवात केली.

आधी महेश्वरनं खानावळीच्या गलिच्छपणावरून भरपूर विनोद केले, आणि भरपूर शिव्याही दिल्या. या तिघांचे बलदंड अवतार पाहून मालकानं तिकडे लक्ष नसल्यासारखं दाखवलं. शिव्या दिल्या, तरी हीच मंडळी लठ्ठात लठ्ठ बिल करणार, ही त्याची खात्री, तेव्हा तो अधूनमधूनच लक्ष देत, मधूनच दात विचकत, आपलं काम करीत राहिला.

वेणुमाधवनं पोऱ्याला बोलावलं. आधी दोनचार शिव्या हासडल्या, आणि मग विचारलं, "इथं प्यायला काय मिळेल?"

प्रथम पोऱ्यानं, काही मिळणार नाही, असंच सांगितलं. मग त्या तिघांनी दिलेल्या शिव्या आणि वाचलेली मद्यप्रकारांची नामावळी ऐकून घेतली, आणि अखेरीस एक हातभट्टीची बाटली कुठूनशी आणून हजर केली. पाठोपाठ मटणाचा लाल रस्सा आणि पाव आले. कांद्याच्या बशा आल्या.

आता तिघे रंगात आले. बडबड करीत पिऊ-खाऊ लागले. मग अर्थात विषय निघाला, तो, त्या पलीकडच्या सुखाचा.

खानावळीत फारशी माणसं नव्हतीच. एकदोघेजण खात बसले होते, पण जेवणाची वेळ अजून झाली नव्हती. जे काय दोघेचौघे बसले होते, त्यांची अजिबात भीडभाड न बाळगता महेश्वरनं जागेवरूनच ओरडून, नाकपुडीवर बोट आपटीत, मालकाला विचारलं- "काय हो मालक-तुमच्या गावात काय व्यवस्था?"

मालकांनी सुरुवातीला हेही थट्टेवारी नेलं, आणि तो गल्ला खुळखुळावीत बसून राहिला.

पण डोक्यात हातभट्टी चढलेले ते तिघेही जण मोठमोठ्यानं आरडाओरडा करून तोच प्रश्न पुन्हा पुन्हा विचारीत राहिले. मालकाला काय उत्तर द्यावं ते समजेना.

पण एवढ्यात खानावळीच्या एका कोपऱ्यात बसलेलं एक काटकुळं गिऱ्हाईक उठलं, आणि या मंडळींच्या टेबलाशी येऊन बसलं.

त्या माणसाच्या अंगात मळकट राखी बुशकोट आणि पँट होती. वय फारसं नसावं, पण शरीर चिपाडासारखं झालं होतं. गालफडं बसली होती. केस भुरभुरीत, विस्कटलेले होते. डोळ्यांत मात्र एक तिखट चमक होती. नजर इकडे तिकडे भिरभिरत होती.

तो येऊन बसताच या तिघांनी नशेतच त्याचं स्वागत केलं. त्याला खाण्याचा, पिण्याचा आग्रह चालवला. पोऱ्याला सांगून त्याच्यासाठी मटण प्लेट मागवली. तोही अधाशासारखा तुटून पडला. वेणुमाधवनं आपल्या उष्ट्याच ग्लासात त्याला दारू ओतून दिली.

त्या फाटक्या माणसानं ग्लासातला एक मोठा जळजळीत घोट घेतला आणि डोळे मिचकावीत विचारलं, "तुम्हाला पत्ते पाहिजेत?"

तशी महेश्वरनं त्याला मिठीच मारली, आणि म्हणाला, "वा वा दोस्त, तू म्हणजे आमच्या हाकेला परमेश्वरासारखाच धावलास. बोल, तुझं कमिशन काय असेल ते देऊन टाकू आम्ही-पैशांचा प्रश्न नाही!"

"हो-पण माल मात्र एकदम कडक हवा हां!" वेणुमाधवनं सुचवलं, "उगाच लेचापेचा चालणार नाही! आमच्याकडे बघतोयस ना तू? रात्रभराची गॅरंटी हवी!"

विद्याधर फक्त एकच वाक्य म्हणाला-

“दिसायला मध्यम चालतील, पण निरोगी हव्यात!”

त्या काटकुळ्या माणसानं तिघांनाही शांत केलं. ग्लास रिकामा करून परत भरला आणि म्हणाला, “अगदी तुमच्याजोगता माल आहे साहेब. या गावंढ्या गावात त्याची किंमत आहे कुणाला, आणि असली तरी परवडणार कशी? तुमच्यासारखं शहरी माणूस येणार वर्षातून एखाददुसऱ्या वेळी, तेव्हाच त्यांची रात्र उजाडायची. तुमच्यासाठीच थांबल्यायत म्हणा ना त्या. अगदी कोऱ्याच्या कोऱ्या.”

असं म्हणून त्यानं चारसहा पत्ते दिले, त्या-त्या पोरींची वर्णनं केली, आणि मंडळींच्या तोंडाला पुरतं पाणी सुटल्याची खात्री झाली, तेव्हाच त्यांचे भाव सांगितले. आपलं कमिशन सांगितलं. एव्हाना मंडळी भलतीच मजेत आली होती, दुसरी बाटलीही संपून गेली होती. तेव्हा पैशाची घासाघीस करण्याच्या मन:स्थितीत कुणीच नव्हतं. “ती काही काळजी करू नकोस बघ.” महेश्वर पुन्हा पुन्हा बजावीत राहिला. “आम्ही सगळ्यांना खूष करून टाकू. त्यांना, आणि तुलासुद्धा. वाटलंय काय!”

“आणखी एक स्पेशल चीज आहे बघा.” फाटका गृहस्थ अधिकच हुशारून म्हणाला.

“स्पेशल चीज? भाव बोल. भाव बोल.” महेश्वर एकदम ओरडला. वेणुमाधवनं पण त्याला साथ दिली.

“भाव आपल्याला ठाऊक नाही. कारण आपण तिकडे गेलेलो नाही. पण ऐकलं आहे, की पोरगी मोठी खूबसूरत आहे. अगदी रंभा-मेनकेला मागं टाकेल असं रूप आहे. नुसतं रूपच नाही पण माणसाला पागल करण्याची हुषारी आहे तिच्यात. रात्र कशी गेली, ते कळायचं सुद्धा नाही.”

सगळे थक्क होऊन ऐकत होते. ओठावरून जिभा फिरवीत होते. शरीरं तापली होती. डोळे चमकू लागले होते.

“हे आपलं तुम्हाला विशेष इंटरेस्ट म्हणून सांगितलं.” राखाडी बुशकोट म्हणाला, “पण तुम्ही तिच्याकडं जा, असं काही आपण सांगणार नाही.”

“कां?” विद्याधरनं विचारलं.

“कां ते पण सांगता येणार नाही. फारच विचित्र कारण आहे.”

“विचित्र?”

“हो, फारच विचित्र.” तो काटकुळा माणूस म्हणाला आणि गप्पच बसून राहिला.

क्षणभर खानावळीत विचित्र शांतता पसरली. बाहेर संध्याकाळही उलटून गेलेली. सारं शांत-शांत होऊ लागलेलं.

“असं एवढं काय आहे पण?” शेवटी विद्याधरनं विचारलं.

“खरं सांगू? काय आहे ते मला देखील ठाऊक नाही. पण लोक बोलतात की, तसलं काहीतरी आहे. पलीकडचं. गावाबाहेर डोंगराच्या पायथ्याशी ते घर आहे. रात्री दिवा दिसतो तिथला. माणसं फार नाहीत त्या घरात. ही सुंदर मुलगी आणि तिची म्हातारी आई, आणखी एखाददुसरा गडीबिडी असेल, बस्स एवढेच; पण ती माणसं इथे लोकांत मिसळत नाहीत अजिबात, म्हणून सगळ्यांना वाटतं, की त्या घरात काहीतरी विचित्र आहे. कुणी तिकडे जात नाही. पण रात्री कुणीकुणी त्या सुंदर मुलीला खिडकीत उभं असलेलं पाहिलंय. असलं सौंदर्य पृथ्वीवरचं नाहीच म्हणतात. पण तिकडे काहीतरी भयंकर आहे, खास! शहाणे असाल तर

जाऊ नका!”

तिघेही खोखो हसत सुटलो. महेश्वरनं तर तिथल्या तिथे आपण आज रात्री त्या घरात जाऊन येणार असल्याचा निश्चय जाहीर केला. त्याच्या जाडजूड शरीरात हातभट्टी सगळीकडे इतकी मस्त पसरली होती, की त्याला आता कशाची भीती वाटत नव्हती, की कशाची पर्वा नव्हती. त्याला फक्त एकच दिसत होतं. त्या विलक्षण घरातल्या त्या रूपवतीचं शरीर!

विद्याधरनं आपणहूनच सांगून टाकलं, की आपण तिसऱ्या दिवशी जाऊ. वेणुमाधव दुसऱ्या दिवशी जायला तयार झाला. तिघांनीही त्या फाटक्या माणसाला सांगितलं, “एकदोन दिवसांत आम्हांला भेटा तुम्ही. मग लोकांनी ओवाळून टाकलेल्या त्या जागेत जाऊनदेखील आम्ही बहाद्दर लोक जिवंत परत आल्याचं तुम्हाला दिसेल.”

त्या माणसानं थोडे पैसे आगाऊ घेतले, आणि त्या तिघांची राहण्याची व्यवस्था केली. त्यांचं जे काय थोडंफार सामान होतं, ते तिथं नेऊन टाकलं. तिघेही टॉर्च घेऊन बाहेर पडले. सकाळी याच खानावळीत भेटून, चहा घेऊन, मग राहायच्या ठिकाणी परतायचं, असं ठरवून!

महेश्वर आपलं किंचित झोकांडणारं शरीर सावरीत सावरीत काळोखातून चालू लागला आणि वेणुमाधव नि विद्याधर दोघेही सिगरेट ओढीत एका झाडाखाली उभे राहिले. वेणुमाधव म्हणाला- “विद्या, जाड्या गेलाय खरा, पण धडपणी आला म्हणजे मिळवलं.”

“न यायला काय झालं? त्याला कोण खातंय?”

“तसं नाही रे. पण आपल्याला साला भीती वाटते. भलतंच काय असलं मग रे? तो फाटक्या काय म्हणत, होता ऐकलंस ना?”

“पण खरं काय आहे ते नाहीच ना आलं सांगता त्याला? अरे असून असून काय असेल? ते घर झपाटलेलंबिपाटलेलं असेल. कुठं कसले आवाज ऐकू येत असतील, नाहीतर कुठं कोण रडत असेल. आपला जाड्या काय लक्ष देणारेय तिकडे? आधीच त्याला जाम चढली आहे. सुम्मध्ये आपलं काम करील, झोपून जाईल.”

“बघू या. पण उद्या तो परत येईपर्यंत आपल्या काही जीवात जीव नाही.”

एवढं बोलून दोघे दोन पत्त्यांवर निघून गेले.

इकडे महेश्वर काळोखातून डुलत डुलत निघाला. बाहेर थंडी होती. पण अंगात हातभट्टीची जोरदार ऊब असल्यामुळं त्याला ती बिलकूल जाणवत नव्हती. पाय जमिनीवर उचलले जाताहेतसं वाटत होतं. स्वत:च्याच तालात मजेत चालत तो डोंगराच्या पायथ्याशी आला. पाठीमागे काळाकभिन्न डोंगर उंच चढत गेलेला, आणि त्याच्या सुरुवातीला हे माडीवालं चिमुकलं घर! पत्ता शोधण्याचा प्रश्नच नव्हता. आजूबाजूला दुसरं घरच नव्हतं. बाकी सगळ्या गुडूप अंधारात या घराच्या माडीवर एकच एक दिवा लुकलुकत होता. त्यामुळं ते लांबूनच दिसण्यात येत होतं.

महेश्वरनं दरवाजा ठोठावला. काही उत्तर आलं नाही. पुन्हा ठोठावला.

काही क्षणांनी दार उघडलं, एका जख्ख म्हातारीनं.

तिच्या हातातल्या कंदिलाच्या उजेडात तिचं जीर्णशीर्ण झालेलं विद्रूप शरीर पाहून महेश्वर क्षणभर दचकलाच. मग स्वत:ला सावरून म्हणाला,

“रात्रौ मुक्कामाला आलोय.”

म्हातारी थरथर कापत म्हणाली, “या, आत या.”

आत गेल्याबरोबर महेश्वर इकडे तिकडे पाहायला लागला. नशेनं भरलेल्या त्याच्या डोक्यात काही हिशेब पक्के होते. या घरात काहीतरी विचित्र आहे, आणि ते आपल्या नजरेला पडणार आहे, यासाठी त्यानं मनाची तयारी केली होती. महेश्वर गमत्या होता. पण भित्रा बिलकुल नव्हता. असता, तर तो आपणहून पहिल्या रात्री इथे यायला तयार झाला नसता. सोबतीशिवाय इथवर आला नसता. मात्र आपल्याला काही तरी विलक्षण प्रकार पाहायला मिळेल आणि तो दुसऱ्या दिवशी तिखटमीठ लावून सोबत्यांना सांगता येईल, अशी त्याला आशा होती.

पण प्रत्यक्षात मात्र त्याला काहीच विचित्र दिसलं नाही. कसला आवाज नाही, की कसली न पटण्याजोगी हालचाल नाही. त्याचं जेवण झालेलं आहे, हे कळल्यानंतर म्हातारीनं त्याला सरळ माडीवर गादी घालून दिली. त्याची अपेक्षा समजायला तिला बिलकूल त्रास पडला नव्हता.

बिछान्यावर पडल्यापडल्या महेश्वर खोलीचं निरीक्षण करू लागला. खोलीत नजरेत भरण्यासारखं काहीही नव्हतं. मागासलेल्या गावातल्या त्यातल्या त्यात सुखवस्तू घरांमध्ये असते, तशी बेताची सजावट खोलीत होती. मण्यांची तोरणं भरलेली चित्रं, वगैरे.

महेश्वर कान देऊन ऐकत होता. पण बाहेर रातकिड्यांच्या किरकिरीशिवाय दुसरं काही ऐकू येत नव्हतं. डोक्यातल्या नशेमुळं त्याला हळूहळू पेंग येऊ लागली.

त्याला फार वेळ वाट पाहावी लागली नाही. थोड्याच वेळात पाण्याचा तांब्या भांडं घेऊन म्हातारीची तरुण सुंदर मुलगी वर आली.

तिला पाहाताच महेश्वराची झोप खाड्दिशी उडाली. शरीराचा रोमरोम जागा झाला. असलं अलौकिक सौंदर्य त्यानं कधीच पाहिलं नव्हतं. शहरातल्या नटव्या बाहुल्यांच्या रंगरंगोटीचा त्याला वीट आला होता. पण कुठल्याही रंगरंगोटीशिवाय हे रूप इतकं देखणं, इतकं प्रसन्न करणारं होतं, की स्त्रीचं खरं सौंदर्य इतक्या वर्षांत आपण आज प्रथमच पाहिलं, असं त्याला वाटलं…त्या जख्ख म्हाताऱ्या थरथरत्या देहाला इतकी सुंदर निर्मिती कधीकाळी करता आली असेल, याच्यावर त्याचा विश्वासच बसेना…

इतर लाजऱ्या मुलींसारखा तिने दिवा मालवण्याचा आग्रह धरला नाही. महेश्वरला ते शरीर नुसतं स्पर्शायचं नव्हतं, तर त्याचं ते दिव्य सौंदर्य डोळे निवेपर्यंत पाहायचंही होतं. दिवा न मालवताच त्यानं कपड्याची मध्यस्थी आपल्या हातांनी दूर केली. मंद प्रकाशात ते देखणेपण अधिकच शोभिवंत वाटू लागलं. नितळ शरीर…त्यावर मंद केशरी दीपकळीचा रंग…मादक चेहरा…फुललेलं तारुण्य झाकण्याचा प्रयत्न करणारे मोकळे लांबसडक काळेभोर केस…महेश्वरच्या मस्तकातल्या नशेला या नवीन नशेने अधिकच बेबंद केलं.

चेहऱ्यावरून लाजवट दिसणारी ती तरुणी शृंगाराच्या कलेत त्याच्याहीपेक्षा पारंगत दिसली. शृंगार मोहक होईल इतकीच लाजेची डूब…त्यापलीकडे मुक्त विहार! जणू महेश्वरच्या कल्पनेतच केवळ नांदणारी स्त्रीसुखाची मूर्ती तिचा आकार घेऊन समोर आली होती. त्याला हरप्रकारानं संतुष्ट करत होती…

रात्री कधीतरी न राहवून त्यानं आपल्या बोटातली अंगठी तिच्या बोटात सरकवली…आणि सकाळी निघताना म्हातारीच्या हातात नोटांचा जुडगा दिला. म्हातारीनं तो पुन्हा पुन्हा कपाळाला लावला, आणि ‘येत जा असंच कधी’ म्हणून त्याला निरोप दिला…

जड शरीरानं आणि हलक्या मनानं महेश्वर खानावळीकडे निघाला. रात्रीच्या जागरणानं शरीर सुस्तावलं होतं. पण मनावर एक नवीन धुंदी चढली होती. नाचावं, गावं, असं वाटत होतं. तो स्वत:शीच हसत होता. गुणगुणत होता.

खानावळीत वेणुमाधव आणि विद्याधर त्याची वाटच पाहात होते. त्याला हसत गात येत असलेला पाहून वेणुमाधवचा जीव भांड्यात पडला. निर्धास्त मनानं त्यांनी चहाची ऑर्डर दिली.

चहा पितापिता महेश्वरनं त्यांना सगळा प्रकार अधिकच खुलवून सांगितला. "काय सांगू दोस्त– आपल्याकडे अधिक शब्दच नाहीत बघ वर्णन करायला." शेवटी तो थकून म्हणाला.

"तू वर्णन करूच नकोस." वेणुमाधव म्हणाला, "आज मी प्रत्यक्ष जाणार आहे, तेव्हा अनुभव घेऊन पाहीन." त्याच्या मनावरचं दडपण गेल्यामुळं तो अधिकच उत्साहानं बोलत होता... "तू अंगठी दिलीस काय, मी कर्णफुलं देईन. आठवण काढायला पाहिजे तिनं आपली जन्मभर. काय?"

विद्याधर जरा गप्पच होता. सारं ऐकून घेतल्यावर त्यानं सावकाश विचारलं, "पण महेश्वर, खरंच का तुला तिकडे काहीच विचित्र आढळलं नाही?"

"या विद्याचं असंच. काळजी केल्याशिवाय याला राहावतच नाही." वेणुमाधव म्हणाला. काल आपणच किती धास्तावलो होतो, हे तो आता पार विसरून गेला होता.

मंडळी नदीवर पोहायला गेली. येऊन पुन्हा पिण्याचा कार्यक्रम झाला. जेवल्यानंतर सगळ्यांनी ताणून दिली ती थेट संध्याकाळपर्यंत. मजा करता करता दिवस मावळला होता, आणि खरी मजा तर रात्रीच येणार होती!

पण आज रात्री महेश्वर दुसरीकडे कुठेच गेला नाही. नुसता झोपून राहिला. दिवसभर त्याच्या थट्टामस्करीला नुसता ऊत आला होता. आताही तो हसतच होता. हसतहसतच म्हणाला..."हम किधरभी नही जायेंगे यार...कालच्या मजेची चव अजून तोंडावर आहे. ती आज दुसरीकडे कुठं जाऊन फुकटमें बिघडवायची नाहीये!"

त्याच्या या बोलण्यानं अधिकच अधीर होऊन, वेणुमाधव ठरल्या वेळेच्या जरा आधीच निघाला. विद्याधरही आज एका नव्या पत्त्यावर गेला. मात्र जाण्यापूर्वी वेणुमाधवला पुन्हा पुन्हा बजावायला तो विसरला नाही-

"काही वेगळं दिसतं का, इकडे लक्ष ठेव-लक्ष ठेव!"

पण वेणुमाधवला काहीच वेगळं दिसलं नाही, तर तो सांगणार काय? दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा तिघंही खानावळीत एकत्र जमले, तेव्हा आदल्या दिवशीचाच प्रकार! वेणुमाधव तोंड फाटेस्तवर स्तुती करीत बसला गावाबाहेरच्या त्या घराची! म्हणाला, "काय सांगू दोस्त, मी तिला कर्णफुलं दिली-पण तिनं मला दिलेल्या सुखापुढं ती काहीच नव्हती. राजा असतो, तर मुकुट दिला असता डोक्यावरचा उतरून!"

त्याच्या जोडीला महेश्वरची बडबड चालूच होती. एक रात्र मध्ये जाऊनसुद्धा त्याच्या सुखाची गोडी किंचितही कमी झाली नव्हती. किंबहुना ती आता आठवणीनं दिवसेंदिवस वाढतच जाणार होती!

विद्याधरला आता कधी एकदा रात्र पडतेसं होऊन गेलं. रात्री काय काय अनुभवायला मिळेल, याच्याच विचारांच्या गुंगीत त्यानं सबंध दिवस काढला. गेल्या दोन रात्री त्याला मिळालेल्या पोरी वाईट नव्हत्या, पण त्याच्या दोन्ही मित्रांच्या तुलनेनं त्यांच्यात काही दम नव्हता. आपलं, रात्री फुकट गेल्या नव्हत्या एवढंच! पण खरी गंमत येणार होती ती आज रात्री!

त्यानं त्या गावाबाहेरच्या मुलीला देण्यासाठी महागातल्या बांगड्या घेतल्या. हो, पुढंमागं इथे परत आलो, तर तिनं तिघांमध्ये आपल्यालाच अधिक सुख द्यायला हवं! तेव्हा आपला वाण सगळ्यांत मौल्यवान हवा!

त्याच दुपारी, ते उतरले होते तिथं, तो फाटका माणूस येऊन गेला. तिघांनीही त्याला डोळे फाटतील एवढं जबर कमिशन दिलं. गावाबाहेरचं ठिकाण सुचवल्याबद्दल तर महेश्वर आणि वेणुमाधव यांनी त्याचे पायच

धरायचं बाकी ठेवलं. शेवटी तोच ओशाळून म्हणाला, “लोक साले असेच एखाद्याला बदनाम करतात! काय काय पिकवलं होतं त्या घराबद्दल! ती पोरगी नसेल बघली एखाद्याला, दुसरं काय? बसला असणार तो दुसऱ्या दिवसापासून गावभर बोंबलत त्या दोघींच्या नावानं!”

शेवटी ज्या रात्रीची विद्याधर सकाळपासून वाट पाहात होता ती एकदाची आली! महेश्वर आणि वेणुमाधव यांच्या जे लक्षात आलं नसेल, ते आपल्या नजरेतून चुकता कामा नये, म्हणून तो पहिल्यापासूनच सगळं बारकाईनं पाहात होता.

पण त्याच्या चौकस नजरेलाही नवीन काहीच सापडलं नाही. तो देखील त्या दोघांसारखाच त्या मुलीच्या सौंदर्यानं दिपून गेला. तिला जवळ घेऊन त्यानं विचारलं, “तुझ्या बोटातली अंगठी कुणाची? माझ्या मित्राची, होय ना?”

तिनं स्मित करीत म्हटलं, “होय.”

तिच्या कर्णफुलांना हलकेच स्पर्श करून त्यानं विचारलं, “ही कर्णफुलं-काल आलेल्या माझ्या मित्रानं दिली ना?”

तिनं हलकेच मान डोलावली, त्यासरशी कर्णफुलं जागच्याजागी डुलली.

मग त्यानं तिच्या हाताचं चुंबन घेतलं आणि खिशातल्या बांगड्या त्यात चढवीत म्हणाला- “या मी आणल्या. त्या दोघांपैक्षाही अधिक मौल्यवान. राहील लक्षात?”

ती हसली, आणि तिनं आपणहून त्याला गच्च मिठी मारली.

ती रात्र मग एखाद्या स्वप्नासारखी गेली. एकमेकांमध्ये हरवून जाणारी दोन गुळगुळीत नितळ उष्ण शरीरं. शरीरांना बसणारे हलके धक्के…आणि असह्य होणारा प्रचंड आवेग. मधेच डोळ्यांवरून फिरणारी गुंगीची मोरपिसं…आणि पुन: पुन्हा…पुन: पुन्हा पांघरून घेतलेली शरीराची ऊब…अर्ध्या मिटल्या डोळ्यांसमोर ओठ दिसत होते… डोळे दिसत होते…अंगावरून केस पसरत होते…भास होत होता की दहिवरात गुलाब-पाकळ्या भिजताहेत…पाखरं घुमताहेत…खोल पाण्यात मासोळ्या सूर मारताहेत… मोरानं पिसारा उघडला आहे…या भासांमधेच कधीतरी पहाट विरघळून गेली आणि हवेतली थंडी वाढली…

तो जागा झाला तेव्हा बाहेर चांगलंच उजाडलं होतं. काही क्षण तो तसेच डोळे मिटून पडला आणि रात्रीचं सुख आठवीत राहिला. ती अर्थातच खाली निघून गेली होती. त्याच्या मनात येत राहिलं…लोक बोलतात… काय हवं ते बोलतात…त्यांच्यावर विश्वास ठेवला नाही, हे फार उत्तम झालं…नाहीतर नशिबीचं हे स्वर्गसुख टळणार होतं…

विद्याधरनं कपडे चढवले आणि तो निघाला. एवढ्यात अपेक्षेप्रमाणे ती दार उघडणारी, गादी घालून देणारी म्हातारी त्याच्यासमोर आली. इतका वेळ जशी काही ती त्याच्या आठवणीतूनच गेली होती. कोण असेल ही तिची? आई नक्कीच नाही… ही किती म्हातारी आहे…आजी असेल ही बहुधा…आईची आई…

म्हातारीनं पैशासाठी हात पुढं केला.

–विद्याधरनं पैशाचं पाकिट खिशातून काढलं. त्यातून एक जुडगा बाहेर काढला.

तो, तो जुडगा तिच्या हातावर ठेवू लागला.

आणि अचानक त्याचा हात हवेतल्या हवेत थबकला.

म्हातारीच्या हातात त्यानं काल रात्री चढवलेल्या बांगड्या होत्या.

डोक्यावरचा पदर पडला होता. केसांच्या जटांमधून कानातली कर्णफुलं डोकावत होती.

काल रात्री काळोखात न दिसलेल्या बोटात किमती अंगठी होती…

अचानक त्याला एका भयंकर सत्याचा उलगडा झाला…

त्यानं पैसे तिथेच फेकले आणि तो जिवाच्या आकांतानं त्या घरापासून दूर पळत सुटला.

त्याला पळत येताना पाहून खानावळीच्या बाहेर ओट्यावर बसलेले महेश्वर आणि वेणुमाधव उठून उभे राहिले…

विद्याधरला धाप लागली होती. धावण्याच्या श्रमानं आणि भीतीनं त्याच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. कसाबसा तो एवढंच बोलला…

"ती…ती म्हातारी जखीण…आपल्यासारख्यांच्या तारुण्यावर जगणारी…"

त्याच्यानं पुढं बोलवेना.

"जखीण…आपण जखिणीच्या शरीराशी-जखिणीच्या शरीराशी…आपण रात्रभर…" एवढंच वेणुमाधव जेमतेम बोलू शकला. दुसऱ्याच क्षणी त्याचे डोळे भीतीने तारवटले. हात छातीशी गेला. तोंडातून एक चीत्कार निसटला आणि त्याचा निष्प्राण देह खाली कोसळला.

"आपण मजा केली…रात्रभर…एका थेरड्या जखिणीबरोबर…" महेश्वर जोरजोरानं हसत सुटला. त्याचं हसणं थांबेचना. कितीतरी वेळ तो नुसता हसतच होता. दम लागून तो हसायचा थांबला, तेव्हा त्याला आजूबाजूचं काहीही समजेनासं झालं होतं.

"महेश्वरचं पुढं काय झालं ठाऊक नाही." पासोडीवाला म्हणतो, "वेणुमाधवला कोणी अग्नी दिला, तेही ठाऊक नाही."

"आणि विद्याधर? त्याचं काय झालं?" मी विचारतो.

"विद्याधर तुझ्या समोर उभा आहे बेटा." पासोडीवाला म्हातारा म्हणतो.

मला फारसं आश्चर्य वाटत नाही.

"गोष्ट चांगली आहे." मी म्हणतो, "पण आजच्या काळात असं काही घडत नाही. तुमच्या वेळची गोष्ट वेगळी होती. पन्नास-साठ वर्षांपूर्वीची."

"पन्नास-साठ?" म्हाताला विषण्ण हसतो, पन्नास-साठ वर्षांपूर्वीची नाही बेटा. बरोबर पंधरा दिवसांपूर्वीची आहे. माझं तारुण्य त्या जखिणीनं शोषलंय बेटा. तिच्याबरोबर झोपल्याची भयंकर किंमत मी देऊन बसलोय. पहिले तीन दिवस मला काहीच झालं नाही. पण चौथ्या दिवशी सकाळी पाहतो तर माझे सारे केस पांढरे झालेले…आणि त्यानंतर आठवड्याभरात माझा हा जीर्ण अवतार झाला… तुला आता दिसत असलेला! लक्षात घे…पंधरा दिवसांपूर्वी मी तुझ्याच एवढा होतो…बरोबर तुझ्या एवढाच!"

मला आता त्या पासोडीवाल्याच्या नजरेला नजर देववत नाही.

कुणास ठाऊक, त्यानं सांगितलं ते खरं की खोटं? त्याच्या त्या अद्भुत हकीगतीला त्याच्याच स्वत:च्या

शब्दांशिवाय दुसरा कसलाही पुरावा नाही. कदाचित् त्या बुढ्ढ्याचा आटाच सटकलेला असेल, आणि सगळीच दंतकथा त्यानं रचून सांगितली असेल असेलही; पण एखादवेळी…

मी मुकाट्यानं कंदील उचलतो, आणि चालू लागतो.

कसा कोण जाणे, माझा बेत आता बदललेला असतो. नव्या पेठेकडे न जाता आता मी सरळ घराच्या दिशेनं पावलं उचलू लागतो.

इंटरव्हू्य

: १ :

ज्या वाचकांना रक्ताची शिसारी येते, त्यांना आम्ही प्रथमच आश्वासन देऊन ठेवतो की, या कथेत रक्ताचा एक थेंबदेखील सांडलेला नाही. कथा अत्यंत साधी आहे. तिच्यात तुटलेली मुंडकी नाहीत, की रक्ताच्या थारोळ्यात पडलेले देह नाहीत.

किंबहुना कथेचा विषयदेखील तुमच्या आमच्या दैनंदिन जगातला, ज्यामध्ये भयाचा लवलेशही नाही असा आहे. -नोकरीसाठी दिलेला इंटरव्हू्य!

एकदम साधा, सरळ, रोखठोक विषय! बिनरक्ताचा, शाकाहारी.

कथानायक-कुणी जगन्नाथ नावाचा तरुण. विवाहित. –म्हणजे प्रेमाबिमाचे लफडे नाही. बायको शालिनी. दोघांचेही एकमेकांवर गाढ प्रेम. म्हणजे प्रेमाचा त्रिकोणबिकोणदेखील नाही.

जगन्नाथ चांगला सेकंडक्लास ग्रॅज्युएट आहे, पण त्याला नोकरी मिळत नाही. तशी त्याला एक नोकरी होती; पण ती रिट्रेन्चमेंटमध्ये सुटली. त्यामुळे वयाची अट सगळीकडे आड येते. बायको शाळेत शिक्षिका आहे. तिच्या एकटीच्या पगारावर आज कसेबसे निभते आहे. जगन्नाथची नोकरीची खटपट चालूच आहे. पण अजून काही जमत नाही.

आणि एके दिवशी अचानक त्याला एक पत्र येते :

‘इकडे एक व्हेकन्सी आहे. ताबडतोब इंटरव्हू्य द्यायला हवा. पत्र मिळताक्षणी निघून ये.’

पत्राखाली वेलबुट्टीदार सही होती. वाचणे अवघड गेले. प्रयत्नांती लागली : विमल दशरथ.

पत्ता धरमपूरचा होता.

दशरथ मंडळी जगन्नाथाच्या लांबच्या नात्यातली होती. म्हणजे विमलचे यजमान त्याचे कुणीतरी दूरचे मामा लागत होते. दोनतीन वर्षांपूर्वीच ते वारले. पण घरची श्रीमंती बरीच होती. सगळ्या धरमपूरमध्ये त्यांचे धागेदोरे होते. मूलबाळ काही नव्हते आणि सबंध इस्टेटीची मालकीण आता विमलच होती.

अर्थात हे सारे जगन्नाथ नुसते ऐकून होता. प्रत्यक्षात मात्र गेल्या काही वर्षांत त्याची दशरथ-कुटुंबाशी भेटगाठदेखील नव्हती.

म्हणूनच विमलचे पत्र पाहून त्याला आश्चर्य वाटले. आपली परिस्थिती तिच्या कानावर गेलेली असावी, याचे नवल वाटले, पण त्यात विशेष काही नव्हते. कुणा ना कुणाच्या तोंडातोंडी असल्या बातम्या प्रवास करतातच. आपल्याला नाही का मामा वारल्याचे कळले?

आपली नड त्यांच्यापर्यंत पोहोचावी याचे जगन्नाथला थोडे वैषम्य वाटले; पण गरजेच्या वेळी कुणीतरी हात पुढे केला, याचा आनंदही झाला.

दशरथांची प्रतिष्ठा लक्षात घेता, ही नोकरी मिळाल्यासारखेच होते. तसे नसते तर मुद्दाम कुणी इतक्या लांबून इंटरव्हू्यसाठी थोडेच बोलावील?

पल्ला जरा लांबचा होता. पण नोकरी चांगली असली, तर तिथेच स्थायिक व्हायलाही हरकत नव्हती. नाहीतरी सगळ्यांनी मुंबईच्या गर्दीत अडचणी सोसत राहण्यात मुद्दा काय?

शालेनोलाही हे पटले. जगन्नाथने ताबडतोब निघायचे, आणि पुढे सगळे मनासारखे जमले तर शालेनोला बोलावून घ्यायचे, असे ठरले.

दुसऱ्याच दिवशी जगन्नाथने धरमपूरची गाडी पकडली.

: २ :

जगन्नाथ धरमपूर स्टेशनवर उतरला तेव्हा संध्याकाळ झाली होती. साऱ्या वातावरणात एक मळकट उदासवाणा प्रकाश भरून राहिला होता. आकाशात काळ्या ढगांचा एक डोंगर कलंडला होता, आणि आता कधीही पाऊस कोसळेल, असे वाटत होते.

धरमपूरला उतरणारे फारसे पॅसेंजर नव्हते. तरीदेखील पाच-सहा टांगे बाहेर आशेने उभे होते. जगन्नाथ बॅग घेऊन स्टेशनबाहेर पडताच सगळे टांगेवाले त्याच्या जवळ जमा झाले.

आणि मग एक चमत्कार घडला.

जगन्नाथने खिशातून पत्र काढून त्यावरचा पत्ता वाचला. तत्क्षणी सगळे टांगेवाले त्याच्याकडे पाठ फिरवून निघून गेले, आणि लांब उभे राहून आपापसांत हलक्या आवाजात चर्चा करीत राहिले.

हा काय प्रकार आहे, हेच जगन्नाथला कळेना. मग तो स्वत:च त्यांच्याजवळ गेला आणि त्याने हे ठिकाण कितीसे दूर आहे, अशी विचारपूस केली. प्रथम त्याच्याकडे दुर्लक्ष केले गेले आणि मग 'बहोत दूर है' असे उत्तर मिळाले. त्यांची एकमेकांत, हलक्या आवाजात चर्चा चालूच राहिली.

जगन्नाथला नवल वाटले. आपल्याशिवाय दुसरे एकही गिऱ्हाईक नसताना आणि 'सवारी' इतक्या दूरची असतानाही टांगेवाल्यांनी आपल्याबरोबर यायला तयार कां होऊ नये, हे त्याला समजेना. काही वेळ तो तसाच खोळंबून राहिला. कारण जवळपास दुसरे एकही वाहन नव्हते.

अखेरीस त्याची दया येऊनच की काय, त्यांच्यातला एक दांडगटसा तरुण टांगेवाला त्याच्या जवळ आला आणि म्हणाला, "चलो जायेंगे. लेकिन-"

आता हा काहीतरी भरमसाट आकडा सांगणार, या अपेक्षेने जगन्नाथने श्वास रोखून धरला. पण टांगेवाल्याचा 'लेकिन' दुसराच होता. तो जगन्नाथला दशरथांच्या बंगल्याच्या दारात सोडायला तयार नव्हता. थोडे अंतर अलीकडेच उतरून पुढे दोन-तीन मिनिटे चालावे लागणार होते. 'असे कां?' असे जगन्नाथने विचारताच 'जानवर जाता नही' असे उत्तर मिळाले.

जगन्नाथने फारसा वाद घातला नाही. कारण दुसरा कोणी टांगेवाला यायलाच तयार नव्हता. तो मुकाट्याने टांग्यात जाऊन बसला. मात्र टांगेवाल्यांच्या वागणुकीचे आणि त्या विचित्र अटीचे त्याला पुन्हापुन्हा आश्चर्य वाटत राहिले.

आता चांगलाच काळोख पडला होता. दशरथांचा बंगला गावाबाहेर होता, आणि गाव सोडल्यानंतर वाटेने दोन्ही बाजूंना जंगल होते. दूर कुठेतरी एखाद्या खोपटातला दिवा मिणमिणताना दिसे, तेवढाच.

जंगलात कोल्हेकुई सुरू झाली होती. आजवर शहरात राहिलेल्या जगन्नाथला तर ती ऐकून बेचैन व्हायला झालेच; पण टांगेवाल्यानेही टांग्याचा वेग वाढवला. जसे काही शक्य तेवढ्या लवकर 'सवारी' सोडून त्याला परत गाव गाठायची घाई झाली होती. रस्ता तसा खराब नव्हता, पण काळोख आणि वाढती कोल्हेकुई यामुळे मन उगाच धास्तावल्यासारखे झाले होते.

आणि एकाएकी कोल्हेकुई थांबली. सगळीकडे शांत झाले. बारीक पाऊस टांग्याच्या छपरावर वाजू

लागला. पावसामुळेच कोल्हेकुई थांबली होती; पण त्या आवाजाचीदेखील सोबत नाहीशी झाल्यामुळे सारे काही अधिकच निर्जन वाटू लागले. त्यातून टांगेवालाही घुम्म बसून राहिला होता. तोंडातून चकार शब्द न काढता त्याने सारे लक्ष टांग्याच्या वेगावर केंद्रित केले होते.

"वो रहा 'दशरथ मॅन्शन'!" तो एकदम ओरडला.

जगन्नाथने बाहेर डोके काढून पाहिले. डोंगरउतारावर एक काळाकभिन्न वाडा एकटाच उभा होता. एकच छोटासा दिवा जळत असल्यामुळे तो अधिक भयाण वाटत होता.

बाहेर पडताना डोके भिजल्यामुळे जगन्नाथाला पावसाची जाणीव झाली. या पावसात बंगल्यापर्यंत चालत जायचे म्हणजे चिंब भिजायला होणार होते. पण त्याशिवाय इलाज नव्हता. कारण टांगा आधीच थांबला होता.

त्याने फाटकापर्यंत पोहोचवण्यासाठी टांगेवाल्याला विनवले.

टांगेवाला काहीच बोलला नाही. त्याने घोड्याला चाबूक मारला. घोडा जेमतेम चार पावले चालला आणि मोठ्याने खिंकाळून मागच्या पायांवर उभा राहिला. "देखा?" टांगेवाल्याने शांतपणे विचारले, आणि घोड्याला आणखी एक फटका मारला. पण घोडा इंचभरही पुढे सरकला नाही.

घोड्याला कशाचीतरी भीती वाटत होती. ते जनावर कशालातरी बुजत होते.

पण कशाला?

जगन्नाथ हबकून गेला; पण अधिक काहीच न बोलता त्याने पैसे दिले आणि तो पावसातून चालू लागला.

टांगा वळला आणि वेगात गावाच्या दिशेने परतला. घोड्याच्या टापा अस्पष्ट होत ऐकू येईनाशा झाल्या, तशी जगन्नाथाला अधिकच एकटेएकटे वाटू लागले.

: ३ :

'दशरथ मॅन्शन' एक प्रचंड दगडी वाडा होता. एखाद्या जुनाट किल्ल्यासारखा त्याच्या मांडणीचा थाट होता. सारे काही ओबडधोबड आणि रुंद. कुठे कसली कलाकुसर नाही की रेखीवपणा नाही. अर्थात हे नुसते जगन्नाथला जाणवलेले. नाहीतर काळोखात तो वाडा नीटसा दिसतच कुठे होता?

वाड्याच्या मागे एक पहाड चढत गेला होता. पण आजूबाजूला एकही घर नव्हते, की खोपट नव्हते. आसपासची जागा मोकळी-नुसतीच मोकळी होती. एक झाडसुद्धा तिथे वाढलेले नव्हते. सारे जसे काही एखाद्या मसणवटीसारखे निपचित, मृत पडले होते. जिवंतपणाची, टवटवीतपणाची एकही खूण तिथे नव्हती.

एकाएकी पाऊस थांबला, आणि कोल्हेकुई परत सुरू झाली.

पायऱ्यांशी पोहोचेपर्यंत जगन्नाथ पुरता भिजून गेला होता.

मघा लांबवरून दिसलेला प्रकाश, आत कुठेतरी लावलेल्या दिव्याचा होता. पण ओटा अंधारातच होता. त्या अंधारात 'कुई कुई...खळ् खळ्...' अशा तालात काहीतरी हलत होते.

पांढरेशुभ्र लुगडे नेसलेली एक बाई अधांतरी बसलेली पाहून जगन्नाथ दचकला. बाई पुढेमागे, पुढेमागे झुलत होती. 'खळखळ्...कुईकुई' असा आवाज एका तालात होत होता.

काळोखाला डोळे सरावताच जगन्नाथच्या लक्षात आले, की ती झोपाळ्यावर बसून झोके घेत आहे...

“कोण-जगन्नाथ का? ये. मी वाटच बघत होते तुझी.” ती बसल्या जागेवरूनच म्हणाली. तिचा आवाज गोड होता. जगन्नाथने ओळखले, हीच विमल!

जगन्नाथ पायऱ्या चढून वर गेला. एकदम त्याच्या ध्यानात आले, की, दारात कुत्रेदेखील नाही. अशा एकांत जागी कुणी कुत्रे न बाळगता कसे राहात असेल?

ती त्याला आत घेऊन गेली. दिवा लावला.

समोर एक प्रशस्त दिवाणखाना होता. हात राखून न ठेवता शृंगारलेला. जमिनीवर जाड गालिचा, कोपऱ्यांत पुतळे, भिंतीवर जनावरांची कातडी, आणि एक प्रचंड तैलचित्र. ते बहुधा मामांचे असावे. अलीकडेच रंगवल्यासारखे दिसत होते. खाली त्यांच्या जन्म-मृत्यूच्या तारखाही होत्या. चित्रातली व्यक्ती रुबाबदार होती, पण चेहेरा पडखाऊ वाटत होता. मिश्या आकडेबाज होत्या, पण डोळे मंद होते.

दोन भल्यामोठ्या हंड्यांमधे लावलेल्या विजेच्या दिव्यांच्या प्रकाशात विमल फारच आकर्षक दिसत होती. तशी ती तरुण नव्हती; परंतु तिच्या एकंदर हालचालींमध्ये एक प्रकारचे सामर्थ्य जाणवत होते. सशक्त देहाशी चेहेरा थोडा विसंगत वाटत होता. कारण तो काहीसा पांढुरका पडला होता. केस मात्र अजूनही पूर्ण काळे होते.

“भिजला आहेस तू! आधी कपडे बदलून घे.” विमलने त्याला न्हाणीघर दाखवले.

कपडे बदलून जेवण होईतो त्याच्या जिवात जीव नव्हता. पण आता त्याला पुष्कळच हुशारी वाटू लागली होती. सगळी कामे विमल एकटीच करीत होती. कदाचित रात्रीच्या वेळेस गडीमाणसे राहात नसतील. पण या बाईला सोबतीची गरज वाटू नये? तिने कुणालाच ठेवून घेऊ नये? या एवढ्या मोठ्या वाड्यात, रात्रीच्या वेळी ही बाई न घाबरता एकटी कशी राहात असेल? दुसऱ्या कशाचे नाही, पण चोराचिलटांचेही भय तिला वाटू नये? आणि घर गावात श्रीमंतीसाठी प्रसिद्ध! –की चोरही इथे यायला घाबरत असतील? पण कां? कशासाठी? मघा टांगेवाल्याचा घोडा कां बुजला?…

पण यातले काहीच तिला विचारायचे धाडस जगन्नाथने केले नाही. त्याने फक्त नोकरीविषयी आणि इंटरव्ह्यूविषयी विचारले.

“ते सगळं तुला उद्या सकाळी सविस्तर सांगेन. आता रात्र बरीच झाली आहे. तू झोप स्वस्थपणे.” विमल म्हणाली.

तिने टॉर्च घेतला आणि दोघे माडीवर गेली. त्याच्या मनात आले, ‘ही इतकी देखणी, सुदृढ बाई! नवरा गेल्याला इतके दिवस झाले. रात्री कुणी इथे येत असेल का?’

पण हे असले वेडेवाकडे विचार त्याने ताबडतोब मनातून घालवून लावले.

झोपायची खोलीदेखील खालच्या दिवाणखान्यासारखीच प्रशस्त होती. खोलीतला प्रचंड बिछाना सुसज्ज होता. अगदी पांघरूणसुद्धा पायथ्याशी घडी करून ठेवलेले होते. जगन्नाथला थोडे आश्चर्य वाटले. पण त्याच वेळी जीव सुखावलाही. दिवसभराच्या प्रवासाने अंग इतके आंबून गेले होते, की केव्हा एकदा बिछान्यावर पडतो असे झाले होते.

विमलने जणू त्याच्या मनातले जाणले. मंद हसत ती म्हणाली, “आता जाते मी. तू झोप.” आणि दार लोटून ती निघून गेली.

जगन्नाथच्या मनातली भीती आता नाहीशी होऊ लागली होती. मोजकेच, कामापुरते, गोड आवाजात हसतमुखाने बोलणारी, प्रत्येक काम स्वत:च आणि झपाझप उरकणारी विमल त्याला आवडली होती.

बाहेरून किल्ल्यासारखा दिसणारा तो वाडा आतून इतका सुसज्ज आणि संपन्न आहे, हे पाहून त्याला फार फार बरे वाटले होते. त्या घराची त्याला एक प्रकारची भीती वाटत होती, आणि तरीही त्याविषयी एक आकर्षण वाटू लागले होते.

ही खोली नक्कीच घराच्या मालकाची झोपायची खोली असावी. तिची सुसज्जता आणि संपन्नता यावरून ते कळत होते. कां कुणास ठाऊक, ती खोली मामांची असावी, हा विचार मनात येताच जगन्नाथ थोडा बेचैन झाला.

त्याने दिवा मालवला आणि अंथरुणावर अंग टाकले.

पडल्यापडल्या खिडकीतून त्याला बाहेरचे मोकळे पठार दिसत होते. त्याला चांदण्याचा राखाडी रंग चढला होता. ऐसपैस पसरलेल्या निव्वळ मोकळ्या जागेखेरीज दुसरे काहीच समोर नव्हते. कसली हालचाल नव्हती. कसला आवाज नव्हता.

घाबरण्यासारखे काहीही नव्हते.

तरीही तो उठला आणि त्याने खोलीचा दरवाजा आतून बंद करून घेतला.

बाहेरच्या मोकळ्या पठाराकडे पाहतापाहता त्याला अलगद झोप लागून गेली.

मध्यरात्री त्याला अचानक जाग आली, ती कसल्यातरी 'खळ्ळ्' आवाजाने.

काय झाले, हे त्याला क्षणभर समजेचना. अंधारातच त्याने खोलीभर नजर फिरवली.

आणि अचानक त्याची नजर समोर गेली. खोलीच्या दरवाजाकडे. एक गोष्ट लक्षात येऊन त्याच्या छातीत 'धस्स' झाले!

'खळ्ळ' आवाज झाला होता तो दरवाजाच्या कडीचा. त्याने पक्की लावलेली कडी आपोआप निघाली होती.

-आणि दार सावकाश उघडू लागले होते…

: ४ :

जागच्या जागी खिळल्यासारखा जगन्नाथ ते दृश्य पाहात राहिला.

होताहोता दार संपूर्ण उघडले.

दारात एक जख्ख म्हातारा उभा होता.

बोडका. लांबुडक्या डोक्याला तुळतुळीत टक्कल पडलेले, चेहेरा सुरकुत्यांनी मढलेला. गालाची हाडे वर आलेली, आणि अस्थिपंजर शरीर.

डोळे मात्र निखाऱ्यासारखे चमकत होते. नजर जगन्नाथवर रोखलेली होती.

नकळत भयाने जगन्नाथ मागे सरकला. त्याने उशी गच्च धरून ठेवली.

म्हातारा दरवाजातून आत आला. सावकाश, एकेक पाऊल टाकीत पुढे येऊ लागला.

जगन्नाथने किंकाळी मारली, तर ती ओठांतून बाहेर फुटलीच नाही.

म्हातारा थांबला. त्याने जगन्नाथला उठून उभे राहण्याची खूण केली.

जगन्नाथ यांत्रिकपणे उठून उभा राहिला—मनाविरुद्ध.

त्या बोडक्या म्हाताऱ्याने त्याला आपल्याबरोबर चलण्याची खूण केली.

जगन्नाथ चालू लागला. खरे तर त्याला जायचे नव्हते; पण स्वत:च्या इच्छाशक्तीवर जणू त्याचा ताबाच राहिलेला नव्हता.

म्हातारा खोलीच्या बाहेर पडला. त्याच्या मागून जगन्नाथ चालत होता. काय होते आहे, हे त्याला समजत होते. काहीतरी विलक्षण प्रकार घडत होता, ज्याची त्याला अत्यंत भीती वाटत होती. सर्व शक्ती एकवटून तिथून पळून जावे, असे वाटत होते, पण मनाचे सांगणे पाय मानीत नव्हते. ते त्या म्हाताऱ्याच्या मागून चालतच होते. एखाद्या यांत्रिक बाहुलीप्रमाणे. मनदेखील तसेच बधिर होते, तर फार चांगले झाले असते. पण ते पूर्ण जागे झाले होते. एकूणएक गोष्टी टिपीत होते. त्यामुळे भीतीने जिवाचा थरकाप होत होता.

उदाहरणार्थ, तो म्हातारा! सारे अंग सुरकुतलेले. वय नव्वदच्या जवळपास सहज असेल; पण तरीदेखील तो बिलकुल वाकला नव्हता. चालण्यातही जोर होता. हे कसे शक्य आहे? झालेच तर त्याच्याजवळ दिवा नव्हता. पण त्या काळोखातही तो बिलकूल न अडखळता, न ठेचाळता चालत होता; खरे तर जगन्नाथला स्वत:चेही आश्चर्य वाटायला हवे होते. कारण तो स्वत:देखील त्या अनोळखी घरात एखाद्या सराइतासारखा चालत होता…

कुठे चालले होते ते? कुठल्यातरी पायऱ्या ते उतरत होते.

दगडी पायऱ्या…त्या पायऱ्यांचा थंड स्पर्श उघड्या पावलांना असह्य होत होता. पण तरीही जगन्नाथ उतरतच होता. पायऱ्यांमागून पायऱ्या…पायऱ्यांमागून पायऱ्या…

जगन्नाथ मध्येच क्षणभर थांबला. त्याबरोबर तो म्हाताराही थांबला. बहुधा जगन्नाथच्या पावलांचा आवाज बंद झाल्यामुळे.

अचानक एक गोष्ट जगन्नाथच्या लक्षात आली. पायऱ्यांवर त्या म्हाताऱ्याच्या पावलांचा आवाज ऐकू येत नाही.

म्हाताऱ्याने पुन्हा खूण केली. जगन्नाथ चालू लागला.

पायऱ्या…आणखी पायऱ्या…

कुठल्या सप्तपाताळात ते जात होते, कुणास ठाऊक!

अखेरीस एकदाच्या त्या पायऱ्या संपल्या. पण त्यांचे चालणे संपले नव्हतेच. दगडी फरशीवरून ते आणखी थोडा वेळ चालत राहिले.

एकदम जगन्नाथच्या लक्षात आले की, आपण एका लांबच लांब दिवाणखान्यात येऊन पोहोचलो आहोत.

दिवाणखाना अरुंद होता, आणि इतका लांब होती की त्याचे दुसरे टोक जगन्नाथला नीटसे दिसतच नव्हते. दिवाणखाना अगदी रिकामा होता. जमिनीवर गालिचा नव्हता. नुसती दगडी फरशी. भिंतीदेखील अगदी रिकाम्या. तुरुंगाच्या भिंतींसारख्या ओक्याबोक्या. दगडी. त्यांवर कुठलेही चित्र नाही की पडदा नाही.

दिवाणखान्यात जगन्नाथ अगदी एकटा होता.

निदान तसे त्याला वाटले.

पण तसे नव्हते. दिवाणखान्याच्या टोकाशी काही पायऱ्या होत्या. त्यावर एक दगडी चौथरा होता. चौथऱ्यावर एक मोठे टेबल होते. टेबलामागे तीन खुर्च्या होत्या. खुर्च्यांवर तीन व्यक्ती बसल्या होत्या. पण अपुऱ्या उजेडात इतक्या अंतरावरून त्यांचे चेहेरे दिसणे शक्यच नव्हते.

"मला-मला इथं का आणलंय?" महत्प्रयासाने जगन्नाथला आपला आवाज सापडला.

"तू ज्या खोलीत झोपलास, तिथं झोपलेलं प्रत्येकजण इथं येतं." दूरवरून शब्द ऐकू आले. खुर्च्यांवर बसलेल्या त्या तिघांपैकीच कुणीतरी बोलत होते. पण त्याचा आवाज प्रत्यक्षात दुरून येत नव्हता. जवळूनच ते शब्द कानांत घुमत होते. मनाला जाणवत होते. "त्या खोलीतल्या वातावरणानं तुला खेचून इथंवर आणलं."

आताच एक गोष्ट जगन्नाथच्या लक्षात आली. तो इथे येऊन पोहोचला, त्या क्षणापासून तो बोडका म्हातारा नाहीसा झाला होता. "तो बिछाना झपाटलेला आहे. ती खोली झपाटलेली आहे. हा वाडा झपाटलेला आहे. आम्हीच तो झपाटला आहे!..." शब्द आले.

"तुम्ही कोण आहात?" जगन्नाथ विचारून गेला.

"आम्ही अ-मृत आहोत. काहीजण जिवंतपणी मेल्यासारखे असतात. आम्ही मेल्यानंतरही जिवंत राहतो. जिवंत व्यक्तींमधून चैतन्य शोषून घेऊन. जीवन शोषून घेऊन. मग ती माणसं मरतात. सावकाश, पळापळानं मरतात. तूदेखील असाच मरशील. आजपासून. त्या बिछान्यात झोपलेले तुझे मामा असेच मेले!"

"मला मरायचं नाही! –नाही!" जिवाच्या आकांताने जगन्नाथ किंचाळला. तरी तो आवाज जेमतेम बाहेर फुटला, एवढेच.

"मरायचं नाही? ते शक्यच नाही!"

"कां?"

"तू अगोदरच मेला आहेस. त्या बिछान्यात झोपलास, तेव्हाच! आता मेलेलं असूनही जिवंत राहण्याचा एकच मार्ग आहे."

"कुठला?"

"तुझ्याऐवजी तू दुसऱ्या कुणालातरी बळी द्यायचंस. मग तू आमच्यातला होशील. मृत असून जिवंत राहशील. अ-मृत होशील. आमच्याकडे एकच जागा रिकामी आहे. आम्ही तुला आमच्यात घ्यायला तयार आहोत. कबूल?"

बळी द्यायचं? दुसऱ्या कुणालातरी?-नाही. असली भयंकर गोष्ट मी करणार नाही!... जगन्नाथ पळत सुटला.

खुर्च्यांवर बसलेल्या मंडळींनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला नाही.

पण तो जेमतेम दारापर्यंत पोहोचू शकला.

–दारात विमल उभी होती.

: ५ :

“कुठं पळतोस वेड्या?” ती हसत म्हणाली, “इथून सुटका नाही. तुला झिजून, पिचून मरायचंय का? माझ्या नवऱ्यासारखं?” ती गोड आवाजात म्हणाली, “त्यापेक्षा कुणाचातरी बळी देऊन टाक. आपण मजेत राहू. चिरंतन. आपल्याला मरणाचीदेखील भीती नाही. अरे, आपण आधीच मेलेलो आहोत. फक्त आपण जिवंत राहावं यासाठी नवीननवीन माणसांना बोलावून घ्यायचं आणि त्यांचे बळी द्यायचे, एवढंच आपल्या हाती आहे. माणसं मात्र चांगली हवीत. तरुण, सुदृढ. नाहीतर आपल्याला पुरेसं चैतन्य कुठून मिळणार?”

आत्ता जगन्नाथच्या डोक्यात प्रकाश पडला. यासाठी मामीने त्याला इतक्या लांबून बोलावून घेतले होते!

“मग? बळी आणून देणार ना? त्या अटीवरच तुला आमच्यात सामील करून घेतलंय.” चौथऱ्यावरील मधल्या खुर्चीत बसलेली व्यक्ती म्हणाली, आणि पायऱ्या उतरून त्याच्याजवळ येऊ लागली.

तो एक जाडजूड, मांसल माणूस होता. गुबगुबीत गालांचा. जाडजूड मिश्या ठेवलेला. अंगात काळाभोर सूट.

हातातला कागद पुढे करून तो म्हणाला, “हे करारपत्र. इथं सही कर.”

जगन्नाथ घुटमळला.

“कर सही.” विमल गोड आवाजात म्हणाली, “त्यावाचून दुसरा उपायच नाही.”

थरथरत्या हातांनी जगन्नाथने आपले नाव लिहिले मात्र-

सगळीकडे एकदम काळोख झाला.

जगन्नाथ दचकून जागा झाला, तेव्हा आपण मामांच्या बिछान्यातच असल्याचे त्याला आढळले.

काय भयंकर स्वप्न! त्याने घाम टिपला.

अजून उजाडले नव्हते.

उरलेली रात्र त्याने कुशी पालटत घालवली.

पहाटेपहाटे त्याला झोप लागली.

तो जागा झाला, तेव्हा दिवस चांगलाच वर आला होता.

त्याला रात्रीच्या त्या भयंकर स्वप्नाची आठवण झाली. दिवसाच्या उजेडात त्याची भयानकता थोडी कमी झाली होती.

जगन्नाथ खाली उतरून आला. न्हाणीघरात गेला. तोंड वगैरे धुऊन बाहेर आला.

वाड्यात कुणाचीही चाहूल नव्हती. गडी-माणसे तर नव्हतीच. पण विमलचाही पत्ता नव्हता.

तो दिवाणखान्यात आला. अस्वस्थपणे इकडेतिकडे बघू लागला. आता कुठे शोधायचे हिला? अजून आपल्याला या घरातल्या खोल्यासुद्धा…

इतक्यात त्याचे लक्ष समोरच्या छोट्या चंदनी स्टुलाकडे गेले. त्यावर एक दुधाचा ग्लास झाकून ठेवलेला

होता. शेजारीच बशीमध्ये फळे होती.

स्टुलावरच एक चिठ्ठी होती. जगन्नाथने ती उघडली.

“बाजारात जाऊन येते. सोबतच्या पत्त्यावर अकरा वाजता इंटरव्ह्यूला जाऊन. ये- विमल.”

सोबत एक व्हिजिटिंग कार्ड होते. त्यावर नाव होते :

“अमृत लेबॉरेटरीज. धरमपूर.”

: ६ :

बरोबर आणलेले ठेवणीतले कपडे चढवून जगन्नाथ कार्डवरच्या पत्त्यावर गेला.

लेबॉरेटरी दुसरीकडे असावी. हे फक्त मॅनेजरचे ऑफिस होते.

कार्डच्या पाठीमागेच भेटीची वेळ आणि मॅनेजरची सही होती.

पट्टेवाल्याला कार्ड दाखवताच त्याने जगन्नाथला आत सोडले.

आतले ऑफिस चांगले झगझगीत होते. जमिनीवर हिरव्या रंगाचा मऊमऊ गालिचा अंथरलेला होता. भिंतीवर एकदोनच फोटो होते. एक ठसठशीत तारखांचे कॅलेंडर होते. थोडक्यात ऑफिसचा थाट मुंबई फॅशनचा होता. कालपासून जगन्नाथच्या मनावर आलेले भीतीचे सावट थोडेसे दूर झाले.

समोरच एक प्रशस्त टेबल होते. त्यामागे तीन खुर्च्या ठेवलेल्या होत्या. तिन्ही खुर्च्यांना सिंहासनासारखी रुंद शोभिवंत पाठ होती, आणि लाल मऊमऊ गादी होती. तिनांतल्या दोन खुर्च्यांवर दोघे मध्यमवयीन गृहस्थ बसले होते.

त्यांनी जगन्नाथला समोरच्या खुर्चीवर बसायला सांगितले.

जगन्नाथ बसला. खुर्च्यांमागे सोनेरी रंगाचा नक्षीदार पडदा या भिंतीपासून त्या भिंतीपर्यंत लावलेला होता, त्याचे निरीक्षण करीत.

दोघेही गृहस्थ त्याच्याशी अत्यंत मृदू आवाजात प्रेमळपणे बोलत होते. जगन्नाथची नेमणूक पक्कीच असावी. कारण त्यांनी फार अडवाअडवीचे प्रश्न न विचारता, इकडच्यातिकडच्या गप्पाच सुरू केल्या. ‘कुठल्या कॉलेजात होता, पहिली नोकरी कसली होती, धरमपूरमध्ये राहणे आवडेल का, हे आणि ते.’

जगन्नाथला खूप बरे वाटले. इंटरव्ह्यूच्या कल्पनेने नाही म्हटले तरी मनावर फार दडपण आले होते. त्या दडपणामुळेच कसली-कसली विचित्र स्वप्ने…जगन्नाथला एकदम मोकळेमोकळे वाटू लागले. ते भयंकर स्वप्न संपले. ती भयानक रात्र संपली. आता आपण दशरथांच्या वाड्यावर नाही राहिले तरी चालेल. इंटरव्ह्यू नीट पार पडला. आता या नोकरीचे नक्की जमेल. इतक्या दिवसांची काळजी संपेल. सध्या कुठेतरी हॉटेलात राहू. मग जागा मिळाली की शालिनीला बोलावून घेऊ…

इंटरव्ह्यू बहुतेक आटपत आला होता. एवढ्यात पाठीमागचा पडदा बाजूला झाला, आणि तिसरे गृहस्थ आत आले.

“आमच्याकडे एकच जागा रिकामी आहे; पण तुम्हाला आमच्यांत घ्यायला आम्हांला आवडेल.” हातातला कागद पुढे करीत ते म्हणाले, “हे घ्या करारपत्र. यावर सही करा.”

त्याच्या चेहेऱ्याकडे नजर जाताच जगन्नाथ धसकला!

काल रात्री पाहिलेला-तोच जाडजूड, मांसल माणूस. गुबगुबीत गालांचा. जाडजूड मिश्या. अंगात काळाभोर सूट…तोच माणूस! तेच शब्द!

शुद्ध हरपून जगन्नाथ बसल्या खुर्चीत कोसळला…

: ७ :

"परवा इंटरव्ह्यूच्या वेळी मला चक्कर आली आणि काही वेळ काही समजेनासंच झालं. माझ्या तब्येतीचा भरवसा नाही. तू जमेल तेवढ्या लवकर इकडे ये. नाहीतर माझं काय होईल काही सांगता येत नाही!…"

शालिनीला पत्र पुढे वाचवेना. जगन्नाथ एकाएकी कसा आजारी पडला, हे तिच्या ध्यानात येईना.

तिचे चित्त सैरभैर झाले. कशीबशी तिने थोडीफार आवराआवर केली. सामान बांधून तयार ठेवले.

गाडी दुसऱ्या दिवशी सकाळची होती. जगन्नाथच्या तब्येतीची काळजी मन पोखरीत होती. रात्रभर तिच्या डोळ्याला डोळा लागला नाही. कुशी पालटीत तिने रात्र घालवली.

प्रवासात तर मन अधिकच अधीर झाले. कशीबशी ती स्टेशनवर उतरली.

टांगेवाल्यांनी नेहमीप्रमाणेच कुजबुज केली. कोणीच 'सवारी' घ्यायला तयार होईना. शेवटी तो एकटाच टांगेवाला तयार झाला. तोच-जगन्नाथाला वाड्यावर घेऊन गेलेला.

पण शालिनीचे त्या सगळ्या प्रकाराकडे फारसे लक्ष नव्हते. गेल्यानंतर जगन्नाथ कुठल्या अवस्थेत भेटतो, इकडेच तिचे डोळे लागून राहिले होते.

विमल दारातच भेटली. झोपाळ्यावर बसलेली.

"मी जगन्नाथची बायको." शालिनी म्हणाली, "हे बरे आहेत ना?"

काहीच न बोलता विमल तिला वरती घेऊन गेली.

मामांच्या झोपायच्या खोलीत बिछान्यावर जगन्नाथ पडला होता.

"जगन्नाथ!-" शालिनी त्याच्या अंगावर कोसळली.

जगन्नाथने डोळे उघडले.

"जगन्नाथ, तुम्ही बरे आहात ना?" शालिनीने व्याकुळपणे विचारले.

"होय शालिनी," तिला जवळ ओढून जगन्नाथ म्हणाला, "मी बरा आहे. मला काहीसुद्धा झालेलं नाही. इंटरव्ह्यूदेखील चांगला झाला. मला ही नोकरी मिळाली. नोकरी चांगली आहे. कायमची आहे."

जगन्नाथचा आवाज ऐकला आणि शालिनीची सारी चिंता मिटली. मनावरचे दडपण ओसरले. सुखाने डोळे मिटून ती बिछान्यावर पसरली.

"माझं सगळं ठीक आहे शालिनी." जगन्नाथ तिचे डोके हलकेच थोपटीत म्हणाला, "मात्र काळजी आहे ती तुझीच! तुला इथली हवा बिलकुल मानवणार नाही शालिनी. तू-तू फार दिवस जगणार देखील नाहीस…"

त्याच्या घशात आवंढा दाटून आला.

विमलने खोलीचे दार लावून घेतले, आणि ती हसतहसत बाहेर निघून गेली.

वशीकरण

हातातल्या फुलपाखराला नर्मदेने शेवटचे टाके घातले. गाठ मारली, आणि रेशीम दाताने तोडून टाकले.

कधीच फडफड करू न शकणारे ते फुलपाखरू - कापडावर कायमचे बंदिस्त झालेले!

नर्मदेने अंगडे लांब धरून पाहिले. हे फुलपाखरू बरोबर मुलाच्या छातीवर येईल. पिवळ्या काळ्या रेशमात भरलेले हे चित्र इतके सुरेख– इतके जिवंत दिसतेय्!

हे अंगडे घालून ते बाळ खेळेल, नाचेल, अंगडे मळवील. भरतकाम उसवील. उसवू दे हवे तर. ते अंगात असताना बाळ तर देखणे दिसेल!

बाळ- त्याच्या आईचे बाळ! तिच्याच कुशीत ते निजेल. तिच्याच अंगावर ते पिईल. तिच्याच सावलीत ते वाढेल. नर्मदेचा संबंध काय? तर केवळ त्याच्या अंगावरचे अंगडे शिवण्यापुरता! त्या अंगड्यावर फुलपाखरू भरण्यापुरता!

नर्मदेने नि:श्वास टाकला. फुलपाखरू सुंदर भरले गेल्याचे समाधान क्षणार्धात हरवून गेले.

एवढ्यात बाळाची आई आलीच.

“झाले काय ग कपडे?” नर्मदेने अंगडे दाखवले. ती ते पाहीपर्यंत एक टोपडे आणि आणखी दोन चिटाची अंगडी दुसऱ्या पिशवीत भरून ठेवली होती ती काढून दिली. राहिलेल्या कापडाचे तुकडे दिले. खुणांनीच सांगितले -‘चार रुपये झाले.’

“चार रुपये! एवढ्या चिंधीएवढ्या कपड्याचे चार रुपये?”

या कपड्यांना ही चिंध्या म्हणते? केवढ्या मायेने, प्रेमाने मी ते शिवले- त्यांच्यावर भरतकाम केले, कलाकुसर केली! नर्मदा मनात म्हणाली- ‘जा बाई जा! फुकट घेऊन जा ते कपडे! माझ्याच बाळासाठी शिवले, असे समजेन मी! मोठा होऊ दे बाळ!’

पण प्रत्यक्षात मात्र तिने वेगळ्याच खाणाखुणा केल्या. गिऱ्हाइकाला नाराज न करता पटवून दिले, की चार रुपये दर रास्त आहे!

कपड्यांचे चिमणे बोचके करून बाळाची आई ते घेऊन गेली. नर्मदा मूकपणे बसून राहिली. एवढ्या अपूर्वाईने फुलपाखरू भरलेले ते अंगडेसुद्धा नजरेसमोरून गेले होते. नर्मदा एकटीच राहिली होती.

तसे म्हटले तर या एकटेपणाची तिला सवयच होती. होती आणि नव्हती देखील! कारण आपल्याला कायम एकटेच राहायचे आहे, असे एक मन म्हणे. पण त्याचवेळी दुसरे मन बंड करून उठे-काय म्हणून? काय म्हणून? मुक्या माणसांना काय संसार करावासा वाटत नाही? मुक्या माणसांना काय घर गजबजलेले असावेसे वाटत नाही? वाटते-वाटते-सगळे खरे, पण तुला वाटून उपयोग काय? लोकांना तसे वाटायला हवे ना!

कोण तुझ्याशी बोलायला येणार? गप्पा मारायला येणार? तुला फक्त बोलता येत नाही, ऐकायला नीट येते हे खरे. पण लोकांना एकटेच बडबडत बसायचा कंटाळा येतो. तुझ्या हातांच्या खुणांचा अर्थ लावणे जीवावर येते. मग कशाला कुणाला बोलावेसे वाटेल तुझ्याशी?

असे किती दिवस चालायचे? किती दिवस? नर्मदा खिन्नपणे स्वत:लाच विचारीत राहिली. लहानपणी बाबा, आई होते. ते खूप काळजी घेत. त्यांनीच शिवणटिपण शिकवले. मुक्या-बहिऱ्यांच्या शाळेत देखील पाठवले. पण आई-बाबा गेले आणि या लहानशा गावात एकटेच येऊन राहणे नशिबी आले. मुक्याच्या भाषेचा उपयोग

दुसऱ्या मुक्याशी बोलताना; पण इथ गावात तो भाषा बोलणार कुणाशी? सराव न राहून तो विसरल्यासारखे झाले होते. नाही म्हणायला आई-बाबांनी शिकवलेली दुसरी शिवणाची विद्या कामाला आली होती. गावातले कपडे शिवून चार पैसे मिळवणे कठीण नव्हते. झालेच तर स्वत:चे घर होते. घरापाठीमागे परड्यात भाज्या लावल्या होत्या. एकटीचे आणि घरात येऊन जाऊन काम करणाऱ्या गडीमाणसाचे एवढ्यावर सहज चालण्यासारखे होते.

पण नर्मदेला एवढे पुरेसे वाटत नव्हते. वयाची तिशी उलटून गेली होती. अंगडी शिवताना मनात येई- माझ्या बाळाचे अंगडे मी कधी शिवणार? दारावरून वरात गेली की वाटे, आपले लग्न कधी होणार? लहानलहान, विशीच्या आतल्या पोरींची लग्ने होऊन गेली होती; पण गावाला कधीच नर्मदेच्या लग्नाची आठवण झाली नव्हती. तशी ती रूपाने चारचौघींपेक्षा अधिक वाईट नव्हती. पण मुक्या मुलीशी कोणी लग्न करील, ही शक्यताच कुणी जमेला धरली नव्हती. तिचेच मन आतल्या आत कुरकुरत राही. माझ्याइतका चांगला संसार कितीशा मुली करतील? मी स्वयंपाकपाणी उत्तम करते, शिवणटिपण करते, परड्यात काम करू शकते. बाजारहाट करते, मला मुलांचा लळा आहे, मी नवऱ्याची सारी सारी हौस पुरवीन...

मनातल्या मनात ती हे सारे स्वत:लाच सांगायची-पण प्रत्यक्षात मात्र तिची जीभ एक शब्दही उच्चारू शकत नसे. एखाद्या चोथ्यासारखी ती तिच्या तोंडात फिरत राहायची. मनात विचार आला, की त्याप्रमाणे हलायची ती बोटे! पाखराच्या पंखासारखी ती फडफडू लागायची. पण हेच तर तिचे दुर्दैव होते! तिची बोटांची भाषा कोण समजून घेणार? गाव त्या मुक्या मुलीशी फक्त कामापुरता संबंध ठेवीत असे-शिवणकामापुरता! लग्नानंतर रात्रंदिवस जिभेचा पट्टा फिरवणाऱ्या, बोलबोलून नवऱ्याला छळणाऱ्या बायका गावाला चालत असत. पण शब्दही न बोलता सारे काम हसतमुखाने उपसणारी नर्मदा मात्र कुणालाच नको होती!

नर्मदेचे वडील हयात असते तर त्यांनी कदाचित काहीतरी हालचाल केली असती. परगावी शब्द टाकला असता. या ना त्या उपकारात बांधून मुक्या मुलीसाठीसुद्धा नवरा शोधून आणला असता. पण आता नर्मदेसाठी स्थळ कोण पाहणार? सगळ्याच बाजूंनी नर्मदेची कोंडी झाली होती.

पहिली काही वर्षे नर्मदेने मन घट्ट केले. नाही लग्न तर नाही-राहायचे तसेच! थोड्या का मुली राहतात लग्नावाचून? अशी स्वत:च्या मनाची समजूत घातली. पण अखेरीस मनाने शरीरापुढे हार खाल्ली. मनाने कितीही समजावले, तरी शरीराची तगमग थांबेना. दिवसभर ती कामात गुंतून राही, पण रात्री तिची तळमळ तळमळ व्हायची. कुशी पालटून डोळ्यांपुढची चित्रे पुसायला ती पाह्यची पण शरीर पुरुषाच्या मिठीसाठी आसुसलेले राहायचे, रिकामे अंथरूण मुठींनीच विस्कटले जायचे, आणि उशी डोळ्यांतल्या पाण्याने भिजून जायची.

मनातले विचार दूर सारण्याचा प्रयत्न करीत नर्मदा मागील दारी आली. पायऱ्या उतरून परड्यात गेली. हिरवे हिरवे परडे पाहून तिचे मन थोडे निवळल्यासारखे झाले. एक-एक रोपटे ती बारकाईने पाहू लागली. कुणाला माती घालायला हवी होती, तर कुणाची किडकी पाने तोडून टाकायला हवी होती.

कसे कोण जाणे, अचानक तिचे लक्ष जमीनदारांच्या वाड्याकडे गेले.

आज वाड्याच्या तीन-चार खिडक्या उघडलेल्या दिसत होत्या.

वाडा कायम बंदच असे. जमीनदाराची मुले, नातवंडे सारी शहरात असत. आज कुणीतरी आलेले दिसत होते.

पण फार गडबड दिसली नाही. एखाददुसरे माणूस असावे. कोण असेल?

हुरहुरतच तिने आपले काम आवरले. सगळा कचरा गोळा केला. बराच जमला होता. तो एकदा उघड्यावर नेऊन जाळायला हवा होता. आजच कां नको? घरापासून जमेल तितक्या लांब न्यायला हवा. तिने टोपल्या, डबे घेतले; दार लोटून घेतले आणि ती घराबाहेर पडली.

कचरा पेटवला. त्याचा मोठा जाळ झाला. धूरहो भसाभस वर जाऊ लागला. पण नर्मदेचे लक्ष त्या जाळातून, धुरातून पलीकडच्या घरात लागले होते. पाहतापाहता तिची नजर एकदम खिळूनच बसली.

जमीनदाराचा तरणा नातू केळींजवळ अंघोळ करीत बसला होता.

इतक्या लांबून देखील त्याच्या उघड्या शरीराचा पिळदारपणा स्पष्ट दिसत होता. चेहरा नीटसा दिसत नव्हता, पण चांगला असावा. काळे दाट केस तो खसाखसा चोळत होता. त्याच्या ओल्या शरीरावर चमचमणाऱ्या उन्हाकडेच खुळ्यासारखी नर्मदा पाहात राहिली...इतक्या अंतरावरून पाण्याचा आवाजही येत नव्हता. पण ते नि:शब्द चित्र तिला अतिशय, अतिशय मोहक वाटले.

एकदम त्या स्वप्नातून तिला जाग आली. आपल्यासारख्या वयाने वाढलेल्या मुलीने अशा उघड्या अंगाच्या तरुण पुरुषाकडे पाहात राहाणे चांगले नाही! कुणी पाहिले तर काय म्हणतील? पण मनाची ही सांगी नजर ऐकेना. ती पुन्हा पुन्हा तिकडे वळतच राहिली. शेवटी धुराचा जाम लोट आला, पलीकडचे काही दिसेना. मध्ये जसा काही अंतरपाटच उभा राहिला. आपल्या कल्पनेने स्वत:च लाजून नर्मदा घरी परत आली...

पण घरकामामध्ये तिचे लक्ष लागेना. सारखा तिच्या डोळ्यांसमोर तो उघड्या अंगाचा पुरुष येत राहिला. एकदम सण्दिशी मनात कल्पना आली-आपण त्याचे होऊन जावे. एकटाच आहे. ऐन वयातला आहे. बाईची संगत तर शोधीतच असेल. नसला त्याचा लग्नाचा विचार तरी चालेल. चार दिवसांसाठीच जवळ करणार असला, तरी आपण नाही म्हणायचे नाही- हे सुख हातचे जाऊ द्यायचे नाही. आपण त्याच्या स्वाधीन व्हायचे-त्याचे व्हायचे. तो नाही म्हणणार नाही. लग्नाची अट घातली नाही, तर कुठला पुरुष बाईला नाकारील? त्यातून आपण दिसायला वाईट नाही. आपले केस तर इतके सुंदर आहेत! भुरे, रेशमाच्या लड्या सुटून पडाव्यात तसे मऊ, गुळगुळीत-त्याच्या उघड्या छातीवर ते केस पिसाऱ्यासारखे पसरतील...

आणि एकदम नको ती आठवण झाली. जयरामची... असाच तो सुटीसाठी कधी तरी घरी आला होता. आल्यानंतरची पहिलीच रात्र होती. तो संध्याकाळी माडीवर लोळत पडला होता. ती त्याची बॅग ठेवायला वर गेली. दिवा लावायला जाणार, एवढ्यात त्याचा हात तिच्या बटनावरच्या हातावर पडला. विरोधाची वाट पाहात तो क्षणभर थांबला. दुसऱ्या क्षणी त्याने हात गच्च धरला. लगेच ती त्याच्या मिठीत घुसमटून गेली. त्या मालवत्या संधिप्रकाशात त्याने तिची असंख्य चुंबने घेतली. तिच्या अंगावर शहाऱ्यांचा बहर आला. सारे शरीर फुलारले. हे सुख तिला पहिल्यानेच मिळत होते-ते दूर सारायला हवे, असे वाटत असताही हवेहवेसे झाले होते. त्याने दोन्ही मुठींमधे तिचे ते मऊ, रेशमी, सुवासिक केस गच्च धरून ठेवले होते. केसांना तडस लागली होती. पण त्या कळांमध्येही विलक्षण सुख होते-त्या सुखात ती हरवून गेली होती-आणि अचानक जयरामच्या काहीतरी लक्षात आले. इतका वेळ तिच्या तोंडून शब्दही बाहेर पडलेला नाही याचा अर्थ त्याला एकदम समजला. तो समजताच त्याने तिला दूर ढकलले-जसे काही त्याच्या मिठीत माणूस नसून कुणी जनावरच होते -

तिखट आवाजात त्याने विचारले-

“तुला बोलता येत नाही?”

तिने मान हालवली...

तिच्याकडे एक तिरस्काराचा कटाक्ष टाकून तो खाली निघून गेला; आणि झपाट्याने अंधारत चाललेल्या त्या माडीवर ती तशीच हुंदके देत बसून राहिली.

त्या प्रसंगाला वर्षे उलटली, तरी त्याची आठवण मात्र तिच्या काळजात खोल रुतून बसली होती. पुरुषाच्या त्या घट्ट मजबूत स्पर्शाची आठवण-आणि तिचे व्यंग कळल्यानंतर तिच्याकडे टाकलेल्या तुच्छतेच्या कटाक्षाचीही पाठोपाठच होणारी आठवण...

कुठलाही पुरुष आपल्याकडे तशीच नजर टाकणार... हा देखील-हा जमीनदाराचा नातू-हा देखील नजरेनेच आपल्याला आपल्या व्यंगाची जाणीव करून देणार –नाही-आता पुन्हा नाही-आता आपल्याला ते सहनच होणार नाही. आपल्या व्यंगासाठी कुणी आपल्याला झिडकारले, तर त्या अपमानापोटी आपण जिवंतही राहणार नाही...

रात्रभर तिचा डोळ्याला डोळा लागला नाही. मनात एकसारखे विचार येत होते. त्या सकाळी पाहिलेल्या तरुणाचे. तो हवा-तो आपला व्हायलाच हवा. पण धोका कसा पत्करायचा? त्याने झिडकारले तर? व्यंग समजताच दूर ढकलले तर...

पहाटेकडे तिला डुलकी लागली.

ती डुलकीतून दचकून जागी झाली, ती एका विचित्र विचाराने. झोपेतच कधी तरी तिच्या अस्वस्थ मनाला तो सुचला असणार! पण जागी झाल्यानंतरही तो तिची पाठ सोडीना.

दिवसाचा प्रकाश वाढू लागला, तसतसा तो विचारही तिला अधिकाधिक खरा वाटू लागला. इतका विक्षिप्त विचार-पण आता त्याच्याइतके बरोबर, दुसरे काहीच वाटेना.

वशीकरण...

तेल्याची येसू मंत्रतंत्र जाणते, असा गावात बोलबाला होता. येसू जख्ख म्हातारी होती. आपला एक निकामी पाय ओढीत ती गावभर भटकायची. लहान पोरे तिला भिऊन पळत, आणि मोठी माणसे कामाशिवाय तिच्या वाऱ्यालाही उभी राहात नसत. ती दारावरून जाऊ लागली, की लेकुरवाळ्या बाया पटापटा दारं लावून घेत, आणि तान्ह्या बाळांना पदराखाली घेत. येशीचा स्वत:चा तरणाताठा पुतण्या तिच्याशी झालेल्या भांडणानंतर दोनच दिवसांत रक्त ओकून मेला होता आणि लोक म्हणत की सावदेकर हॉटेलवाल्याला तिच्याच मेहरबानीनं पैसा मिळाला...

येशी आपल्याला काहीतरी मंत्रतंत्र नक्कीच देईल, असे नर्मदेच्या डोक्याने घेतले. वशीकरणाचा मंत्र...! येशी मागेल तितके पैसे आपण देऊ. फक्त तिने आपल्याला मंत्र दिला पाहिजे. त्या मंत्राच्या सामर्थ्याने जमीनदारांचा नातू आपल्याकडे ओढला गेला पाहिजे. आपलासा झाला पाहिजे. मंत्राच्या प्रभावाने त्याला आपले व्यंग जाणवता कामा नये-त्या व्यंगासकट त्याने आपले शरीर स्वीकारले पाहिजे. एकदा त्याला शरीराची ओढ लागली, की न जाणो, पुढेमागे त्याला आपली माया लागेल-तो लग्नाला तयार होईल-आपल्यासाठी जीव टाकेल ...आपले एकटेपण संपेल...हे खायला येणारे रिकामे घर भरून जाईल-आपण त्याला सुखी करू. सवयीने प्राण्यालाही माणसाचा लोभ लागतो-मग तो तर-! दिसत तरी होता चांगलाच उमदा!

सकाळी ती परड्यात गेली तेव्हा तिला दूरवर त्यांच्या घराशी तो उभा असलेला दिसला. सकाळचे थंड वारे अंगावर घेत. जवळच त्याचा कुत्रा बागडत होता. त्याला चाटत होता. हा कुत्रा तिने आजवर कधीच पाहिला नव्हता. त्याअर्थी हा त्याने येताना बरोबर आणला असणार!

नर्मदाने आपले लांबसडक मोकळे केस छातीवर ओढून घेतले. केस हलकेच थोपटीत ती त्याच्याकडे पाहात राहिली. आपल्यासाठी कसला बेत शिजतोय, याची बिचाऱ्याला कल्पनाही नसेल! नर्मदा स्वत:शीच हसली. आपण त्याच्याकडे पाहात आहोत हे त्याच्या लक्षात येऊ नये, म्हणून ती लगबगीने घरात निघून गेली.

तिच्या निरोपासरशी येशी कातरवेळेला हजर झाली.

नुसत्या खुणांनी आपल्या मनातले येशीला समजावून देता देता नर्मदेच्या नाकीनऊ आले. पण अखेरीस त्या अनुभवी म्हातारीला ते समजले. सारे काही नीट ध्यानात आले. दातांचे बोळके दाखवीत ती क्लक्क्लक् हसली, तेव्हा नर्मदेला ओशाळल्यासारखे झाले.

“काळजी करू नको. असला वशीकरण मंत्र आहे माझ्याजवळ.” येशी म्हणाली, “पण पैसे मात्र फार पडतील. चांगले शंभर रुपये पडतील.”

‘शंभर’ आकडा ऐकल्याबरोबर नर्मदा थक्क झाली. एवढे पैसे पडतील, असे तिच्या स्वप्नातही आले नव्हते. तिने खुणांनीच, म्हातारीशी बराच वाद घातला. पण म्हातारी काही ऐकून घ्यायला तयार नव्हती. शेवटी ती जायला निघाली, तेव्हा नर्मदेचा नाइलाज झाला. तिने आतल्या खोलीत जाऊन पत्र्याची ट्रंक उघडली. त्यात कापडाच्या बोळ्यांमधे आणि जुन्या कपड्यांमधे एक पत्र्याचीच पेटी होती, ती तिने बाहेर काढली. आजवर शिवणकामाच्या पैशांतून पै-पैसा वाचवून तिने जवळजवळ साडेतीनशे रुपये जमा केले होते. त्यांतल्या दहाच्या दहा नोटा काढताना तिच्या जिवावर आले. पण येसूला सांगितलेले काम तसेच जबरदस्त होते. मग पैशांकडे पाहून काय फायदा? ती नोटा घेऊन बाहेर आली आणि तिने त्या, येशीच्या पसरलेल्या ओंजळीत टाकल्या. येशी पुन्हा क्लॅक्क्लॅक् करून हसली.

“आता दोन गोष्टी मिळवायला लागतील. एक तुझी अन् एक त्याची, अशा जिवाभावाच्या गोष्टी! त्या कुठनं आणायच्या?”

काही वेळ दोघी विचारात पडल्या. नर्मदाच्या जिवाभावाचे होतेच काय? विचार करून काही सुचेना; आणि अचानक तिचा हात केसांकडे गेला. हे केस तेवढे तिला जिवापेक्षा प्यारे होते. पण छे! ते नाही द्यायचे! ती मनातल्या मनात बोलली.

पण म्हातारीची नजर कावळ्याची होती. नर्मदाचा हात केसांकडे गेलेला तिच्या लक्षात आल्याशिवाय राहिला नाही. ती म्हणाली- “केस चालतील! पण पुष्कळ लागतील. राख करायचीय. अगदीच चिमूटभर होऊन चालायची नाही.”

आढेवेढे घेऊन शेवटी नर्मदा केसांची राख करायला तयार झाली. पण जमीनदाराच्या नातवाची कुठली जिवाभावाची वस्तू आणणार? आणि सकाळी पाहिलेला तो बागडणारा कुत्रा तिला आठवला. तो त्याच्याभोवती नाचत होता. त्याला चाटत होता.

येशीने सगळा बेत ठरवला. मध्यरात्री दोघींनी स्मशानात जाऊन वशीकरणाचा मंत्र सिद्ध करायचा होता. त्याआधी काळोख पडल्यानंतर, म्हातारी त्या कुत्र्याच्या डोक्यात धोंडा घालणार होती.

रानात रात्र किर्रर्र किर्रर्र वाजू लागली. घराघरांमधली कलकल थांबून कितीतरी वेळ झाला होता. तिथी कृष्णपक्षातली होती, तेव्हा बाहेर गुडुप अंधार पसरला होता.

दारावर टक्टक् झाले तेव्हा माहीत असूनही नर्मदेच्या काळजात लक्क झाले. येशी आली होती. आता आपले केस जाणार. दार उघडण्यापूर्वी तिने केसांवरून हात फिरवला.

दारात घोंगडी पांघरून येशी उभी होती. तिच्या हातांतल्या गोणपाटाच्या पिशवीला रक्ताचा मोठा डाग पडला होता. नर्मदेच्या अंगावर शहारे आले. कुत्र्याचा कापलेला भाग! नुसता विचारच भयंकर होता.

पण तिने विचारले नाही, तरी येशीने आपणहूनच उत्साहाने माहिती दिली, “मेला भलताच इमानी निघाला! हालत नव्हता वाड्याजवळून. पण हाड दाखवलं तशी झक्कत आला. चघळायला बसला, तशी घातली सुरी पाठीमागून! पाठीकडचाच भाग आणलाय. बघायचाय?” नर्मदेला तो बघायचा नव्हता. थरथरत्या हातांनी तिने येशीकडे कातर दिली. येशीने मानेजवळून कातर चालवून भसाभस केसांचा पिसारा कापून काढला. नर्मदेच्या पाणावलेल्या डोळ्यांकडे पाहात वर म्हणाली, “खुळी कुठली! रडतेस? अग, चांगल्या कामाला डोळ्यातनं पाणी काढू नये माणसानं.”

भुंड्या झालेल्या नर्मदेने घाईघाईने डोक्यावरून पदर घेतला, तशी म्हातारी क्लक्क्लक् करीत दातपडके हसली. ते केस त्या कुत्र्याच्या मांसाशेजारीच, रक्ताने लडबडलेल्या पिशवीत तिने ठेवले आणि म्हणाली,

“चल-उशीर होतोय. काळे मूग, पिंजर सारं काही घेतलंस का?”

दोघी स्मशानात आल्या, तेव्हा गार वारे वाहू लागले होते. नर्मदेचे दात वाजू लागले. तेव्हा म्हातारी म्हणाली, “घाबरू नकोस, मी आहे ना बरोबर! कोणी खाणार नाही तुला. मी प्रत्यक्ष बोलू शकते त्यांच्याबरोबर.”

हे ऐकून नर्मदेचा धीर अधिकच खचला. आपण केले हे चुकले, असे तिच्या मनात येऊ लागले. बिचारे कुत्रे प्राणाला मुकले, आणि आपले केस-शरीरावरची तेवढी एकच सुंदर वस्तू-तीही आपण गमावून बसलो. आता परत इतके केस वाढायला किती वर्षे लागतील; पण पुन्हा तिच्या डोळ्यांसमोर सकाळच्या कोवळ्या उन्हात उभा असलेला तो पुरुष आला-काहीही असो, तो पुरुष मला झिडकारू शकणार नाही! ती मनात म्हणाली.

म्हातारी येशी पाय ओढीत काही तरी शोधीत होती. लवकरच तिला हवे होते ते सापडले. तो एका कवटीचा, फुटून दूर उडालेला, त्यातल्या त्यात मोठासा एक तुकडा होता. तो घेऊन म्हातारी स्मशानाच्या एका टोकाला एक पिंपळ होता, त्याच्या मुळाशी जाऊन बसली. नर्मदा देखील तिच्या मागून चालत गेली. तिला खाली बसवून म्हातारीने तिला पिंजर आणि मुगाचा चौकोन काढायला सांगितला.

नर्मदा भारल्यासारखी तिचे ऐकत होती. म्हातारीने चौकोनात कुत्र्याचे मांस आणि रक्ताने भरलेले केस ठेवले, आणि म्हणाली, “टाक आता यावर पिंजर. आणि हात जोडून प्रार्थना कर. हवं ते मिळावं यासाठी.” इतके बोलून ती कसला तरी मंत्र स्वत: पुटपुटू लागली. दातपडक्या आवाजात. नर्मदेने डोळे मिटले. कोण कुणास ठाऊक, पण तिच्या मनासारखे करणारी जी एक शक्ती होती तिची तिने मनातल्या मनात प्रार्थना केली- “तो माझा व्हायला हवा. त्यानं मला आपलं म्हणायला हवं. त्यानं माझ्यावर प्रेम करायला हवं. मला प्रेम हवं…मला प्रेम हवं…”

तिची प्रार्थना संपायच्या आत म्हातारीचे मंत्रपठण संपले होते. तिने केस आणि मांस यांना काडी लावली. गप्दिशी ती पेटली आणि मोठा जाळ झाला. विलक्षण दुर्गंधी सुटली. नर्मदेने नाक दाबून घेतले.

पाच मिनिटांत त्या रक्त-मांस-केसांची चार चिमटी राख झाली. म्हातारीने ती कवटीच्या तुकड्यात भरली. मग स्वत:कडच्या बटव्यातून एक बाटली काढली. त्यात रक्त होते. ते कुणाचे, ते तिने सांगितले नाही. पण त्याचे चार थेंब तिने राखेत टाकले, आणि ते मिश्रण कालवले. मग ती नर्मदेला म्हणाली, “लुगडं सोड. पोलकं पण काढ. काही काही ठेवू नकोस अंगावर.”

नर्मदेने न लाजता सारे कपडे काढून टाकले. घडत असलेला प्रकार, ती म्हातारी, तिचे ते मंत्र, ती दुर्गंधी, आणि तो धूर या साऱ्यांनी त्या स्मशानातल्या काळोखात असे काही जगावेगळे विचित्र भेसूर वातावरण तयार झाले होते, की त्यामुळे एरवीच्या साऱ्याच भावना तिला सोडून गेल्या होत्या.

येशीने कवटीतले ते मिश्रण तिच्या चेहऱ्यावर, तिच्या अंगभर आपल्या हातांनी लावले. ते लावत असतानाही तिचे मंत्र पुटपुटणे चालूच होते. मध्येच थांबून ती म्हणाली- “आता तुझ्या शरीराच्या कुठल्याही भागावर त्याची नजर पडली, तरी तो धावत आलाच, म्हणून समज तुझ्याकडे. आता त्याची सुटका नाही.”

सगळे मिश्रण संपले. तेव्हा तिचे पुटपुटणेही संपले. तो कवटीचा तुकडा तिने नर्मदेच्या उघड्या शरीरावरून फिरवला आणि वळून न पाहाता मागच्या मागे लांब भिरकावून दिला. मग ती म्हणाली,

“झालं. नेस आता लुगडं…”

एकाएकी नर्मदेला भयंकर थंडी वाजून आली. अंग उघडे आहे, आणि चावरे वारे त्याला झोंबते आहे, याची तिला इतक्या वेळात पहिल्यानेच जाणीव झाली. तिने भराभर लुगडे लपेटून घेतले.

“लक्षात ठेव-” येशी म्हणाली, “तुझ्या शरीराला वशीकरणाचं भस्म लावलंय. त्याच्यावरून आंघोळ करायच्या आत तुझी त्याची पहिली भेट झाली पाहिजे. ही अशी आत्ताच्या आत्ता जा त्याच्याकडे. शरीराचा

जमेल तेवढा भाग उघडा कर. जितक्या जास्त भागावर त्याची नजर पडेल. तेवढा तो तुझा जास्त आंकेत होईल. समजलीस? उगाच लाजतबिजत बसू नकोस.”

ती लाजणार नव्हतीच. आता एवढे सगळे अक्रीत करून तिने जे पाऊल पुढे टाकले होते, ते काय मागे घेण्यासाठी? अशा अपरात्री स्मशानात जाऊन तंत्रमंत्र करून घ्यायला जी घाबरली नव्हती, ती काय केवळ पलीकडच्या वाड्यात जाऊन एका तरुण पुरुषाला भेटायला घाबरणार होती? ती त्याच्यासमोर उभी राहाणार होती-त्याच्या आवडत्या कुत्र्याच्या रक्तात, तिच्या स्वत:च्या केसांच्या राखेत तयार झालेल्या भस्माचा लेप लावलेल्या शरीराने उभी राहाणार होती-तिचा चेहरा मीलनाच्या कल्पनेनेच उजळून जाणार होता. न बोलता सारं काही बोलून जाणार होता. पण ती भाषा त्याला समजली नाही, तरी चालणार होते. कारण चेहऱ्यावरचे भस्मच त्याला आपलेसे करणार होते. तो अधिक जवळ येणार होता-ती शरीराचा आणखी थोडा भाग उघडा करणार होती-तो पाहून तो वेडावून जाणार होता-त्याची नजर तिच्या शरीरावरून खुळ्यासारखी फिरणार होती. अधिकाधिक खुळावणार होती. होता होता ती आपले शरीर त्याच्या स्वाधीन करणार होती; नव्हे, तोच तिच्या शरीराच्या स्वाधीन होणार होता. आणि मग- मग कदाचित तो तिच्यावर प्रेमही करू लागणार होता. शरीरापलीकडचे एक सुंदर नाते आकाराला येऊ लागणार होते…

एका नव्या आनंदाने भारावल्यासारखी ती घरी आली. अंगावरचे साधे लुगडे बदलून ती सणासुदीचे भरजरी रेशमी लुगडे नेसली. दहा-दहा वेळा आरशात बघत तिने काजळ घातले, कुंकू लावले. केस विंचरून त्यांचा छानदार अंबाडा घालावा, असे तिच्या मनात आले आणि एकदम धस्दिशी आठवण झाली, की आपले केस गेले…जाऊ देत…डोक्यावरून पदर ओढून घेताना ती मनाशी म्हणाली,-‘एकदा तो भारला जाऊन माझ्याकडे पाहात राहिला की त्याला केसांचे भुंडेपण जाणावणारही नाही.’

ती जमीनदाराच्या वाड्याकडे निघाली, तेव्हा पहाट नुकती फुटू लागली होती. पक्षी झाडाझाडातून किलबिलू लागले होते.

वाड्याच्या पडवीशी ती पोहोचली, तेव्हा आतून भरदार मर्दानी आवाजात म्हटलेली भूपाळी तिला ऐकू आली. क्षणभर सुखावून ती तो मधुर आवाज ऐकत उभी राहिली.

मग ती पुढे झाली. जमीनदाराचा नातू खिडकीशी उभा राहून भूपाळी म्हणत होता. त्याचे गाणे थांबवावे की नाही, हे तिला समजेना. पण नाही, थांबवावे. त्याहून अधिक सुंदर काही घडायचे तर-त्याने आपल्या चेहऱ्यावर नजर टाकायची तर-

ती दारातून आत गेली. तिची चाहूल लागून तो वळला.

“कोण आहे?” -त्याने दचकून विचारले.

ती तशीच उभी राहिली.

“कोण आहे?-कोण आहे?” तो पुन्हापुन्हा विचारीत होता.

ती त्याच्या समोरच उभी होती. त्याचे डोळे तिच्याकडे वळले होते; पण त्यातली नजर ठार आंधळी होती. चाचपडत, पुढे येत तो भयाकुल स्वरात विचारीत होता- “कोण आहे? -कोण आलं आहे?” आणि ती-

ती त्याला उत्तर देऊ शकत नव्हती.

जळमटं

‘आ पल्याच हातांनी आपण हे ओढवून आणलं; आता रडायचं कशाला?’ हे म्हणाले.

यांचं हे नेहमीचंच आहे. अगदी मोठ्ठा आव आणून काहीतरी तत्त्वबित्व सांगायचं.

फुस्-असल्या तत्त्वांना कोण्णी भीक घालत नाही.

मी म्हणते, जन्मभर काय उपयोग झाला त्या तत्त्वांचा, तर आता मेल्यानंतर होईल?

मारे खूप विचार केला अमकं नि ढमकं, पण माणसाला शेवटी मन म्हणून काही असतंच की नाही?

आणि आता तर आपल्याला मनच आहे नुसतं-शरीर आहेच कुठं म्हणण्यासारखं? मनाच्याच सांगीनं घेतला तर आकार घेणार ते! तेसुद्धा नेहमी जमतंच असं नाही.

म्हणाले कशावरून, तर मी रडत बसले होते ना, त्यावरून.

म्हणे ‘आपल्यासारख्यांनी कातरवेळी रडू नये, ते जिवंत माणसांना चांगलं नसतं’, यंव नि त्यंव.

आता चांगलं न् वाईट, आपल्याला काही पडल्येय का त्याची उठाठेव? तुम्ही अगदी चांगले वागलात. म्हणून कोण काय नवस का बोलायला येणारेय तुमच्यापाशी? आणि जिवंत माणसाला नसेना का चांगलं-अशी काय ढीगभर जिवंत माणसं पडलीयत हो तुमच्यासमोर? मेलं चिटपाखरूदेखील नाही. अख्खा ब्लॉक रिकामा. दिवा लावायलादेखील माणूस नाही. बरंच आहे म्हणा ते-दिवा लावला की मेली कशी विरविरल्याची भावना होते. काळोखात निदान घट्टमुट्ट बसून तरी राहता येतं. पण माणसांची जाग-ही हवीच. आम्ही या मुंबईच्या गर्दीत माणसांच्या बरोबर राहिलेले- तिकडे स्मशानात, नाहीतर जुन्या वाड्यात, नाहीतर जंगलात ज्यांचा जीव रमत असेल त्यांचा, रमो. आपल्यात असा माणूसघाणेपणा नाही. वाटतं चांगलं भरलेलं घर असावं, दुडदुड धावणारी मुलं असावीत…

निदान बच्चूसारखा एक तरी मुलगा!

बच्चू!

‘झाली पुन्हा तुझी रडायला सुरुवात?’ हे पलीकडच्या कोपऱ्यातून खेकसले.

जसे काही हे घुम्म बसून राहिले, म्हणजे कुणी समजणारेय की बच्चूविषयी यांना काही वाटतच नाही! फसवतात कुणाला? मी काय त्यांना आज ओळखतेय? मग कशाला भिरभिरत होते या गजबजलेल्या रस्त्यांमधून त्याचा पत्ता शोधायला? आणि आता मला सांगताहेत, पण बच्चू आला राहायला या ब्लॉकमधे, त्या दिवशी काय पण खुळावले होते! मी एकसारखी दबकावीत होते, अहो जरा दमानं घ्या. ती माणसं पहिल्यांदाच काच घेतील, तर नाही! सारखे आपले पुढेपुढे पुढेपुढे करीत होते. सुदैवाने त्यांच्यातल्या कुणाला असलं काही दिसू शकत नव्हतं. एकटा बच्चूच काय तो-

पहिल्यांदा गंमतच झाली. ब्लॉक बघायला आली नवरा-बायको, दोघंच. आम्ही जाम हालचाल न करता गप्प बसून राहिलो. म्हटलं जरा खुट्ट झालं, तर तेवढ्यावर सगळं फिसकटायचं, आणि पुन्हा ब्लॉक चार-सहा महिने बंद राहायचा! आधीच ओरड झालेली- ‘इथं ते तसलं काही आहे, तसलं काही आहे’ म्हणून! चावट मेले! जसं काही नाव घेतलं तर आम्ही त्यांना खाणारच आहोत! तर ती मंडळी जाईपर्यंत आम्ही तश्शी कडीपाटाला ओठंगून बसून राहिलो. ‘जळमटं चिक्कार झालीयत’ असं कुणीसं म्हणालं देखील. पण आम्ही हसलोसुद्धा नाही. तोंड मिटून बसलो.

पण मंडळी गेली, ब्लॉकला कुलूप लागलं आणि झाली यांची चिडाचेड करायला सुरुवात! म्हणे 'लहान मूल दिसत नाहीये! दोघंच जणं आहेत! मुलं हवी होती!'

आता हवी होती ते झालंच. पण होतील नंतर! तरुण तर आहे जोडपं!

तर यावर यांचं अगदी कडवट बोलणं- म्हणे 'पाच-दहा वर्षं तर झालीच असतील लग्नाला! अजूनपर्यंत झालं नाही, तर आता काय होणारेय?'

इतकं बोलते तरी ठीक. पण वर आणखी म्हणाले की, 'आपल्यासारखंच दिसतंय! आता हे काढायची काही गरज होती का?'

मी तरी बाईमाणूस! वाटतं एक मनाला. पण हे एवढे पुरुषासारखे पुरुष! यांना एवढं मनाला लावून घ्यायची काय गरज? मुलं नसलेली कित्तीक जोडपी आहेत! आणि जन्मभर अगदी चेष्टेवारी नेत हं हा विषय! जसं काही स्वत:ला काही वाटतच नाही, असं लोकांत दाखवून मला खुळ्यात काढायचे! मग मेल्यानंतर हा असा तोच ध्यास घेणं शोभतं का यांना?

पण चार दिवसांत ती मंडळी राहायला आली आणि सगळाच वाद अगदी संपुष्टात म्हणतात ना, तसा निघाला. कारण त्यांना मुळी चांगला साडेतीन-चार वर्षांचा मुलगा होता! तोच बच्चू! पोर इतकं गोड होतं! गोरंगोमटं, आणि अगदी व्रात्य दिसणारं. म्हटलं बरं तर बरं, आपल्याला असता असला मुलगा, तर हैराण झाले असते हो! नाही तेच बरं!

पण यांना मुळी काही सुचेचना. कडीपाट सोडून खाली आले आणि इकडे तिकडे वावरायला लागले, त्या मुलाच्या भोवती, भोवती. एकदा दिवा काय हालवलान्, एकदा बॅगच काय पाडली! सगळं वय चुलीत गेलं. अगदी मुलाहून मूल झाले होते. बरं तर बरं, आकार घेतला नव्हता. नाहीतर सगळीच पंचाईत! मी दामटलं म्हणून, नाहीतर तेवढंसुद्धा करायला मागंपुढं पाहिलं नसतं!

आणि तेही झालंच शेवटी. रात्री बच्चू झोपता झोपेना. त्याला, मला वाटतं, काहीतरी जाणवलं होतं. त्याच्या आई-वडिलांना मला वाटतं, दिसण्यातलं नव्हतं. पण त्याच्यात होता तो गुण! म्हणून तो जरा अस्वस्थच होता. जेवणं झाली, अंथरुणं घातली, पण हा काही झोपेना. शेवटी तर रेडिओसुद्धा बंद झाला. पण याचे डोळे साताड उघडे! तशी त्याची आई म्हणते- "झोपतोस की नाही आता? नाही तर बागुलबोवा येईल हो, सांगून ठेवते."

आणि काय यांना खुमखुषी आली-ते यांनी एकदम आकारच घेतला! आणि तस्से जाऊन उभे राहिले त्या पोरासमोर... म्हणाले- 'हा बघ मी आलो– बागुलबोवा.'

पोर खरं म्हणजे भेदरायचा. पण काय झालं कुणास ठाऊक, तो न घाबरता यांच्याकडे टकमक बघतच राहिला. मग हे देखील खजील झाले. म्हणाले, 'घाबरू नकोस हो. मी आहे तुझा आजोबा.'

मुलगा खरंच गुणाचा हो! दुसऱ्याएखाद्या मुलानं रडून आकांत केला असता. पण हा नुसतं इवलंसं हसला, आणि कुशीवर वळून झोपी गेला. आईला बापडीला काही दिसलं नाही, की काही कळलं नाही. पण पोरगा झोपला एवढ्याच समाधानावर ती माउली झोपून गेली.

ती झोपली, तरी आम्हांला कुठून झोप यायला? दोघंही आम्ही आनंदानं नुसतं फुलून गेलो होतो. नेहमीपेक्षा अधिकच हलकी हलकी झालो होतो. मुलाची हौस जन्मभर मारावी लागलेली; पण आता मेल्यानंतर नातू मिळालेला. आता आमच्या मनातला हा हिशेब दुसऱ्यांना थोडाच समजणार? तेव्हा सावध राहणं भाग होतं. हा गोड पोरगा नजरेसमोर राहायचा, तर त्याच्या आई-वडिलांनी आमची धास्ती घेऊन चालण्यासारखं नव्हतं. जिवंत माणसं कधीकधी फारच खुळ्यासारखी वागतात. मेलं नको तिथं घाबरून उगीचच धावाधाव करीत सुटतात. एवढास्सा जरी वेडावाकडा प्रकार दिसला तरी घाबरून ही माणसं एकदम ब्लॉक सोडतील! तेव्हा

आम्हो ठरवलं, आपणच शहाण्यासारखं वागायचं. काय करायचं, काय नाहो. खूप ठरवत बसलो रात्रभर. मुख्य म्हणजे वस्तूबिस्तू इकडच्या तिकडे होऊ द्यायच्या नाहीत, उचलाबिचलायच्या नाहीत, असं अगदी पक्कं केलं. दोघंही म्हातारी, तेव्हा ते कठीण नव्हतंच म्हणा. पण यांना जरा सांभाळायला हवं होतं. कधी कधी नको तेवढा उत्साह दाखवतात!

पण त्यांना दोष दिला, आणि मीच एकदोनदा खुळेपणा केला. एकदा बच्चू कॉटवर झोपला होता. आई कामात होती. इकडे हे वेडं झोपेत सरकत सरकत कॉटवरून अगदी पडायच्या बेताला आलं. तशी माझ्यानं राहवेना. पटकन् त्याला बाजूला सरकावून दिलं भिंतीकडे. त्याला सरकवलं अन् पाहते, तर त्याची आई डोळे विस्फारून माझ्याकडे बघत राहिलेली! मी दिसत नव्हते म्हणा तिला! पण काहीतरी नक्कीच जाणवलं असणार. कारण क्षणभर तश्शी बघत उभी राहिली. ती मला घाबरायची, तर मीच घाबरले, हिच्या काही लक्षात येतं की काय म्हणून! मग वाटतं, तिनंच स्वत:ची समजूत घातली की मुलगा गेला असेल आपणहून सरकत, आणि लागली कामाला न् काय! पण गाफीलपणा माझाच!

दुसऱ्या वेळेस तर आणखीनच कमाल झाली. बच्चूनं कशासाठी तरी हट्ट धरला आणि तो बसला जाम रडत! आईनं किती समजूत घातली तरी थांबेचना. रडून रडून धाप लागली. शेवटी माझ्याच्यानं राहवेना. मी आकार घेतला आणि त्याला पटकन् उचललं. तो जमिनीवरून उचलला जाताक्षणी त्याच्या आईची किंकाळी- आणि चक्क बेशुद्ध पडली हो बाई! पण माझं लक्ष कुठं? मी बसले लाड करत त्या पोराचेच. तो गुलामदेखील 'आजी आजी' करून बसला माझं नाक ओढीत! तरी फार वेळ रमले नाही. म्हटलं, एवढा अंगावर खेळवायला मिळाला, हेच पुष्कळ झालं. अधिक लोभ नको, म्हणून खाली ठेवणार, इतक्यात नेमकी त्याच क्षणी बच्चूची आई शुद्धीवर आली. मी तिला दिसत नव्हते; पण बच्चू खाली ठेवला जातोय्, असं पाहून परत बेशुद्ध पडली आणि तिला फणफणून ताप आला!

यांनी मला अशी फैलावर घेतली! 'तू अशीच आहे, नि तुला कळतच नाही– हे न् ते!' मी ऐकून घेतलं सारं मुकाट्यानं! करते काय?

पण त्या प्रसंगापासून दोन गोष्टी झाल्या. एक म्हणजे तापातून उठल्यानंतर बच्चूची आई त्याच्या वडिलांना सांगायाला लागली, "मला भीती वाटते इथं राहायची. आपण नवी जागा बघू या." त्याचं म्हणणं, "जागा काय अशा झाडाला लागल्यात? हीच मोठ्या मुष्किलीनं मिळाली. ती अशा भासाबिसांनी सोडून कसं चालेल?" यावर तिचं म्हणणं, "मला भास मुळीच झाला नाही. बच्चूला कुणी तरी चक्क उचलून घेतलेलं नि खाली टेकवलेलं मी पाहिलं. पण कुणी ते मला दिसलं नाही." त्याचं म्हणणं, "ज्या अर्थी दिसलं नाही, त्या अर्थी कुणी असणंच शक्य नाही." हेऽ दोघांचं भांडण! आम्ही ऐकत होतो गुपचूप! आमच्याकडे पण पूर्वी या विषयावर वाद व्हायचा! मी म्हणायची, माझा विश्वास आहे, तर त्यांचं म्हणणं असायचं, विज्ञानाला अजून सापडलेलं नाही, त्याअर्थी तसं काही असणंच शक्य नाही! म्हटलं, आता घ्या, कुणाची जिरली? मी नेहमी चिडवते यांना त्या विषयावरून. हे पण मुकाट्यानं ऐकून घेतात. न ऐकून सांगतील कुणाला? अर्थात त्या नवराबायकोच्या वादात आम्ही काही पडलो नाही. म्हटलं आणखीनच चिघळायचा सगळा प्रकार! नसती उठाठेव सांगितलीये कुणी?

दुसरी गोष्ट म्हणजे बच्चूला एकदमच आमचा लळा लागला. तो जसा काही ओढलाच गेला आमच्याकडे. दिवसातून दोन-चार वेळा तरी तो "आजोबा हवेत, आजी हवी" म्हणायला लागला. आता त्याच्या सख्ख्या आजी-आजोबांपैकी वडिलांची आई न् आईचे वडील हयात होते म्हणे! पण ते कुठं दूर परगावी! तेव्हा आईवडील सांगत, 'मे महिन्यात जाऊ, नाहीतर दिवाळीत जाऊ,' असलं काहीतरी. पण तेवढ्यानं त्या पोराचं कुठून समाधान होणार? त्याचं म्हणणं असायचं- "इथ्थेच आहेत आजी-आजोबा. तेच मला हवेत." आता हा हट्ट काय, तो काही दोघांना समजत नसे. काहीतरी थातुरमातुर बोलत. मग पोर बापडं हिंपुटी होई. माझ्या भारी मनात येई की पोराला मांडीवर घ्यावं, गोडधोड भरवावं, काऊचिऊची-राजाराणीची गोष्ट सांगावी, त्याला चांगली स्वच्छ आंघोळ घालावी. खसाखसा त्याचं अंग पुसावं, पण हे कुठून जमायला? लोकांना आपलं वाटतं की, आम्हांला अशक्य काहीच नाही! पण एवढी साधी गोष्ट- जिवंत आजीला सहज करता आली असती, ती नव्हतीच ना आम्हांला साधत?

बरं, त्या दोघांची तरी कमालच! क्षणभर म्हणून त्याला एकटा सोडत नसत. संध्याकाळच्या अधवट उजेडात, नाहीतर एखाद्या खोलीच्या अंधारातल्या कोपऱ्यात पटकन् आकार घेऊन त्याच्याशी चार शब्द बोलावेत, त्याचं कोडकौतुक करावं म्हटलं, तर ते काही शक्य नव्हतं. "कुठं आहेस बच्चू तू?" म्हणत दोघांपैकी एकजण हजर! आणि एवढास्सा तीन खणांचा ब्लॉक आमचा. गॅलरी होती. तेवढाच आडोसा. तेव्हा हे काही जमण्यातलं नव्हतं. त्यातनं त्यांचंही काही चूक नाही. एकुलता एक मुलगा त्यांचा! बरं वय समज न आलेलं. ते तरी कसा होऊ देतील त्याला नजरेआड? आम्हांलाही सांभाळूनच वागावं लागे. फट् म्हणता गेले जागा सोडून, तर घ्या काय? तरी बरं, नशिबानं बच्चूच्या वडिलांचा आमच्या असण्यावर विश्वास नव्हता!

तशी त्या बाईची एकटीची धांदलच व्हायची, घरचं काम सांभाळून बच्चूकडे लक्ष ठेवायचं म्हणजे. त्यातून पोरगं असं उनाड की कधी कुठं चढेल, कुठून पडेल, काही सांगवत नसे. रोज एखाद्या तरी ठिकाणी खरचटून घेई. स्वयंपाकाची वेळ असली म्हणजे तर त्याच्या आईला नको जीव होई. मग मला वाटायचं, या पोराची आपण जिवंत आजी असतो, तर केवढी मदत झाली असती! आत्तासुद्धा मोह व्हायचा. पण मनाला आवर घालायचे. अगदी दूध उतू जात असलं तरी गॅससुद्धा बंद करायचे नाही मी. करून उपयोग काय? ती बाई किंकाळ्या फोडून घर डोक्यावर घेणार, हाच ना? त्यापेक्षा जाऊ दे. आपल्याला काही दिसलं नाही, आपण काही ऐकलंच नाही, असं मानायचं.

मध्यंतरी यांनी एक छान युक्ती शोधून काढली. दिव्याचा फ्यूजच काढून टाकायचे. मग बराच वेळ काळोख राहायचा. त्या काळोखात मग आम्हांला बच्चूचे लाड करायला फावायचं. त्याला उचलून घ्यायचं, मांडीवर घ्यायचं, त्याचे पापे घ्यायचे. गंमत यायची. त्यालाही ते आवडायचं. हसत असायचा गुलाम खुदुखुदु! उजेड व्हायचा, तेव्हा त्याच्या हातात चांदीचे कागद नाही तर एखादं पेपरमिंट असायचं. विचारलं कुणी, तर बिनदिक्कत सांगायचा, आजोबांनी दिलं म्हणून. कुणाला संशय येत नसे की काही नाही. यांची हौस अगदी उताला जायची. दुसरं बालपण आल्यासारखं करायचे. मणी काय जमवायचे, चांद्या काय जमवायचे! कशाला, तर बच्चूला द्यायला. सरळ दुकानातून बरणी उघडून पेपरमिंट लाटायचे! मी म्हटलं, 'काय हे? जन्मात कधी आपण चोरी केली नाही!' तर म्हणायचे, 'मग काय पैसे देऊन आणू? पैसे मिळवायला जातोय् कुठं मी? आणि मिळवले तरी माझ्या हातचे पैसे घ्यायची कुणाची छाती होणार?' –ते बाकी खरंच होतं.

बच्चूवर यांचं सदासर्वकाळ लक्ष असायचं. एके दिवशी ब्लॉकचा दरवाजा उघडा राहिला होता. तर तेवढ्यात दारात आला एक गोसावडा! बच्चू गेला पुढं, कोण आहे हे बघायला. तो गोसावडा लागला याच्याशी बोलायला. गप्पा मारीत मारीत बच्चूला घेऊन एक जिना उतरलासुद्धा. यांच्या लक्षात आलं तसं, तसेच तरंगत पोहोचले त्या गोसावड्याजवळ. एक दिली मुस्कटात ठेवून आणि बच्चूला उचलून घेऊन क्षणात परत आले. मग गंमत सांगत होते- 'काय म्हणे तो गोसावडा पळालाय् 'भ्-भ्' करीत!'

पण एके दिवशी मोठीच पंचाईच झाली. बच्चूचे वडील चालले होते ऑफिसात. आई होती स्वयंपाकात. बच्चू वडिलांना 'टाटा' करायला गॅलरीत गेला. रोज त्याचा जेमतेम हात दिसायचा. पण आज वाटतं तिकडे कुणी तरी ठेवली होती एक खुर्ची! हा सरळ चढला खुर्चीवर आणि वाकून 'टाटा' करायला लागला. पाहता पाहता इतका वाकला, इतका वाकला, हे गॅलरीच्या दाराशी पोहचलेले, मी शटरवर बसून बघतेय- तर हा एकदम इतका वाकला की तोल जाऊन सरळ खाली! वडील पाहात राहिले, मुलगा खाली येतोय! ते गारठलेले. हात काही त्यांना उचलवेना. पण हे झप्दिशी गेले तसेच अर्ध्या आकारानिशी आणि हवेतल्या हवेत झेललानी पोराला! म्हणून वाचला, नाही तर दगडी फरशीवर डोकंच फुटायचं. बच्चू वाचला ही आनंदाची गोष्ट - पण या प्रकारात भलतंच कर्म उभं राहिलं. हवेतल्या हवेत बच्चू पडायचा थांबला, नि मग अलगद खाली आला, म्हणताक्षणी त्याचे वडील जे मटकन् खाली बसले, ते उठता उठेचनात. चार माणसांना धरून उठवावं लागलं-पायातनं त्यांच्या जसं काही वारं गेलं होतं!

झालं, त्या दिवसापासनं जागा बदलायची भाषा घरात सुरू झाली. बच्चूच्या वडिलांचा विश्वास नव्हता, तो बसला. बरं तो पडत असताना धरायलाच हवं होतं. ती वेळ का परिणामाचा विचार करीत बसण्याची? म्हणजे नशिबानं दावा साधला तो असा. बच्चूची आई "तरी मी म्हणतच होते, इथं काही तरी आहे" असं एकसारखं म्हणत बसली, आणि वडीलसुद्धा "तरी मला वाटतच होतं की, हल्ली वरचेवर दिवे कशानं जातात" असं

काहीतरी उकरून काढायला लागले. बच्चू तर काय, विचारल्याबरोबर आमचं वर्णन धडाधडा करायला लागला. गधड्याला ठाऊक नव्हतं, नवीन जागेत आजी-आजोबा असणार नाहीत, ते! बेअकली कारटं!

नंतर एके दिवशी बच्चूचे वडील एका काळ्या काटकुळ्या माणसाला घेऊन आले. अंगात धोतर, बंडी, कपाळाला गंध!– मांत्रिक होता म्हणे! असं बच्चूच्या वडिलांनी त्याच्या आईला सांगितलं. म्हणजे ढोंगच करीत होता तो फाटका माणूस! मांत्रिक काय आम्हांला ओळखू येत नाहीत? मेल्याला दगडधोंडेसुद्धा कळत नव्हते. बच्चूचे वडीलच सांगत होते, असं होतं नि तसं होतं, मुलाला काहीतरी दिसतं नि आम्हांला कसलेकसले भास होतात. पुरतं ऐकलं नि त्यालाही चेव चढला. त्यानं खांद्याला अडकवलेल्या पिशवीतनं पुड्या काढल्या. गुलाल काय नि तांदूळ काय, ऊद काय नि काय काय! मेल्याचे नसते चाळे बघून घ्या! मी इतकी फणफणत होते! हे सारखं 'अग हळू-अग हळू' म्हणत बसले होते; पण ऐकलंऐकलं आणि त्यांनाही संताप अनावर झाला. कश्शाकश्शाचा विचार न करता ते उठले नि त्यांनी आकार घेतला. बच्चू नाचायला लागला, "आजोबा आले-आजोबा आले" म्हणून टाळ्या पिटत!

यांनी त्या काटकुळ्या माणसाची मानगूटच पकडली, आणि म्हणाले, "साल्या होतोस की नाही चालता? माझ्या घरात येऊन मला नावं ठेवतोस? चल, फूट इथून." त्यांचा अवतार पाहूनच तो खलास झाला! एक लाथ त्याच्या ढुंगणावर मारून यांनी त्याला घराबाहेर काढल्यानी नि वर त्याच्या पिंजर, उदाच्या पुड्या उघड्याच्या उघड्या त्याच्या अंगावर फेकल्यानी. धडपडत, गडगडत कसा तरी तो जिना उतरून गेला आणि हे शूर वीरासारखे परत येऊन कोनाड्यात बसले. नुसती यांनाच हुशारी वाटली असं नाही, मलादेखील अगदी धन्य झालं! मेला हा काय त्रास आम्हांला, आमच्याच घरात?

दोघेही अगदी खूष होऊन गेलो होतो. पण पाचच मिनिटांत लक्षात आलं की, आपण भलताच जबर घोटाळा करून ठेवलाय. झाला प्रकार पाहून बच्चूच्या आईची दातखीळ बसली होती, आणि नवरा तिची समजूत काढत होता, "उगी उगी, सोडू या हं आपण ही जागा! –उद्याच्या उद्याच सोडू या."

ते ऐकलं, आणि आमची सगळी हुशारी पार मावळली.

म्हटल्याप्रमाणे खरंच ती दोघं दुसऱ्या दिवशी कुलूप लावून निघाली. बच्चूला काय, आपण जागा सोडतोय एवढं कळत कुठे होतं? त्याला वाटत होतं, आपण फिरायलाच निघालोत. तरी पोर "येतो हं आजोबा, येतो हं आजी" असं सांगून निघाला.

त्याचे ते शब्द ऐकले आणि गलबलून आलं. मला वाटलं, न राहवून हे आता पुढं होणार नि त्याला उचलणार! त्यांना वाटलं, माझा धीर सुटणार! पण प्रत्यक्षात कुणीच पुढं झालं नाही. आम्ही दोघं एकमेकांच्या आधारानं तशीच बसून राहिलो.

ब्लॉकच्या दाराला पुन्हा एकदा बाहेरून कुलूप लागलं.

पुन्हा पूर्वीसारखेच दिवस लांबायला लागले. रात्री संपत नाहीशा झाल्या.

नाहीतर मध्ये त्या दोघांची उठल्यापासून निजेपर्यंत नुसती घाई घाई … त्यात त्या चिमण्याची लुडबूड नुसती.

आता सारं शांत. आम्ही बसलो आहोत आढ्याशी जळमटांसारखे… काढतो आहोत आठवणी मधल्या दिवसांच्या. कसा बोले आमचा राजा… कसा…कसा 'आजी' म्हणे… गाल फुगवून 'आजोबा' म्हणे… हट्ट करून रडत सुटे… ढोपरं फोडून घेई! काही का असेना-आपलं स्वत:चं अजिबात कुणी नव्हतं. त्यापेक्षा चार दिवस का होईना, पण हे दुसऱ्याचं मूल गेलं ना भेटून? परक्याचं पोर, ते तरी आणखी किती दिवस राहायचं?

मध्यंतरी यांच्या डोक्यात काय आलं, तर ते उठले आणि रस्त्यात भिरीभिरी हिंडून आले. विचारलं, कुठं गेला होतात, तर म्हणाले, 'बघून आलो त्यांच्याकडे येणाऱ्यातलं कुणी भेटतं का. नवीन पत्ता तरी समजला

असता-'

मी म्हटलं, 'काही नको नवीन पत्ता कळायला. तिकडे दुसऱ्याच्या घरात जाणं आपल्याला काही जमायचं नाही. त्यापेक्षा तिकडे बरा तो सुखात...इकडे आपण सुखात!'

'सुखात आहेस, तर मग रडतेस कशाला?' यांचे असलेच खवचट प्रश्न.

'आपल्याच हातांनी आपण हे ओढवून आणलं, मग रडायचं कशाला?'

'हातांनी ओढवून आणलं, म्हणजे? इतक्या वर्षांनी घरात लहान मूल आलं आणि त्याच्यावर माया केल्याशिवाय राहता येतं?'

'पण लहान मुलाला सोपं असतं माया विसरणं. कठीण असतं ते आपल्यालाच. तो गेला असेल एव्हाना आजोबा-आजीला विसरून. नवीन जागेत रमला असेल. त्याच्या आई-वडिलांनी सुटकेचा नि:श्वास टाकला असेल...'

असं म्हणत म्हणत आम्ही बसलो होतो... खोलीत काळोख पडला होता.

तेवढ्यात एक गंमत झाली.

बंद ब्लॉकच्या कुलूप लावलेल्या दारातून बच्चू आत आला.

'आऽजी आजोऽबा-मी आऽलो...' धावतच येऊन त्यानं मला मिठी मारली. 'तिकडे ना-मला-ना-तुमची रोजरोज आठवण यायला लागली. मग खूप ताप यायला लागला-आणि मग-मग मी आऽलोऽऽ' तो नाचत म्हणाला.

आमच्यासाठी हाय खाऊन-बच्चू आई-वडिलांचं जग सोडून- आमच्या जगात आला होता! कायमचा आमचा झाला होता! फक्त आमचाच! आमचा दोघांचा!

किती सुंदर हा क्षण!

- मोठ्ठ्या प्रयासानं मी तो भास पुसून टाकला. ती कल्पनासुद्धा मनातून काढून टाकली. म्हटलं, 'नको बच्चू, तू आमच्याकडे येऊच नको. जिथं असशील, तिथं जग– वाच. मोठा हो. मोठा हो...'

पण तेव्हापासून न चुकता दर संध्याकाळी तो भास होतो! -तो पुसला गेला की एकटेपण अधिकच वाढतं...

तडा गेलेली काच

भिंत. पांढरीशुभ्र भिंत. एकदेखील डाग नसलेली, एकही तडा न पडलेली, एकही चित्र, तसबीर न टांगलेली पांढरीफेक भिंत.

त्या पांढरेपणाखालचे सगळे डाग, सगळे ओरखाडे पुसून काढलेले. सगळेच डाग निपटून जात नाहीत. पण वर लावलेल्या सफेतीने दिसेनासे होतात. तसे सगळे घालवून पांढरीफटक पडलेली भिंत.

भिंतीला टेकून ठेवलेली खुर्ची. पत्र्याची.

त्या खुर्चीतच तो कोरा मुलगा बसला आहे.

त्याच्या शेजारच्या खुर्चीत त्याचा मित्र.

त्या दोघांच्या पुढ्यात एक टेबल. काचेने झाकलेले. काचेत उलटे ठेवलेले टिपकागद. सगळ्या डॉक्टरांकडे नेहेमी दिसणारे. फार्मस्यांच्या जाहिरातींचे. बाळे आणि बाटल्या काढलेले.

काचेला एक मोठा तडा गेला आहे. वेडावाकडा. कुरणातून गढूळ ओहोळ धावावा, तसा.

टेबलाच्या अलीकडच्या बाजूला मी. डॉक्टर. मनाचा.

तो कोरा मुलगा माझा पेशंट. डॉक्टर व पेशंट यांच्यामध्ये एक टेबल. तडा पडलेल्या काचेचे; आणि शेजारी भिंत. पांढरीसफेद, कोरी करकरीत भिंत.

त्याच्या हातून असे काही घडले असेल, असे त्याच्याकडे पाहून वाटायचे नाही.

अवघा एकोणीस वर्षांचा मुलगा. चांगल्या घरातला, अस्सल ब्राह्मण कुळातला. वर्णाने गोरापान. व्यायामाने घोटवलेली शरीरप्रकृती. पण नाजूक, हळवा. नाकेला चेहेरा. डोळे पाणीदार. मात्र आता त्यांच्यात एक वेगळी लकेर दिसू लागलेली.

आणि मुद्रेवर विलक्षण आनंद!

असा आनंद मी आजवर कधी कुणाच्या मुद्रेवर पाहिलेला नाही. एखादे युगायुगांचे वांच्छित हाती लागावे आणि मग जसा ब्रह्मानंद होईल, त्या कोटीतला तो हर्ष. अशा आनंदाची फक्त कल्पनाच करावी. प्रत्यक्षात तो क्वचितच पाहायला मिळायचा. वास्तविक मी डॉक्टर. असंख्य चेहेरे मी पाहिलेले. त्यातून गुन्हेगारांना नेहेमी माझ्याकडे आणले जाते. गुन्हेगार खरेच आजारी आहेत, की ढोंग करीत आहेत, विकृती असली तर ती कसली आहे, हे मला नेहेमी पारखावे लागते. माझे ते कामच आहे. आजवर मी अनेक निर्ढावलेले, कळवळणारे, दु:खाने पिचलेले चेहेरे पाहिले आहेत. प्रत्येक चेहेऱ्यावर कळत-नकळत पडलेला दु:खाचा छाप मला पाहावा लागलेला आहे. पण आनंदाने फुललेला असा चेहेरा मात्र मी प्रथमच पाहात आहे. अशी निरागसता त्या चेहेऱ्यावर आहे की, त्याचा गुन्ह्याशी पाहण्यापुरताही संबंध आला असेल, असे वाटणार नाही. एखाद्या तान्ह्या अर्भकासारखी ती मुद्रा निष्पाप आहे. त्यात नवल नाही म्हणा. तान्ह्या बाळाला जसे जगाचे भान नसते, तसेच ते यालाही नाही. त्याच्या त्या विलक्षण आनंदात त्याचे सर्वच गोष्टींचे भान सुटले आहे. एखाद्या व्यसनी माणसाला व्यसनापासून फार काळ दूर ठेवावा, त्यामुळे झुरूनझुरून तो अगदी मरणोन्मुख व्हावा आणि नंतर ते व्यसन त्याला मुबलक प्रमाणात मिळावे, तो त्यात अगदी न्हाऊन निघावा, आणि मग त्याच्या चेहऱ्यावर तृप्तीचा आनंद पसरेल, तसला हा आनंद! वेदनेने पिवळवटून निघणारा चेहेरा पाहून मला एक वेळ फारसे काही वाटणार नाही; पण खरे सांगतो, आनंदाने भडकलेला हा चेहेरा पाहून मात्र मी मनातून धसकलो.

पोलिसांनी त्याला माझ्याकडे पाठवले आहे. त्याच्यात कुठली विकृती आहे हे समजले, तर त्याच्या हातून जे घडले त्याचे कारण समजेल, अशा विचाराने.

दुसरे असे की, तो पोलिसांच्या प्रश्नांना सरळ उत्तरे देण्याच्या परिस्थितीत नाही.

त्याला सुसंगत उत्तरे देता येत नाहीत, असे पाहिले, तेव्हा कुणीतरी त्याला डॉक्टरकडे नेण्याची कल्पना काढली. डॉक्टरचे नाव काढताच तो कावराबावरा झाला. एकदम म्हणाला, "डॉक्टरकडे कां पाठवता? माझ्यात काही विकृती नाही. खरंच काही नाही."

-हे त्याचे शब्द! अगदी 'विकृती' असा सहसा न सुचणारा शब्ददेखील!

अर्थातच मी त्याला, आपण डॉक्टर असल्याचे कळू दिलेले नाही. एखाद्या मित्राकडे गप्पागोष्टी करायला जावे, तसे त्याच्या मित्राने त्याला माझ्याकडे आणले आहे.

मित्र त्याच्याच वयाचा; पण थोडा निबर वाटणारा. कॉलेजात दोघे एकाच वर्गात आहेत. हॉस्टेलमध्ये दोघेही एकाच रूममध्ये राहतात. अभ्यासात दोघेही साधारण बरे.

म्हणजे त्याच्या हातून ते घडण्याच्या आधी.

आता मात्र कॉलेज, हॉस्टेल, अभ्यास या साऱ्यापासून तो फार लांब गेला आहे— फार फार लांब…

एकटा तोच नव्हे, त्याचा मित्रही थोडा हादरूनच गेला आहे; पण त्याला निदान जगाचे तरी भान आहे. तसा तो मला समंजस वाटतो. भांबावला असूनही तो शक्य तितके व्यवस्थित बोलण्याचा प्रयत्न करीत असतो.

"आम्ही याला हनुमंत म्हणत असू गमतीनं." त्याचा मित्र म्हणतो, "कारण याला व्यायामाची फार आवड. परीक्षेच्या दिवसांतसुद्धा व्यायाम केल्याशिवाय राहात नाही. शरीराची फार काळजी घेतो."

तो स्वत:शीच हसतो. मित्र दचकतो.

मग म्हणतो, "नुसतं तेच कारण नाही. याला ब्रह्मचर्याचं भयंकर वेड आहे. कसलीकसली पुस्तकं आणून वाचायचा. 'ब्रह्मचर्य हेच जीवन' वगैरेसारखी. रात्री झोपण्याच्या पोझिशनविषयीसुद्धा याच्या कायकाय थिअरीज होत्या!"

आपण काहीतरी भलतेच बोलून गेलो, असे वाटून मित्र जीभ चावतो.

मी काही विशेष वाटल्यासारखे दाखवीत नाही. उलट म्हणतो, -"हं! म्हणून तुम्ही त्याला 'हनुमंत' म्हणता! पण मग मुलींशी त्याची कितपत -"

"छे छे! मुलींशी बोलणं तो टाळीतच असे. थोडंफार बोलायचा तो हिच्याशीच- नीलाशी."

तिचा उल्लेख करताच मित्र त्याच्याकडे पाहतो.

पण त्याचे लक्ष नसते. डोळे मिटून तो आपल्याच तंद्रीतच बसलेला आहे.

"नीला तशी सगळ्यांशीच मोकळेपणानं वागायची." मित्र पुढे म्हणाला, "आमच्या हॉस्टेलच्या रेक्टरांची ती मुलगी. जिना एकच असल्यामुळं ती आम्हांला अधूनमधून भेटायची. भेटल्याबरोबर हसायची, बोलायची. त्यामुळं आमची सगळ्यांचीच तिच्याशी थोडीफार ओळख झाली होती."

मी खिडकीतून बाहेर नजर टाकीत ऐकत राहतो. बाहेरच्या फुलांच्या ताटव्यांकडे पाहतापाहता माझ्या

डोळ्यांसमोर नीलाची मूर्ती आकार घेऊ लागते. एक लहानखुरी मुलगी - स्कर्ट घालणारी, कधीकधी हौसेने साडी नेसणारी, आणि त्यामुळे अवघडून अधिकच लचकणारी-मुरडणारी, एरवी दाणे टिपणाऱ्या चिमणीसारखी बागडणारी, हसणारी, खिदळणारी, दोन शेपटे खांद्यावर उडवणारी, पाठीमागून येऊन पाठीत धाबकन् धपका घालणारी, अपऱ्या नाकाची, मोठ्या डोळ्यांची…

- आणि एकदम त्या मोठमोठ्या डोळ्यांमध्ये भीती साकळलेली मला दिसते. डोळे विस्फारतात. जे काय समोर दिसते, त्याचा जगड्व्याळपणा नजरेत भरून घेण्यासाठी ते रुंदावत जातात. रुंदावता रुंदावता, ती नजर फाटते.

"मोकळा होता नीलाचा स्वभाव." मित्र सांगतच असतो, "एकसारखी खिदळत असायची. तिच्या मनातही काही राहात नसे. सगळ्यांची थट्टामस्करी करायची. याची जरा विशेष. पण त्यात कुणालाच मोठंसं काही वाटत नसे. कारण ती तशी वयानं लहानच होती. असेल पंधरासोळा वर्षांची. पण फिगर वयाच्या मानानं-"

मित्राचा चेहेरा किंचित आरक्त होतो. मी चेहेरा निर्विकार ठेवण्याचा प्रयत्न करतो– आणि तो? तो हलक्या आवाजात शीळ घालू लागलेला असतो.

त्याला गप्पांत ओढण्यासाठी मी म्हणतो, "काय रे, नीला कशी काय वागायची तुझ्याशी?"

तो शीळ थांबवतो. किंचित कावराबावरा होऊन म्हणतो, "अतिशय चांगली होती. मला चिडवायची."

"काय चिडवायची?"

"मासा म्हणायची. बुळबुळीत, घाणेरडा मासा."

"मासा?" मित्र म्हणतो, "मी तर ऐकलं नाही कधी तिनं तुला मासा म्हटलेलं."

"तू कसं ऐकणार? ती मनातल्या मनात म्हणायची." एवढे बोलून तो गप्पच होतो.

बाहेरच्या फुलांच्या ताटव्यामध्ये एक कावळा शिरलेला असतो. तो एक फूल कुरतडून कुरतडून खात असतो.

"तुम्ही डॉक्टर तर नाही?" तो एकदम खडबडून जागा झाल्याप्रमाणे विचारतो. "तसं असेल तर मला तुमची काही गरज नाही; कारण माझ्यात तशी कुठलीच विकृती नाहीये."

"मी तुझा दोस्त आहे." त्याच्या खांद्यावर हलकेच थोपटल्यासारखे करीत मी म्हणतो, "पण तुला डॉक्टरांची भीती का वाटते?"

"भीती? कोण म्हणतं भीती वाटते?" तो उसळून म्हणतो, "कां वाटावी? नाहीच वाटणार. कारण मला डॉक्टरांची भीती वाटली तर तुम्ही मला हसाल. म्हणाल, की तूदेखील त्यांच्यापैकीच आहेस. ते - उन्हात पोळणारे खडक असतात ना, त्यांच्यापैकी. पाऊस पडून गेला की वयोमानापरत्वे त्यांच्यावर शेवाळ जमा होतं. -हिरवंहिरवं शेवाळ. त्या शेवाळावर पाय घसरतो. पण शेवाळ म्हणजे काही अंकुर नाही. अंकुर कधीच येत नाही- खडकावर अंकुर कधीच येत नाही…"

"हे असंच काहीतरी हा बोलतो." मित्र म्हणाला, "त्या दिवसापासून. म्हणून तर पोलिसांना काही समजेनासं झालंय. पण तोपर्यंत याची तब्येत एकदम ठणठणीत होती. वागणुकीतही काही फरक नव्हता. नाही म्हणायला थोडा गप्प गप्प असायचा. पण तसं म्हणायचं, तर आम्ही सगळेच गप्प होतो. परीक्षा जवळ आली होती. त्यामुळं अभ्यासाच्या गडबडीत होतो आम्ही. आणि पहिल्यापासून हा थोडा अबोलच आहे. त्यामुळं आम्हांलाही नवल वाटलं नाही."

एव्हापर्यंत तो पुन्हा गप्प झालेला असतो. काचेच्या तड्यावरून बोटे फिरवू लागलेला असतो, पुन्हा जणू आमच्या बोलण्यातून त्याचे लक्ष हरवते. कावळ्याने फुले पुरती कुस्करून टाकलेली आहेत. एक लांबच लांब देठ चोचीत धरून तो कुठेसा उडून जातो… बाहेर ढग जमून येतात.

“तिच्याशी याचं कधी भांडण झालं होतं?”

“भांडण करण्याइतकी मैत्री नव्हतीच त्यांची. शिवाय ती कधीच चिडत नसे. सदा हसतखिदळतच असायची.”

“याच्या वागण्यात तुम्हाला कधीच काही विचित्र आढळलं नाही म्हणता?”

“आता मुद्दाम विचार केला तर वाटतं. पण तेव्हा जाणवण्यासारखं नव्हतं.”

“काय?”

“हा शरीराची फार काळजी घ्यायचा. तासचे तास त्याच्या अंघोळीला लागायचे: आणि-आणि ते घडायच्या आदल्या आठवड्यात आणखी एक विचित्र गोष्ट घडली.”

“कुठली?”

“लांडग्यानं बकरीला खाऊन टाकली- आणि मग तिच्याशी लग्न केलं.” तो मध्येच म्हणतो आणि खुदकन हसतो.

आम्ही दोघेही नाही म्हटले तरी दचकतोच. मित्र पुन्हा स्वत:ला सावरतो नि पुढे सांगू लागतो-

“आमचं मित्रांचं एक टोळकं आहे. त्यातल्या प्रत्येकाला मधे पत्रं आली– प्रेमपत्रं. एखाद्या मुलीनं लिहावीत तशी ती होती. आमच्यापैकी प्रत्येकाला.” मित्र हसून सांगतो, “पहिल्यानं मोठी हुषारी वाटली. कुणीतरी मुलगी आपल्यासाठी- फक्त आपल्याचसाठी पागल झाली आहे, या कल्पनेनं प्रत्येकजण अगदी खुषीत आला. पण मग कळलं, की तसली पत्रं सर्वांनाच आली आहेत. मग त्यात काही अपूर्वाई राहिली नाही. कुणीतरी आपल्याला मामा बनवतंय, हे लक्षात आलं. पण कोण ते कळेना.”

“कुणी पाठवली होती ती पत्रं? नीलानं?”

“छट्! नीला इतकी वेडपट नव्हती. आम्हाला संशय आला तो या - याचा. कुणीतरी एकदम म्हणालं, की हे अक्षर याच्या अक्षरासारखं दिसतं –थोडं बदललेलं.”

“तुम्ही त्याला तसं विचारलंत?”

“कसं विचारणार? ही गोष्टच मुळी इतकी चमत्कारिक होती! एखाद्या पुरुषानंच अशी पत्रं पाठवायची म्हणजे … बरं, तसा काही तो एरवी खोड्या करणारा मुलगा नाही. तो फार गंभीर, मख्ख मुलगा होता. पण साला आम्हांला कळेना, की याच्या डोक्यात तरी कुठून आलं असेल हे? इतकं लडिवाळपणे लिहिलं होतं एकेक! तेव्हा मी त्याला याबद्दल विचारायचं ठरवलं होतं. कारण मीच त्यातल्या त्यात त्याच्या जवळचा होतो. त्याचा रूम-पार्टनर होतो; पण आजउद्या करताकरता मध्येच हे घडलं.”

मित्र बोलायचा थांबतो. एकदा बारकाईने त्याच्याकडे पाहात राहतो. त्याच्या मुद्रेवर ते भीतिदायक स्मित असतेच. त्या स्मितामागचे रहस्य कळले तर? त्याला एवढा कुठल्या गोष्टीचा आनंद झाला होता, एवढा कसला ठेवा गवसला होता, हे कळले तर?…

पण अजून तरी आम्ही होतो तिथेच आहोत. त्याच्याविषयी चार-दोन गोष्टी कळल्या आहेत. पण तरीही त्या

भयंकर घटनेकडे नेणारा एकही धागा अजून हाती लागलेला नसतो. शेवटी फिरून एकवार प्रयत्न करण्यासाठी मी विचारतो,-

"ते सारं घडलं कसं हे सांग पाहू."

"खरं म्हणजे मलाही ते नेमकं कसं घडलं हे सांगता यायचं नाही. माझाही तो अंदाजच आहे. ते तसं घडेल असं मला तेव्हा वाटलं नव्हतं. जरासुद्धा कल्पना नव्हती –आणि आता ते घडलं हे खरंसुद्धा वाटत नाही. अजून वाटतं की हॉस्टेलमध्ये गेल्यावर नीला भेटेल. तिच्या नेहेमीच्या पवित्र्यात. एक पाय उचललेला, छातीशी तिचं ते नेहेमीचं पांढरंशुभ्र मांजर धरलेलं, अशी."

"त्या संध्याकाळी कायकाय घडलं, हे क्रमाक्रमानं सांग बघू."

"सांगतो. पण खरं तर विशेष काहीच घडलं नाही त्या संध्याकाळी. असं भयंकर काहीतरी घडावं, असं वातावरणच नव्हतं."

मी हसतो. "वातावरण कथाकादंबऱ्यात असतं. नाटक-सिनेमात असतं." मी म्हणतो, "प्रत्यक्षात कुठंही, काहीही होऊ शकतं."

"संध्याकाळी आम्ही दोघेही कॉलेजातून उशिरा परतलो. कॉलेज-लायब्ररीत अभ्यास करून. वाटेनं हा विशेष काहीच बोलला नाही. एकटा मीच बोलत होतो."

"कशाबद्दल?"

मित्राचा चेहेरा लालसर होतो. काही क्षण तो गप्पच बसतो. मग हलकेच म्हणतो, "कॉलेजमधे एक मुलगी आहे. तिच्याविषयी... मला... म्हणजे अजून आम्ही तसं काही ठरवलेलं नाही. पण आमची तशी फार दाट मैत्री आहे. त्या-त्या मुलीविषयी बोलत होतो मी."

"तो काय म्हणाला त्यावर?"

"काही विशेष नाही. कारण नाहीतरी त्याला मुलीबिलींविषयी बोलायला आवडतच नाही. मीही एरवी कधीच तसं काही बोलत नाही त्याच्याजवळ. त्या दिवशीच राहवलं नाही म्हणून-"

अगदी अचानकपणे पावसाला सुरुवात होते. झरझरझरझर आभाळ गळू लागते. बाहेरची झाडेपाने भिजून चिंब होतात. खिडकीतून पाणी आत येऊ लागते. मी खिडकी लावून घेतो.

"तर आम्ही खोलीवर आलो. हा अंघोळीला गेला. मी जेवायला गेलो खाली मेसमध्ये. त्याला भूक नव्हती. खाली जाताना वाटेत मला नीला भेटली. ती नेहमीप्रमाणंच खूप आनंदात होती. तिच्या हातांत तिचं ते पांढरं मांजर होतंच. घरात ती एकटीच राहणार होती - तिच्या घरची मंडळी जलशाला जाणार होती, आणि दुसरं म्हणजे तिला क्लासिकल गाण्यात इंटरेस्ट नव्हता, म्हणून. 'घरात एकटं राहायला भीती वाटत नाही का?' असं मी विचारलं, तर ती उलट माझ्याच भित्रेपणाला हसली."

"ती घरी एकटीच असणार, हे त्याला माहीत होतं?"

"हो. नंतर कधीतरी मीच सहज बोलून गेलो."

"नंतर कधी?"

"जेवणानंतर. आम्ही अभ्यासाला बसलो. पण अभ्यासात लक्ष लागेना. म्हणून आम्ही थोडे फिरायला गेलो. त्या वेळेस बोललो मी."

“फेरायला गेलात, तेव्हा विशेष काही घडलं?”

“नाही. तो गप्पच होता. हे तेव्हा मलाही थोडं विचित्र वाटलं. मनात काहीतरी खळबळ चालली असावी त्याच्या. कसलातरी विचार… बस्स्! यापलीकडे काही नाही.”

“नंतर?”

खिडक्या लावून घेतल्यामुळे आणि बाहेरही अंधारून आल्यामुळे खोली काळोखून गेली होती. मी उठतो आणि दिवा लावतो. तिघांचेही चेहेरे पिवळट उजेडात न्हाऊन, विचित्र दिसू लागतात.

“आम्ही रूमवर परत आलो नि झोपलो. मग तो मध्येच उठला. मला अर्धवट जाग आली. तो दिवा न लावताच बाहेर जाऊ लागला. मी त्याला हटकलं. तो म्हणाला, “बाथरूममध्ये जाऊन येतो.” -आणि गेला.

“थोड्याच वेळात माझी झोप उडाली. हा अजून कसा परत येत नाही, अशा विचारानं मी अंथरुणात उठून बसलो. मग बाथरूममध्ये पाहून आलो. तिथं कुणीच नव्हतं. एकदम मला थोड्या वेळापूर्वीचं बोलणं आठवलं. मनात काय आलं कोण जाणे, मी पळतपळत वर गेलो. रेक्टरांच्या घराशी. त्यांच्या घराबाहेर मोठी गच्ची आहे. गच्चीच्या तोंडाशी चांदण्यात पांढरं मांजर सावल्यांशी खेळत होतं. त्याला ओलांडून मी पुढं गेलो- आणि विलक्षण दचकलो!”

“काय दिसलं तुला?”

“हा-हा चांदण्यात उभा होता. त्याची काळीकुट्ट आकृती एखाद्या मोठ्या गोरिलासारखी दिसत होती. त्याच्या मिठीत नीला होती, आणि तिची मान निर्जीवपणं एका बाजूला कलंडली होती. डोळे सताड उघडे होते. तोंड पांढरंफटक पडलं होतं. यानं तिला गच्च कवटाळून धरलं होतं आणि हा अधाशासारखा, भ्रमिष्टासारखा, तिच्या शरीराच्या प्रत्येक भागाची चुंबनं घेत होता…”

बाहेर गडगडते आणि पावसाची एक मोठी सर येते. तावदानांवरून पाण्याचे ओघळच्या ओघळ सांडू लागतात आणि काचेला शेकडो तडे पडल्यासारखे दिसू लागतात.

काही वेळ आम्ही कुणीच काही बोलत नाही. आता काळोखलेल्या त्या पांढऱ्याशुभ्र खोलीत आम्ही गुदमरून गेल्यासारखं गप्प बसून राहतो. पाहिले त्याच्या आठवणीने शहारून मित्र अवाक् झाला आहे. मी विचारांच्या आवर्तात सापडल्यामुळं बोलू शकत नाही. खरे तर मी गोंधळून गेलो आहे. आतापर्यंत कळलेल्या हकीगतीवरून हे सारे का घडले, यावर काहीच प्रकाश पडत नाही. काय झाले हे तर मलाही माहीत आहे. पण कां झाले हेच तर गूढ आहे. कां?…

आणि ज्याच्या संदर्भात हे सगळे चालले आहे तो मात्र विलक्षण आनंदी मुद्रेने काचेवरून बोटे फिरवीत बसलेला असतो…

सांगितले तर एकटा तोच सांगू शकेल. कां त्याने असे केले? त्याच्या गुन्ह्याचा साक्षीदार माझ्यासमोर आहे; पण त्याच्या मनाचा साक्षीदार?…

त्याला बोलता केला पाहिजे. कसेही करून त्याला बोलता केला पाहिजे…

“कां केलंस तू हे? कां?” मी त्याला विचारतो. प्रत्यक्ष त्यालाच. सरळपणे.

“मला तसं करणं भाग होतं.”

“कुणी भाग पाडलं तुला?”

“माझ्या मनानं.”

पुन्हा बंद दरवाजा. काळोख.

“आता तुला समाधान वाटतंय?”

“अर्थातच. फार फार आनंदात आहे मी.”

“कसला आनंद झालाय तुला?”

“जगण्याचा. आपण कधीकधी स्वप्नात मरतो, माहीत आहे? आणि मग जागं होऊन पाहतो, तर आपण जिवंतच असतो. असं आपण जिवंत आहोत, हे कळण्यात जो आनंद असतो-”

“नुसतं जिवंत असून उपयोग काय? तुला नाही वाटत यात काहीतरी विकृत आहे म्हणून?”

“काय म्हणालात? विकृत?” तो संतापाने उठून उभा राहतो. “मी विकृत नाही!…मी विकृत नाही!” तो संतापाने थरथरू लागतो.

मला एकदम एक धागा सापडतो. तो कुठल्या शब्दाला घाबरतो, हे लक्षात येते.

“नाही कसा? तू विकृत आहेस!” मी मुद्दामच ओरडतो.

त्याचा चेहेरा संतापाने लालबुंद होतो. ते भयानक हास्य काही क्षण तरी पुसले जाते. हाताच्या मुठी वळून तो ओरडतो, “तुम्हाला काय समजतंय? मी चारचौघांसारखाच आहे. माझ्यात कसलीच विकृती नाही.”

मी त्याच्या वळलेल्या मुठी दोन्ही हातांत धरतो. अगदी जवळ उभा राहून त्याच्या डोळ्याला डोळा देऊन म्हणतो, “कबूल कर! सांगून टाक तुला काय होतंय ते!”

माझ्या हाताला हिसडा देऊन तो त्वेषाने ओरडतो, “सो यू आर अ ब्लडी डॉक्टर, हं? पण मला गरज नाही! कुठल्याही डॉक्टरची मला गरज नाही!”

ओरडतच तो दाराबाहेर पडतो. चार पावले पळाल्यावर थांबतो. तसाच पाऊस अंगावर घेत ओरडतो, -“मला डॉक्टरकडे नेतात काय? कां? तर डॉक्टरांना एक नवीन भक्ष्य मिळावं, म्हणून!” मी दारात जाऊन उभा राहतो. तो वळून हातवारे करीत पावसात भिजत माझ्यावर ओरडत असतो, “डॉक्टर!… काय करणार डॉक्टर? मला झोपवणार … कपडे काढायला लावणार … माझं ते नागडं शरीर बघणार … आणि माझी कीव करणार…मनातल्या मनात मला हसणार. माझी टिंगल करणार… नकोय मला ते! मला उपाय सापडलाय एक. तो वापरून पाह्यलाय मी! - आणि कुठल्याही डॉक्टरकडे न जाता मला कळलंय की मी पुरुष आहे! तुम्हा दोघांसारखाच मीसुद्धा पुरुष आहे!”

आम्ही दोघेही चकित होऊन ऐकत उभे राहतो. मला तर त्याच्या बोलण्याचा अर्थच उलगडत नाही. पण त्याच्या मित्रालाही हे नवीनच असावे. मी तसाच पावसातून पुढे होतो, आणि झेप घेऊन त्याला पकडतो.

तो सुटण्याची धडपड करू लागतो. पण माझी पकड घट्ट असते. आभाळ गडगडते आणि आणखी एक झड येते. एव्हाना आम्ही दोघेही चिंब भिजून गेलेलो असतो. हळूहळू त्याचा विरोध थांबतो. थकल्यासारखा तो माझ्या हाताच्या आधाराने उभा राहतो. रडवेल्या आवाजात बोलू लागतो,-

“त्या क्षणापर्यंत मला वाटत होतं, की मी पुरुष नाही. माझं शरीर निरुपयोगी आहे. मी एक झाड होतो आणि त्या झाडाला एकच एक पिवळं दुबळं पान होतं. कदाचित माझ्या कल्पनेनंच माझ्यात दोष निर्माण झाला असेल. तसं नसतं तर परवा मी एकाएकी पुरुष कसा झालो असतो?”

त्याचा तोल आता सुटलेला असतो. तो एकसारखा न थांबता बोलत राहतो,-

“कुणी म्हणालं, की तू त्या ठिकाणी जा. तिथं तुला पुरुषासारखं आपोआप वागता येईल. म्हणून मी तिथं गेलो. - त्या बाजारात. एका अंधाऱ्या जिन्यावरून गेलो. एक मळकट गादी होती आणि एक चेहेरा रंगवलेली सुसर हळूहळू पुढं सरकत होती. आणि एकदम आजूबाजूची सगळी दारं बंद झाली. उरलो फक्त दोघं-सुसर आणि मी. वरती छपरातली मधली कौलं गेली होती. कुणीतरी तिथं डोळे लावून बसलंय् असं वाटत होतं आणि सुसर हळूहळू पुढं सरकत होतीच. किड्क्या अजस्र दातांमध्ये मांसाचा रक्ताळलेला तुकडा पानासारखा चघळीत. एकेक करताकरता प्रत्येक कौलाला दोनदोन डोळे फुटले. सुसर हळूहळू माझे कपडे सोडू पाहू लागली आणि कौलांचे डोळे तर माझ्यावर रोखलेलेच होते…

“मी विलक्षण घाबरून गेलो. शरमून गेलो. खिशातल्या नोटा तिच्या अंगावर भिरकावल्या, आणि कपडे गच्च धरून तिथून पळत सुटलो. तरी त्या सुसरीचं हसणं मला खालपर्यंत ऐकू येत होतं. कालपर्यंत ऐकू येत होतं.”

मी त्याला खोलीत आणून तिथल्या बिछान्यावर झोपवतो. अजूनही त्याची गडबड चालूच असते. तक्तपोशीकडे पाहात तो बडबडत असतो,-

“हॉस्टेलमधे नीला हसायची तेव्हा तिच्या हसण्यातून मला तेच - त्या तोंड रंगवलेल्या सुसरीचं हसणं ऐकू यायचं. वाटायचं, हिला माझं रहस्य माहीत आहे. म्हणून ही मला मुद्दाम चिडवत्येय.”

शटरमधून वाऱ्याचा झोतच्या झोत आत येतो. खोलीतला दिवा एकदम एक मोठा झोका खातो. आम्हा तिघांच्या प्रचंड सावल्या पांढऱ्या भिंतीवर हिंदकळतात.

“त्या रात्री नीला घरी एकटीच असणार होती. मी तिच्याजवळ गेलो. वाटलं इथं कौलांना डोळे असणार नाहीत; इथं कुबट वास, मळकट गादी असणार नाही. इथं मी घाबरणार नाही. इथं मला पुरुषासारखं वागता येईल. पुन्हा ती मला हसणार नाही…

“ती गच्चीत उभी होती. चंद्राकडे बघत. पाठमोरी. मी पाठीमागून जाऊन तिला गच्च धरलं. ती ओरडू नये म्हणून एक हात तिच्या तोंडावर धरला. दुसरा गळ्याशी आला.

“आणि एकदम एक चमत्कार घडला. मला एकाएकी एक नवीनच जाणीव झाली. मी दोन्ही हातांनी तिचा गळा धरला. तिच्या गळ्यातली हसणारी सुसर एकदम गप्प झाली. माझी बोटं जितकी आत जाऊ लागली तसतसा माझ्यातला पुरुष जागा होऊ लागला. माझं शरीर तापू लागलं. रक्ताचा प्रवाह वर चढू लागला. मला जाणवू लागलं : मी पुरुष आहे. बोटं अधिक खोलवर रुतली. … माझी खात्री होऊ लागली : माझ्यात कसलीही विकृती नाही. बोटं खोल खोल गच्च रुतून बसली. मजा आला … मजा … मी तिची मान सोडली नाही. माझी खात्री पटली. … मजा आला मजा!”

हर्षातिरेकानं तो हसत सुटतो.

“केवढा आनंद!… मनावरचा केवढा भार गेला. किती दिवसांपासूनची भीती… केवढी काळजी… सगळी दूर झाली. -एकदम दूर झाली. मी सुटलो… मजा आला मजा!” तो खदखदा हसत सुटतो. “आता कुणी म्हणू शकणार नाही, की मी पुरुष नाही! मी पुरुष आहे! पुरुष आहे!”

“एकूण तुला गुन्हा कबूल आहे तर?” त्याचे हसणे ऐकवेनासे होते, ते थांबवण्यासाठी मी विचारतो.

“हो. कबूल आहे.” तो थकल्यासारखा येऊन खुर्चीवर बसतो. पुन्हा काचेवरून बोटे फिरवू लागतो. “मीच ती पत्रं लिहिली. प्रेमपत्रं. मला तसं कां करावंसं वाटलं कोण जाणे. पण मी कबूल करतो, या साऱ्यांना मीच पत्रं-”

“पत्रांविषयी नाही बोलत मी. नीलाविषयी बोलतोय. तू नीलाचा गळा दाबून जीव घेतलास, त्याविषयी.”

क्षणभर त्याचे डोळे कावरेबावरे होतात. एखाद्या भयभीत अर्भकाप्रमाणे इकडेतिकडे पाहात तो विचारतो, “काय म्हणालात तुम्ही? नीलाचा जीव घेतला? कुणी?”

“तू! तू नीलाला मारलंस!”

त्याच्या मुद्रेवर पुन्हा मघाचे ते भीतिजनक स्मित उमटते. हायसे वाटल्यासारखे. तो म्हणतो, “काय घाबरलो मी! एकूण तुम्ही माझी थट्टा करताय तर! मी नीलाला मारलं? मी कसा मारीन नीलाला? माझं-माझं तिच्यावर विलक्षण प्रेम आहे. तिनंच तर मला पुरुष बनवलं! छे छे! मी तिला मारणार नाही. मला ती हवी आहे. शिक्षण संपलं की मी तिच्याशी लग्न करणार आहे… लग्न करणार आहे…”

-आणि तो पुन्हा हलकी शीळ घालू लागतो.

पावसाचे पाणी भिंतीवरून झिरपू लागलेले असते.



रत्नाकर मतकरी

‘खेकडा’ या कथासंग्रहातील बहुतेक सर्वच कथांमधून जे भय दाटून राहिलेले आहे, ते वाचकाला कडकडून दंश करणारे आणि जिव्हारी झोंबणारे आहे. या भयात वाचकाचे अवघे मनोव्यापार झपाटून टाकण्याची शक्ती आहे. या कथा वाचून अंगावर जो सरसरुन काटा उभा राहतो तो दीर्घकाळ तसाच टिकून राहतो, कारण या कथा मूलभूत वास्तवाला कधी विसरत नाहीत.

जसे ‘तुमची गोष्ट’ आरंभीच लेखक सांगतो, ‘ही तुमची गोष्ट आहे म्हणजे तुमच्याही बाबतीत घडू शकेल अशी’ आणि शेवटीही निक्षून सांगतो,‘तुमची म्हणून सांगितलेली ही गोष्ट तुमची नव्हेच. एक आपली शक्यता सांगितलेली एवढेच.’ पण तरीही या कथेत ज्या थरारक अनुभवांचे निवेदन आहे, त्याचा प्रभाव इतका विलक्षण आहे की अपराधाचा स्पर्श तुमच्या मनीमानसी नसूनही तुमच्या गळ्याभोवती फासाचा स्पर्श झाल्याची भावना तुम्ही अनुभवता.

रत्नाकर मतकरी हे एक सिद्धहस्त कथाकार आहेत आणि या कथासंग्रहातील कथा मराठी

भाषेत तरी दुर्मिळ अशा आहेत. या कथांचे अन्य भाषांतून अनुवाद झाले तर ते फक्त मतकरींचेच प्राप्त यश वृद्धिंगत करतील असे नव्हे, तर परिणामी मराठी भाषेलाही ललामभूत ठरतील.



रत्नाकर मतकरी

“मनाची टोचणी चालूच होती. आपण एका माणसाला मरू दिलं,

फासावर लटकवलं, हे मनाला खातच होतं. कुठंही दोरी दिसली, की ते सारं आठवायचं. मग हाताचा चाळा सुरू व्हायचा. सहज दोरीची गाठ मारली जायची. माझं वागणं शहाणपणाचं नव्हतं, हे माझं मलाच कळत असे.

पण दोरी पाहिली की ती रात्र डोक्यात फिरायची,

आणि घरात सगळीकडे दोऱ्या. चिकाच्या पडद्याला दोरी, ताक घुसळायला दोरी, आंघोळ करायला घरामागच्या विहिरीवर जावं, तर चांगला जाडजूड दोरखंड.

त्या दोरखंडाचा गच्च फास कळशीभोवती आवळताना, ती रात्र डोळ्यासमोर यायची. जीव गलबलायचा. मी रहाट गडगडत सोडून द्यायचा,

आणि तळापासून थोड्या अंतरावर कळशी तशीच लोंबकळत ठेवायचा.

अधांतरी… फाशी गेलेल्या माणसासारखी.”

मतकरी यांच्या कथा वाचताना भीती वाटते, पण त्या निव्वळ भयकथा नाहीत. त्यांना गूढतेचे एक अस्तर आहे. त्यांच्या कथांत भुते आहेत. पण त्या लौकिक अर्थाने भूतकथा नाहीत… त्यांचा पल्ला या पलीकडचा आहे.

प्राध्यापक शाळिग्रामांना फाशीच्या बखळीत कुणीतरी भेटतो.

ते त्याला फाशी देतात आणि शेवटी… सारेच अजब;

पण अजब वाटत नाही तो प्राध्यापकांचा ‘–गिल्ट कॉम्प्लेक्स!’

– धोंडो विठ्ठल देशपांडे

गूढकथेला मानवी मनाचे कंगोरे देणाऱ्या, आणि त्यामुळेच मराठी कथासाहित्यात अढळपद मिळवणाऱ्या, रत्नाकर मतकरी

यांच्या कथांचा आगळावेगळा संग्रह.

वास्तव आणि त्यापलीकडचे वास्तव, यांच्यातील धूसर सीमारेषेवरच्या गूढकथांचा संग्रह.

संभ्रमाच्या लाटा

रत्नाकर मतकरी

काळोखातून आपल्याच दु:खाची वाट चालत नंदिता
स्मशानभूमीत येऊन पोहोचलेली. लांबवर एक चिता जळत
असलेली. तिचा अंधुक उजेड सगळीकडे पसरलेला. तोही मधूनमधून
कमीजास्त होत असलेला. धाप लागल्यासारखा.
इथेच-इथेच तो आला! सैरभैर ती त्याला शोधते. हे सगळे
हरवलेल्यांचे जग! इथे कोण कुठे, अग्नीचे पांघरूण लपेटून चिरनिद्रा
घेता घेता नाहीसे झाले, ते कसे कळणार? पण नाहीसे झाले म्हणजे
सर्वत्र पसरले... पंचमहाभूतात मिसळले... म्हणजे इथेच-इथल्याच
कणाकणात तो आहे... आणि नाहीही...
नंदिता भ्रमिष्ट होऊन गेली...
घाटाच्या पायऱ्या उतरून ती गंगेच्या पाण्याजवळ उभी
राहिली...
पाणी पंचमहाभूतांपैकीच एक. नंदन यातही मिसळला असेल
का? मला त्याच्याबरोबरच पंचमहाभूतात विलीन होता येईल का?

का नाही येणार?... समोर पसरलेले हे पात्र... काळोखाचे रहस्य उघडणारे हे दार... मी या दारातून आत गेले, तर काळोखात मिसळलेल्या नंदनशी माझी भेट होईल...?

रत्नाकर मतकरी यांच्या विलक्षण वर्णनशैलीने नटलेल्या, वास्तव आणि त्यापलीकडचे वास्तव, यांच्यातील धूसर सीमारेषेवरच्या गूढकथांचा हा संग्रह.

जीवनाचे व मानवी मनाचे खोल, अर्थपूर्ण आणि समृद्ध दर्शन घडवणारे



रत्नाकर मतकरी

मरणाला जिंकता यायला हवं. हे मरण भयंकर असतं.
या मरणानं मला दोनदा निराधार केलं.
मी– मी त्याचा सूड घेईन! मी जिंकेन मरणाला!
मला कैवल्यवाणी येते.....
निरामयीनं पोथी समोर धरली आणि हात जोडले.
तत्क्षणी काळ्याभोर आकाशात वीज कडाडली.

कोसळली तो नेमकी पांडेतांच्या वाड्यावर!
वाडा गदगदा हलला. क्षणमात्र!
आणि दुसऱ्याच क्षणी त्याचं छप्पर ढासळलं.
बाजूच्या भिंतींना मोठमोठे तडे गेले.
निरामयीच्या डोक्यावरची तुळई एका बाजूनं सुटली
आणि खाली येऊ लागली.
भयचकित होऊन निरामयी त्या तुळईकडे पाहतच राहिली.
त्या भयानक क्षणी तिला बाजूला व्हायचंही भान राहिलं नाही.
वरून खाली येणाऱ्या मृत्यूकडे ती डोळे विस्फारून
बघत राहिली. तिनं मृत्यूला डिवचलं होतं.
ती पोथी वाचायची असा निश्चय करून!
म्हणून मृत्यू तिच्या रोखानं चाल करून येत होता.

मतकरींच्या गूढकथा हा त्यांच्या कलानिर्मितीचा एक अत्यंत वेधक,
लोभसवाणा आविष्कार आहे. मतकरींच्या गूढकथांना उदंड यश
लाभले आहे. त्यांच्या गूढकथांतून जीवनाचे आणि मानवी मनाचे
असेच खोल, अर्थपूर्ण आणि समृद्ध दर्शन घडत राहावे.